| १२९ | नाईक, श्री. राजन बाळकृष्ण (नालासोपारा) | ३ | ४ | ४२.८६ |
| १३० | नाईक, श्री. शिरिषकुमार सुरुपसिंग (नवापूर) | ७ | ० | १००.०० |
| १३१ | नार्वेकर, ॲड. राहुल सुरेश (कुलाबा) | मा.अध्यक्ष | | |
| १३२ | निकम, श्री. शेखर गोविंदराव (चिपळूण) | ७ | ० | १००.०० |
| १३३ | निकोले, श्री. विनोद भिवा (डहाणू) | ५ | २ | ७१.४३ |
| १३४ | निलंगेकर पाटील, श्री. संभाजीराव दिलीपराव (निलंगा) | १ | ६ | १४.२९ |
| १३५ | पटेल, श्री. अमिन (मुंबादेवी) | ७ | ० | १००.०० |
| १३६ | पटेल, श्री. मुरजी (काका) (अंधेरी पूर्व) | ७ | ० | १००.०० |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १३७ | पटोले, श्री. नानाभाऊ फाल्गुनराव (साकोली) | ६ | १ | ८५.७१ |
| १३८ | पठाण, श्री. साजिद खान (अकोला पश्चिम) | ६ | १ | ८५.७१ |
| १३९ | पठारे, श्री. बापूसाहेब तुकाराम (वडगाव शेरी) | ५ | २ | ७१.४३ |
| १४० | पडळकर, श्री. गोपीचंद कुंडलिक (जत) | ६ | १ | ८५.७१ |
| १४१ | पवार, श्री. अजित अनंतराव (बारामती) | मा.उपमुख्यमंत्री | | |
| १४२ | पवार, श्री. नितीनभाऊ अर्जुन (ए.टी.) (कळवण) | ५ | २ | ७१.४३ |
| १४३ | पवार, श्री. अभिमन्यू दत्तात्रय (औसा) | ६ | १ | ८५.७१ |
| १४४ | पवार, श्री. राजेश संभाजीराव (नायगाव) | ६ | १ | ८५.७१ |
| १४५ | पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड) | ३ | ४ | ४२.८६ |
| १४६ | पाचपुते, श्री. विक्रम बबनराव (श्रीगोंदा) | ७ | ० | १००.०० |
| १४७ | पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर) | ७ | ० | १००.०० |
| १४८ | पाटील, श्री. अभिजीत धनंजय (माढा) | ७ | ० | १००.०० |
| १४९ | पाटील, श्री. अमोल चिमणराव (एरंडोल) | ७ | ० | १००.०० |
| १५० | पाटील, श्री. अशोक धर्मराज (भांडुप पश्चिम) | ५ | २ | ७१.४३ |
| १५१ | पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा) | ५ | २ | ७१.४३ |
| १५२ | पाटील, श्री. गुलाबराव रघुनाथ (जळगाव ग्रामीण) | मा.मंत्री | | |
| १५३ | पाटील, श्री. चंद्रकांत निंबा (मुक्ताईनगर) | ० | ० | ०.०० |
| १५४ | पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चु (कोथरुड) | मा.मंत्री | | |
| १५५ | पाटील, श्री. जयंत राजाराम (इस्लामपूर) | ५ | २ | ७१.४३ |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १५६ | पाटील, श्री.नारायण (आबा) गोविंदराव (करमाळा) | ७ | ० | १००.०० |
| १५७ | पाटील चिखलीकर, श्री. प्रतापराव गोविंदराव (लोहा) | ४ | ३ | ५७.१४ |
| १५८ | पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपुर) | मा.मंत्री | | |
| १५९ | पाटील, श्री. रविशेठ (पेण) | ५ | २ | ७१.४३ |
| १६० | पाटील, श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर (धुळे ग्रामीण) | ६ | १ | ८५.७१ |
| १६१ | पाटील (यड्रावकर), श्री. राजेंद्र शामगोंडा (शिरोळ) | ५ | २ | ७१.४३ |
| १६२ | पाटील, श्री. राणाजगजितसिंग पद्मसिंह (तुळजापुर) | ४ | ३ | ५७.१४ |
| १६३ | पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी) | ६ | १ | ८५.७१ |
| १६४ | पाटील, श्री. रोहित सुमन आर.आर. आबा (तासगाव-कवठे महांकाळ) | ५ | २ | ७१.४३ |
| १६५ | पाटील, श्री. सचिन (फलटण) | १ | ६ | १४.२९ |
| १६६ | पाटील, श्री. शिवाजी शट्टप्पा (चंदगड) | ६ | १ | ८५.७१ |
| १६७ | पाडवी, श्री. आमश्या फुलजी (अक्कलकुवा) | ६ | १ | ८५.७१ |
| १६८ | पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा) | ६ | १ | ८५.७१ |
| १६९ | पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर) | ७ | ० | १००.०० |
| १७० | पुराम, श्री. संजय (आमगाव) | ७ | ० | १००.०० |
| १७१ | पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना) | ० | ० | ०.०० |
| १७२ | पंडित, श्री. विजयसिंह शिवाजीराव (गेवराई) | ७ | ० | १००.०० |
| १७३ | पिंपळे, श्री. हरीश मारोतीअप्पा (मुर्तीजापूर) | ७ | ० | १००.०० |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १७४ | प्रभू, श्री. सुनिल वामन (दिंडोशी) | ७ | ० | १००.०० |
| १७५ | फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव (नागपूर दक्षिण पश्चिम) | मा.मुख्यमंत्री | | |
| १७६ | फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य) | ३ | ४ | ४२.८६ |
| १७७ | फुंडकर, श्री. आकाश पांडुरंग (खामगाव) | मा.मंत्री | | |
| १७८ | बकाने, श्री. राजेश भाऊराव (देवळी) | ५ | २ | ७१.४३ |
| १७९ | बडोले, श्री. राजकुमार सुदाम (अर्जुनी-मोरगाव) | ७ | ० | १००.०० |
| १८० | बनकर, श्री. दिलीपराव शंकरराव (निफाड) | ५ | २ | ७१.४३ |
| १८१ | बनसोडे, श्री. अण्णा दादू (पिंपरी) | मा.उपाध्यक्ष | | |
| १८२ | बनसोडे, श्री. संजय बाबुराव (उदगीर) | ५ | २ | ७१.४३ |
| १८३ | बाबर, श्री. सुहास अनिलभाऊ (खानापूर) | ६ | १ | ८५.७१ |
| १८४ | बालदी, श्री. महेश (उरण) | ३ | ४ | ४२.८६ |
| १८५ | बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णराव (कामठी) | मा.मंत्री | | |
| १८६ | बोरनारे, श्री. रमेश नानासाहेब (वैजापुर) | ७ | ० | १००.०० |
| १८७ | बोरसे, श्री. दिलीप मंगळू (बागलाण) | ७ | ० | १००.०० |
| १८८ | बंब, श्री. प्रशांत बन्सीलाल (गंगापूर) | ५ | २ | ७१.४३ |
| १८९ | बांगर, श्री. संतोष लक्ष्मणराव (कळमनुरी) | ६ | १ | ८५.७१ |
| १९० | भरणे, श्री. दत्तात्रय विठोबा (इंदापूर) | मा.मंत्री | | |
| १९१ | भातखळकर, श्री. अतुल (कांदिवली पूर्व) | ७ | ० | १००.०० |
| १९२ | भारसाकळे, श्री. प्रकाश गुणवंतराव (आकोट) | ० | ० | ०.०० |
| १९३ | भुजबळ, श्री. छगन (येवला) | मा.मंत्री | | |
| १९४ | भुमरे, श्री. विलास संदिपानराव (पैठण) | ५ | २ | ७१.४३ |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १९५ | भुसे, श्री. दादाजी दगडू (मालेगाव बाह्य) | मा.मंत्री | | |
| १९६ | भोईर, श्री. विश्वनाथ आत्माराम (कल्याण पश्चिम) | ० | ० | ०.०० |
| १९७ | भोयर, डॉ. पंकज राजेश (वर्धा) | मा.राज्यमंत्री | | |
| १९८ | भोये, श्री. हरिश्चंद्र सखाराम (विक्रमगड) | ६ | १ | ८५.७१ |
| १९९ | भोसले, डॉ. अतुलबाबा सुरेश (कराड दक्षिण) | | | |
| २०० | भोसले, श्री. शिवेंद्रराजे अभयसिंहराजे (सातारा) | मा.मंत्री | | |
| २०१ | भोळे, श्री. सुरेश (राजू मामा) दामु (जळगाव शहर) | ७ | ० | १००.०० |
| २०२ | भांगडिया, श्री. बंटी मितेश (चिमूर) | ५ | २ | ७१.४३ |
| २०३ | भोंगळे, श्री. देवराव विठोबा (राजुरा) | ७ | ० | १००.०० |
| २०४ | भोंडेकर, श्री. नरेंद्र भोजराज (भंडारा) | ६ | १ | ८५.७१ |
| २०५ | मते, श्री. मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण) | ६ | १ | ८५.७१ |
| २०६ | मलिक, सना (अणुशक्ती नगर) | ७ | ० | १००.०० |
| २०७ | मसराम, श्री. रामदास मळूजी (आरमोरी) | ७ | ० | १००.०० |
| २०८ | महाजन, श्री. गिरीश दत्तात्रय (जामनेर) | मा.मंत्री | | |
| २०९ | महाडीक, श्री. अमल महादेवराव (कोल्हापूर दक्षिण) | ५ | २ | ७१.४३ |
| २१० | महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली) | ७ | ० | १००.०० |
| २११ | माने, दलितमित्र डॉ. अशोकराव (बापू) (हातकणंगले) | ४ | ३ | ५७.१४ |
| २१२ | मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती) | मा.राज्यमंत्री | | |
| २१३ | मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली) | ७ | ० | १००.०० |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २१४ | मुंडे, श्री. धनंजय पंडितराव (परळी) | ३ | ४ | ४२.८६ |
| २१५ | मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (केज) | ३ | ४ | ४२.८६ |
| २१६ | मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर) | ६ | १ | ८५.७१ |
| २१७ | खलिक, मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल (मालेगाव मध्य) | ५ | २ | ७१.४३ |
| २१८ | मुश्रीफ, हसन मियालाल (कागल) | मा.मंत्री | | |
| २१९ | मेघे, श्री. समीर दत्तात्रय (हिंगणा) | ७ | ० | १००.०० |
| २२० | मेश्राम, श्री. संजय नारायणराव (उमरेड) | ६ | १ | ८५.७१ |
| २२१ | मेहता, श्री. नरेंद्र (मिरा भाईंदर) | २ | ५ | २८.५७ |
| २२२ | मोरे, श्री. राजेश गोवर्धन (कल्याण ग्रामीण) | ७ | ० | १००.०० |
| २२३ | मोरे, श्री. शांताराम तुकाराम (भिंवडी ग्रामीण) | ७ | ० | १००.०० |
| २२४ | म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर) | ४ | ३ | ५७.१४ |
| २२५ | मांगुळकर, श्री. अनिल ऊर्फ बाळासाहेब शंकरराव (यवतमाळ) | ३ | ४ | ४२.८६ |
| २२६ | मांडेकर, श्री. शंकर हिरामण (भोर) | ७ | ० | १००.०० |
| २२७ | यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर) | ७ | ० | १००.०० |
| २२८ | यावलकर, श्री. उमेश ऊर्फ चंदू आत्मारामजी (मोर्शी) | ७ | ० | १००.०० |
| २२९ | रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा) | ६ | १ | ८५.७१ |
| २३० | राऊत, डॉ. नितीन काशिनाथ (नागपूर उत्तर) | ७ | ० | १००.०० |
| २३१ | राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी) | ४ | ३ | ५७.१४ |
| २३२ | राजळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव) | ४ | ३ | ५७.१४ |
| २३३ | राठोड, श्री. तुषार गोविंदराव (मुखेड) | ० | ० | ०.०० |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २३४ | राठोड, श्री. संजय दुलिचंद (दिग्रस) | मा.मंत्री | | |
| २३५ | राणा, श्री. रवि गंगाधरराव (बडनेरा) | ७ | ० | १००.०० |
| २३६ | राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली) | मा.मंत्री | | |
| २३७ | राणे, श्री. निलेश नारायण (कुडाळ) | ७ | ० | १००.०० |
| २३८ | रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (शिंदखेडा) | मा.मंत्री | | |
| २३९ | रासने, श्री. हेमंत नारायण (कसबा पेठ) | ७ | ० | १००.०० |
| २४० | लवटे, श्री.गजानन मोतीराम (दर्यापूर) | | | ०.०० |
| २४१ | लहामटे, डॉ. किरण यमाजी (अकोले) | ६ | १ | ८५.७१ |
| २४२ | लोढा, श्री. मंगलप्रभात गुमानमल (मलबार हिल) | मा.मंत्री | | |
| २४३ | लंघे, श्री. विठ्ठल वकिलराव (नेवासा) | ७ | ० | १००.०० |
| २४४ | लांडगे, श्री. महेश (दादा) किसन (भोसरी) | ५ | २ | ७१.४३ |
| २४५ | लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब (चांदिवली) | ६ | १ | ८५.७१ |
| २४६ | वडेट्टीवार, श्री. विजय नामदेवराव (ब्रह्मपूरी) | ७ | ० | १००.०० |
| २४७ | वळसे पाटील, श्री. दिलीप दत्तात्रय (आंबेगाव) | ३ | ४ | ४२.८६ |
| २४८ | वानखडे, श्री. राजेश श्रीरामजी (तिवसा) | ७ | ० | १००.०० |
| २४९ | वानखेडे, श्री. किसन मारोती (उमरखेड) | ७ | ० | १००.०० |
| २५० | वानखेडे, श्री. सुमित (आर्वी) | ६ | १ | ८५.७१ |
| २५१ | विखे पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी) | मा.मंत्री | | |
| २५२ | विटेकर, श्री. राजेश उत्तमराव (पाथरी) | ५ | २ | ७१.४३ |
| २५३ | वुईके, प्रा. डॉ. अशोक रामाजी (राळेगाव) | मा.मंत्री | | |
| २५४ | शाह, श्री. पराग (घाटकोपर पूर्व) | ३ | ४ | ४२.८६ |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २५५ | शिंदे, श्री. एकनाथ संभाजी (कोपरी-पाचपाखाडी) | मा.उपमुख्यमंत्री | | |
| २५६ | शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव) | ६ | १ | ८५.७१ |
| २५७ | शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | मा.मंत्री | | |
| २५८ | शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल (शिवाजी नगर) | ६ | १ | ८५.७१ |
| २५९ | शिवतारे, श्री. विजयबापू (पुरंदर) | ७ | ० | १००.०० |
| २६० | शेख, अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम) | ६ | १ | ८५.७१ |
| २६१ | शेख, रईस कासम (भिवंडी पूर्व) | ७ | ० | १००.०० |
| २६२ | शेलार, ॲड. आशिष (वांद्रे पश्चिम) | मा.मंत्री | | |
| २६३ | शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ) | ७ | ० | १००.०० |
| २६४ | सत्तार, अब्दुल (सिल्लोड) | ७ | ० | १००.०० |
| २६५ | सरदेसाई, श्री. वरुण सतिश (वांद्रे पूर्व) | ६ | १ | ८५.७१ |
| २६६ | सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजिवडा) | मा.मंत्री | | |
| २६७ | साकोरे-बोर्डिकर, श्रीमती मेघना दिपक (जिंतुर) | मा.राज्यमंत्री | | |
| २६८ | सागर, श्री. योगेश (चारकोप) | ७ | ० | १००.०० |
| २६९ | साटम, श्री. अमित भास्कर (अंधेरी पश्चिम) | ७ | ० | १००.०० |
| २७० | सामंत, श्री. उदय रविंद्र (रत्नागिरी) | मा.मंत्री | | |
| २७१ | सामंत, श्री. किरण ऊर्फ भैय्या (राजापूर) | ४ | ३ | ५७.१४ |
| २७२ | सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ) | मा.मंत्री | | |
| २७३ | सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व) | ७ | ० | १००.०० |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २७४ | सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व) | मा.मंत्री | | |
| २७५ | सावंत, डॉ. तानाजी जयवंत (परांडा) | ३ | ४ | ४२.८६ |
| २७६ | सावंत, श्री. महेश बळीराम (माहिम) | ६ | १ | ८५.७१ |
| २७७ | सुर्वे, श्री. प्रकाश (मागाठाणे) | ४ | ३ | ५७.१४ |
| २७८ | सेल्वन, कॅप्टन आर. तमील (सायन कोळीवाडा) | ५ | २ | ७१.४३ |
| २७९ | सोनवणे, श्री. चंद्रकांत बळीराम (चोपडा) | ४ | ३ | ५७.१४ |
| २८० | सोनवणे, श्री. शरददादा भिमाजी (जून्नर) | ५ | २ | ७१.४३ |
| २८१ | सोपल, श्री. दिलीप गंगाधर (बार्शी) | ४ | ३ | ५७.१४ |
| २८२ | सोळंखे, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | ५ | २ | ७१.४३ |
| २८३ | संचेती, श्री. चैनसुख मदनलाल (मलकापूर) | ६ | १ | ८५.७१ |
| २८४ | स्वामी, श्री. प्रविण विरभद्रया (उमरगा) | ६ | १ | ८५.७१ |
| २८५ | हिरे, श्रीमती सीमा महेश (नाशिक पश्चिम) | २ | ५ | २८.५७ |
| २८६ | क्षिरसागर, श्री. राजेश विनायकराव (कोल्हापूर उत्तर) | ४ | ३ | ५७.१४ |
| २८७ | क्षिरसागर, श्री. संदिप रविंद्र (बीड) | ४ | ३ | ५७.१४ |
| २८८ | रिक्त | रिक्त | | |

***

## विवरण क्रमांक - ७

# महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशन कालावधीतील कार्यवाहीचा संक्षिप्त वृतांत

## सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**शुभारंभ :** अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

त्यांनतर राज्यगीताचे समूह गायन झाले.

वंदे मातरम्" गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर"वंदे मातरम्" या गीताचे पुन्हा संपूर्ण गायन करण्यात आले.

**१.** (१) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ७ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(२) नगर विकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ११ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(३) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १० – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(४) पणन मंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(५) ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १२ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(६) कामगार मंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ८ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

**२.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) खाली मिळालेल्या अधिकारात महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या विचारात घेण्यात याव्यात, अशी शिफारस केली असल्याचे सांगितले.

सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर करण्यात आल्या असून या पुरवणी मागण्यांचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावर तसेच टपालखणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान दिनांक १० व ११ डिसेंबर, २०२५ रोजी होईल. दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमांत घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजी व दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमांत घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** सचिव-१ यांनी, विधानसभेने संमत केलेले व विधान परिषदेकडून संमती मिळालेले एक वि.स. विधेयक आणि दोन्ही सभागृहांद्वारे संमत केलेल्या व मा. राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या ७ वि.स. विधेयकांची यादी सभागृहात वाचून दाखविली.

(अ) विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेले सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५.

(ब) मा. राज्यपालांची अधिसंमती मिळालेली विधेयके :—

१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५.

२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र कर,व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५.

३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५.

५) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५.

६) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५.

७) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८१ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५.

**४.** माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित केले.

(१) श्री.चैनसुख संचेती

(२) श्री.किशोर आप्पा पाटील

(३) श्रीमती सरोज अहिरे

(४) डॉ.राहुल पाटील

(५) श्री.उत्तमराव जानकर

(६) श्री.रामदास मसराम

(७) श्री.समीर कुणावार

**५.** पुरःस्थापनार्थ—

(१) कामगार मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ८९ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) पणन मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९३ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९४ – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(५) विधी व न्याय राज्यमंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९५ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(६) माहिती तंत्रज्ञान मंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(७) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली.

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभा सभागृहात झालेल्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुस्तक स्वरुपात महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री.आचार्य देवव्रत जी यांच्या "शुभ हस्ते" मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी माननीय राज्यपाल महोदयांचे कार्यालय व निवासस्थान, लोकभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात येत आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे. कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयाकडून आपल्याला वितरित करण्यात येत आहे. कार्यक्रमस्थळी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांतील "राज्यशास्त्र व लोकप्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षीसुध्दा दिनांक ०९ ते १३ डिसेंबर, २०२५ या कालावधीत ५१ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर संसदीय अभ्यासवर्गाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व सर्व

मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ०९,०० वाजता विधानपरिषद सभागृह, विधान भवन, नागपूर येथे होणार आहे. संसदीय अभ्यासवर्गासंबंधीची निमंत्रणपत्रिका व कार्यक्रमपत्रिका सर्व माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संसदीय अभ्यासवर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी, नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याबाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी याबाबत आपले मत मांडले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

६. माननीय अध्यक्षांनी पुढील शोकप्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

"श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले, वि.स.स. व माजी राज्यमंत्री; सर्वश्री महादेवराव सुकाजी शिवणकर, भारत राजाभाऊ बोंद्रे, माजी वि.स.स. व माजी मंत्री; श्री. श्याम ऊर्फ जनार्दन बाळकृष्ण आष्टेकर, माजी वि.स.स. व माजी राज्यमंत्री; सर्वश्री यशवंत बाबाजी दळवी, नारायण नानू पटेल, सिद्रामप्पा मलकप्पा पाटील, गिल्बर्ट जॉन मेंडोन्सा, राजीव अनिल देशमुख व श्रीमती निर्मला शंकरराव ठोकळ, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४७ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) सांस्कृतिक कार्य मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ३० जून, २०२५ ते दिनांक १८ जुलै, २०२५ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ११४७ आश्वासनांची यादी तसेच सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २७१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवली.

(३) पणन मंत्र्यांनी खालील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक वित्तीय अहवाल.

(ख) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल व लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल.

(४) खनिकर्म मंत्र्यांनी, मॉयल लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री.अतुल भातखळकर, समिती सदस्य यांनी नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर केला.

**३.** श्री.अतुल भातखळकर, समिती सदस्य यांनी, खालील प्रस्ताव मांडला –

"विधानसभा नियम समितीच्या आज दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये कोणतीही सुधारणा करण्याची सूचना देण्यासंबंधातील म.वि.स. नियम २२५(१) व २२५(३) मधील १० दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती म.वि.स. नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंतच्या कालावधीची करण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावासंदर्भात श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी खुलासा केला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

माननीय अध्यक्षांनी खालील घोषणा केल्या—

(१) "दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात खालील नमूद मंत्री महोदय आपल्या मूळ विभागाचे कामकाज सांभाळून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विभागाचे विधानमंडळातील कामकाज पाहतील, असे मुख्यमंत्री महोदयांनी कळविले आहे.

| **मंत्री** | **विभाग** |
|---|---|
| ॲड. आशिष शेलार | सामान्य प्रशासन विभाग |

(२) दिनांक ८ डिसेंबर, २०२५ पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांनी त्यांच्याकडे कार्यभार असलेल्या विभागांचे विधिमंडळातील कामकाज आपल्या मूळ विभागाचे कामकाज सांभाळून त्यापुढे नेमून दिलेले मंत्री संबंधित विभागांच्या राज्यमंत्री यांच्यासोबत समन्वय ठेवून एकत्रितरित्या हाताळतील असे प्रस्तावित करून त्याबाबतची परवानगी मागितली होती.मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांच्याकडे कार्यभार असलेल्या नमूद विभागाचे कामकाज नेमून

दिलेले मंत्री संबंधित विभागांच्या राज्यमंत्री यांच्याशी समन्वय ठेऊन हाताळण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी अनुमती दिली आहे. त्यानुसार विभाग व मंत्री महोदयांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **विभाग** | **मंत्री** |
|---|---|---|
| १) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) | मा.श्री. दादाजी भुसे |
| २) | नगर विकास | मा.श्री. उदय सामंत |
| ३) | गृहनिर्माण | मा.श्री. शंभूराज देसाई |

(३) "सर्व सन्माननीय सदस्यांना पुनश्च कळविण्यात येते की, भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी विधानसभा सभागृहात झालेल्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुस्तक स्वरुपात महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत जी यांच्या "शुभ हस्ते" आज मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी माननीय राज्यपाल महोदयांचे कार्यालय व निवासस्थान, लोकभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात येत आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे. कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयाकडून आपल्याला वितरित करण्यात आली आहे. कार्यक्रमस्थळी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. मी पुन्हा एकदा आठवण करून देतो की, सदर कार्यक्रमास विरोधी पक्षानेही यावे, असा माझा आग्रह आहे."

(४) "सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, काल काही सन्माननीय सदस्यांनी प्रवेश पास नसलेल्या व्यक्तींना विधान भवनामध्ये सोबत आणल्याबाबत मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी माझ्याकडे अहवाल सादर केला आहे. अधिवेशनाचा पहिला दिवस लक्षात घेता, सन्माननीय सदस्यांची नावे जाहीर करणे मला उचित वाटत नाही. तथापि, भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती घडल्यास त्या सन्माननीय सदस्यांची नावे सभागृहात जाहीर करण्यात येतील व त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही ही करण्यात येईल. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रवेशपास व सुरक्षा विषयक सूचनांचे पालन करून सहकार्य करावे."

**५.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "सीएसटी" स्टेशनचे नाव "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस" असे करण्यात येऊन त्याचे भव्य पुनर्विकासाचे काम सुरू आहे तरी त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अतिशय भव्यदिव्य आश्वारूढ स्वरुपातील पुतळा उभा करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात यावा" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यासंबंधीची पुन्हा एकदा माहिती घेऊन सभागृहाला अवगत करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, "श्रीमती कुंदाताई खुशाल मिश्रा, वर्धा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली या महिलेचा वाघाने केलेल्या हल्ल्यामध्ये झालेला मृत्यू तसेच गडचिरोली जिल्ह्यामध्ये व्याघ्र प्रकल्प नसणे याबाबत वन विभाग कोणत्या उपाययोजना करणार आहे ते सभागृहास अवगत करावे" असा मुद्दा उपस्थित केला.

श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी, माननीय विधानसभा अध्यक्षांची अध्यक्ष पदी दुसऱ्यांदा निवड होऊन आज दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी दुसऱ्या टर्ममधील १ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला व भाषण केले.

माननीय अध्यक्षांनी सभागृहाचे आभार मानले.

(१) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, “जुलै, २०२५ च्या अधिवेशनामध्ये माननीय कामगार मंत्र्यांनी सभागृहात घोषणा केल्याप्रमाणे आधीच्या कामगारांची यादी आणि योजना सुरू झाल्यानंतरच्या कामगारांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नसणे.” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी सभागृहाला दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घ्यावी व योग्य ती पूर्तता करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्रीमती श्रीजया अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी, “राज्यात सोयाबीनची शासकीय खरेदी केंद्रे सुरू झाली असून मराठवाडा आणि विशेषतः नांदेड जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी लक्षात घेता शासनाने तातडीने दखल घेऊन सोयाबीनच्या शासकीय खरेदी केंद्राचे निकष शिथिल करण्याची आवश्यकता.” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री.राजेश वानखेडे, वि.स.स. यांनी, “अमरावती जिल्ह्यातील तिवसा औष्णिक विद्युत प्रकल्पातून निघणाऱ्या राखेचे व्यवस्थापन करणारी एस.एस.कन्स्ट्रक्शन व रतन इंडिया या कंपनीचे व्यवस्थापन करणारे अधिकारी संगनमताने काळाबाजार करीत असणे तसेच या प्रकल्पात जमीन गेलेल्या भूमिपुत्रांना येथे नोकरी मिळण्याची आवश्यकता.” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री.अशोक पाटील, वि.स.स. यांनी, “भांडूप येथे पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या श्री.नायर नावाच्या व्यक्तीचा टेम्पो अंगावर घालून हत्या करण्याचा प्रयत्न झाला असून पोलिसांमार्फत त्या वाहन चालकाऐवजी दुसऱ्या वाहन चालकाचे नाव गुन्ह्यात नोंदले गेले असणे.” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री.शंकर मांडेकर, वि.स.स. यांनी, “भोर औद्योगिक वसाहतीमधील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यानंतर त्यांच्यावर खोट्या तक्रारी व गुन्हे दाखल केले गेले असणे, माण, हिंजवडी येथील मोकळ्या जमिनींवर एमआयडीसीचे शिक्के असल्याने तेथील शेतकऱ्यांना त्यावर कोणताही उद्योग, व्यवसाय करता येत नसणे तसेच तसेच या एमआयडीसीमध्ये स्थानिक शेतकऱ्यांना नोकरी मिळावी. शिल्लक जमिनीवरील शिक्के काढण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनात त्यांच्यावर नोंदण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री.अजय चौधरी, वि.स.स. यांनी, “अभ्युदय नगर, काळा चौकी, मुंबई येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास मागील अनेक वर्षापासून रखडलेला असणे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री.सुहास बाबर, वि.स.स. यांनी, “खानापूर-आटपाडी येथील जवळपास ६ हजार घरकुलांना शासनाने मान्यता दिली असून वाळू मिळाली नाहीतर घरकुलांची कामे अपूर्ण राहण्याची शक्यता असल्यामुळे कृत्रीम वाळू तयार करणाऱ्या प्रत्येक क्रशरने सरकारी योजनेतील घरकुलांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याबाबत शासनाने आदेश देण्याची आवश्यकता” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री.सत्यजीत देशमुख, वि.स.स. यांनी, “आद्य क्रांतीवीर नरवीर उमाजी नाईक यांच्या बलिदानाने पुनित झालेल्या पुणे येथील ऐतिहासिक मामलेदार कचेरी परिसरातील वास्तुचे जतन व संवर्धन करणे तसेच तेथे आद्य क्रांतीकारक राजे उमाजी नाईक यांचे स्मारक घोषित करण्यात यावे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त औचित्याच्या मुद्यासंदर्भात श्री.हेमंत रासने, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

(९) श्री.मुरजी (काका) पटेल, वि.स.स. यांनी, "मुंबई येथील अनेक वर्षांपासून रखडलेल्या अनेक झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी आणि भविष्यातील खासगी मिळकतीवरील योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी खासगी मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी आवश्यक संमती किंवा ना-हरकत प्रमाणपत्रांबाबत निश्चित धोरण ठरविण्याची नितांत आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव, वि.स.स. यांनी, "सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कन्नड व सोयगाव तालुक्यातील पिके, शेतातील माती आणि लोकांची उपजिविकेची साधने उद्धवस्त होण्यास मुख्य कारण असलेल्या सर्व जलस्त्रोतांचे वैज्ञानिक सर्वेक्षण करून त्यांचे तात्काळ खोलीकरण करण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री.चरणसिंग ठाकूर, वि.स.स. यांनी, "नागपूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादकता प्रत्यक्ष उत्पादनाशी सुसंगत राहावी यासाठी सन २०२५-२०२६ या वर्षासाठी प्रति हेक्टर १७ ते १८ क्विंटल एवढी निश्चित करण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, "नाशिक जिल्ह्यातील कश्यपी धरणग्रस्तांना नोकऱ्या व अन्य हक्कांचे लाभ न मिळाल्याने त्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री.गोपिचंद पडळकर, वि.स.स. यांनी, "राज्यातील गोपाळ समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री.बाबुराव कदम-कोहळीकर, वि.स.स. यांनी, "हदगांव तालुक्यातील (जि.नांदेड) वारकवाडी, वानवाडी, मांडवा परिसरातील बौध्द धर्माचे पवित्र तीर्थस्थळ असलेले जागतिक दर्जाचे उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र असून सदर ठिकाणी असलेल्या डोंगरातून एका खासगी कंपनीच्या ठेकेदाराकडून अवैधरित्या सुरू असलेले उत्खनन." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री.अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "नरेगा अंतर्गत जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या मागणीनुसार प्रलंबित अकुशल निधी त्वरित वितरित करण्याबाबत तसेच रेशीम उद्योग ही शेतकऱ्यांना बारमाही उत्पन्न देणारी योजना गावपातळीवर राबविण्यासाठी आणि राज्यात 'क' वर्ग नगरपालिका हद्दीतील अल्पभूधारक गरीब शेतकऱ्यांना मनरेगाच्या धर्तीवर वैयक्तिक योजनाचा सुलभतेने लाभ देण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री.अभिजीत पाटील, वि.स.स. यांनी, "महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत सर्पदंश झालेल्या रूग्णांना, ट्रॅक्टरवर किंवा थ्रेशर, कटर यावर कडबाकुट्टी करणाऱ्या शेतकऱ्यांना अशी कामे करताना अपघात झाल्यास लाभ मिळत नसणे तसेच आत्महत्या करणाऱ्या प्रकरणांचाही या योजनेत समावेश नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्रीमती सई डहाके, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अकोला परिमंडल विभागाने शासनाकडे वाशिम विभागाचे विभाजन करून वाशिम व कारंजा हे नवीन विभाग निर्माण करण्याबाबत पाठविलेल्या प्रस्तावाला अद्यापही मंजुरी मिळालेली नसणे" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री.नाना पटोले, वि.स.स. यांनी, "पुणे शहरातील खराडी परिसरातील पुणे पेठ, आयटी पार्क प्रकल्पांमध्ये लिफ्ट प्रत्यक्षात न उभारता तत्कालीन लिफ्ट निरीक्षकांनी अवैधरीत्या लिफ्ट परवाने जारी करण्यात येणे तसेच सभागृहात मांडण्यात आलेल्या औचित्याचे मुद्यांचे एका महिन्याच्या आत उत्तरे मिळावीत" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सागितले.

याबाबत नोंद घेण्यात येईल असे वने मंत्र्यांनी सागितले.

(१९) श्री.रईस शेख, वि.स.स. यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी मजकूर प्रलंबित असणे.)

(२०) श्री.राहुल आवाडे, वि.स.स. यांनी, "इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथील बंद करण्यात आलेले एल.सी.बी. (स्थानिक गुन्हे अन्वेषण) कार्यालय लवकरात लवकर पूर्ववत सुरू करण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री.विठ्ठल लंघे, वि.स.स. यांनी, "शासनाने प्रत्येक शेतीसाठी रस्ता या धोरणातून बळीराजा शिवपाणंद रस्ते ही संकल्पना पुढे करून वहिवाटीसाठी असणाऱ्या रस्त्यांना नंबर देऊन प्रत्येक बांधावर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची खालच्या स्तरावर योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारण्यात यावा" इ.बाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री यांनी निवेदन केले.

(२२) श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी, “शासनाने कोणत्याही खाजगी व धार्मिक संस्थेला कोणत्याही खाद्यपदार्थ व वस्तूंचे प्रमाणिकरण करण्यास तात्काळ बंदी घालावी आणि उत्तर प्रदेश राज्याच्या धर्तीवर हलाल प्रमाणित उत्पादनांच्या निर्मिती, विक्री आणि वितरणावर बंदी घालणारा कायदा राज्यात लागू करण्यात यावा, गुजरात व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात अँटी-लँड ग्रॅबिंग कायदा तत्काळ लागू करण्यात यावा तसेच राज्य पातळीवर १ उत्कृष्ट पोलीस अधिकारी व महत्त्वपूर्ण अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून महाराष्ट्रातील मागील २० ते २५ वर्षांतील देवस्थान समितीच्या सर्व जमीन हस्तांतरण प्रकरणांची चौकशी करण्यात यावी.” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री.निलेश राणे, वि.स.स. यांनी, “कोकणातील रस्ते दर्जेदार उभारण्यासाठी त्यासाठीचे निकष कायमचे बदलण्यात यावेत तसेच संपूर्ण राज्यासाठी लागू असलेले रस्त्यांचे निकष कोकणासाठी लागू करण्यात येऊ नयेत” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, “राज्यात देशातील इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात महाग दराने वीज वितरित करण्यात येत असणे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, “मुंबईतील गोरेगाव पूर्व दादासाहेब फाळके चित्रनगरीसह राज्यातील चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार/ज्युनिअर कलाकारांवर मालक/निर्माते यांच्याकडून सातत्याने अन्याय होत असल्याचे निदर्शनास येणे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्री महोदयांना नोंद घेण्यास सांगण्यात येईल असे माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांनी सांगितले.

(२६) श्री. सिद्धार्थ खरात, वि.स.स. यांनी, “शासनाने जाहीर केलेल्या सौर ऊर्जा पंप देण्याच्या घोषणेतील असलेली एकराची अट शिथिल करण्याची गरज तसेच सौर ऊर्जा धोरणामुळे नवीन वीज कनेक्शनसाठी पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यात यावे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्री.आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, “मुंबईमध्ये सेस इमारतींमध्ये व चाळींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचा पुनर्विकास रखडलेला असून यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री.शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी, “चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातून जाणारा बेळगांव-वेंगुर्ला रस्त्यावरील वाढलेली वाहतूक लक्षात घेता बेळगाव–वेंगुर्ला १८० क्रमांकाचा राज्यमार्ग हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून दर्जोनित करून संपूर्ण १० मीटर रुंदीचा महामार्ग करण्यात यावा” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री.महेश सावंत, वि.स.स. यांनी, “दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा अत्यंत दुरावस्थेत असणे” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी, “वाळवा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीचे स्ट्रीट लाईटची तसेच राज्यातील प्रत्येक गावातील स्ट्रीट लाईटची थकबाकी राज्य सरकारने भरून प्रत्येक खेड्यामध्ये वाढीव स्ट्रीट लाईटचा मार्ग मोकळा करण्यात यावा” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३१) श्री.महेश लांडगे, वि.स.स. यांनी, “पिंपरी-चिंचवड शहरात प्राधिकरणाच्या जागेवर महापालिकेने आर्थिक दुर्लभ घटकातील ७ हजार लोकांसाठी बांधण्यात आलेली घरकूले १२ ते १५ वर्षे झाले तरी पूर्णपणे तयार झालेली नसून तेथे सुखसोयी, सुविधा दिलेल्या नसणे तसेच मध्यंतरी कोविड सारखी महामारी आली तेव्हा या ७ हजार कुटुंबातील सगळी कमविणारी व्यक्ती घरी असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचा कर माफ करण्याची गरज असणे.” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३२) श्री.बबनराव लोणीकर, वि.स.स. यांनी, “परतूर विधानसभा मतदारसंघाच्या मंठा तालुक्यातील बरबडा-आकणी बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पांकरिता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्यांना जमिनीचा व घरांचा मावेजा देणे अद्याप प्रलंबित असल्यामुळे सदर प्रकल्पास निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असणे तसेच परतूर तालुक्यातील आंबा व मंठा तालुक्यातील वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद येथील कोल्हापुरी बंधारे फुटल्याने नदीपात्रातील पाणी वाहून जात असणे.” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३३) श्री.अबु आझमी, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी भाषण प्रलंबित असणे.)

श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. यांनी, "तुकाराम मुंढे यांनी नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पात केलेले गैरप्रकार तसेच या प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्य श्री.कृष्णा खोपडे यांना धमकी देण्यात आलेली असणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सर्वश्री.प्रविण दटके व रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सदर प्रकरणाची शासन नोंद घेईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

शासनाने या संदर्भात गांभीर्याने दखल घेतली असून या प्रकरणी लवकरात लवकर चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांनी सांगितले.

**६.** (१) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद पठाण, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, डॉ.विश्वजित कदम, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

"मुंबईतील पवई येथील आर.ए. स्टुडिओमध्ये ऑडिशनच्या नावाखाली परभणी, लातूर आदी जिल्ह्यांसह राज्यातील विविध भागांतून आलेल्या १५ वर्षांखालील १७ मुलांसह एकूण २० जणांना रोहित आर्या नामक व्यक्तीने ओलीस ठेवल्याची व त्या अपहरणकर्त्याचा पोलिसांनी एन्काऊंटर केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२५ च्या अखेरच्या आठवड्यात घडणे, "मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा" या अभियानातील महत्त्वाचा घटक असलेल्या पी.एल.सी. स्वच्छता मॉनिटर प्रकल्पातील सुमारे दोन कोटी रुपयांहून अधिक निधीच दिला नसल्याचा आरोप संबंधित रोहित आर्याने केला असणे, सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील काही शाळांना जाणूनबुजून चुकीचे गुण देऊन त्याच शाळांना विजेते घोषित करण्यात आल्याचा गौप्यस्फोट रोहित आर्याने केला असणे, तसेच त्या संदर्भात त्याने तत्कालीन शिक्षण मंत्र्यांच्या निवासस्थानासमोर अनेक वेळा उपोषण केले असणे, पोलीस कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या रोहित आर्या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने दिले असणे, परंतु अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे जनमानसांत पसरलेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या घटनेचा सखोल तपास करण्यासाठी आयोगाने विशेष तपास पथकाची (SIT) नियुक्ती करून संबंधित दोषीवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(चर्चा अपूर्ण)

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करतो असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५२ मिनिटांनी, १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २ मिनिटांनी सुरू झाली.

श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. यांनी, "तुकाराम मुंढे यांनी नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पात केलेले गैरप्रकार तसेच या प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्य श्री.कृष्णा खोपडे यांना फोनवरून धमकी देण्यात आलेली असणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री.विजय वडेट्टीवार व श्री.प्रविण दटके, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सदर प्रकरणाची शासन नोंद घेईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

या संदर्भात सर्व माहिती घेऊन सभागृहामध्ये वस्तुस्थितीदर्शक निवेदन करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(१) श्री.हारुन खान, वि.स.स. यांनी, "वर्सोवा मेट्रोचा पिल्लर नंबर ८ च्या जवळ अविनाश टॉवरच्या समोरील सी.सी.रोड जवळपास रस्ता ७ फूट खचला असणे तसेच २० दिवसांपूर्वीच डी.एन. नगर मेट्रो स्टेशनच्या खालील रस्ता खचला असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स. यांनी, "मागील १५ दिवसांपूर्वी नागपूर शहरामध्ये एक बिबट्या दिसून येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

आज या विषयावर एक लक्षवेधी सूचना दिली असून त्यावेळी आपण हा माहितीचा मुद्दा उपस्थित करावा आता लक्षवेधी सूचना क्रमांक - १ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सर्वश्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांनी, "मुंबईतील पवई येथील आर.ए. स्टुडिओमध्ये घडलेला प्रकार" इ.बाबत उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना – (चर्चा पुढे सुरू)

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. अतुल भातखळकर, चेतन तुपे, सुरेश भोळे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. योगेश सागर, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, मंगेश चव्हाण, महेश लांडगे, अनंत (बाळा) नर, सुनिल प्रभू, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. साजिद पठाण, शिरीषकुमार नाईक, रामदास मसराम, संजय मेश्राम, हेमंत ओगले, अनिल मांगुळकर, मुरजी पटेल वि. स. स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधले –

"मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या अंदाजे एक लाखापेक्षा जास्त असताना, संपूर्ण शहरासाठी केवळ ८ निवारा केंद्रे (Shelters) कार्यरत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, ही समस्या केवळ मुंबईपुरती मर्यादित नसून ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर येथेही असणे, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) आणि निवारा यासाठी मा. उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला दिलेल्या निर्देशांची अद्याप पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नसल्याने नवीन निवारा केंद्रे उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज असणे, कार्यरत निवारा केंद्रांना आणि भविष्यात उभारल्या जाणाऱ्या केंद्रांना पुरेसे पालिका कर्मचारी, पशुवैद्यक, अन्न-पाणी पुरवण्यासाठी आवश्यक निधी आणि संसाधनांची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व शहरात विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे शहरात मोठ्या प्रमाणात हजारो लोकांना श्वानांनी चावा घेतल्यामुळे झालेले मृत्यू, मुंबईत गेल्या वर्षात ७० व ठाण्यात १२ हजारापेक्षा जास्त नागरीकांना भटक्या श्वानांनी चावा घेतल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले असणे, तसेच जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नागेश्वर कॉलनी येथे दिनांक १ जून २०२५ रोजी अंगणात खेळत असलेल्या ४ वर्षाच्या बालकावर भटक्या श्वानांनी अचानक जीवघेणा हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याने त्याचा झालेला मृत्यू, यास्तव

राज्यात भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्र (Shelters) उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याच्यादृष्टीने तसेच भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री.तुकाराम काते व श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. तुकाराम काते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधले—

"मुंबई शहर व उपनगरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सन २००१ पासून "दत्तक वस्ती योजना" सुरू केली असणे, त्यामध्ये सन २००१ मध्ये नऊशे रुपये मानधन देऊन नऊ हजार कामगार काम करीत असणे, त्यानंतर सन २०१३ पर्यंत ४८०० रुपये पर्यंत मानधनामध्ये वाढ झाली असणे, तसेच दीपावलीमध्ये २००० रुपये बोनस मिळत असणे, पण सन २०१३ मध्ये महानगरपालिकेने जुनी दत्तक वस्ती योजना बंद करून नवीन "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान वस्ती स्वच्छता योजना" या नावाने योजना अंमलात आणली असणे, या योजनेमध्ये सध्या १२००० कामगार काम करीत असणे, या कामगारांना फक्त रुपये ५४०० मासिक पगार मानधन म्हणून दिले जात असणे, या कामगारांना पूर्वी दिल्या जाणारा दिवाळी बोनस सुद्धा बंद करण्यात आला असणे, महानगरपालिकेच्या सफाई कामगारांप्रमाणेच काम करत असताना देखील त्या कामगारांप्रमाणेच या योजनेतील कामगारांना वेतन मिळत नसल्याचा अहवाल कामगार आयुक्तांनी महापालिकेला दिलेला असणे, त्याची अंमलबजावणी महानगरपालिकेकडून होत नसणे, अनेकदा या सफाई कामगारांच्या जीवाला धोकाही होत असताना अशा परिस्थितीत हे कामगार काम करत असणे, या कामगारांना किमान वेतन व आरोग्य विमा, सुरक्षा विमा कवच सुविधा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ पुढे ढकलण्यात येत असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक ५ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(५) डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, मोहन मते, सुनिल प्रभू, ज्ञानेश्वर कटके, अमित साटम,श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. शंकर मांडेकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, आशुतोष काळे, सत्यजित देशमुख, अमित विलासराव देशमुख, संजय मेश्राम, अमित झनक, विकास ठाकरे, साजिद पठाण, अस्लम शेख, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, चेतन तुपे, ॲड राहूल कुल, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री. रामदास मसराम, राजकुमार बडोले, दिलीपराव बनकर, दौलत दरोडा, रोहित पवार, विठ्ठल लंघे, उमेश यावलकर, अब्दुल सत्तार, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"राज्याच्या विविध भागांमध्ये बिबट्यांची प्रचंड दहशत वाढलेली असून बिबट्या मानवी वस्तीत शिरल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये व त्या दरम्यान वारंवार निदर्शनास येणे, माहे सप्टेंबर २०२५ मध्ये कळस (ता. पारनेर) येथे एका तरुणाचा व पारनेर शहरात एका तीन वर्षीय बालिकेचा, खारेकर्जुने (ता. अहिल्यानगर) येथे पाच वर्ष मुलीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे उघडकीस येणे, जानेवारी ते नोव्हेंबर, २०२५ पर्यंत अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात २० जणांचा मृत्यू झालेला असणे, गोंदियाच्या तिरोडा तालुक्यातील इंदोरा निमगाव येथे वडिलांसोबत शेतात गेलेल्या बालिकेवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना, तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील चिचपल्ली वन परिक्षेत्रांतर्गत चिरोली बीट भगवानपूर कक्ष क्रमांक ६९६ मध्ये गुरे चराईसाठी गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडली असणे, पुणे जिल्ह्यातील ता.शिरुर, पिंपरखेड गावातील १३ वर्षीय मुलाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडलेली असताना याआधी १५ दिवसापूर्वी ५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत झाल्याची घटना घडली असणे, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर यांसह इतर जिल्ह्यांमध्ये बिबट्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढत होत असून सध्या राज्यात पाच हजारांपेक्षा जास्त बिबटे असणे, वन विभागाने जंगलांमध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार २२८५ बिबटे असल्याचे आढळून

येणे, मात्र जंगलाबाहेर द्राक्ष, ऊस व कापसाच्या शेतात बिबट्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होणे, जंगलाबाहेर सर्वेक्षण केलेले नसणे, केवळ जुन्नर वन विभागामध्येच दोन हजार बिबटे असणे, पाच हजारपेक्षा जास्त बिबटे असतांना केवळ पाच बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी मिळालेली असल्याची धक्कादायक महिती उघडकीस येणे, मानवी क्षेत्रात बिबट्या येऊन लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असणे, मागील ३ वर्षात सुमारे १७ हजार पाळीव प्राणी व २५० पेक्षा जास्त मनुष्यांची बिबट्याने हल्ले करून शिकार केलेली असणे, त्यामुळे राज्यातील नागरीकांची जीवितहानी व मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून मानवी जीवितास मोठा धोका निर्माण होणे, यासाठी वाघ व बिबट्यांपासून मानवांचे संरक्षण करण्यासाठी वन विभागातील वनाधिकारी व वन रक्षकांची पद भरण्याची आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कार्यवाही व उपाययोजना करण्याची  मागणी सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.वने मंत्री यांचेकडे दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार केलेली असतांनाही, सदरबाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असल्याने राज्यातील नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**७. (अ) पुरःस्थापनार्थ :—**

(१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :—**

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५.

(क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा अध्यादेश नापंसत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) महसूल मंत्र्यांनी, उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्याविषयीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

| | |
|---|---|
| (१) श्री.संजय कुटे | (२) श्री.भास्कर जाधव |
| (३) श्री. संजय गायकवाड | (४) श्री. रवि राणा |
| (५) श्री. विजय वडेट्टीवार | (६) श्री.अभिजीत पाटील |
| (७) श्री.प्रकाश (दादा) सोळंके | (८) श्री.चंद्रदीप नरके |
| (९) श्री. विक्रम पाचपुते | (१०) श्री. कैलास घाडगे-पाटील |
| (११) श्री. हिरामण खोसकर | (१२) श्री. रमेश बोरनारे |
| (१३) श्री.कृष्णा खोपडे | (१४) श्री.राहुल कुल |
| (१५) श्री.अमित देशमुख | (१६) श्री.नानाभाऊ पटोले |
| (१७) श्री.प्रविण दटके | (१८) श्री.सुरेश धस |

चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

(क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम, हेमंत ओगले, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव व श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्याविषयीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. नानाभाऊ पटोले (२) श्री.सुधीर मुनगंटीवार

(३) श्री. भास्कर जाधव

चर्चेस विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत करण्यात आले.

**विधेयकावरील चर्चेबाबत –**

माननीय अध्यक्षांनी विधेयकावरील चर्चेतील सन्माननीय सदस्यांचा सहभाग यासंदर्भात सविस्तर खुलासा केला व मार्गदर्शन (सूचना) केले.

उपरोक्त विषयासंदर्भात श्री.योगेश सागर, श्री. राहुल कुल, भास्कर जाधव व अर्जुन खोतकर, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

(५) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

(क) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव व श्री.भास्कर जाधव, वि.स.स. चौथा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्याविषयीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. सुधीर मुनगंटीवार
(२) श्री.योगेश सागर
(३) श्री. जयंत पाटील
(४) श्री.नाना पटोले
(५) श्री. अमिन पटेल

चर्चेस विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

या विधेयकाच्या अनुषंगाने दोन्ही बाजूंच्या काही सन्माननीय सदस्यांच्या मनात निर्माण झालेला संभ्रम माननीय मुख्यमंत्री उद्या सभागृहात आल्यानंतर दूर करतील. सबब, हे विधेयक आज ऑनलेग ठेवावे अशी विनंती महसूल मंत्र्यांनी केली.

सदर विधेयक ऑनलेग ठेवण्यात येत असून या विधेयकावर उद्या पुन्हा चर्चा केली जाईल तसेच आता सत्तारुढ पक्षाचा नियम २९३ अन्वये प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

८. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम. २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले –

"राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वंकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्वीकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांना तात्कालीक दिलासा देण्यात येणे, जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, बुजलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणाऱ्या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसुली थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेले निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करून मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे, शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृद्ध झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांना तातडीने मदत देण्याची

यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा हिंस्त्र व वन्य प्राण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतकऱ्यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपण घालण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करून राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रामीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करून बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्यात उभारण्यात येत असलेले उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीड" हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतकऱ्यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रति कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना विम्याद्वारे प्रति हेक्टर रुपये १७ हजार मदत देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येण इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वंकष मदत देऊन शेतकऱ्यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशारीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाड्यासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत सभागृहात विचार-विनिमय करून राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

माननीय राज्यपालांच्या कार्यक्रमासाठी जावयाचे असल्यामुळे आपण आता या प्रस्तावावर ऑनलेग रहावे आणि उद्या पुन्हा या प्रस्तावावर बोलण्यास सुरुवात करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. ऑनलेग राहिल्यामुळे भाषण अपूर्ण)

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी आजच्या कामकाजातील अर्धा तास चर्चा उद्या घेण्यात याव्यात अशी विनंती केली.

याबाबत माननीय अध्यक्ष यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ४६ मिनिटांनी, बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी १० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१) सर्वश्री प्रकाश सुर्वे व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.—

"मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ (मुंबई उपनगर) शुक्ला कंपाऊंड, दहिसर पूर्व येथे नागरिक गेल्या ५० वर्षापासून वास्तव्यास असणे, या रहिवाश्यांकडे शासनास आवश्यक असलेली लाईट बिल, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळख पत्र, झोपडीचा फोटोपास अशी कागदपत्रे असणे, असे असतानाही मुंबई महानगरपालिकेकडून या झोपडया तोडण्याची कारवाई माहे नोव्हेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवडयात करण्यात येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी वांरवार मुंबई महानगरपालिका यांचेशी विनंती वजा पत्रव्यवहार करुनदेखील कारवाईला स्थगिती न देणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांना लेखी निवेदन देण्यात येणे, कारवाई होत असल्याच्या कारणास्तव या वसाहतीतीलल ५०० कुटुंबांमध्ये निर्माण झालेले भितीचे व घबराटीचे वातावरण, शासनाने यासंदर्भात तातडीने निर्णय घेऊन या वसाहतीतील रहिवाशांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेलीी वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योगमंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. हेमंत रासने, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"पुणे शहरातील कसबा पेठ हा ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा भाग असून येथे असलेले शनिवार वाडा, सारसबाग यासारख्या सांस्कृतिक ठिकाणांवर दररोज मोठया प्रमाणावर नागरिक व पर्यटक येणे, परिणामी या परिसरात प्रचंड वाहतूककोंडी, प्रदूषण आणि अपघातांचे प्रमाण वाढणे, वाहतूक समस्येमुळे नागरिकांचा वेळ तसेच इंधनाचाही अपव्यय होणे, याकरीता सारसबाग येथून शनिवार वाडयापर्यंत (बाजीराव रस्ता) शनिवार वाडा ते स्वारगेट

(शिवाजी रस्ता) परिसरापर्यंत भुयारी मार्ग होणे आवश्यक असल्याने या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची आवश्यकता, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

उद्योगमंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ३ सदस्य अनुपस्थितीमुळे घेण्यात आली नाही. लक्षवेधी सूचना क्रमांक ४ चे निवेदन माननीय सदस्यांना प्राप्त न झाल्यामुळे व क्रमांक ५ चा विषय जलयंपदा विभागाशी संबंधित असल्यामुळे तो त्या विभागाकडे हस्तांतरित झाल्यामुळे या दोन्ही सूचनांचे कामकाज उद्याच्या बैठकीत घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

३) श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" पुणे जिल्ह्यातील भोसरी एमआयडीसीतील अंबिका पावडर कोटिंग कंपनीमध्ये दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास एलपीजी गॅस गळती होऊन झालेल्या स्फोटात एका कामगारचा मृत्यू होणे तर पाच कामगार जखमी होणे,ं कंपनीतील स्फोटाच्या आवाजाच्या तीव्रतेने सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत हादरा बसणे, आगीच्या उंच ज्वाळा तसेच धूर पसरू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होणे,ंऔद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेबाबत नियमांचे कंपनी मालकांनी काटेकोर पालन न केल्याने अशा दुर्घटना वारंवार घडत असणे, उद्योगनगरीतील कारखाने व व्यवसायिक आस्थापनांची नियमित तपासणी तसेच उपकरणांची देखरेख आणि कामगारांना सुरक्षा प्रशिक्षण देणे आवश्यक असणे, कंपनीत घटनास्थळी मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस सिलिंडर मधून ज्वलनशील गॅसची गळती मोठ्या प्रमाणात झाल्याने गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याचा अंदाज असणे,ं सदर कारखान्याच्या सेफ्टी ऑडिटची तपासणी करण्याची आवश्यकता असणे, या एमआयडीसीतील सर्व कारखान्यांचे सेफ्टी ऑडिट करण्याबाबत कामगार व परिसरातील

नागरिकांची मागणी असणे, शासनाचे या घटनेकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांच्या मनामध्ये शासनाप्रती पसरलेला प्रचंड असंतोष व निर्माण झालेले भीतीचे वातावरण, कामगारांच्या सुरक्षतेप्रती कंपनी मालकांच्या होत असलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४२ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११ वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** अ) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

ब) आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील एकवीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

१) जलसंपदा मंत्र्यांनी (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

२) वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षांचे लेखे अहवाल व सन २०२२ या वर्षाचा चोवीसावा व सन २०२३ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३) जलसंपदा मंत्र्यांनी (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ करीताचा सुधारीत अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

४) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी, हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे पंचेचाळीसावा, शेहेचाळीसावा व सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

५) सामाजिक न्याय मंत्र्यांनी,

अ) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ चा वार्षिक अहवाल,

ब) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक लेखे अहवाल, तसेच

क) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा अनुक्रमे शेहेचाळीस, सत्तेचाळीस व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** अ) पुरःस्थापनार्थ—

१) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

३) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

४) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**४.** वित्त मंत्र्यांनी, नियम स्थगित ठेवण्याबाबत पुढील प्रस्ताव मांडला.

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

१) श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी, “२ डिसेंबर रोजी मतदानामुळे कामावर हजर न राहू शकलेल्या भारत पेट्रोलियमच्या माथाडी कामगारांना कंपनीने कामावर येण्यास मज्जाव केल्याने यामध्ये जिल्हाधिकारी आणि कामगार आयुक्त यांनी हस्तक्षेप करून त्यांना न्याय मिळवून देणे”, इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, “पुनःस्थापित सादर झालेली काही विधेयके कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसणे”, इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**राज्य निवडणूक आयोगाविरोधात महाभियोग आणण्याबाबत माननीय अध्यक्षांचा निर्णय—**

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, “राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांबाबत घेतलेली भूमिका यामुळे भारतीय राज्य घटनेच्या कलम २४३(क) अन्वये राज्य निवडणूक आयोगाविरोधात महाभियोग आणणे”, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

हा विषय सभागृहाच्या अखत्यारित नसल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले आणि यासंदर्भात सविस्तर निर्णय दिला.

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, एका पाच वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाला असून तिला न्याय मिळवून देणे,, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची गंभीर दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावी आणि अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

२) श्री. सुमित वानखेडे, वि.स.स. यांनी, “आर्वी मतदारसंघामध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने टाकलेल्या छाप्यामध्ये १९२ कोटी रुपयांचे १२८ किलो मॅफेड्रोन ड्रग्ज मिळणे, राज्य शासनाने या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करणे”, इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

३) श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, “मुंबई शहराच्या नवीन आराखड्यामध्ये स्मशानभूमी व दफनभूमीसाठी दर्शविलेल्या सर्व जागांचा संपूर्ण डीपीआर सभागृहाच्या पटलावर अद्यप न मांडणे”, इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उद्योग मंत्र्यांनी, मुस्लिम दफनभूमी व स्मशानभूमीच्या जागांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. पुढील काही दिवसांमध्ये तो अहवाल महानगरपालिकेला प्राप्त होईल. त्यानंतर त्याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल, असे सांगितले.

शासनाने याबाबत धोरण ठरविले पाहिजे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

४) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांनी, "अधिवेशनात आपल्या मागण्या मांडण्यासाठी आलेल्या शिक्षक, पोलीस पाटील, बचत गट महिलांचे म्हणणे शासनाने ऐकून घेणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

५) श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी, "मावळ तालुक्यातील कासारसाई, पवना आणि आंध्रा धरणाभोवतीच्या भूमिपुत्रांना विश्वासात घेऊन नंतर शासकीय प्रक्रिया पूर्ण करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

६) श्री. हेमंत रासने, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाने पुणे शहरातील गणेशोत्सव मंडळावर दाखल केलेले सर्व गुन्हे त्वरित मागे घेणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

७) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. यांनी, "देगलूर-बिलोली या तालुक्यांसह संपूर्ण नांदेड जिल्ह्यामध्ये बिबट्याची प्रचंड दहशत बसली असून त्यांना तात्काळ जेरबंद करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

८) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील बेरोजगार युवा-युवतींना रोजगार उपलब्ध करून देणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

९) श्री. प्रवीण दटके, वि.स.स. यांनी, "हलबा समाजासाठी संत कोलबा स्वामी हलबा आर्थिक विकास महामंडळाची त्वरित स्थापना करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१०) श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. यांनी, "साखरेचे एमएसपी जाहीर करणे, तसेच इथेनॉलला ७ रुपये भाव देणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

११) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, "कापूस खरेदीसाठी असलेली १ हेट्करमध्ये ४ क्विटल कापूस तसेच कापसाचा पेरा ७/१२ वर असणे या दोन अटी तातडीने शिथील करून कापूस खरेदी सुरू करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१२) श्री. अर्जुन खोतकर, वि.स.स. यांनी, "जालनामध्ये विकास लोंढे या मातंग समाजाच्या तरुणाची हत्या करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१३) श्री. अबु आझमी, वि.स.स. यांनी उपस्थित केलेला माहितीचा मुद्दा (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने उपलब्ध नाही.)

१४) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जुन्नर, आंबेगाव, खेड तालुक्यातील लोकांनी केलेल्या आंदोलनप्रकरणात दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१५) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, "भोला नगर व शिवाजी नगर या भागातून जाणाऱ्या उन्नत रेल्वेमुळे बाधीत होणाऱ्या साडे तीन हजार लोकांना शासनाने पुनर्वसनाचे लेखी आश्वासन देणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१६) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "ताम्हिणी घाटातील रस्त्यांची दुरुस्ती करणे तसेच कठडे बसविणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१७) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "अधिवेशनादरम्यान उपोषणास बसलेल्या विविध संघटनांचे म्हणणे शासनाने ऐकून घेणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१८) डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी, "माहीम येथील कपडा बाजार येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

१९) श्री. दिलिप लांडे, वि.स.स. यांनी, "घाटकोपर येथील मुलीवर झालेल्या अत्याचारातील आरोपी मोकाट असून त्याच्याविरोधात कारवाई करून त्याला तात्काळ अटक करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, "चंद्रपूर ते मुंबई सुपरफास्ट रेल्वे सुरू करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

४) श्री मुरजी पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"मुंबईतील अंधेरी पूर्व ते अंधेरी पश्चिम जोडणाऱ्या अंधेरी सबवेमध्ये प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असणे, परिणामी वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होणे, या सबवेमधील पाणी परिसरातील नागरिकांच्या घरामध्ये जावून मोठ्या प्रमाणात वित्तहानी होऊन जनजीवन विस्कळीत होत असणे, काही वेळा जीवित हानी देखील होणे, दरवर्षी पावसाळयात सततच्या घटनांमुळे जनमानसात तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, त्यामुळे पावसाळयात अंधेरी सबवे मध्ये पाणी साचू नये यासाठी कायमस्वरूपी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) सर्वश्री अमिन पटेल व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"दक्षिण मुंबईमधील कुलाबा, पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे प्रकार घडत असणे, या जुन्या व जीर्ण इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे, यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्वेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास विलंब होत असणे, जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात येणे, परंतु दुरुस्तीचे काम न करता कंत्राटदाराकडून निधीचे पैसे काढून घेण्यात येणे, काही ठिकाणी तर कंत्राटदारांकडून १०० ते १४० टक्के कमी दराने निविदा भरण्यात येणे, यामुळे शासनाची घोर फसवणूक होणे, परिणामी येथील जुन्या इमारतींमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) श्री मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले.

"कुर्ला विभागातील साबळे नगर, संतोषी माता नगर व क्रांती नगर येथील रेल्वे वसाहतीत गेल्या अनेक वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांना रेल्वे प्रशासनाकडून निष्कासनाच्या नोटीसा बजावल्या असणे, बर्मा सेल लाईन शेजारील झोपडपट्टीतील रहिवाशांनाही सद्यस्थितीत पर्यायी जागा उपलब्ध नसल्यामुळे गंभीर समस्येचा सामना करावा लागत असणे,या वसाहतींमध्ये राहणाऱ्या सर्व कुटुंबांना पर्यायी जागा उपलब्ध करून देऊनच निष्कासन

प्रक्रिया पार पाडावी अशी स्थानिकांची मागणी असणे,भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारने यासाठी तातडीने धोरण बनविण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) सर्वश्री अजय चौधरी व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले.

"मुंबईतील जिजामातानगर, काळाचौकी येथील जवळपास २८०० झोपड्यांचा पुनर्विकास प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे, विकासकाला सन २००४ मध्ये एल.ओ.आय. देणे, २०१४ मध्ये बांधकामाचा परवाना देण्यात आलेला असणे, परंतु आज तागायत पुनर्विकासाचे काम सुरू न होणे, रहिवाश्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी एसआरएकडे १३/२ ची कारवाई करण्यात यावी अशी केलेली मागणी, विकासकावर कमल १३ (२) नुसार कारवाई करण्यासंदर्भात वारंवार सुनावणी झालेली असणे, तथापि अद्यापपर्यंत संबंधित विकासकावर कोणतीच कारवाई न होणे, उक्त झोपड्यांच्या पुनर्विकासासंदर्भात दि. ०८/१२/२०२३ रोजी पालकमंत्री, मुंबई शहर तथा गृहनिर्माण मंत्री यांचे दालनात झालेल्या बैठकीत विकासकाने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार पुनर्विकासाचे काम पुढील ६ महिन्यात न झाल्यास विकासकावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले असणे, संबंधित विकासकाकडून जाणीपूर्वक चालढकल करण्यात येणे, २ वर्ष उलटूनही विकासकाने अद्यापी पुनर्विकासाचे काम सुरु केलेले नसणे, तसेच एस. आर.ए.ने विकासकावर अद्याप कोणतीच कारवाई न करणे, शासनाने तातडीने पुनर्विकासाचे काम न करणा-या संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची तसेच उक्त झोपड्यांचा पुनर्विकास त्वरीत करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८) सर्वश्री विजयसिंह पंडित व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमित झनक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"वाशिम जिल्हा हा केंद्र शासनाने आंकाक्षित जिल्हा घोषीत केलेला असणे, वाशिम जिल्हयाची आर्थिक परिस्थिती ही शेती पिकांवर अवलंबुन असणे, वाशिम जिल्हा हा तापी खोरे व गोदावरी नदीच्या खो-याच्या मध्यभागी असणे, नदी जोड प्रकल्पांची घोषणा जेव्हा झाली तेव्हा वाशिम जिल्हयाचे नाव मूळ प्रस्तावात नसणे पण नंतर वाशिम जिल्हयाच्या नदीजोड प्रकल्पात समाविष्ट करण्यात आला असणे, पहिल्या टप्प्यात आराखडा तयार झाला त्यामध्ये वाशिममध्ये कुठल्याही नदीचा समावेश झालेला नसणे, त्याकारणास्तवव लोकांमध्ये मोठया प्रमाणात प्रामुख्याने शेतक-यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, मालेगाव तालुक्यातील चाकातीर्थ प्रकल्प हा जालना पुलगांव महामार्गावरील पूल पाण्याखाली जाईल याकरिता पूर्ण करण्यात आला नसणे, मात्र या महामार्गावरील पूलांचे निर्माण कार्य जलदगतीने सुरु असणे, त्यामुळे स्थानिक लोकांचीव शेतक-यांची मागणी नुसार चाकातिर्थ प्रकल्पाचे काम करण्यात यावे जेणेकरुन वाढलेल्या पाणी साठयामुळे शेतक-यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल व मालेगाव शहराला शुद्ध पिण्याचे पाणीीउपलब्ध होईल, परंतु शासन याबाबत अदयापही उचित कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चीड व उद्रेकाची भावना लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२१) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, “अकोला जिल्ह्यामध्ये एका १३ वर्षीय विद्यार्थीनीने केलेल्या आत्महत्याप्रकरणी संबंधित शाळा तसेच शिक्षक यांच्यावर आणि तिला त्रास देणाऱ्या मुलाविरोधात कारवाई करणे”, इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने या विषयाची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे निदेश मा. तालिकाध्यक्षांनी दिले.

९) सर्वश्री सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्य शासनातर्फे सुरु असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिणण योजनेत सुमारे १२ हजार ४३१ पुरुषांनी १३ महिने प्रत्येकी १५०० रुपये घेऊन सुमारे १६४ कोटी रुपयाचा अर्थिक घोटाळा केल्याची गंभीर बाब दिनांक २१ ऑक्टोबर, २०२५ रोजी माहिती अधिकारातून उघडकीस येणे, सदरहू योजनेचा पुरुष लाभार्थ्यांनी जुलै-२०२४ ते जुलै-२०२५ या कालावधीत लाडकी बहिण योजनेचे पैसे घेतले. त्यानंतर शासनाने पैसे देणे थांबविणे परंतु दिलेले पैसे वसूल करणेबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, यामुळे लाडकी बहिण योजनेमध्ये मोठयाप्रमाणात गैर लाभार्थ्यांनी लाभ घेऊन शासनाची अर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास येणे,एंकदरीतच लाडक्या बहीण योजनेची राज्यभर पारदर्शकपणे अंमलबजावणी करण्यामध्ये शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शासनास सुमारे १६४ कोटी रुपयाचा अर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

महिला व बाल विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडशः विचार व संमत करणे

(१) (क) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १२ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) ग्राम विकासमंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२५ मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी भाग घेतला.

ग्राम विकास मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) (क) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ११ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) नगर विकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**क) विचार, खंडशः विचार व संमत करणे—**

१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सर्वश्री. अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाही.

विधेयक विचारात घेण्याच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. भास्कर जाधव　　　　२) श्री. हेमंत ओगले

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सर्वश्री. अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाही.

विधेयक विचारात घेण्याच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. भास्कर जाधव

२) श्री. जयंत पाटील

३) श्री. नानाभाऊ पटोले

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

३) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव व सर्वश्री. अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव तसेच श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांचा चौधा प्रस्ताव मांडण्यात आले नाही.

विधेयक विचारात घेण्याच्या प्रस्तावावरील चर्चेत श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**क) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे—**

वित्त व नियोजन राज्यमंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ पुन्हा विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्याच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. जयंत पाटील
२) श्री. सुधीर मुनगंटीवार
३) श्री. अमिन पटेल
४) श्री. विजय वडेट्टीवार

विधेयकावरील चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

२२) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी, "जुहू मिलिटरी ट्रान्समिटर स्टेशनच्या ५० यार्डांमध्ये असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग काढण्यासाठी शासनाने निवेदन करणे, तसेच गुलमोहर व डी.एन. नगर परिसरातील इमारतींचा पुनर्विकास करणे", इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनीदेखील उपरोक्त मुद्यावर आपले मत मांडले.

शासनाने याची त्वरित दखल घेऊन हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत दीपवली या सणाचा समावेश होणे, इ. बाबत म.वि.स. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

**५.** (१) नगरविकास विभाग, (२) गृह निर्माण विभाग (३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग विभागांच्या मागण्या म्हणजे अनुक्रमे मागणी क्रमांक एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७ चर्चेसाठी सभागृहाला सादर करण्यात आल्या.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय अध्यक्षांनी, अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहित धरून आता चर्चेला प्रारंभ होईल, असे सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "वैधानिक विकास महामंडळ नसणे", इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सन २०२५-२०२६ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (पुढे सुरू)

मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. सुनिल प्रभु　　२) श्री. अमित देशमुख

३) श्री. मिहीर कोटेचा　　४) श्री. अर्जुन खोतकर

५) डॉ. जितेंद्र आव्हाड　　६) श्री.शंकर मांडेकर

(चर्चा अपूर्ण)

**शासकीय विधेयके (पुढे सुरू) -**

**क) विचार, खंडशः विचार व संमत करणे**

४) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा), विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्याच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. योगेश सागर　　२) श्री. रमेश बोरनारे

३) श्री. उत्तमराव जानकर　　४) श्री. जयंत पाटील

महसूल मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, “आदिवासी आश्रमशाळेतील मुलींना युपीटी चाचणी करावी लागणे”, इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२५-२०२६ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (पुढे सुरू)**

मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

७) श्री. जयंत पाटील　　८) श्री. सुनील राऊत

९) श्री. कालीदास कोळंबकर

श्री. शरद सोनावणे, वि.स.स. यांनी, "रात्रीच्या वेळी बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर लोकांना धमकावून त्यांचे पैसे, दागिने लुटण्याचे होत असलेले प्रकार", इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

शासन निश्चितपणे याबाबत आजच कारवाई करेल, असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

**सन २०२५-२०२६ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (पुढे सुरू)**

मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१०) श्री. संजय गायकवाड
११) श्री. बबनराव लोणीकर
१२) श्री. अमिन पटेल
१३) श्री. रोहित पाटील
१४) श्री. राजकुमार बडोले
१५) डॉ. बाबासाहेब देशमुख
१६) श्री. प्रविण दटके
१७) श्रीमती मंजुळा गावित
१८) डॉ. राहुल पाटील

**घोषणा—**

"अधिवेशन समाप्तीनंतर १४ डिसेंबर रोजी माननीय सदस्यांना मुंबईला जाण्यासाठी एअर इंडिया या विमान कंपनीच्या एका विशेष विमानाची सोय करण्यात आली असून त्याच्या तिकिटाचे आरक्षण ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. तरी सदस्यांनी आपले तिकिट ऑनलाईन आरक्षित करून सुविधेचा लाभ घ्यावा,"अशी घोषणा माननीय तालिका सभाध्यक्षांनी केली.

**सन २०२५-२०२६ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (पुढे सुरू)**

मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१९) श्रीमती सुलभा खोडके
२०) श्रीमती मोनिका राजळे
२१) श्री. रवि राणा
२२) श्रीमती नमिता मुंदडा
२३) श्रीमती सुलभा गायकवाड
२४) डॉ. ज्योती गायकवाड
२५) श्रीमती अनुराधा चव्हाण
२६) श्रीमती मनिषा चौधरी
२७) श्री. मुरजी (काका) पटेल
२८) श्री. महेश लांडगे
२९) श्री. हेमंत ओगले
३०) श्री. वरुण सरदेसाई

३१) श्री. अबु आजमी
३२) श्री. दिलीप लांडे
३३) श्री. अनुपभैया अग्रवाल
३४) श्री. देवेंद्र कोठे
३५) श्री. विलाल भुमरे
३६) श्री. काशीनाथ दाते
३७) श्री. साजिद खान पठाण
३८) श्री. राजेश मोरे
३९) श्री. शेखर निकम
४०) श्री. आनंद तिडके
४१) श्री. अभिजीत पाटील
४२) श्री. हिरामण खोसकर
४३) श्री. शंकर जगताप
४४) श्री. महेश सावंत
४५) श्री. बापूसाहेब पठारे
४६) श्री. बाबाजी काळे
४७) श्री. सिद्धार्थ शिरोळे
४८) श्री. मोहन मते
४९) श्री. अनंत (बाळा) नर
५०) श्री. बालाजी कल्याणकर
५१) श्री. भीमराव तापकीर
५२) श्री. देवराव भोंगळे
५३) श्री. कैलास घाडगे पाटील
५४) श्री. उमेश आत्मरामजी यावलकर
५५) श्री. सुरेश धस
५६) श्री. चरणसिंग ठाकूर
५७) श्री. सिद्धार्थ खरात
५८) डॉ. मिलिंद नरोटे
५९) श्री. ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके

मागण्यांवरील चर्चेला उद्योगमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी उत्तर दिले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून ११ मिनिटांनी गुरुवार दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी ९ वाजून ४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर , २०२५

विधानसभेची विशेष बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव—

"राज्यातील शेतकरी समृद्ध होण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना" या विषयावर सर्वश्री रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांचा प्रस्ताव-

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. रणधीर सावरकर | २) श्री. भास्कर जाधव |
| ३) श्री.अब्दुल सत्तार | ४) श्री. हेमंत ओगले (भाषण पूर्ण) |

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४९ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता सुरू झाली.

**१.** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) मुख्यमंत्र्यांनी, (क) श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२३-२०२४ वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल,(ख) श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल, (ग) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा २०२३-२०२४ चा तेवीसावा वार्षिक अहवाल,(घ) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीतील एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाच्या कारणांसह सभागृहासमोर ठेवली.

(२) मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे सन २०२३ चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(३) पणन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा सदुसष्टावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) मृद् व जलसंधारण मंत्र्यांनी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या वर्षाचे अनुक्रमे चव्वेचाळीसावा, पंचेचाळीसावा व शेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाच्या कारणांसह सभागृहासमोर ठेवला.

**३.** श्री.शंकर जगताप , समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर , २०२५ रोजीचे अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे चौथे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(१) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "त्यांची स्वाक्षरी असलेल्या लेटरहेडची छायाप्रत काढून त्यावरील मजकूर बदलून श्री. रविकांत तिवारी व श्री. नितेश बोजेवार यांना प्रवेश पास देण्यात येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "अहिल्यानगर जिल्ह्यातील कनहेर गाव टेंभुर्णी परिसरातील अवैध रेती उपशाची पोलिसांकडे तक्रार करणाऱ्या श्री. पांडुरंग कुबेर तोडकर या तरूण वकीलाला गुंडांनी सोलापूर हायवेवर मारहाण करणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(अ) पुरःस्थापनार्थ–**

(१) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि.क्रमांक १०६ – महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर सदरहू विधेयक संमत झाले.

(२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि.क्रमांक १०५ – मामलतदार न्यायालय (सुधारणा) विधेयक सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडश : विचार व संमत करणे—**

(१) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.विधेयक क्रमांक १००- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, रामदास मसराम, हेमंत ओगले, अमीन पटेल व अमित झनक यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेमध्ये पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. भास्कर जाधव २) श्री. विजय वडेट्टीवार

महसूल मंत्र्यांनी, उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.विधेयक क्रमांक १०१- हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, रामदास मसराम, हेमंत ओगले, अमीन पटेल व अमित झनक यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेमध्ये पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. जयंत पाटील | २) श्री. विजय वडेट्टीवार |
| ३) श्री. देवराव भोंगळे | ४) श्री. किशोर पाटील |
| ५) श्री. बालाजी कल्याणकर | ६) श्री. चंद्रदीप नरके |
| ७) श्री. नितीन राऊत | ८) श्री. भास्कर जाधव |
| ९) श्री. शेखर निकम | १०) श्रीमती मनिषा चौधरी |
| ११) श्री. सुरेश धस | १२) श्री. नानाभाऊ पटोले |
| १३) श्री. कैलास घाडगे-पाटील | |

महसूल मंत्र्यांनी, उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) महिला व बालविकास मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.प.विधेयक क्रमांक १५- महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेमध्ये पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. भास्कर जाधव | २) श्री. नानाभाऊ पटोले |

महिला व बालविकासमंत्र्यांनी, उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**५.** १ ) महसूल विभाग, २ ) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग आणि ३ ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ( १ ) महसूल विभाग : अनुक्रमांक १२ ते १५ ( २ ) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास : अनुक्रमांक १६ ते २१ व मत्स्यव्यवसाय विभाग ( ३ ) सार्वजनिक बांधकाम विभाग : अनुक्रमांक ३३ ते ३९ चर्चेला घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले व सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली—

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१ ) श्री. जयंत पाटील
२ ) श्री. विक्रम पाचपुते
३ ) श्री. कैलास घाडगे-पाटील
४ ) श्री. निलेश राणे
५ )श्री. नानाभाऊ पटोले
६ ) श्रीमती सना मलिक
७ ) श्री. सुधीर मुनगंटीवार
८ ) श्री. राजू खरे
९ ) श्री.चंद्रदीप नरके
१० ) श्री. बाबाजी काळे

श्री. अमोल खताळ, वि.स.स. यांनी, ' नाशिकमधील संगमनेर येथील चुकेवाडी येथे ३०० किलोपेक्षा अधिक वजनाचा गांजा पोलिसांना सापडणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**५. सन २०२५-२०२६ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या – (चर्चा पुढे सुरु)**

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

११ ) डॉ. किरण लहामटे
१२ ) डॉ. बाबासाहेब देशमुख
१३ ) श्री. संजय मेश्राम
१४ ) श्री. जितेश अंतापूरकर
१५ ) डॉ. राहुल पाटील
१६ ) श्री. विठ्ठल लंघे
१७ ) श्री. रोहित पवार
१८ ) श्री.शेखर निकम
१९ ) श्री. रवि राणा
२० ) श्री. रामदास मसराम
२१ ) श्री. किसन वानखेडे
२२ ) श्री. विजय वडेट्टीवार

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) यांनी उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**६.** माननीय अध्यक्षांनी, आता चर्चारोधानंतरच्या पुढील मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकल्या—

| | |
|---|---|
| १ )सामान्य प्रशासन विभाग | अनुक्रमांक १ ते ५ |
| २ ) गृह विभाग | अनुक्रमांक ६ ते ११ |
| ३ ) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | अनुक्रमांक २२ ते २४ |
| ४ ) वित्त विभाग | अनुक्रमांक ३० ते ३२ |
| ५ ) जलसंपदाविभाग | अनुक्रमांक ४० व ४१ |
| ६ ) विधि व न्याय विभाग | अनुक्रमांक ४२ ते ४५ |
| ७ ) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | अनुक्रमांक ४६ ते ४९ |
| ८ ) ग्रामविकास विभाग | अनुक्रमांक ५० ते ५३ |
| ९ ) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | अनुक्रमांक ५४ ते ५६ |
| १० ) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अनुक्रमांक ५७ व ५८ |
| ११ ) नियोजन विभाग | अनुक्रमांक ५९ व ६४ |
| १२ ) सार्वजनिक आरोग्य विभाग | अनुक्रमांक ६७ ते ६९ |
| १३ ) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | अनुक्रमांक ७० व ७१ |
| १४ ) आदिवासी विकास विभाग | अनुक्रमांक ७२ ते ७५ |
| १५ ) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | अनुक्रमांक ७६ |
| १६ ) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | अनुक्रमांक ७७ व ७८ |
| १७ ) उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अनुक्रमांक ७९ ते ८२ |
| १८ ) महिला व बाल विकास विभाग | अनुक्रमांक ८३ |
| १९ ) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | अनुक्रमांक ८५ |
| २० ) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | अनुक्रमांक ८६ ते ८९ |
| २१ ) अल्पसंख्याक विकास विभाग | अनुक्रमांक ९० व ९१ |
| २२ ) मराठी भाषा विभाग | अनुक्रमांक ९२ |
| २३ )इतर मागास बहुजन कल्याण विभाग | अनुक्रमांक ९३ |
| २४ ) मृद् व जलसंधारण विभाग | अनुक्रमांक ९४ व ९५ |

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**शासकीय विधेयके – पुढे सुरू**

**(क) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडश : विचार व संमत करणे–**

वित्त मंत्र्यांनी (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(१) माननीय उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांनी, " मुंबई शहरात सुधारित भोगवटा अभय योजना राबविणे" इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांनी, " वैभववाडी कोल्हापूर रेल्वे मार्ग तातडीने तयार करण्याबाबत शासनस्तरावरुन कारवाई सुरु करण्यात येत असणे " इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

८. (१) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपुलावर माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये स्कूल व्हॅन व बसमध्ये झालेल्या भीषण अपघातात एका शालेय विद्यार्थ्यासह चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असणे, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि नागपूर पूर्व या तिन्ही प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात एकूण ३९९३ स्कूल बस व व्हॅन्सची नोंद झालेली असणे, यापैकी सुमारे ८ ते १० टक्के स्कूल बस व व्हॅन्सना फिटनेस प्रमाणपत्र नसल्याने त्या अनफिट असून त्याद्वारे विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक सुरु असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन, याबाबतची माहिती घेऊन अशा अनफिट स्कूल बस व व्हॅन्सवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली:

"सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी अधिवेशन समाप्तीनंतर नागपूर ते मुंबईकडे रेल्वेने प्रवास करणाऱ्या सदस्यांना रात्री १०.०० वाजता ट्रेन नंबर ०१०१२ या विशेष ट्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरहू ट्रेनच्या तिकिटाचे आरक्षण उद्या दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात येणार असून ते सर्वांसाठी खुले असल्याने सन्माननीय सदस्यांनी आपली तिकिटे आरक्षित करून सुविधेचा लाभ घ्यावा."

(२) सर्वश्री. भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. निलेश राणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"राज्यात माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत २९ जिल्ह्यांतील ३०० पेक्षा जास्त तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झालेली असणे, २६६ तालुक्यांमध्ये १०० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झालेला असणे, अतिवृष्टी आणि पुरांमुळे ६८ लाख हेक्टर शेती प्रभावित झालेली असून ६५ लाखांपेक्षा जास्त शेतक-यांचे अतोनात नुकसान झालेले असणे, छत्रपती संभाजीनगर, वर्धा, सांगली, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, अकोला, जालना, परभणी व अहिल्यानगर या जिल्ह्यातील सर्व तालुके पूर्णतः बाधित असणे, जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार येथील ५ ते १० तालुके पुणे, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झालेली असणे, शेतक-यांच्या सर्वच पिकांची नासाडी झालेली असणे तर नदी, नाल्यांना महापूर येऊन शेकडो हेक्टर शेती मातीसह खरडून खराब झालेली असणे, राज्य शासनाने ३१ लाख ६४ हजार शेतक-यांना २ हजार २१५ कोटी रुपयांची केलेली मदत, शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात सदर मदत अत्यंत अपुरी असणे, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून मदतीचे पॅकेज जाहीर करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, सदरची परिस्थीती पाहता राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना मदत दिली जावी याकरीता शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मदत व पुनर्वसनमंत्री यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार मागणी केलेली असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी राज्यातील शेतक-यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नुकसान भरपाई मिळत नसल्याने अनेक शेतक-

यांनी आत्महत्या केलेल्या असुन अनेक शेतक-यांची मानसिक अवस्था दोलायमान झालेली असणे,आपल्या न्याय्य मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्यात येत असून नागपूर येथील दिनांक ८ डिसेंबर, २०२५ पासून सुरु होणा-या विधिमंडळाच्या अधिवेशनकाळात मोर्चा काढून आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. विजयसिंह पंडित, हिकमत उढाण, राजेश विटेकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

नाशिक तसेच जायकवाडी धरण क्षेत्रातपावसाचा जोर वाढल्यास धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्गामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघातील पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत सोडावा लागत असून या पाथरवाला गुंतेगाव, सुरळेगाव, पांचाळेश्वर, राक्षसभुवन शनीचे, गुळज यांच्यासह एकूण ३२ गावांना दरवर्षी पूराचा गंभीर धोका होत असणे, सन २००६ मध्ये जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्यामुळे गोदावरी नदीला आलेल्या पुरात या ३२ गावांमधील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होऊन घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, अनेक नागरीकांना स्थलांतर करावे लागणे, त्यानुषंगाने शासनाने सदर ३२ गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला असणे, परंतु आज १९ वर्षे उलटूनही अद्याप पुनर्वसनाचे काम प्रलंबित असणे, यावर्षीही २०२५ मध्ये जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्यामुळे संबंधित गावांमध्ये पुन्हा एकदा पूरस्थिती निर्माण झालेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरलेले असणे, अशा परिस्थितीत प्रशासनाकडून वेळेवर व सक्षम उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असून त्यानुषंगाने संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी गेवराई तालुक्यातील ३२ गावांच्या पुनर्वसनाच्या निर्णयाला तात्काळ प्रशासनिक मान्यता देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय  व बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मुंबई बंदर प्राधिकरणाच्या अखत्यारीतील व महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त असलेली मुंबई-अलिबाग माल वाहतूक व प्रवासी वाहतुकीच्या गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे गेल्या अनेक वर्षापासून एकूण ५ जेटी अस्तित्वात असून त्यापैकी १ ते ४ जेटीवरील वाहतूक ही शासनाच्या नियमाप्रमाणे फक्त ५ रुपये सेवा शुल्काप्रमाणे आकारणी होत असणे, परंतु अनपेक्षितपणे जेटी नं.५ ही धोकादायक आहे असे दर्शवून तेथून प्रवासी व माल वाहतूक होऊ शकत नाही असे निर्देशीत करणे, सदर जेटी ही खाजगी व्यक्तीला हाताळण्याकरिता मुंबई बंदर प्राधिकरण (MPT) यांनी राजपत्र काढण्याअगोदर परवानगी दिलेली असणे, महाराष्ट्र शासनाने दि.२५ ऑक्टोबर, २०२५ रोजी राजपत्र काढून देणे, रॉयल बॉम्बे यॉट क्लब हा प्रायवेट क्लब सामान्य प्रवाशी व पर्यटकांना ही जेटी हाताळण्यासाठी (रु.७८+१८% GST) रु.९२ प्रति प्रवासी आकारत असणे, तसेच सदर क्लबच्या सदस्यांकरिता रु. २३ प्रति प्रवासी असणे, सदरचा दर हा राजपत्रात नमूद नसूनही सदर क्लब स्वतःच्या मर्जीनुसार दर लागू करीत असणे, सदर दर हा शासनाच्या निर्धारित दराच्या १५ ते २० पट जास्तीचा असणे, शिवाय सदर व्यक्ती ही जेटी नं.५ ही प्रवासी वाहतुकीसाठी सुयोग्य असतांनाही प्रवाशांना, बोट चालक व मालकांना भीती दाखवून त्यांनी केलेल्या पर्यायी लोखंडी तराफा मार्गाचा पैसे आकारुन अवलंब करण्यांस भाग पाडणे, पर्यायाने प्रति प्रवाशी यांना जाण्या-येण्यासाठी किमान २०० ते २५० रुपयांचा अतिरिक्त भार पडणे, त्यामुळे प्रवाशी, बोटचालक-मालक यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण पसरणे, वास्तविक या मार्गावरुन किमान १५० ते २०० बोटी रोज प्रवासी वाहतुक व नौकानयन करत असणे, सर्व बोटमालक व चालकांनी मिळून या अन्यायकारी वसूलीबाबत संबधीतांकडे सनदशिर मार्गाने आंदोलन करणे, या ठिकाणी असलेल्या एकूण ५ जेटी पैकी फक्त क्रमांक ५ चीच जेटी  ही जाणीवपूर्वक धोकादायक ठरवून त्याची दुरुस्ती न करणे, केवळ कांही लोकांच्या हितसंबधासाठी ही जेटी खाजगी व्यक्तीला हाताळण्यांसाठी देणे, यामध्ये गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."-

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, डॉ. ज्योती

गायकवाड वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधले-

"मुंबई मध्ये रस्त्यावर बसून विविध व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांसाठी मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही ठोस धोरण नसणे, मुंबई महानगरपालिकेकडून रस्त्यावर बसून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येणे, आघाडी सरकारच्या काळात या फेरीवाल्यांसाठी एक धोरण बनविण्यात येणे, लोकसंख्येच्या २.५ टक्के फेरीवाल्यांना परवाना देण्याची तरतूद असणे, परंतु त्यात काही फेरीवाले पात्र तर काही फेरीवाले अपात्र होणे, या फेरीवाल्यांना केंद्र सरकारच्या माध्यमातून कर्ज देण्यात येणे, परंतु त्यांना व्यवसाय करु न दिल्यास त्यांच्याकडून कर्ज फेड करता न येणे, मुंबईमध्ये शहर फेरीवाला समिती ही महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बनविण्यात येणे, परंतु सदर कमिटी अद्यापही कार्यान्वित न होणे, श्रीमंत लोक मोठमोठया दुकानात अथवा शॉपींग मॉलमध्ये जाऊन खरेदी करु शकणे, परंतु सामान्य नागरीकांचा दरदिवशी या फेरीवा-यांशी संपर्क होणे, या फेरीवाल्यांसाठी फेरीवाला क्षेत्र नसल्याने सतत या फेरीवाल्यांवर कार्यवाही होत असणे, मुंबई महानगर पालिकेच्या फेरीवाल्यांसाठी असलेल्या नियमांमध्ये सुधारणा होणे आवश्यक असणे, या मेहनती फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय करण्यासाठी संधी मिळणे गरजेचे असणे, त्यामुळे मुंबई महानगरपालिकेकडून या फेरीवाल्यांसाठी ठोस धोरण अंमलात येण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी या फेरीवाल्यांकडून होणे, परिणामी या फेरीवाल्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांच्याकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"चंदगड (जि.कोल्हापूर ) मधील हेरे सरंजामसंदर्भात १९७२ पासून प्रकरण प्रलंबित असणे, यामध्ये गावे, वाडी विभाजनानंतरची गावे यांचा समावेश असणे, दिनांक ३१ मे, २००१ च्या शासन निर्णयापूर्वी वाटप करावयाचे क्षेत्र १६००१ हेक्टर असून शासन

निर्णयानंतर वाटप झालेले क्षेत्र ६०९१ हेक्टर असून त्यापैकी वाटप केलेले क्षेत्र ३७२१.३७ हेक्टर असणे, त्याचबरोबर वाटप करावयाचे क्षेत्र २३६९.६३ हेक्टरपैकी कॅम्प मध्ये वपाटप केलेले क्षेत्र ९२५.६६ हेक्टर सध्या वाटपाचे शिल्लक क्षेत्र १४४३.९७ हेक्टर बाकी असणे, तत्कालीन मंत्रीमंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष घातल्यामुळे कामाला प्रत्यक्षात सुरुवात होणे, परंतु सदर कामे करतांना प्रशासकीय पातळीवर अनेक अडचणी येत असणे, याकरिता यामध्ये येत असलेल्या जाचक अटी शिथील करण्याची आवश्यकता, विविध कागदपत्रांच्या होत असलेल्या मागणीबाबत फेरविचार करण्याची गरज, तसेच शासकीय पट जी २०० तो कमी केल्यास सदर प्रक्रीया सुलभ होऊन शेतक-यांच्या नावे जमीन होऊन अनेक वर्ष प्रलंबित असलेले प्रकरण निकाली काढण्यासाठी शासन स्तरावर तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री. विक्रम पाचपुते, प्रविण दटके, श्रीमती मंजुळा गावित, श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसामुळे जून ते सप्टेंबर महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात कांदा पिकाचे नुकसान झालेले असणे, जास्त पाऊस झाल्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नसणे, अतिवृष्टीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या निर्यातीवर परिणाम झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, आर्द्रतेमुळे वखारातील कांदा कुजून, बुरशी लागून विक्री योग्य राहिलेला नसणे, झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने निर्माण झालेली नैराश्याची भावना, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईकरिता शासनाने पंचनामे करण्याबाबत आणि नुकसान भरपाई देण्याबाबत तातडीची करावयाची कार्यवाही व उपायोजना.”

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८. सर्वश्री आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा प्रस्ताव -

श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले-

"जून ते सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी-ओला दुष्काळ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल होणे, शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी न होणे, बहुतेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तुटपुंजी मदत मिळणे, शेतीचे पंचनामे करण्यास प्रशासनाकडून विलंब होत असल्याने निधी वितरणात गोंधळ उडालेला असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्यांचा धोका वाढणे, मुंबई-नागपूर-चंद्रपूर, पुणे-ठाणे इत्यादी शहरांमध्ये हवेचे गंभीर प्रदूषण वाढले असल्याने हवेची गुणवत्ता धोक्याच्या पातळीवर गेल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणे, प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची कार्यवाही अपुरी असणे, बेरोजगारीमुळे तरुणाईमध्ये ड्रग्सचे वाढते प्रमाण, मुंबई-पुणे-नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर एम.डी. (मेथ) व अन्य ड्रग्सचे उत्पादन, वाहतूक व साठा आढळणे, महाविद्यालयीन तरुणाईला ड्रग्सचा विळखा पडला असून सर्रासपणे होणाऱ्या अंमली पदार्थांच्या विक्रीस आळा बसविण्याबाबत शासनाला येत असलेले अपयश, सन २०२६ मधील नाशिक येथील कुंभमेळयाची तयारी सुरु असून यासाठी पुरातन वारसा असलेल्या तपोवन परिसरातील हजारो झाडांची कत्तल करून पर्यावरणीय संतुलन बिघडून हरितपट्टा नष्ट होण्याचा धोका निर्माण होणे, तपोवन परिसरातील वृक्षतोडीला समाजातील विविध माध्यमातून विरोध दर्शविला असणे, मातृभाषा-आधारित शिक्षण पद्धतीच्या विरोधात निर्णय घेऊन इयत्ता १ ते ३ पर्यंत "तिसरी भाषा" अनिवार्य हिंदी भाषा थोपवली जात असणे, मुंबईतील महानगरपालिकेच्या मराठी शाळा बंद पडत असणे, मुंबईतील शासकीय स्थळांचे खाजगीकरण होत असणे, राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटची अंमलबजावणी करतांना मराठा विरुध्द इतर मागासवर्ग, धनगर व बंजारा विरुध्द आदिवासी असा वाद निर्माण करून सहिष्णुता संपुष्टात आणणे, राज्यातील विविध प्रशासकिय विभागांमध्ये सध्या गंभीर अनियमितता, धोरणात्मक त्रुटी, भ्रष्टाचार, निधी अभाव आणि अंमलबजावणीतील शिथिलता दिसून येणे, याचा थेट परिणाम राज्याच्या विकासकामांवर, शेतकरी वर्गावर, महिला-बालकांच्या आरोग्यावर, शहर व ग्रामीण विकासावर, पर्यावरणावर तसेच कायदा-सुव्यवस्थेवर होत असणे, मागील काही महिन्यांपासून अनेक समाजोपयोगी योजना बंद करण्यात येणे, त्यात आनंदाचा शिधा, एक रुपयात पीकविमा, स्वच्छता मॉनिटर, एक राज्य एक गणवेश, लाडक्या भावाला अपरेंटीसशिप, योजनादूत योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना इत्यादी महत्त्वाच्या योजना बंद करण्यात येऊन त्यांचा निधी इतरत्र वळविणे, सामाजिक न्याय, आदिवासी, महिला व बालविकास, ग्रामविकास आदी विभागांच्या अनेक

योजना बंद किंवा ठप्प झालेल्या असणे, महिला व बालविकास विभागातील आदर्श अंगणवाडी "स्मार्ट किट" खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अनियमित खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असणे, किटचे निकृष्ट दर्जाचे साहित्य असल्याने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा न होणे, त्याचप्रमाणे राज्यातील अनेक महत्त्वाच्या महानगरपालिका क्षेत्रात भूखंड घोटाळे झाल्याचे प्रकार नुकतेच उघडकीस येणे, जमीन वाटपात अनियमितता, अवैध ताबे, बांधकामाला परवानगी देताना होणारे भ्रष्टाचार, भूखंडांचे अवास्तव दर, राजकीय दबाव व तडजोडी होत असणे, नागपूर अधिवेशनादरम्यान घाईघाईने सार्वजनिक बांधकाम मार्फत दुरुस्ती व नवीन कामे करण्यात येत असल्याने ही कामे एमपीडब्ल्यू मॅन्युअलप्रमाणे न होणे, सदरील दर्जाहीन कामे, वेळेत काम न करणे, प्रचंड आर्थिक अनियमितता असणे, शालेय पोषण आहार व अंगणवाडी पूरक पोषण आहाराचा दर्जा अत्यंत निकृष्ट असणे, त्यामुळे कुपोषणात वाढ होऊन अनेक भागात बालमृत्यूंच्या व गरोदर मातांच्या मृत्यूदरात वाढ होणे, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जमीन वाटपात भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले असून इनाम, महार वतन, गायरान आणि सरकारी जमिनींच्या वाटपातील अनियमितता दिसून येणे, या जमिनीच्या व्यवहारासाठी राजकीय हस्तक्षेप व आर्थिक हितसंबंध जोपासले जात असणे, कामगार विभागातील गृह-उपयोगी व सेफ्टी किट निविदेतील भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसणे, पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील वाढवण येथे होणाऱ्या बंदराच्या बांधकामाला तेथील नागरिकांचा होत असलेला विरोध, दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी आय.टी.डी. कंपनीने पोलीस बळाचा वापर करित ड्रिलींगचा सर्व्हे करण्याचा केलेला प्रयत्न, त्यामुळे परिसरातील स्थानिक नागरीकांनी एकत्र येऊन या सर्व्हेला केलेला विरोध, विरोध करणाऱ्या महिलांना करण्यात आलेली धक्काबुक्की, राज्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, परंतु अद्यापही न मिळालेली नुकसान भरपाई, राज्यात वाढलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राज्यात कुपोषणामुळे मुले, गर्भवती व स्तनदा मातांच्या मृत्यूंची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, पालघर, मेळघाट अमरावती येथे कुपोषणामुळे झालेले मृत्यू, दि. १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी पुणे येथील पुणे-बंगळुरु महामार्गावर नवले पूल परिसरात झालेला भीषण अपघात, २ कंटेनर व एका कारच्या झालेल्या या अपघातात एका ३ वर्षाच्या चिमुकलीसह ८ व्यक्ती जागीच मृत्यूमुखी पडून बावीस व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या असणे, कर्नाटक विधानसभेच्या बेळगाव येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाला तेथील मराठी भाषिकांनी केलेला विरोध, मराठी भाषिकांनी केलेला महामेळावा कर्नाटक पोलिसांनी दडपून टाकून मराठी भाषिक १०० नेते व कार्यकर्त्यांना केलेली अटक, याचे राज्यात उमटलेले पडसाद, पुणे महानगरपालिकेत ज्या सालचे घर, त्या सालचे दर या दराने

महापालिकेमार्फत कर आकारणी केली गेल्याचे दिसून येणे, त्यास अनुसरून पूर्वीपासून महापालिकेत असणारे क्षेत्र व नव्याने समाविष्ट गावे या दोन्ही ठिकाणी आकारल्या जाणाऱ्या कराकरिता एकच निकष लावण्यात आलेला असणे, वास्तविक १९९७ साली समाविष्ट झालेली गावे यांत तब्बल तीस वर्षांचा फरक असणे, वार्षिक करपात्र रक्कम ठरविताना त्या ठिकाणी किती सुविधा देण्यात येते याचा विचार करून त्या ठिकाणचे दर हे नव्याने करण्याची आवश्यकता, शासनाने २०२० मध्ये सुरु केलेली आर. आर. पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना शासनाने २९ सप्टेंबर २०२५ रोजी अचानक बंद करणे, सरसकट कर्जमाफीची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकांमध्ये वापरण्यात येणाऱ्या मतदार याद्यांमध्ये असलेल्या प्रचंड चुका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीमध्ये SC, ST आरक्षणाची बदललेली चक्राकार पद्धत, सन २०२३ पासून राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असल्याचा प्रचार परंतु प्रत्यक्षात होत नसलेली गुंतवणूक, त्यामुळे राज्यात वाढलेली बेरोजगारी, आदिवासी विभागातील अनेक वर्षापासून कार्यरत रोजंदारी शिक्षकांची सेवा समाप्त करून खाजगी संस्थेमार्फत शिक्षकांची केली जाणारी कंत्राटी भरती, राज्यात वाढलेले भ्रष्टाचाराचे प्रमाण, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१) श्री. राहुल कुल
२) श्री. हेमंत ओगले
३) श्री. रईस शेख
४) श्री. प्रकाश सोळंके
५) श्री. अर्जुन खोतकर
६) श्री. राजू खरे
७) श्री. चरणसिंह ठाकूर
८) श्री. कैलास घाडगे-पाटील
९) श्री. नारायण (आबा) पाटील
१०) डॉ. बाबासाहेब देशमुख
११) श्री. सुरेश धस
१२) श्री. रमेश बोरनारे
१३) श्रीमती श्वेता महाले
१४) श्री. मनोज कायंदे
१५) श्री. शरददादा सोनवणे
१६) श्री. बाबाजी काळे
१७) श्री. देवराव भोंगळे
१८) श्री. विनोद अग्रवाल
१९) श्री. अमोल खताळ
२०) श्री. मुरजी पटेल

२१) श्री. प्रताप अडसड
२२) श्री. अभिजीत पाटील
२३) श्री. सिद्धार्थ खरात
२४) श्री. अमोल जावळे
२५) श्री. काशिनाथ दाते
२६) श्री. अशोक पाटील
२७) श्री. विक्रम पाचपुते
२८) श्री. संजय पुराम
२९) श्री. तुकाराम काते
३०) श्री. शंकर मांडेकर
३१) श्री.राजेश बकाने
३२) श्री. उमेश उर्फ चंदू यावलकर
३३) श्री. बाबूराव कदम-कोहळीकर
३४) श्री. रोहित पाटील
३५) श्री. प्रवीण स्वामी
३६) श्री. राघवेंद्र (रामदादा) पाटील
३७) श्री.अनंत (बाळा) नर (भाषण पूर्ण)
(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक मध्यरात्री ०१ वाजून ५५ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी ०९.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९-३० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

आज शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या कामकाजपत्रिकेत विशेष बैठकीत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १ संदर्भात पत्र प्राप्त झाल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"पुणे महानगरपालिकेत लोहगावसह इतर गावांचा सन २०१७ मध्ये समावेश होणे, सदर गावांच्या विकास आराखड्यास विलंबामुळे महापालिकेला विकासकामे करण्यास येत असलेल्या अडचणी, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप विकास आराखड्यात गंभीर त्रुटी असणे, लोहगावातील अनेक प्रस्तावित रस्ते नागरिकांच्या घरांवरून दर्शविणे, स.न.९५ व इतर सर्व्हेनंबरमधून ३६ मी. रस्त्यालगत ३०० मी.वर मोकळी जागा असतानाही नागरीवस्तीतून, पुणे–अहिल्यानगर महामार्गावर खराडी जकात–नाक्यापासून केवळ २०० मी. अंतरावर ३६ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करून कृत्रिमपणे ०२ चौकांमुळे वाहतूक कोंडीची संभावना,अनेक आरक्षणे नागरिकांच्या भूखंडांवर प्रस्तावित करणे, मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या जमिनीवर आरक्षण नसल्याने हस्तक्षेप झाल्याची दाट शंका, आरक्षणांमुळे अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन होणे, एकाच जमीनमालकाच्या भूखंडावर ३६, २४, १८ मी.रस्ते, उद्यान, डिस्पेन्सरी, सार्वजनिक सुविधा अशी आरक्षणे, स.न.१३४ मध्ये ग्रामपंचायत काळापासून नागरिक वास्तव्यास असणे, सदर सर्व्हे नंबरमध्ये मोकळ्या जागा नसतानाही कमर्शियल झोन, पोरवाल रोड स.न.२९६ येथील घरांवर ग्रीन झोन करणे, सदर आराखडा करताना अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय पाहणी न करता कार्यालयीन नकाशांवर करणे, भूभागाची सद्यस्थिती, घरबांधणी, वाहतूक, लोकवस्तीचा विचार न करणे, सदर आराखड्याबाबत सखोल चौकशी करून आढळलेल्या त्रुटी, अनियमितता आणि व्यक्तीच्या संभाव्य हस्तक्षेपाची तपासणी आवश्यक असणे, नागरिकांच्या घरांवरून प्रस्तावित सर्व रस्ते रद्द करून मोकळ्या जागेतून पुनः प्रस्तावित करणे आवश्यक असणे, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या भूखंडांवरील आरक्षणांचा पुनर्विचार करून जमीन व उपजीविका संरक्षित करणे आवश्यक असणे, प्रारूप आराखडा प्रत्यक्ष पाहणी करून सुधारित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग विकास मंत्री यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. रईस शेख, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"भिवंडी शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ११५ मौजे चाविंद्रा सर्वे नं ७ पै.१०६ पै हा सिटी पार्ककरिता आरक्षित असलेल्या जागेवर कचरा डपिंग ग्राऊंड करण्यात आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, मनपा क्षेत्रातील दैनंदिन जमा होणारा कचरा अनधिकृतपणे या ठिकाणी जमा केला जात असणे, सदर जागा ही सिटी पार्ककरिता आरक्षित असतांना गेल्या २० वर्षापासून यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदर जागेवर कचरा जमा होत असल्याने चाविंद्रा, पोगाव, रामनगर, गायत्रीनगर, नागांव येथील नागरिकांनी त्याला तीव्र विरोध करणे, सदरहू डपिंग ग्राऊंडमुळे आजुबाजुच्या गावातील नागरिकांचे, विदयार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येणे, नागरिकांनी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला असता यासंदर्भात तत्कालीन प्रशासक तथा आयुक्त यांनी नागरिकांसमवेत डपिंग ग्राऊड बंद करण्याबाबत महानगरपालिकेमध्ये बैठक घेऊन दिनांक २/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत पर्यायी व्यवस्था होईपर्यंत करण्यात येईल असे दिलेले आश्वासन, परंतु आज २०२५ सुरु झाले तरीही डपिंग ग्राऊंड अदयापी बंद करण्यात आलेले नसणे, त्यामुळे नागरिक संतप्त होणे, डपिंग ग्राऊंड बंद न झाल्यास नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सदरहू डपिंग ग्राऊड तात्काळ बंद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"सायन रेल्वे स्थानक येथे सायन ( मुंबई शहर ) आणि मुंबई पश्चिम उपनगर यांना जोडणाऱ्या मध्य रेल्वे मार्गावर ROB पूल असणे, सदर पूल हा धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जुना पूल जमीनदोस्त करून नवीन पूल बांधण्याचे काम शासनातर्फे हाती घेण्यात येणे, मागील दीड वर्षापूर्वी पुलाचे काम सुरू झाले असून येथील वाहतूक

पूर्णपणे बंद करण्यात आली असणे, सदर बांधकाम धीम्या गतीने सुरू असल्याचे निदर्शनास येणे, बांधकाम सुरू झाल्या पासून सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषणात वाढ होणे, सायन येथून धारावी आणि पश्चिम उपनगर यांना जोडणारा एकमेव मार्ग बंद झाल्यामुळे पायी चालत जाणारे प्रवासी, दुचाकी आणि हलकी वाहने यांना पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने वाहतूक कोंडी होत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला असंतोष, रखडलेले पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करून प्रवाशांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. मुरजी पटेल, अतुल भातखळकर, मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मंगेश कुडाळकर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधले.

"मुंबईमधील व मुंबई उपनगर मधील अनेक इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र रखडलेले असून काही विकासकांनी इमारती बांधणे परंतु इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले नसणे, भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे किंबहुना भोगवटा प्रमाणपत्र रखडलेले असल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतीमधील रहिवाशांना शास्ती कराच्या रूपाने तिप्पट चौपट कराची रक्कम भरावी लागत असल्यामुळे रहिवाशांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असणे, भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी इमारतीमधील रहिवासी महापालिकेकडे गेल्यास विकासक निघून गेल्याने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी लागणारे कागदपत्रे उपलब्ध होत नसणे, शास्ती रूपाने तिप्पट, चौपाटीचा आर्थिक भूदंड सोसावा लागत असल्याने व भोगवटा प्रमाणपत्र अभावी इतर महत्त्वाची कामे होत नसल्याने जनमानसात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, त्यामुळे मुंबई व उपनगरातील भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींना तातडीने भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मंत्र्यांचे (नगरविकास व गृहनिर्माण) लक्ष वेधले.

"मुंबईतील गोरेगांव येथील लिंक रोडवरील देवी कन्याकुमारी एस.आर.ए योजनेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी स्थानिक झोपडपट्टीवासियांनी संबंधित प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, या एस.आर.ए. योजनेत पात्र झोपडपट्टीवासियांवर अन्याय होत असतानाही याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करीत असणे, याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात चौकशी करण्याबाबत शासन दिरंगाई करीत असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. मिहिर कोटेचा वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई शहर व उपनगर मधील प्रमुख शहरे जसे कि मानखुर्द गोवंडी येथील कांदळवन, नाले आणि जलवाहिन्यांवर मोठ्या प्रमाणात भर टाकून हजारो झोपड्या उभारण्याचे गंभीर प्रकार गेल्या काही वर्षांत वाढत असणे, तसेच विविध विभागांच्या मालकीच्या शासकीय खुल्या जागांवर भूमाफियांनी अतिक्रमण केलेले असणे, त्यात संबंधित विभागांकडून निष्क्रियता आणि काही ठिकाणी मिलीभगत असल्याची गंभीर माहिती समोर येत असणे, या अतिक्रमणांमुळे शहरातील नाले आणि जलवाहिन्या अडवल्या जात असून पावसाळ्यात पूरस्थिती वाढून नागरिकांचे जीवित व मालमत्तेचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असणे, कांदळवनाचा ऱ्हास होऊन पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत असणे, शहर नियोजन पूर्णपणे विस्कळीत होत असणे, मोठ्या प्रमाणात रोगराई पसरून मनुष्यहानी होण्याची दाट शक्यता असणे, शासकीय मालमत्ता गिळंकृत करून जमीन माफियांचे जाळे अधिक बळकट होत असणे, गुन्हेगारी व अनैतिक व्यवहारांना चालना मिळत असणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा मार्फत 'नेत्रम' हे वेब बेस ॲप पी.एम. गती शक्ती (PM GATI SHAKTI) बरोबर संयुक्तरित्या बनवलेले असणे, त्यामध्ये LAND JIHAD चे सर्व पुरावे असणे, सदर स्थिती बदलण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री यांनी (श्री. एकनाथ शिंदे माननीय उप मुख्यमंत्री यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अजंग ता.मालेगाव जि.नाशिक येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या गट क्रमांक ४०७/१ पैकी क्षेत्र १५.०० तसेच मौजे सातमाने शिवारातील ब्लॉक क्र.१४ या शासनाच्या मालकीच्या जागेवर कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता स्टोन क्रशर व गौणखनिज उत्खनन, खोदकाम व वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असणे, सदर ठिकाणी पर्यावरण, महसूल,उद्योग, वन विभाग, प्रदूषण मंडळ, प्राधिकरण यांची एकही वैध परवानगी नसताना संबंधित खाण माफियांनी संगनमताने शासनाची फसवणूक करून महसूली नुकसान करणे, MIDC क्षेत्रातील गटक्र. ४०७/१ पैकी क्षेत्र १५.०० मध्ये कोणत्याही स्टोन क्रशरला परवानगी नसणे, सदर ठिकाणी अवैध क्रशर व खनिज उत्खनन संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असणे, यामुळेच महसूल, पर्यावरण, वन, प्रदूषण मंडळ यांच्या मंजुरीशिवाय शासनाच्या जमिनीचा अनधिकृत वापर केला जात असणे, औद्योगिक क्षेत्रातील खनिज संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असणे, सदर शासन नियमांविरोधात खाण माफिया यांचेकडून गौणखनिज उत्खनन, ब्लास्टिंग, ट्रक वाहतूक सुरू असून सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणाला गंभीर हानी पोहचत असणे, दिनांक ०८ एप्रिल, २०२५ रोजी उपरचनाकार तथा विशेष नियोजन प्राधिकरण मऔविम, नाशिक यांनी तहसीलदार, मालेगाव यांना पाठविलेल्या पत्रामध्ये अजंग–रावळगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारच्या क्रशरला परवानगी देण्यात आलेली नाही असे स्पष्ट नमूद असणे, पर्यावरणीय परवानगी न घेता उत्पादन सुरू करणे, MPCB कडून हवा/पाणी प्रदूषण परवाना नसणे, महसूल व खनिकर्म परवाना नसताना उत्खनन व नियमबाह्य वाहतूक सुरू ठेवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. गोपिचंद पडळकर वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"जत तालुक्याची भूमी ही रामायण-महाभारत काळापासून “मंगल परिसर” आणि “शक्ती पीठांची भूमी म्हणून प्रख्यात असणे, राजकीय कारणामुळे तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे आणि प्रस्थापित नेतृत्वाच्या उदासिनतेमुळे या भूभागाचा धार्मिक व सांस्कृतिक वारसा व विकास अद्यापपर्यंत झालेला नसणे, जतच्या भूमीचे महत्त्व सिद्ध करणारे प्रमुख शक्ती पीठे

जत तालुक्यात असणे, महाभारतातील बकासूर ज्या शक्ती देवतेची उपासना करीत होता त्या एकविरा देवीचे मंदिर डफळापूर येथे असणे, कुंती मातेचे एकमेव स्थान जतपासून जवळच कोत्यनबबलाद येथे असून कुंती मातेचे हे भारतातील एकमेव मंदिर स्थान असणे, महाराष्ट्र-कर्नाटकाचे श्रध्दास्थान श्री धान्नमा देवी, गुड्डापूर आणि बनशंकरी, बनाळी ही मोठी शक्तीपीठे असणे, स्थानिक कुलदेवता श्री यल्लमा देवी, यब्बावा, उटगी, कालीमाता, जत, महालक्ष्मी, खलाटी, आदिशक्ती मुरुगुबाई, मेंढीगिरी आणि श्री माय्यक्का मंदिर, जत यांसारखी अनेक जागृत देवस्थाने जत तालुक्यात असणे, त्यामुळे राज्य आणि केंद्र शासनाकडून धार्मिक पर्यटन विकास अंतर्गत जत तालुक्याला विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, जत तालुक्याचा धार्मिक विकास झाल्यास पर्यटन वाढून जत तालुक्यात रोजगार निर्मिती होणार असणे, त्यामुळे जत तालुक्याला देवभूमी म्हणून घोषित करून धार्मिक स्थळांचा विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्री यांनी, सदरहू लक्षवेधी सूचना जरी पर्यटन विभागाकडे दाखविली असली तरी या लक्षवेधी सूचनेचा आशय धार्मिक स्थळांचा विकास करणे हा आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना ग्रामविकास विभागाकडे हस्तांतर करावी अशी विनंती केली.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांनी सदरहू लक्षवेधी सूचना पुन्हा दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी विनंती करावी, अशी सूचना केली.

(१०) सर्वश्री, संतोष बांगर, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, प्रकाश सोळंके, राजेश वानखेडे, राघवेंद्र पाटील, रोहित पाटील, संजय मेश्राम, सत्यजित देशमुख, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संतोष बांगर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी-कर्मचारी, सी.आर.पी. व गावस्तरीय केडर यांच्या प्रलंबित शासन निर्णयाबाबत गंभीर गैरसमज निर्माण झाल्याचे वास्तव उघड होणे, गेल्या तीन वर्षांपासून ग्रामविकास विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान (MSRLM) यांच्या बैठकीत मंजूर केलेले निर्णय, स्वतंत्र 'उमेद विभाग स्थापन करणे, ६२ वर्षांपर्यंत सेवा कार्यक्षमता ठेवणे, ग्रामसखी दर्जा, नवीन HR Manual (मानव संसाधन पुस्तिका) लागू करणे, CIF अनुदान, विमा-सुविधा, वेतनवाढ, व बाह्य संस्था कमी करण्याचे निर्णय

अद्याप अंमलात न येणे, तर माहे मार्च, २०२६ नंतर समुदाय केडरचे मानधन बंद होण्याची भीती निर्माण होणे, यामुळे हिंगोली, नांदेड, जळगाव, सातारा, नागपूरसह राज्यभरातील ८४ लाख ग्रामीण कुटुंबांचे भविष्य अनिश्चित होत असल्याने असंतोष वाढणे, त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक हस्तक्षेप करून उमेदीतील सर्व प्रलंबित निर्णय कायमस्वरुपी निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४९ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (अ) तारांकित प्रश्न—

(१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) सचिव (२) यांनी अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ९ ते २२ सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) कामगार मंत्री यांनी, (मुख्यमंत्री) यांच्यावतीने) (क) महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल,

(ख) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) नगरविकास राज्यमंत्री यांनी, (क) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल,

(ख) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, ता. पनवेल यांचा सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा अनुक्रमे तेहतीसावा, चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल,

(ग) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल,

(घ) मुंबई रेलवे विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल,

(ङ) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल,

(च) मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) कामगार मंत्री यांनी ((पशुसंवर्धन मंत्री) यांच्यावतीने), पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) आदिवासी विकास राज्यमंत्री यांनी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) कृषी मंत्री यांनी, (क) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल,

(ख) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छप्पन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(६) परिवहन राज्यमंत्री यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ चा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी, श्री.सहाव राठोड, बोपगाव, माहूरगड, किनवट तालुका यांचे सोयाबीन खरेदी केद्राने नाकारणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय वरिष्ठ सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी जी माहिती सभागृहात दिलेली आहे, त्यासंबंधीची शासनाने नोंद घेऊन चौकशी करावी व पुढील उपाययोजना करावी, निर्देश माननीय अध्यक्षांनी दिले.

(१) पणन मंत्री यांनी, हेक्टरी २३ क्विंटल कापूस खरेदीची मर्यादा राज्यात सरसकट लागू करणे, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) महसूल मंत्री यांनी, बाबुलनाथ मंदिर ट्रस्ट, मलबार कंबाला हिल, मुंबई यांच्या लिज नूतनीकरण, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(३) महसूल मंत्री यांनी, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरु करणे व ती राबविण्याकरिता सोपी व सुलभ कार्यपद्धती निश्चित करणे, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(४) महसूल मंत्री यांनी, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील दीर्घ मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्टयाचे नूतनीकरण करणे, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(५) महसूल मंत्री यांनी, भोगवटादार वर्ग – २ मधून भोगवटादार वर्ग – १ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरण करणे, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री यांनी, महसूल मंत्री यांनी, पापलेट उत्पादनाच्या अनुषंगाने समाजमाध्यमांत उपस्थित चर्चा, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केल्या.

(१) दिनांक ११ डिसेंबर,२०२५ रोजी सन्माननीय सदस्य श्री. नितीन राऊत यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांच्या बनावट लेटरहेड व सहीचा वापर करुन, त्यावर रवीकांत तिवारी व नितेश बारेवार यांची नावे नमूद करून विधान भवन प्रवेश पास घेतला आहे. सदर बाब गंभीर असून याची दखल घेण्यात यावी, असे सांगितले आहे. याबाबत मुख्य सुरक्षा अधिकारी, विधान भवन यांना सदर गंभीर प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सांगितले होते. त्यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार विद्यासागर जनार्दन राऊत सदर इसम संशयास्पद असून, या इसमाने हे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी माहिती प्राप्त झाली आहे व त्याच्याकडे विचारणा केल्यानंतर सदर बाबीची कबुली दिलेली आहे. याबाबत अधिकची चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येईल.

(२) सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात येत असलेल्या संदर्भसमृध्द ग्रंथमालिकेतील " विधानपरिषदेने संमत केलेली महत्वपूर्ण विधेयके, ठराव आणि धोरणे" या द्वितीय ग्रंथाचे प्रकाशन माननीय श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते आणि माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व संसदीय कार्य मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजता विधानपरिषद सभागृहात करण्यात येत आहे. या प्रकाशन सोहळ्यास आपण उपस्थित रहावे.

(१) श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी, मुंबई उपनगरात गोरेगावमध्ये प्रबोधन येथे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात एक पिसाळलेला कुत्रा २६ लोकांना चावला असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(२) डॉ. श्री. नितीन राऊत वि.स.स. यांनी, छायांकित प्रतीवर माझी खोटी स्वक्षरी असलेल्या पत्राच्या आधारे माननीय अध्यक्ष यांच्या कार्यालयातून पास दिली असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य डॉ.नितीन राऊत व श्री. सुनिल प्रभू यांनी मांडलेल्या मुद्याची शासनाने गंभीर दखल घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**३.** श्री. नरेंद्र भोंडेकर (समिती प्रमुख) यांनी, "दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात धक्काबुक्की करीत अत्यंत आक्षेपार्ह कृत्य करून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा व प्रतिमा मलीन केल्याने उद्‌भवलेले महाराष्ट्र विधानसभेचे विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण" या प्रकरणासंबंधातील विधानसभा विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहास सादर केला व शिफारस केली.

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी, सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांबाबत मंत्रालयीन अधिकारी यांच्याकडून नकारात्मक शेरे देण्यात येत असणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या विषयाची शासनाने दखल घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्ष यांनी सांगितले.

**४.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**५.** (१) श्री. अमिन पटेल वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्वपदे रिक्त असल्याने हिंदी भाषण प्रलंबित असल्याने सदर मुद्याबाबतचा मजकूर उपलब्ध नाही.)

(२) श्री. प्रवीण दटके वि.स.स. यांनी, नागपूरात जवळपास ६६ टेरेस बार अनधिकृत पद्धतीने सुरु असणे, इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(३) डॉ.ज्योती गायकवाड वि.स.स. यांनी, मुंबईमध्ये ३६ दिवसांमध्ये ८२ मुले बेपत्ता झालेली असणे, इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(४) श्री. अबु आझमी यांचा माहितीचा मुद्दा. (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्वपदे रिक्त असल्याने हिंदी भाषण प्रलंबित असल्याने सदर मुद्याबाबतचा मजकूर उपलब्ध नाही)

(५) श्री. विलास भुमरे वि.स.स. यांनी, पैठण मतदारसंघातील इंदेगाव विहामांडवा रस्त्याच्या कालव्यावरील पूल ऊसाचा ट्रॅक्टर जात असताना कोसळला असणे, इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

**६.** (१) श्री. दिलीप लांडे वि.स.स. यांनी, चांदिवलीतील माईली व असल्फा येथील हरीत पट्टा रद्द करण्याची आवश्यकता, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री.नरेंद्र बोंडेकर वि.स.स. यांनी, भंडारा विधानसभा मतदारसंघात गोसे खुर्द जल प्रकल्प असून त्यातील ३४ गावे पुनर्वसन व ३२ गावे गावे अंशतः पुनर्वसन प्रक्रियेमध्ये असून जिल्ह्याचे पालक मंत्री यांनी येथील लोकांच्या प्रश्नाच्या संदर्भात ताबडतोब बैठक घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याची गरज, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. सिद्धार्थ शिरोळे वि.स.स. यांनी, पीसीएमसी भागात माहे ऑक्टोबर मध्ये लिफ्टमध्ये अडकून झालेला मृत्यू, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. विक्रम पाचपुते वि.स.स. यांनी, सरकार सेवा केंद्राचे संगणक तज्ज्ञ, ब्लॉक व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक हे ५ दिवसांपासून उपोषणाला बसलेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) ॲड. श्रीजया अशोकराव चव्हाण वि.स.स. यांनी, राज्यातील शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध असल्याने शेतामध्ये जावे लागत असल्याने अनेक ठिकाणी शेतकऱ्यांवर बिबट्याने हल्ला केल्याच्या घडणा घडत आहेत. त्यामुळे याबाबी विचारात घेऊन शेतीला सकाळी ६ ते रात्री ६ या कालावधीत वीज पुरवठा करण्यात यावा, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

श्री. समाधान अवताडे वि.स.स. यांनी, राज्यातील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत महिला परिचर यांचा कामाचा अनुभव व सेवा कालावधी लक्षात घेऊन त्यांच्या मानधनात तातडीने

भरीव वाढ करण्यात यावी, तसेच त्यांना अर्ध वेळ ऐवजी पूर्ण वेळ नियमित सेवेत समावून घेण्यासाठी शासनाने त्वरित धोरणात्मक निर्णय घ्यावा, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री.हरीष पिंपळे वि.स.स. यांनी, मुर्तीजापूर मतदारसंघात मंगळूर बॅरेज उभारण्यात येत असताना जांभा बुद्रुक गावाचे १०० टक्के पुनर्वसन होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. परंतु, त्यांचे पुनर्वसन करण्यात येत नसल्याने संपूर्ण गावातील लोक मुलांसह बॅरेजच्या पाण्यात आंदोलन करीत असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने दखल घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**७.** (१) श्री. गोपीचंद पडळकर वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

महाराष्ट्रातील होलार समाज अनुसूचित जातीतील (SC) २६ व्या क्रमांकावर असून या समाजाचा पारंपारिक व्यवसाय वाद्य वाजविणे, जुन्या चपला शिवणे हा असणे, या समाजाकडे शेत जमीन नसल्याने तारण मिळत नसणे, त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी कर्जही मिळत नसणे, तसेच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने बेरोजगारी व गरीबीचे प्रमाण जास्त असणे, महाराष्ट्र शासनाने १९७४ साली होलार, चांभार, ढोर व मोची या समाजासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ स्थापन करणे, परंतु सदर महामंडळ स्थापनेपासून होलार समाजाला या महामंडळामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधीत्व मिळालेले नसणे, सदर महामंडळ स्थापनेपासून अध्यक्ष व संचालक नसणे, माहिती अधिकाराखालील माहितीच्या आधारे असे दिसून येणे की २% सुध्दा कर्ज वाटप झालेले नसणे, त्यामुळे होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे गरजेचे असून याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली असणे, राज्यात ५० लाखाच्या पुढे होलार समाजाची लोकसंख्या असून महाराष्ट्रातील विविध भागात व्यवसायानुसार मातंग, चांभार, मोची अशा चुकीच्या नोंदी लागलेल्या असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी नेमलेल्या अभ्यास गटाने सिध्द करणे, त्यामुळे होलार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सामाजिक न्यायमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी, राज्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देणे या

विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ७१९३ ला दिनांक १५ जुलै, २०२५ शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा –तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

इतर मागास व बहुजन कल्याण विकास मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(३) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

"बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुमारे १४,००० पेक्षा अधिक पागडी/सेस इमारती असणे, यापैकी अनेक इमारती १९४० पूर्वी बांधलेल्या असून अत्यंत जीर्ण अवस्थेत असणे, या इमारतींमध्ये लाखो कुटुंबे अतिधोकादायक परिस्थितीत वास्तव्य करत असून त्या कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत असणे, मात्र मालक व भाडेकरू यांच्यातील वाद तसेच एक समान पुनर्विकास धोरणाच्या अभावामुळे या इमारतींचा पुनर्विकास अद्यापही रखडलेला असणे, परिणामी रहिवाशांना असुरक्षित व अमानवीय परिस्थितीत राहण्यास भाग पाडले जात असणे, त्यामुळे या इमारतींच्या पुनर्विकासासाठी "इमारतीचे वय" या एका साध्या व स्पष्ट निकषाची आवश्यकता, या प्रकारातील सन १९६५ पूर्वीच्या सर्व पागडी/सेस इमारती जीर्ण अवस्थेत असोत वा नसोत त्यासाठी ठराविक काल मर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता, बी.डी.डी. पुनर्विकासाचा आदर्श समोर ठेऊन सेस/पागडी इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी एक नवीन, स्पष्ट, सर्वसमावेशक व पारदर्शक शासन निर्णय (GR) तातडीने काढण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(४) श्री. भिमराव (आण्णा) तापकीर व इतर वि.स.स. यांनी, "पिंपरी-चिंचवडमधील (जि. पुणे) येथे पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याबाबत" या विषयावरील तारांकित सूचना प्रश्न क्रमांक ७५६३ ला दिनांक ०७ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भषाण केले.

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(५) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील विषयाव अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

"पोंभुर्णा आणि करंजी (ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर) येथील एमआयडीसीमध्ये आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची आवश्यकता, जिल्ह्यातील आदिवासी तरुण-तरुणींना उद्योजक करण्यासाठी आदिवासी औद्योगिक विकास क्षेत्र निर्माण करण्याची आवश्यकता, आदिवासी युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी होणारे प्रयत्न जलदगतीने होत नसल्याने उद्योजकतेकडे त्यांची वाटचाल होत नसल्याचे दिसून येणे, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा आणि गोंडपिपरी तालुक्यातील करंजी येथील एमआयडीसीमध्ये प्लग अॅन्ड प्ले या धर्तीवर आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

**७. (ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१) (क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव.**

"ही विधानसभा सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करणे"

अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) पणन मंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९३ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचा दुसरा प्रस्ताव, सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, अमित झनक, विकास ठाकरे, रामदास मसराम व हेमंत ओगले यांचा तिसरा प्रस्ताव व सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचा चौथा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अर्जुन खोतकर
(२) श्री. रमेश बोरनारे
(३) डॉ. राहुल आहेर
(४) श्री. अनिल पाटील
(५) श्री. दिलीप लांडे
(६) श्री. राहुल कूल
(७) श्री. सचिन कल्याणशेट्टी
(८) श्री. चद्रदीप नरके
(९) श्री. शरददादा सोनवणे
(१०) श्री. नारायण कुचे
(११) श्री. नानाभाऊ पटोले
(१२) श्री. सुनिल कांबळे
(१३) श्री. अभिजीत पाटील

पणन मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयकचा खंडशः विचार सुरू झाला.

**खंड ३—सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या प्रकरण एक-अ नंतर नवीन प्रकरण समाविष्ट करणे.**

खंड ३ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री. रणधीर सावरकर व समीर कुणावार यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. रणधीर सावरकर वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली.

"**पृष्ठ क्रमांक ३,—**

(१) ओळ क्रमांक १२ व १३ मध्ये,-

"त्या विभागातील चार शेतकरी" या मजकूराऐवजी "त्या विभागातील अथवा राज्यातील पाच शेतकरी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) ओळ क्रमांक २१ ने २३ मध्ये,

कंसातील "(त्यांपैकी एक, महिला असेल आणि एक, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जमाती) किंवा भटक्या जमाती यांमधील व्यक्ती असेल) हा मजकूर वगळण्यात येईल."

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ३, 'सुधारणा केल्याप्रमाणे', विधेयकाचा भाग झाला.

खंड ४ ते ९ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

**खंड १० - सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३४अ ची सुधारणा.**

खंड १० ला सन्माननीय सदस्य सर्वश्री रणधीर सावरकर व समीर कुणावार यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. रणधीर सावरकर वि.स.स. यांनी पुढील सुधारणा मांडली."

पृष्ठ क्रमांक ६,-

ओळ क्रमांक १७ व १८ मध्ये,

""राज्य शासनास," या मजकूराऐवजी, "संचालकास,"" या मजकूराऐवजी""राज्य शासनास देण्यात येईल," या मजकूराऐवजी, "संचालकास देण्यात येईल"" हा मजकूर दाखल करण्यात येईल;"

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड १०, 'सुधारणा केल्याप्रमाणे', विधेयकाचा भाग झाला.

खंड ११ व १२ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक सुधारणा केल्याप्रमाणे संमत झाले.

**८. पुरःस्थापनार्थ–**

गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स.विधेयक क्रमांक १०८ – महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी, पुणे जिल्ह्यातील एका आदिवासी आश्रमशाळेतील माध्यमिकमध्ये शिकणाऱ्या मुलींना प्रेग्नन्सी टेस्टनंतर प्रवेश दिल्याचा मुद्दा मांडला होता. त्यासंदर्भात माननीय महसूल मंत्र्यांनी या प्रकरणी शासन निवेदन करेल असे सांगितले होते. मात्र शासनाने याबाबत कोणतेही निवदेन केलेले नसणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१) श्री. राहुल कुल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे रिंगरोडची संकल्पना २७ वर्षापूर्वी, १९९७ च्या प्रादेशिक आराखड्यात मांडली असणे, २०१४-१५ मध्ये प्रकल्प MSRDC कडे सोपवला असणे, १७० किमीचा रस्ता असून पुणे – पिंपरी चिंचवड शहरांच्या वाहतूक कोंडीच्या समस्यांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण असणे, आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच ४२००० कोटी रुपयांच्या सुधारित प्रस्तावाला प्रमा देण्यात येणे, विलंबामुळे २२००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाची किंमत वाढली असणे, ९०% भूसंपादन पूर्ण झाले असून प्रत्यक्षात काम चालू झालेलं नसणे, हडपसर - यवत सहापदरी उन्नतमार्गासाठी ५२६२ कोटी, पुणे-शिरूर ५३ किमी सहापदरी उन्नत मार्गासाठी ७५१५ कोटींची मंजुरी मिळाली असणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे तातडीने सुरु करण्याची आवश्यकता असणे, पुणे-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर ६ लेन ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे साठी अंदाजे १६००० कोटींच्या खर्चाची आवश्यकता असणे, तळेगाव ते शिक्रापूर हा उन्नत मार्ग देखील प्रस्तावित असणे, पुणे शहरात अनेकठिकाणी रस्त्यांचे, पुलांचे आणि मेट्रोचे काम चालू असल्यामुळे नागरिकांना ट्रॅफिक रांगांमध्ये उभे राहून त्रास सहन करावा लागणे, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उन्नत मार्ग, रिंगरोडची संकल्पना असून, साकारण्यास विलंब होणे, कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्याचे सांगण्यात आले असून कार्यवाही झाली नसणे, MSRDC, MSIDC व जिल्हाधिकारी पुणे यांनी समन्वय वाढवून विलंब टाळण्याची आवश्यकता, लोणीकाळभोर, ता.हवेली, पर्यंतचा प्रस्तावित मेट्रोमार्ग यवत, ता.दौंड, पर्यंत करण्याची मागणी, एकंदर सर्वंकष वाहतूक नियोजनाची गरज, वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असलेली नाराजी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयोजना."

शालेय शिक्षण मंत्री यांनी (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. भिमराव (आणा) तापकीर, सुनिल कांबळे, सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भिमराव (आण्णा) तापकीर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"पुणे महानगरपालिका हद्दीत, खडकवासला विधानसभा मतदारसंघात धनकवडी, भारती विद्यापीठ, शिवणे, धायरी, वारजे, सिंहगड रस्ता, बावधन व इतर उपनगरांत वाढती लोकसंख्या, वाहनसंख्या आणि वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली असणे, वाहतूक कोंडी व अपघातांची वाढलेली शक्यता हे पुणे मनपात स्वतंत्र तांत्रिक "वाहतूक नियोजन विभाग" नसल्याचा परिणाम असणे, सिग्नल समन्वय, जंक्शन सुधारणा, मार्ग नियोजन व वाहतूक व्यवस्थापन तांत्रिक तज्ज्ञता नसल्याने व्यवस्थापन होत नसणे, पिंपरी–चिंचवड महापालिकेत वाहतूक अभियांत्रिकी व शहरी नियोजन तज्ज्ञांचा विभाग कार्यरत असताना पुण्यात अशी यंत्रणा नसणे, डीपी रस्ते, सेवा रस्ते व रस्त्यासाठी आरक्षित भूखंडांचा विकास प्रलंबित असल्याने वाहतूक कोंडी वाढली असून आरक्षित जमिनीवरील अतिक्रमणे, मार्ग अरुंद व असुरक्षित बनवित असणे, सनसिटी नदीवरील पूल व इतर उड्डाणपूल बांधकामांदरम्यान पोहोच रस्त्यांचे पूर्वनियोजन न केल्याने वाहतूक अडथळे वाढले असणे, ही स्थिती पाहता स्वतंत्र तांत्रिक "वाहतूक नियोजन विभाग" स्थापन करणे आवश्यक असणे, अनुभवी ट्रॅफिक प्लॅनर नेमणे, उपनगरांमध्ये वाहतूक नियंत्रणासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, प्रलंबित डीपी रस्ते, सेवा रस्ते व पोहोच रस्त्यांची कामे अतिक्रमणमुक्त करणे, तसेच मागील तीन वर्षांत व पुढील वर्षभरात रस्ते व सेवा रस्त्यांच्या विकासासाठी झालेला खर्च व प्रस्तावित निधी तसेच मतदारसंघात आवश्यक तेथे कोणत्या खात्यांतून निधी वर्ग केला असणे याबाबतचा तपशील, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांच्यावतीने)) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री, बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार, नारायण कुचे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. बबनराव यादव वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"परतूर विधानसभा मतदारसंघांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या १७३ गाव वॉटर ग्रीड मधील ५२ तर ९५ गाव वॉटर ग्रीड मधील एकही गावांमध्ये पाणी पोहोचले नसणे, दि.७ डिसेंबर, २०२३ रोजी १७३ गाव वॉटर ग्रीडचे १३ कोटी रुपयांचे तर २७ डिसेंबर, २०२३ रोजी ९५ वॉटर ग्रीडचे १३ कोटी रुपये असे २६ कोटी रुपये अंतिम बिल काम पूर्ण न करता अदा करण्यात आले असणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे तत्कालीन मुख्य अभियंता,

अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने आर्थिक व भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्याचा खोटा अहवाल शासनास सादर केला असणे, मुख्य जलकुंभापासून जलकुंभापर्यंत, जलकुंभापासून गावातील पाण्याच्या टाकीपर्यंत हायड्रोलिक टेस्ट केलेली नसणे, पाण्याची टाकी, चेंबर बांधणे, पाईपलाईनसह वॉल-रिटर्न वॉल टाकणे इत्यादी कामे अपूर्ण असणे, पाईपलाईन फूट दीडफूट खोदल्याने लिकेज आणि फुटतुट होतं असणे, कामाचा दर्जा तपासण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली नसणे, कुठलीही शहानिशा न करता दोन्ही योजनेचे मिळून २६ कोटी रुपये फायनल बिल काम अपूर्ण असताना देण्यात येणे, अपहार करणाऱ्या सर्व भ्रष्ट अधिकारी-कंत्राटदाराच्या वैयक्तिक मालमत्तेवर बोजा टाकून अपहाराची रक्कम वसूल करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मोहन मते, प्रताप अडसड,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कृष्णा खोपडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले.

"नागपूर महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांनी अधिकार नसताना स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत अंदाजे २० कोटींच्या वर गैरव्यवहार केला असणे, त्यावेळेसचे महापौर/सत्तापक्षाचे नेते यांनी सर्व कागदपत्रांसहीत सदर पो.स्टे.नागपूर येथे तक्रार दाखल करून FIR दाखल करणे, पोलिस विभागातर्फे या प्रकरणी कार्यवाही न होणे, या अधिकाऱ्याने स्मार्ट सिटी प्रकल्पामधील दोन महिला अधिकाऱ्यांसोबत अभद्र व्यवहार स्वतःच्या कार्यालयात बोलावून करणे, या महिला अधिकाऱ्यांनी हिम्मत दाखवून सदर पो.स्टे.नागपूर येथे तक्रार केल्याने याबाबतचा गुन्हा दाखल झालेला असणे,महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी या प्रकरणावर सुनावणी घेऊन मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांना कारवाईचे दिलेले निर्देश, शासनस्तरावर प्रकरण दोन वर्षापासून प्रलंबित असणे, डॉ.के.एच.गोविंदराज यांचे पत्र क्र.D/८२३ प्रक्र१६३ नवि-३२, दि.०८/०१/२०२४ यांनी प्रधान सचिव, अपिल व सुरक्षा, गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण करणे,समितीने प्रकरण IAS अधिकाऱ्यांचे असल्यामुळे प्रलंबित ठेवणे, यासंदर्भात नागपूर (पूर्व) मतदारसंघाचे विधानसभा सदस्य यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी मुख्य

सचिव, अप्पर मुख्य सचिव (गृह),पोलिस आयुक्त नागपूर यांना व दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव नवि-२, पोलिस आयुक्त, नागपूर यांना पुराव्यांसहीत कारवाई संदर्भात पत्र दिलेले असतानाही शासनस्तरावर कारवाई प्रलंबित असणे, हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्यामुळे उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, तोपर्यंत संबंधित नागपूर महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी (उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. विजयबापू शिवतारे, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुरंदर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील रस्त्यांची अतिशय दुरवस्था होणे, सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य होणे, अनेक ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र तयार होणे, मोठ्या प्रमाणात अपघात होऊन नागरिकांचे जीव जाणे, वारंवार सूचना देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केलं जाणे, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभागात कार्यकारी अभियंता पदी व पुरंदर येथील उप अभियंता पदी अत्यंत अकार्यक्षम अधिकारी कार्यरत असणे, दोनही अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कार्यपद्धतीमुळे नागरिक हैराण होणे, पुरंदर तालुक्यात आतंरराष्ट्रीय विमानतळ, राष्ट्रीय महामार्ग, लॉजिस्टिक पार्क, आयटी पार्क असे प्रकल्प प्रगतीपथावर असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे भांडवली गुंतवणुकीस उद्योजक आणि गुंतवणूकदार न धजावणे, त्याचा विपरीत परिणाम पुरंदर तालुकाच नव्हे तर पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राच्या विकासावर होणे, सार्वजनिक बांधकाम विभागात निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोळ घालणे, निविदा प्रक्रिया पारदर्शी नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. साजिद पठाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"विदर्भ कबड्डी असोसिएशनमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार, गैरव्यवहार व मनमानी कारभार सुरू असल्याचे डिसेंबर, २०२५ मध्ये उघड झाले असणे, सदर

पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंची दिशाभूल करून त्यांच्याकडून पैसे उकळणे, खोटी आश्वासने देणे, प्रमाणपत्रांची परस्पर विक्री करणे, तसेच अॅमेचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या लेटरहेडवर खोट्या सह्या करून न्यायालयात खोटी कागदपत्रे सादर करण्याचे गंभीर प्रकार उघड झाले असणे, राष्ट्रीय खेळाडू कु. छकुली पेटकर हिने या त्रासामुळे आत्महत्या केली असणे, तिच्या निवेदनानुसार पदाधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे तीने हे पाऊल उचलल्याचे स्पष्ट होणे, विविध पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी देऊनही FIR दाखल न झाल्याने पीडितांना न्याय मिळत नसणे, म्हणून विदर्भ कबड्डी असोसिएशन बरखास्त करून संबंधित पदाधिकारी यांचेवर तात्काळ FIR नोंदवून एसआयटीमार्फत तपास सुरू करण्याची तसेच मृत खेळाडूंच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता तसेच या प्रकरणातील विदर्भ कबड्डी असोसिएशनमध्ये सुरु असलेल्या भ्रष्टाचाराची एसआयटी मार्फत चौकशी करून असोसिएशन तात्काळ बरखास्त करून दोषी पदाधिकारी व चंद्रपूर जिल्हयाचे सचिव यांच्यावर तात्काळ FIR दाखल करून तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) महसूल मंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक १०२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. योगेश सागर (२) श्री. अभिजित पाटील

(३) श्री.हिरामण खोसकर

महसूल मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) महसूल मंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक १०३ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, रामदास मसराम, हेमंत ओगले, अमीन पटेल व अमित झनक यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. संजय गायकवाड (२) श्री. अतुल भातखळकर

(३) श्री. अभिजीत पाटील

महसूल मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) महसूल मंत्री यांनी, सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक १०५ – मामलतदार न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, रामदास मसराम, हेमंत ओगले, अमीन पटेल व अमित झनक यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. भास्कर जाधव (२) श्री. अभिमन्यू पवार

(३) डॉ. बाबासाहेब देशमुख (४) श्री. सुनिल शेळके

| | |
|---|---|
| (५) श्री. संजय गायकवाड | (६) श्री. हिरामण खोसकर |
| (७) श्री. अभिजीत पाटील | (८) श्री. राजकुमार बडोले |
| (९) श्री. राजेश पवार | (१०) श्री. राघवेंद्र पाटील |
| (११) श्री. भास्कर जाधव | (१२) श्री. नानाभाऊ पटोले |
| (१३) डॉ. अतुलबाबा भोसले | (१४) श्री. राजू खरे |
| (१५) श्री. रमेश बोरनारे | (१६) श्री.सचिन कल्याणशेट्टी |
| (१७) श्री. कैलास घाडगे पाटील | (१८) श्री. हेमंत ओगले |
| (१९) श्री. अनंत (बाळा) नर | (२०) श्री. सिद्धार्थ खरात |

महसूल मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(७) श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मौजे मंगरूळ, (ता. मावळ, जि. पुणे) येथे गट नं ४१, ४२, ४६ हे सर्वे नंबर afforestation म्हणजे वनीकरणासाठी राखीव क्षेत्र म्हणून आरक्षित असलेल्या क्षेत्रातील बेसुमार झाडांची वृक्षतोड केली असून येथील माती, मुरूम व डबर प्रकारचे गौण खनिजाचे अवैधरीत्या उत्खनन झालेले असणे, सदर विषयाबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये दिनांक २० मार्च, २०२५ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली असून सदर लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असताना मा. मंत्री महोदयांनी याबाबत संबंधित अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी माहिती न घेता चुकीच्या सर्वे नंबरमधून उत्खननाकरिता परवानगी दिली व त्यांच्या परवानगीनंतर अवैधरीत्या सदर उत्खनन झालेले आहे असे सांगणे, तसेच वन परिक्षेत्रात काही ठिकाणी शेड्यूल आणि काही नॉन शेड्यूल असलेली झाडे तोडताना परवानगी घेतलेली नसणे, सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून शासन यामध्ये विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करेन आणि या जागेचे शासनाकडून संपूर्ण मोजमाप व सर्वेक्षण करून साधारण एक महिनाभरात त्यांचा अहवाल घेण्यात येईल असे आश्वासित करणे,

सदर विषयाबाबत आजमितीस ८ महिने इतका कालावधी उलटला असून शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यासंदर्भात स्थानिकांकडून वारंवार होत असलेल्या मागणीकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये शासनाविषयी वाढलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. राजेश विटेकर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील विविध गैरप्रकारांकडे सहकार आयुक्त पुणे यांच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, १५२ पदांच्या भरतीसाठी मान्यता असताना बँकेस "अ" दर्जा दाखवून मंजूर आकृतीबंधानुसार सर्व ४२१ जागा सरळसेवा पद भरतीसाठी नियमबाह्यरित्या संचालकांनी ठराव मंजूर करणे, आकृतीबंधच्या १००% प्रमाणे जागा भरणे धोकादायक असताना सहकार आयुक्त पुणे यांनी ठराव न फेटाळणे, वारसाला नोकरीत घेण्याकरीता सर्रासपणे अनफिट दाखवून ५० ते ६० जणांकडून लाखो रुपये घेऊन बँकेत नोकरीत घेणे, ११ प्रोबेशन कर्मचाऱ्यांना सप्टेंबर, २०२५ दरम्यान नियमबाहयरित्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता घेऊन कायम करणे, नोकर भरतीसाठी पात्रता नसतानाही बँकेत नोकरी देणे, संचालक, त्यांचे नातेवाईकांना, हितसंबंधातील लोकांना नियम व निकष डावलून जवळपास शंभर कोटी रुपयांचे कर्ज वाटप करणे, सदर प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय सहनिबंधक व सहकार आयुक्त पुणे यांच्या स्तरावरून दुर्लक्ष होणे, पाथरी तालुक्यातील विविध सहकारी सोसायटी मधील पदाधिकारी यांना हाताशी धरून नियमबाह्यरित्या कर्ज वाटप करणे, जिंतूर येथील माजी आमदार यांनी सन २०२५ दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी तक्रार करणे, बँकेच्या अंदाधुंद कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, वरील सर्व गैरप्रकार व लेखापरीक्षण विभाग यांच्या कारभाराची सहकार विभागाकडून चौकशी होण्याची गरज, यावर शासनाने केलेली कारवाई व त्यावरील उपाययोजना.

सहकार मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री. उत्तमराव जानकर, अभिजीत पाटील, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. बाबासाहेब देशमुख वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने एप्रिल २०१९ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्याच्या प्रलंबित अनुदानाबाबत दि.११ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन मंत्री मदत व पुनर्वसन यांनी चारा छावणी चालकांच्या कागदपत्रांमद्धे काही त्रुटींची पूर्तता करण्याकरिता विभागीय आयुक्त पुणे यांच्या कार्यालयातील किमान उपायुक्त यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे संबंधित चारा छावणी चालकांची सुनावणी घेऊन राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार पात्र चाराछावणीचा सुधारित प्रस्ताव शासनास दिनांक २८ जून, २०२४ रोजी सादर करण्यात येणे, सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील चाराछावणीधारकांचे प्रलंबित देयकाबाबत अनुक्रमे रु.२०,८६,९०,५९३/- व रु.१२,०७,५०,७३१/- इतक्या सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करून या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक १ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात येऊन राज्य आपत्ती प्रतिसाद निधिमधून चारा छावणी चालकांच्या प्रलंबित अनुदानाचा खर्च करण्यात येणार असून, यास्तव विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून दिनांक २८ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्ताव राज्य कार्यकारी समितीसमोर सादर करून समितीने दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या राज्य कार्यकारणी समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे सदर प्रस्तावाची पुनश्च फेरपडताळणी करून फेर प्रस्ताव सादर करण्यास निर्देश देणे, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी राज्य कार्यकारिणी समितीकडे प्रस्ताव पाठविणे, या प्रस्तावावर राज्य कार्यकारिणी समितीने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने चारा छावणीधारक अनुदानापासून वंचित राहिल्याने असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**१०. (अ) पुरःस्थापनार्थ :–**

(१) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८२ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरु व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८५ महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८७ महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(५) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(६) डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९० - महाराष्ट्र राज्यातील पदवीधर बेरोजगारांना सेवा-सुविधा (बेरोजगार भत्ता) देण्याबाबत विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१ - महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भात मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(८) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०७ - महाराष्ट्र अधिवक्ता विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव-**

सर्वश्री आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा, "या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळणे, राज्यातील महानगरामधील प्रदूषणाची समस्या, तरूणांना अमलीपदार्थांचा पडलेला विळखा, नाशिक कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील हजारो वृक्षतोड करून पर्यावरणाला निर्माण होणारा धोका, मुंबईतील शासकीय स्थळाचे होणारे खाजगीकरण, राज्यात वाढलेली बेरोजगारी, शेतकरी कर्जमाफीची होत असलेली मागणी, इत्यादीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष" इ. बाबत दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.वरुण सरदेसाई
(२) श्री.सत्यजित देशमुख
(३) डॉ. ज्योती गायकवाड
(४) श्री. नारायण (आबा) पाटील
(५) श्री.राजेश विटेकर
(६) श्री.नारायण कुचे
(७) श्री. बाबाजी काळे
(८) श्री. अबु आझमी
(९) श्री.राजेश पवार
(१०) श्री.रोहित पाटील
(११) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे
(१२) श्री. सिद्धार्थ खरात
(१३) श्री.हिकमत उढाण
(१४) श्री. हिरामण खोसकर
(१५) श्री.मनोज जामसुतकर
(१६) श्री.मनोज कायंदे
(१७) श्री.आनंद तिडके
(१८) डॉ. किरण लहामटे
(१९) श्री. प्रवीण स्वामी
(२०) श्री. अभिजीत पाटील
(२१) श्री. अनंत (बाळा) नर

सभागृहाची बैठक शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी मध्य रात्री १२.२८ वाजता शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी ९.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.३० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले -

"मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील अनेक ठिकाणी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत अनेक बहुमजली इमारतींचे बांधकाम सुरू असणे, सदर बांधकामे करतांना विकासक यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुरक्षिततेची काळजी न घेता नियमबाह्य पद्धतीने कामे सुरू असणे, बहुमजली इमारतींची कामे सुरू असल्याने उंचावरुन पडणारे साहित्य आजूबाजूच्या परिसरामध्ये असलेल्या चाळींवर व वस्तींवर पडत असणे, उक्त साहित्य वजनदार असल्याने रस्त्यावरुन जाणाऱ्या रहिवाशांवर पडत असल्याने वारंवार अपघात घडत असणे, या कारणास्तव नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत असणे, दिनांक ८ आक्टोबर, २०२५ रोजी मे.श्रध्दा लाईफस्पेस यांच्या माध्यमातून विकास प्रकल्पाच्या साईटवरुन बांधकाम साहित्य पडून कु.संस्कृती अनिल कोटीयन या २२ वर्षीय तरुणीला आपला जीव गमवावा लागला असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबतचे निदर्शनास आणलेले असतानाही या प्रकरणी दोषी व्यक्तींवर आवश्यक कारवाई होत नसणे, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची व असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरित याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. हिकमत उढाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मौजे महाकाळा येथील समर्थ सहकारी साखर कारखाना, महाकाळा (ता.अबंड) व सागर सहकारी साखर कारखाना, तीर्थपूरी (जि.जालना) व्यवस्थापनाने अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ऊस देयकातून बेकायदेशीररित्या विविध कारणांनी रक्कम कपात केलेली असणे, सदर कपातीविरोधात अनेक वर्ष ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण व आंदोलन करून न्यायासाठी आवाज उठविला

असणे, अनेक वर्षापासून स्थानिक शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असणे, सदर कपातीच्या रकमेबाबत विचारणा केली असता कारखाना व्यवस्थापनाकडून कोणतेही समाधानकारक निर्णय अद्याप घेतलेला नसणे, समर्थ कारखान्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेली खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या रकमेवर तसेच शेअर्स वाटपात करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये आर्थिक गैरव्यहा केलेला असणे, आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, सहकार आयुक्त कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय तसेच केंद्रीय सहकार मंत्री यांच्याकडे लेखी अर्ज तक्रार दाखल करुनही देखील त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल अद्याप शासनाकडून घेतलेली नसून शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नसणे, त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे थकीत रकमेचा परतावा मिळाला नसल्यास आत्महत्या करण्याकरिता परवानगीची मागणी कलेली असणे, बळीराजाच्या हक्काची रक्कम परत मिळवून देण्याकरिता व शेतकऱ्यांना आत्महत्येपासून रोखण्याकरिता न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सहकार राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

( ३ ) श्री.गोपिचंद पडळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"जत तालुक्याची भूमी ही रामायण-महाभारत काळापासून “मंगल परिसर” आणि “शक्तीपीठांची भूमी म्हणून प्रख्यात असणे, राजकीय कारणामुळे तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे आणि प्रस्थापित नेतृत्वाच्या उदासिनतेमुळे या भूभागाचा धार्मिक व सांस्कृति वारसा व विकास अद्यापपर्यंत झालेला नसणे, जतच्या भूमीचे महत्त्व सिद्ध करणारे प्रमुख शक्ती पीठे जत तालुक्यात असणे, महाभारतातील बकासूर ज्या शक्ती देवतेची उपासना करित होता त्या एकविरा देवीचे मंदिर डफळापूर येथे असणे, कुंती मातेचे एकमेव स्थान जतपासून जवळच कोत्यनबबलाद येथे असून कुंती मातेचे हे भारतातील एकमेव मंदिर स्थान असणे, महाराष्ट्र-कर्नाटकाचे श्रद्धास्थान श्री धान्नमा देवी, गुड्डापूर आणि बनशंकरी, बनाळी ही मोठी शक्तीपीठे असणे, स्थानिक कुलदेवता श्री यल्लमा देवी, यब्बावा, उटगी, कालीमाता, जत, महालक्ष्मी, खलाटी, आदिशक्ती मुरुगुबाई, मेंढीगिरी आणि श्री माय्यक्का मंदिर, जत यांसारखी अनेक जागृत देवस्थाने जत तालुक्यात असणे, त्यामुळे राज्य आणि केंद्र शासनाकडून धार्मिक पर्यटन विकास अंतर्गत जत तालुक्याला विशेष निधी उपलब्ध

करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, जत तालुक्याचा धार्मिक विकास झाल्यास पर्यटन वाढून जत तालुक्यात रोजगार निर्मिती होणार असणे, त्यामुळे जत तालुक्याला देवभूमी म्हणून घोषित करून धार्मिक स्थळांचा विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

ग्रामविकास व पंचायतराज मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ आणि ५ पुढे ढकलण्यात आल्या असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक ९ चर्चेस घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(९) सर्वश्री. अतुल भातखळकर आणि मनोज जामसुतकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले –

"झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (SRA) माध्यमातून उभारल्या जाणाऱ्या पुनर्वसित इमारतींना विकासकांकडून एका घरासाठी ४० हजार रुपये इतका कॉर्पस फंड आकारला जात असणे, परंतु, उंच इमारती उभारल्या जात असल्याने लिफ्ट, अतिरिक्त जिने, अग्निशमन यंत्रणा इत्यादींमुळे वाढलेला मेंटेनन्स इमारतीमधील रहिवाशांना परवडत नसणे, त्यामुळे, सदर रक्कम रु. ४० हजार वरून रु. १ लाख पर्यंत वाढवून देण्याची गरज असणे, तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन इमारतींमध्ये सामायिक सुविधांवरील खर्च विशेषतः कॉमन पॅसेजमधील विजेची देयके, उद्वाहन (लिफ्ट) वैगेरे अशा गोष्टींचा भार रहिवाशांना सहन करावा लागणे, त्यामुळे, SRA मार्फत बांधल्या जाणाऱ्या इमारतींना OC देण्यापूर्वी विकासकांनी सोलार पॅनेल बसविणे बंधनकारक करण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे, कॉर्पस फंड रुपये ४० हजार वरून रुपये १ लाखपर्यंत वाढवून देण्याकरिता व इमारतींना OC देण्यापूर्वी विकासकांनी सोलार पॅनेल बसविणे बंधनकारक करण्याकरिता ठोस निर्णय घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले –

"परभणी जिल्ह्यातील गंगाखेड ही श्री संत जनाबाईंच्या जन्माने पावन झालेली भूमी असून गोदावरीच्या काठावरील या स्थानास दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाणे, येथे दरवर्षी दर्शनासाठी हजारो दिंड्यांतून लाखो भाविक येत असणे, येथे भेट देणाऱ्या भाविकांसाठी भक्तनिवास, सार्वजनिक शौचालय त्याचप्रमाणे भौतिक सेवा-सुविधांचा असलेला अभाव, त्यामुळे भाविक व वारकऱ्यांची होत असलेली गैरसोय, राज्यातील इतर संतांच्या जन्म अथवा समाधी स्थळांचा विकास करण्यात आलेल असणे, परंतु याबाबतीत गंगाखेड येथील संत जनाबाई संस्थान कायम उपेक्षितच राहिलेले असणे, शासनाने या ठिकाणी भक्तनिवास, सार्वजनिक शौचालय बांधकाम, भौतिक सेवा-सुविधा व म्युझियम उपलब्ध करून देणे गरजेचे असणे, उक्त ठिकाणी विविध विकास कामे करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे दि.११/०२/२०२३ रोजी लेखी निवेदनाद्वारे केलेली असणे, तथापि अद्यापही विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे, श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखडा संदर्भामध्ये परिपूर्ण प्रस्ताव नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आलेला असणे, उच्चाधिकार समितीकडे यासंदर्भात बैठक झालेली असून आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करून प्रस्ताव नगरविकास विभागाकडे दाखल केलेले असणे, सदरील प्रस्ताव राज्याचे मुख्य सचिव यांच्यामार्फत शिखर समितीपुढे ठेऊन मा.मुख्यमंत्री यांनी संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास तात्काळ मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७ चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(७) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधलेः-

"चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा शहरातील नगरपालिकेच्या शेजारी मुख्य रस्त्याच्या लगतचे ७० वर्षाहून अधिक काळ उभे असलेले वृक्ष शासनाच्या व संबंधित प्रशासनाच्या

परवानगीशिवाय तोडले असल्याची बाब समोर येणे, यानंतर संबंधित वृक्ष तोडण्याची तक्रार नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे व जिल्हा प्रशासन तसेच राज्य शासनाच्या विविध मंत्र्यांकडे केली असणे, सदर वृक्ष तोडत असताना वृक्ष प्राधिकरण समितीची कोणतीही परवानगी न घेणे, यामध्ये प्रामुख्याने नगरपरिषद चे तात्कालीन मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी यांचा समावेश असणे, सदर प्रकरणात पोलिसांमध्ये तक्रार दिल्यावरसुद्धा त्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणताही तपास पोलिसांमार्फत न होणे, संबंधित दोषी अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी पोलीस प्रशासनमार्फत या प्रकरणात दिरंगाई होत असणे, या सर्व प्रकरणाची गंभीर दखल घेत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देणे, त्याअनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, या सर्व प्रकरणाचे गांभीर्य पाहता संबंधितांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(८) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले –

"जळगाव शहरातील महापालिकेच्या व्यापारी संकुलातील २३६८ गाळेधारकांचा भाडेपट्टा नूतनीकरण भाडेपट्टा कर मूल्यांकन दर २ किंवा ३% प्रमाणे आकारणे व नवीन दर मुदत संपल्याच्या कालावधी लागू न करणे, जळगाव शहर महानगरपालिकेने मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनाक ७ नोव्हेंबर, २०२५ या दिवशी महापालिका जळगाव यांना यासंदर्भात आदेश देऊन सुद्धा मा. मुख्यमंत्री यांचे आदेशाला न जुमानता अद्यापपर्यंत या संदर्भात कुठलीही कार्यवाही न करणे, तसेच अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसणे, मा. मुख्यमंत्री यांचे आदेश असताना सुद्धा अद्यापपर्यंत प्रस्ताव शासनास सादर न करणे, या महापालिकेच्या आयुक्त, उपायुक्त व अधिकारी यांच्यावर त्वरित कार्यवाही करणेसंदर्भात तसेच जळगाव शहरातील महापालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांना भाडेपट्टा नूतनीकरण नवीन सुधारित भाडेपट्टा कर मूल्यांकन दर निश्चित करणेसाठी मनपा स्तरावर भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती गठीत करण्यात आलेली असून, सदर समिती मार्फत भाडेपट्टा कर मूल्यांकन दर हे जुन्या मूल्यांकन दरापेक्षा केवळ

१% कमी म्हणजेच ७% प्रमाणे करावयाचे ठरविले असणे, परंतु सदरील दर अत्यंत अवाजवी असणे, यामुळे भाडेपट्टा कर मूल्यांकन दर २ किंवा ३% प्रमाणे आकारण्यात येण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) श्री.निलेश राणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मृद व जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मृद व जलसंधारण विभाग, कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंब्रड सारमळे येथील धरणाला १९९६ साली मिळालेली प्रशासकीय मान्यता, १९९६ साली मान्यता मिळूनही २९ वर्ष प्रकल्प प्रलंबित असणे, सदर कामाची निविदा पी के.कोंडेकर या ठेकेदारास १९९८ साली देण्यात येणे, त्यावेळी निविदा किंमत २ कोटी ५४ लक्ष ८३ हजार ८५० असणे, सदर प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे सुधारित मान्यता करून २ कोटीचा प्रकल्प आता ३४ कोटींवर जाणे, मूळ निविदा किंमतीपेक्षा तब्बल ३२ कोटी रुपयांनी प्रकल्पाची किंमती वाढलेली असतांनाही अद्यापही काम अपूर्ण असणे, आजपर्यंत सदर प्रकल्पावर १६ कोटी ४० लक्ष एवढा खर्च होणे, उर्वरित १८ कोटी ५३ लक्ष एवढी रक्कम शिल्लक असणे, सदर प्रकल्पात वेळकाढूपणा होत असून शासनाची एकप्रकारे फसवणूक सुरू असणे, प्रकल्पाच्या कामात मोठ्या प्रमाणात विभागाच्या अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार सुरू असणे, अशा प्रकारे अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असणे, अनेक कामांकरीता ठराविक ठेकेदारांनाच कामे देऊन प्रत्यक्षात कामे न करता उचलण्यात येत असलेली बिले, ठेकेदार व अधिकारी संगनमत करून चुकीचे अहवाल शासनास सादर करून देयके अदा करून घेत असणे, यावरुन शासनाची व जनतेची होत असलेली फसवणूक याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सखोल चौकशी करून प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच दोषी ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

मृद व जलसंधारण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१२) श्री. सिद्धार्थ खरात, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"शेतकऱ्यांचे शेतात पीक तयार होताच ते घरी अथवा साठवण्याच्या ठिकाणी पोहचवणे आवश्यक असणे, तथापि रस्त्याअभावी शेतकऱ्यांना ते शक्य होत नसणे, राज्यात मोठ्या प्रमाणात शेतरस्त्यांचा असलेला अभाव, शेतरस्ते नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्ग खडतर ठरत असणे, लोकप्रतिनिधींनी वारंवार शेतरस्ते/पाणंद रस्त्यांची शासनाकडे केलेली मागणी, त्यानुषंगाने शासनाने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते ही योजना मनरेगा व राज्य रोहयोच्या सहभागातून सुरू करणे, शासनाकडून शेतरस्ते/पाणंद रस्ते, गावजोड रस्त्याचे सुमारे १६ हजार प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असणे, तथापि या रस्त्यांसाठी मंजूर करण्यात आलेला नियतव्यय तथा निधी वितरण अत्यंत अल्प असणे, त्यामुळे या कामांवर होत असलेला विपरीत परिणाम, शेतरस्त्यासाठी शेतकऱ्यांकडून जमीन देतांना सहमती नसणे, त्यामुळे अशा कामांवर त्याचा परिणाम होणे, त्यासाठी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देऊन प्रति कि.मी. चा समावेश सुधारित करण्याची तरतूद करणे, चालू हिवाळी अधिवेशनात या विभागाला मागील देणी व पुढील कामांसाठीच्या निधीची पुरवणी मागणी देखील समाविष्ट न होणे, एकुणच या विभागाकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मंजूर कामे होण्याबद्दल निर्माण झालेला संभ्रम व या योजनेचे भवितव्य व परिणाकारकता याबद्दल करावयाची कार्यवाही व उपाययोजना, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

रोजगार हमी योजना मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

**१.** (अ) तारांकित प्रश्न -

(१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) उपमुख्यमंत्र्यांनी, "नाशिक जिल्ह्यातील कनकापूर खर्डे (ता.देवळा) व वडनेर भैरव (ता.चांदवड) येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत" या विषयावरील

डॉ.राहुल आहेर, वि.स.स. यांचा दिनांक २० मार्च, २०२५ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ५९७७ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२४ -२०२५ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) वने मंत्र्यांनी खालील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल.

(ख) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल.

(ग) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षित लेखे व लेखापरिक्षण अहवाल.

(घ) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ चे वार्षिक लेखे.

(ङ) संदिप विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ चे वार्षिक अहवाल.

(च) डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल.

(छ) विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(ज) डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(झ) एमआयटी आर्ट, डिझाइन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(ञ) एमआयटी  विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(ट) एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल विद्यापीठ, धुळे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(ठ) निकमार विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल.

(३) खनिकर्म मंत्र्यांनी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०२०-२०२१ ते सन २०२२-२०२३ या वर्षांचा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवले.

(४) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) कृषि मंत्री यांनी (ॲड.माणिकराव कोकाटे, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री यांच्यावतीने) खालील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल तसेच सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल.

(ख) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचा सन २००२-२००३ ते सन २०१७-२०१८ या कालावधीतील लेखा परीक्षण अहवाल.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकालेली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** (१) श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले -

"म्हाडा प्राधिकरणाकडून कार्यकारी अभियंता संवर्गातील रिक्त पदांच्या पदोन्नतीसाठीची DPC (खात्यातंर्गत सेवाज्येष्ठता समिती) प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित असणे, यामुळे अनेक उपअभियंता पदावरील कार्यरत अभियंते पदोन्नतीसाठी मागील अनेक वर्षापासून वंचित असणे, सदर पदोन्नती प्रक्रिया सेवाज्येष्ठतेनुसार अपेक्षित असून सन २०२२ पासून पदोन्नती, पात्रता, ज्येष्ठता व सेवानोंदीचे सर्व निकष पूर्ण झाले असूनही केवळ DPC

(खात्यांतर्गत सेवाज्येष्ठता समिती) प्रक्रिया वेळेत न होणे, म्हाडाकडे आधीच कर्मचाऱ्यांचा तुटवडा असणे, त्यामुळे अनेक पदे रिक्त असणे, अभियंता संवर्गातील ज्येष्ठता यादी निश्चित असूनही वर्षानुवर्षे एकाच पदावर कार्यरत असल्याने व जास्तीच्या सेवाकाळात पदोन्नती न मिळाल्याने अभियंत्यांचे मानसिक धैर्य खचणे व त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होणे, पदोन्नतीसाठी पात्र असलेले अनेक अधिकारी, अभियंता निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणे, त्यामुळे वेतनवाढ, आर्थिक विवंचना आणि करिअर वृद्धीची नुकसानी याची भीती या अभियंत्यामध्ये निर्माण होणे, म्हाडा आस्थापनेतील कार्यकारी अभियंता संवर्गातील अनेक पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्यामुळे कार्यरत असणाऱ्या प्रकल्पांवर नकारात्मक परिणाम होणे, सर्व संवर्गांमध्ये मागील काळापासून DPC प्रक्रिया पूर्ण झाल्या असून फक्त याच संवर्गात DPC प्रक्रिया प्रलंबित असणे, परिणामी उप/कार्यकारी अभियंत्यावर येणाऱ्या वरिष्ठ पदाच्या अतिरिक्त कार्यभारामुळे प्रशासनावर दुष्परिणाम होणे, त्यामुळे कार्यकारी अभियंता उपअभियंता व अभियंता यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्री यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्यावतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवर सकाळच्या सत्रात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११ चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(११) श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"वांद्रे (पूर्व) येथील सर्वे क्र. ३२९, न.भु.क्र. ६२९/१२३४/अ/१ या शासकीय भूखंडावर शासकीय वसाहतीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देणे, याबाबत राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र. साबांज-२०२३/ प्र.क्र.२१/मिव्य-१, दि. १४.१०.२०२४ मध्ये शासकीय वसाहतीतील दीर्घकाळ वास्तव्यास असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी/कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला वांद्रे शासकीय वसाहतीतील भूखंड देण्यात येत असल्याचे नमूद केलेले असणे, शासनाने अद्यापपर्यंत सदर बाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनात हक्काचे घर मिळणेबाबत निर्माण होणारी संभ्रमावस्था, शासनाने याबाबत शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे उपलब्ध करून

देण्याकरिता तातडीने भूखंड आरक्षित करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवर नियमित सत्रात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २ चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

"राज्याच्या ऊर्जा धोरणात सौर ऊर्जेवर मोठा भर देण्यात येत असणे, तथापि, सौर ऊर्जा ही केवळ दिवसा उपलब्ध होत असून रात्रीच्या वेळी विजेची गरज भागवण्यासाठी आजही कोळसा आधारित विजेवरच अवलंबून राहावे लागणे, दिवसा सौर ऊर्जा उपलब्ध असल्याने औष्णिक विजेची गरज ४० ते ५० टक्के तर रात्रीच्या वेळी १०० टक्क्यांवर असणे, सध्याचे बहुतांश वीज प्रकल्प हे सुमारे ४० वर्षांपूर्वीचे जुन्या तंत्रज्ञानावर आधारित असणे, या प्रकल्पांची रचना सतत एकाच क्षमतेने चालण्यासाठी केलेली असल्याने, विजेच्या बदलत्या मागणीनुसार उत्पादन त्वरित कमी-जास्त करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होत नसणे, त्यामुळे दिवसा कमी लोड आणि रात्री पूर्ण क्षमतेने लोड मॅनेज करण्यासाठी लवचिक आणि नव्या पिढीतील औष्णिक वीज केंद्रांची आवश्यकता असणे, चंद्रपूर येथे 'रिप्लेसमेंट प्रोजेक्ट' उभारणे तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत फायदेशीर असणे, येथे आधीपासूनच मुबलक पाणी, कोळसा, स्वतःची जमीन, रेल्वेचे विस्तृत जाळे आणि वेकोलिच्या (WCL) कोळसा खाणी उपलब्ध असणे, तसेच औद्योगिक जिल्हा असल्याने प्रशिक्षित कर्मचारी आणि तांत्रिक मनुष्यबळही उपलब्ध असणे, तसेच चंद्रपूरजवळच 'भद्रावती पॉवर ग्रीड' असल्यामुळे विजेच्या मागणी-पुरवठ्याचे संतुलन (Grid Stability) राखणे आणि वीज त्वरित ट्रान्सफर करणे अत्यंत सोपे असणे, वरील सर्व तांत्रिक, भौगोलिक आणि आर्थिक बाबींचा विचार करून चंद्रपूर येथे वीज निर्मिती करिता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'रिप्लेसमेंट पॉवर प्रोजेक्ट' तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

ऊर्जा राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ३, ४, ५ आणि ६ शी संबंधित मंत्री महोदय विधान परिषद सभागृहामध्ये असल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येतील तसेच आता लक्षवेधी सूचना क्रमांक - ७ चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(७) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील बेटाळा येथील रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राट मे. केशवप्रिया इन्फ्रास्ट्रॅक्चर्स मालाड मुंबई यांना देण्यात येणे, त्यांनी शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून बेकायदेशीर वाळूचे उत्खनन व हायवा ट्रकने वाहतूक करणे, त्यामुळे अनेक रस्ते खराब होऊन रहदारीस अयोग्य होऊन वारंवार अपघात होणे, भंडारा जिल्ह्यातील पवणी येथील रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राट मे.अनोज कुमार अग्रवाल रामदास पेठ नागपूर यांना देण्यात येणे, त्यांनी शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून बेकायदेशीर ३४ हजार ६०० च्या वर ब्रास वाळूचे उत्खनन करून शासनाचे किमान ६५ करोड रुपयांचे नुकसान केले असणे, या बाबतचा अहवाल अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना सादर करणे, असे असताना सुद्धा अद्यापही कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, कंत्राटदार व महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि पोलीस विभाग यांच्या संगनमताने हा अवैध धंद्याचा प्रकार सुरू असणे, या सर्व गंभीर प्रकरणी तक्रार होऊन सुद्धा संबंधितांवर अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरत असलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक ८ पुढे ढकलण्याबाबत पत्रान्वये विनंती केली असल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक - ८ पुढे ढकलण्यात येत असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक - ९ चर्चेला घेण्यात येत आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(९) श्री.हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले

"समृध्दी महामार्गावरील घोटीपासून त्र्यंबकेश्वर येथिल ज्योतिर्लिंगाला जोडणाऱ्या चारपदरी रस्त्यासाठी ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात येत आहेत त्यात २२ गावे ही आदिवासीबहुल गावे असून ती पेसा कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रात येणे, आदिवासी जमिनी

बिगर-आदिवासीं विक्रीकर कायदेशीर निर्बंध असल्याने या गावांमध्ये जमीन व्यवहार अत्यंत कमी असणे, त्यामुळे संदर्भासाठी घेतल्या जाणाऱ्या नोंदणीकृत विक्री दरांमध्ये वास्तव मूल्य प्रतिबिंबित होत नसणे, ही गावे इगतपुरी व त्र्यंबकेश्वर या वेगाने विकसित होणाऱ्या भागामध्ये असूनही या विकासाचा लाभ आदिवासींना भरपाई स्वररुपात न मिळणे, बहुतांश बाधीत आदिवासी शेतकरी हे लहान जोतधारक भात उत्पादक असून अल्प भरपाई मिळाल्यास त्यांच्या उपजीविकेचा आधारच नष्ट होण्याची आणि कायमस्वरुपी आर्थिक अस्थिरतेची भीती, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना अधिनियम, २०१३ च्या कलम २६ नुसार बाजार भावावर गुणक लावण्याचे नियम राज्य शासन ठरविणे, सद्यस्थितीत या भागातील जमिनींना गुणक १ लागू करण्यात येत असणे, केवळ काही जमिनी महामार्गालगत आहेत या कारणावरुन त्या ग्रामीण स्वरुपाच्या असूनही त्यांना विकासक्षम न मानता गुणक २ नाकारण्यात येत असल्याने हे आदिवासी भागांसाठी अन्यायकारक असणे, समृध्दी महामार्गाच्या भूसंपादनाच्या वेळी राज्य शासनाने विशेष परिस्थिती लक्षात घेऊन अतिरिक्त लाभ व प्रिमियम मंजूर केले त्याच धर्तीवर पेसा लागू असलेल्या आदिवासी गावांना आर्थिक भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांना काही कामासाठी बाहेर जायचे असल्यामुळे त्यांनी विनंती केल्यामुळे त्यांची लक्षवेधी सूचना क्रमांक - ५ चर्चेला घेण्यात येत असून त्यानंतर उर्वरित सर्व लक्षेवधी सूचना चर्चेला घेण्यात येतील, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(५) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

"चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी सुरू असणे, दि.२८ ऑक्टोबर २०२५ रोजी, रात्री श्री. दिनेश दोनाडकर यांचा अवैध वाळूने भरलेला हायवा ट्रक क्र. एमएच-३६-एए-९९३३ एसडीपीओ यांनी जप्त करणे, त्यावर तब्बल १० दिवस कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, याप्रकरणी ५० हजार रुपये एसडीपीओ यांनी घेतल्याचे ट्रक मालक श्री. दिनेश दोनाडकर यांनी कबूल केलेले असणे, दुसरे प्रकरण दि. १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी, रात्री ११ वाजता नागभीड हद्दीत कुणाल दोनाडकर यांचा अवैध वाळूचा ट्रॅक्टर एसडीपीओ यांनी पकडणे, त्यावर किरकोळ २००० रु चा दंड आकारुन सोडून देण्यात येणे, तोच ट्रॅक्टर दुसऱ्या दिवशी दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी

ब्रम्हपुरी येथे पोलीस निरीक्षक यांनी पकडून चालक कुणाल दोनाडकर यांच्याविरुद्ध रीतसर गुन्हा नोंद करणे, दोन्ही प्रकरणे पाहता एसडीपीओ हे जाणीवपूर्वक गुन्हेगारांशी संगनमत करून परस्पर प्रकरणे निकाली काढत असणे, मात्र कनिष्ट अधिकारी त्याच प्रकरणी कर्तव्य बजावत गुन्हा नोंदवत असणे, एसडीपीओ यांची कार्यप्रणाली पोलीस प्रशासनाविरोधात असून शिस्तीचा भंग करणारी असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. सुहास (आण्णा) कांदे, अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, मनोज जामसुतकर, मुफ्ती मोहम्मद, अजय चौधरी, संजय देरकर, गजानन लवटे, अबू आझमी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील एका ३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर शेजारील २४ वर्षीय मुलाने लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना दि.१६.११.२०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे उघडकीस येणे, बलात्कार केल्यानंतर त्या नराधमाने मुलीचा दगडाने ठेचून तीची अतिशय क्रुरतेने केलेली हत्या, मुलगी बेपत्ता झाल्याने पीडित मुलीच्या आई-वडिलांनी तिचा शोध घेतला असता चिमुकलीचा मृतदेह सापडणे, सदर प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात येणे, या गंभीर प्रकरणामुळे स्थानिक ग्रामस्थांसह संपूर्ण राज्यात संताप व्यक्त करण्यात येणे, सदर प्रकरणी दोषी असलेल्या आरोपीला त्वरित फाशी देण्याची मागणी करीत ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन करणे, तसेच मालेगावमध्ये दि.२१.११.२०२५ रोजी बंद पाळण्यात येणे, राज्यातील विविध भागात या घटनेचा निषेध करण्यासाठी मोर्चे काढण्यात येणे, सदर घटना राज्याला काळीमा फासणारी असणे, शासनाने यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी करून दोषींवर त्वरित कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. अमोल खताळ, काशिनाथ दाते, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. रामदास मसराम, संजय मेश्राम, हेमंत ओगले, आशुतोष काळे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.अमोल खताळ, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"राज्यातील जिल्हा अहिल्यानगर स्थित संगमनेर शहरात गेल्या काही दिवसांत अमली पदार्थांच्या तस्करीचे प्रकार समोर येत असताना आता या रॅकेटमध्ये अतिशय घातक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'एमडी' (मेफेड्रोन) ड्रग्सचा समावेश झाल्याने चिंतेचे वातावरण निर्माण होणे, माहे नोव्हेंबर २०२५ वा त्यासुमारास पुणे-नाशिक महामार्गावरील गणेशनगर परिसरातून तब्बल ४३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांमार्फत जप्त केला असणे, त्याचबरोबर नशेसाठी वापर होणाऱ्या औषधांची खरेदी-विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, नशेसाठी म्हणून वापरल्या जात असलेल्या बाटल्या, इंजेक्शनच्या सिरीज अवैध उद्योग धंदे संगमनेर शहरात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, नशेचे पदार्थ विक्रीचे प्रकार किंवा तस्करीचे प्रकार हे हप्तेखोरीतून घडत असल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल होत असणे, आतापर्यंत अटक करण्यात आलेले आरोपी, आरोपींकडून नेमकी गोळा केलेली माहिती, ड्रग्सचे स्त्रोत इत्यादीचा अचुक तपास करून नशेखोरीस आळा घालण्याची गरज असणे, वाढत्या ड्रग्ज तस्करीमुळे विशेषतः तरुण वर्ग या नशेच्या आहारी वेगाने जात असल्याची सार्वत्रिक भीती व्यक्त केली जात असणे, नशेच्या व्यापाराला मूळापासून नष्ट करण्यासाठी पुढील काळात अधिक कडक व सखोल तपास सुरू ठेवण्याची नितांत आवश्यकता असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी, "सदर लक्षवेधी सूचना ही तीन वर्षाच्या मुलींवर बलात्कार करून तिची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली या संदर्भात असून या प्रकरणाची बाजू मांडण्यासाठी सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते राज्यसभा खासदार असल्यामुळे या प्रकरणाला न्याय देण्याकरिता वेळ मिळत नसल्यामुळे दुसऱ्या सरकारी वकिलाची नियुक्ती करण्यात यावी" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात आपत्ती व व्यवस्थापन मंत्र्यांनी खुलासा केला.

श्री.अमोल खताळ, वि.स.स. यांनी, "लक्षवेधी सूचना मांडत असताना सभागृहात दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नावे घेतल्यामुळे त्यांच्याकडून सन्माननीय सदस्यांना अप्रत्यक्षपणे धमक्या देण्यात येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी खुलासा केला.

श्री.सुमित वानखेडे, वि.स.स. यांनी, "त्यांच्या मतदारसंघातील एका छोट्या गावामध्ये सुमारे १९२ कोटी रुपये किमतीचे मेफेड्रोन ड्रग मिळाले असणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी जास्तीत जास्त कठोर कारवाई करण्यात येईल असे गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी सांगितले.

(५) सर्वश्री. विक्रम पाचपुते, तानाजी मुटकुळे, योगेश सागर, देवराव भोंगळे वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"ई-पीक पाहणीची नोंद करताना राज्यातील गावांमध्ये मोबाईलला रेंज असणे, परंतु शेतामध्ये रेंज नसणे, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीचे अॅप मोबाईलवर डाऊनलोड करता येत नसल्यामुळे पीक पाहणीची नोंद करता येत नसणे, यापुर्वी पीक पाहणीची नोंद तलाठी करत असणे, पीक पाहणीसाठी तलाठी यांना पीक पाहणी सहाय्यक म्हणून नेमण्यात आलेले असणे, परंतु सदर पाहणी करण्यासाठी सहाय्यक हे संपूर्ण गावात जाऊ शकत नसणे, राहिलेल्या पीक पाहणीसाठी तलाठी यांच्या लॉगीनला ॲक्सेस मिळणे गरजेचे असणे, मका, सोयाबीन, तूर व धान यांची नोंद नसल्यामुळे धान खरेदी करताना ७/१२ वरती एक नोंद नसल्यामुळे अडचणी निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. प्रवीण तायडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील वासणी मध्यम प्रकल्पावर रु.६४३.५१ कोटी खर्च झाला असणे, प्रकल्पामुळे एकूण ५०४३ हे. सिंचन क्षेत्र अपेक्षित असणे, सन २०१७ पासून दायित्वाअभावी प्रकल्पाचे काम रखडलेले असणे, त्यामुळे ६५.६५ कोटीचे दायित्व मंजूर करणे अत्यावश्यक व त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे असणे, याचप्रमाणे अचलपूर तालुक्यातील अपूर्ण असलेले बोर्डी नाला प्रकल्प, राजना बॅरेज प्रकल्प, राजुरा प्रकल्प अपूर्ण असणे, याबाबतही निर्णय घेणे आवश्यक असणे, शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. अतुलबाबा भोसले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले –

> "पुणे-बंगळूर आशियाई महामार्गाच्या सहापदीकरणाच्या कामामुळे कराड शहरालगत उड्डाणपूलाचे काम अंतिम टप्प्यात असणे, मात्र कामाच्या दिरंगाईमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, रुंदीकरणाच्या कामामुळे जागोजागी खोदकाम, महामार्गालगत मोठमोठे खड्डे, सुरक्षा रेंलिगचा अभाव, साईडपट्टीवर दगडांची मांडणी, अनावश्यक ठिकाणी बॅरिगेटस, ब्लिकर्स, सबलर, इंडिकेटर्सची कमतरता, धोकादायक ठिकाणी फलकांचा अभाव, उपमार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य, साचलेले पाणी, चिखलामुळे होणारी घसरगुंडी यामुळे प्रवाशांच्या जीवावर बेतणे, काही दिवसांपूर्वीच वाठार येथे महामार्गालगत सहलीला जाणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना बस अपघातात झालेली गंभीर दुखापत, गेल्या काही महिन्यात महामार्गावर झालेल्या अपघातामध्ये अनेकांनी जीव गमावणे, तसेच गंभीर जखमी होणे, सातारा ते कोल्हापूर ह्या १२० कि.मी.चा प्रवासास तीन तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, एकाचवेळी सर्व ठिकाणी ही कामे केली जात असल्याने धोकादायक परिस्थती निर्माण झाल्यामुळे अपघांतामध्येही दिवसेंदिवस होणारी वाढ थांबविण्यासाठी वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कर्मचारी, योग्य दिशादर्शक फलक, अपघात टाळण्यासाठी स्पीड ब्रेकर, पथदिवे उभारणी करण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. माननीय अध्यक्षांनी पुढील शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

"श्री. शिवराज विश्वनाथ पाटील, माजी लोकसभा अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, "वर्ग-२ मधील जमीन वर्ग-१ करताना १० टक्के शुल्क आकारणी ५ टक्के करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ज्या ६० टक्क्यांपेक्षा जास्त आर्थिक दुर्बल संस्था आहेत, ते १० टक्के शुल्क भरू शकत नाहीत किंवा इमारतींचा स्वंयपूर्ण पुनर्विकास करू शकत नाहीत. त्यांना शासनाने दिनांक ४ मार्च, २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार ५ टक्केसाठी असलेली पंतप्रधान आवास योजना व स्वंयपूर्ण पुनर्विकासाची अटी व शर्ती काढून गृह निर्माण संस्थांना फ्री होल्ड करण्याबाबतची स्पष्टता देण्यात यावी व त्याबाबत सरकारने निवेदन करावे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त माहितीच्या मुद्यासंदर्भात महसूल मंत्र्यांनी खुलासा केला.

दोन विधेयके पारित झाल्यानंतर विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरू करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**६. (अ) पुरःस्थापनार्थ :-**

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) पर्यटन मंत्री (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०८ – महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास

प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

पर्यटन मंत्री (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

मुख्यमंत्र्यांनी, (१) "संरक्षण क्षेत्रालगतच्या जमिनी आणि इतर काही कारणांमुळे काही क्षेत्रांवर इमारतीचा पुनर्विकास पूर्ण क्षमतेने करणे शक्य नाही अशा क्षेत्रातील इमारतींचा पुनर्विकास व्हावा या हेतूने नवीन हाऊसिंग फॉर ऑल ही योजना तयार करून मुंबईमधील इमारतींचा पुनर्विकास करण्यास चालना देणे" आणि (२) "दहिसर व जुहू (डी.एन. नगर) येथील रडारचे स्थलांतरण करणे" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री.अबु आझमी, वि.स.स. यांचा मुद्दा.

(हिंदी प्रतिवेदकांच्या अनुपलब्धतेमुळे मजकूर उपलब्ध नाही.)

मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात खुलासा केला.

श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "नियम २९३ व २९२ अन्वयेच्या दोन्ही प्रस्तावांवरील चर्चा एकत्रित करण्यात यावी" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

आता विरोधी पक्षाचा म.वि.स. नियम २९३ व २९२ अन्वये प्रस्तावांवरील चर्चा एकत्रितपणे घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विरोधी पक्षाच्या दोन्हीही प्रस्तावांवरील चर्चेला उत्तर द्यावयाचे असल्याने आज उक्त चर्चा पूर्ण करावी अशी मुख्यमंत्र्यांनी विनंती केली.

दिव्यांग कल्याण मंत्र्यांनी, "दिव्यांग-अदिव्यांग व दिव्यांग-दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देणे" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा.

(हिंदी प्रतिवेदकांच्या अनुपलब्धतेमुळे मजकूर उपलब्ध नाही.)

शासनाने दिलेल्या माहितीची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्यातील काही लक्षवेधी सूचनांवर सभागृहात चर्चा होते तर काही लक्षवेधी सूचनांवरील निवेदने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवली जातात ही पद्धत काही अधिवेशनांपासून दिसून न येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उद्या सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी सर्व प्रलंबित लक्षवेधी सूचनांवरील निवेदने प्राप्त झाली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाची कारवाई करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**७.** सर्वश्री आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा, "या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळणे, राज्यातील महानगरामधील प्रदूषणाची समस्या, तरूणांना अमलीपदार्थांचा पडलेला विळखा, नाशिक कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील हजारो वृक्षतोड करून पर्यावरणाला निर्माण होणारा धोका, मुंबईतील शासकीय स्थळाचे होणारे खाजगीकरण, राज्यात वाढलेली बेरोजगारी, शेतकरी कर्जमाफीची होत असलेली मागणी, इत्यादीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष" या विषयावरील म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर

आणि

सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा, "राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, भ्रष्टाचारात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, राज्यात घडत असलेला शेकडो कोटी रुपयांचा धान घोटाळा, संतोष देशमुख मृत्यू प्रकरणी अद्यापही आरोपींना अटक झालेली नसणे, कृष्णा आंधळे अद्यापही फरार असणे, नागपूर येथे मोठ्या प्रमाणावर एमडी व अन्य् ड्रग्सचे उत्पादन व साठा होत असणे, विविध समाजाच्या आरक्षणासंदर्भात राजकीय पातळीवर द्वेषपूर्ण वक्तव्ये व जाणूनबुजून तयार केलेला तणाव, विदर्भातील सोयाबीन, धान, कापूस उत्पादक अत्यंत अडचणीत असून अद्यापही शासनाकडून योग्य मदत न मिळणे, पिकाला हमी भाव मिळत नसणे, सरसकट कर्जमाफी करण्यात न येणे" इत्यादी विषयासंबंधी नियम २९२ अन्वये प्रस्ताव –

श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी वरील म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव मांडला व भाषण केले –

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावावरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) संजय कुटे
(२) श्री.सुनील प्रभू
(३) श्री.मंगेश कुडाळकर
(४) श्री.राजू खरे
(५) श्री.हिरामण खोसकर
(६) श्री.अबु आझमी
(७) श्री.अमिन पटेल
(८) श्री.अतुल भातखळकर
(९) श्री.सिद्धार्थ खरात (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांनी, "दिनांक १२ मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयास स्थगिती देणे" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

सर्वश्री आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा, "या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत मिळणे, राज्यातील महानगरामधील प्रदूषणाची समस्या, तरूणांना अमलीपदार्थांचा पडलेला विळखा, नाशिक कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील हजारो वृक्षतोड करून पर्यावरणाला निर्माण होणारा धोका, मुंबईतील शासकीय स्थळाचे होणारे खाजगीकरण, राज्यात वाढलेली बेरोजगारी, शेतकरी कर्जमाफीची होत असलेली मागणी, इत्यादीकडे शासनाचे झालेले

अक्षम्य दुर्लक्ष" या विषयावरील म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर

आणि

म.वि.स.नियम २९२ अन्वये प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा, "राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, भ्रष्टाचारात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, राज्यात घडत असलेला शेकडो कोटी रुपयांचा धान घोटाळा, संतोष देशमुख मृत्यू प्रकरणी अद्यापही आरोपींना अटक झालेली नसणे, कृष्णा आंधळे अद्यापही फरार असणे, नागपूर येथे मोठ्या प्रमाणावर एमडी व अन्य् ड्रग्सचे उत्पादन व साठा होत असणे, विविध समाजाच्या आरक्षणासंदर्भात राजकीय पातळीवर द्वेषपूर्ण वक्तव्ये व जाणूनबुजून तयार केलेला तणाव, विदर्भातील सोयाबीन, धान, कापूस उत्पादक अत्यंत अडचणीत असून अद्यापही शासनाकडून योग्य मदत न मिळणे, पिकाला हमी भाव मिळत नसणे, सरसकट कर्जमाफी करण्यात न येणे" इत्यादी विषयासंबंधी नियम २९२ अन्वये प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

उपरोक्त दोन्ही प्रस्तावावरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

| | |
|---|---|
| (१०) श्री.विलास भुमरे | (११) श्री.विजयसिंह पंडीत |
| (१२) श्री. प्रविण दटके | (१३) श्री.अमित झनक |
| (१४) श्री.रवि राणा | (१५) श्री.बाबाजी काळे |
| (१६) श्री.राजकुमार बडोले | (१७) श्री.हेमंत ओगले |
| (१८) श्री.सचिन कल्याणशेट्टी | (१९) श्री.हारून खान |
| (२०) श्री.अब्दुल सत्तार | (२१) श्री.रईस शेख |
| (२२) श्रीमती सुलभा गायकवाड | (२३) श्रीमती मनिषा चौधरी |
| (२४) डॉ.ज्योती गायकवाड | (२५) श्रीमती श्वेता महाले |
| (२६) श्रीमती मंजुळा गावीत | (२७) श्री.कैलास घाडगे-पाटील |
| (२८) श्री.संजय मेश्राम | (२९) श्री.आनंद तिडके |

(३०) श्री.जयंत पाटील (३१) श्री.देवेंद्र कोठे

(३२) श्री.बाबुराव कोहळीकर (३३) श्री.उमेश यावलकर

(३४) श्री.रत्नाकर गुट्टे (३५) श्री.किसन वानखेडे

(३६) श्री.चरणसिंग ठाकूर (३७) श्री.महेश सावंत

(३८) श्री. प्रताप अडसड (३९) श्री.रामदास मसराम

(४०) श्री.किसन वानखेडे (४१) श्री.सुनिल शेळके

(४२) मुरजी पटेल (४३) श्री.देवराव भोंगळे

(४४) श्री.अनंत (बाळा) नर (४५) श्री. प्रविण स्वामी

(४६) श्री.संजय देरकर (४७) श्री.अभिजीत पाटील (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता पुन्हा भरेल. सकाळी ९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. सदरहू विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक रात्री १२ वाजून ५३ मिनिटांनी, रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या सकाळी ९.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मौजे भडकंबे (ता.वाळवा, जि.सांगली) येथे नियमाचे उल्लंघन करून गौण खनिज उत्खनन सुरु असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, खडी क्रेशर व मुरुम व गौण खनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात होत असल्याने डोंगरपट्ट्यात बांधण्यात आलेल्या को. बंधाऱ्यांमध्ये पाण्याची लेवल टिकून राहत नसणे, ओढ्यांमध्ये मुरुमाचा भराव टाकल्यामुळे ओढा बुजणे, पाझर तलावाचे बांधकाम बंद पाडणे, शा.नियमानुसार खडी क्रेशर व डंपर वाहतूक न होणे, भडकंबे तांदूळवाडी रोडवरील नागोबा मंदिराला डंपर चालकाने धडक दिल्याने मंदिराला धोका, दिवस-रात्र उत्खनन सुरु असणे, दगड उडून शेतात जाऊन पडत असल्याने शेताचे, घरांचे, नुकसान, घरांना तडे जाणे, झाडे, वन्यप्राणी, आदि पर्यावरणाचा ऱ्हास, आवाजामुळे ग्रामस्थांच्या झोपेवर व आरोग्यावर परिणाम, एकावेळी कमीत कमी ४ फूट परवानगी असतांना २० ते २५ फूट सुरुंग लावण्यात येत असल्याने सार्वजनिक रस्ते, पाणंद रस्ते, मंदिरे, नाले, ओढा, जलाशय, जि.प शाळेतील विद्यार्थी यांना धोका, सततच्या वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था, शेतीच्या उत्पादनावर होत असलेला परिणाम, खनन उत्खनन परवाना देण्यामागच्या मूळ उद्देशाला बगल, गावातील एकालाही रोजगार उपलब्ध न होणे, नियमांचे उल्लंघन करून सुरु असलेल्या खडी क्रेशर, मुरुम व गौण खनिज उत्खननासंदर्भात ग्रामस्थांनी सातत्याने केलेल्या तक्रारी, पोलीस स्टेशनमध्ये अनेक तक्रारी, शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करून तात्काळ खडी क्रेशर, मुरुम व गौण खनिज उत्खनन बंद करण्याची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. प्रवीण दटके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधले.

"महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीच्या अभिन्यासातील भूखंड भाडेपट्ट्यावर देण्यात आलेले असणे, त्यापैकी काही भूखंडांकरिता त्या त्या महानगरपालिकेची

त्या त्या वेळी जागेची डिमांड वसूल करून काही अभिन्यासातील भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने तर काही भूखंड निरंतर भाडेपट्ट्याने दिलेले असणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या अभिन्यासासाठी भूखंडाकरिता महानगरपालिकेच्या जागेची किंमत वसूल केलेली असून सुद्धा ३० वर्षांचे भाडेपट्टे हे निरंतर भाडेपट्ट्याने दिलेले असल्याने भाडेपट्ट्याचे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मुक्त भूखंडधारकांना महानगरपालिकेच्या स्थावर विभागाकडे भाडेपट्टा नूतनीकरण, भाडेपट्ट्याचे हक्क हस्तांतरण, बांधकाम करण्याचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी करिता जावे लागत असणे, त्यापासून भूखंडधारकांना नाहक त्रास होत असल्याने निर्माण झालेली तीव्र नाराजीची भावना, तथापि महानगरपालिकेने अभिन्यासातील भूखंडांकरिता जागेची किंमत वसूल केलेली असल्यास भूखंड भाडेपट्ट्यावर ठेवणे संयुक्तिक नसल्याने भूखंड मालकी तत्त्वावर हस्तांतरित करून भूखंडधारकांना भूखंडाचे मालकी हक्क प्रदान करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

खनिकर्म मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्रीमती अनुराधा चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पायाभूत सुविधांची विविध कामे सुरु असणे, यामध्ये समृद्धी महामार्ग, खुल्ताबाद–फुलंब्री महामार्ग या आणि अशा अनेक कामांच्या गुणवत्तेवर तक्रारी होऊनही दखल न घेतल्याने गुणवत्तेबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण होणे, या कामांची सुयोग्य अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभागांकडे SOP तथा गुणवत्ता तपासणी करता यंत्रणा राज्याकडे नसणे, परिणामी कामांची गुणवत्ता ढासळून तीच कामे पुन्हा करण्याची नामुष्की राज्यावर येणे, नगर विकास विभागाची कामे तपासणी साठीची जबाबदारी शासकिय तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांकडे असल्याने त्यांचे लक्ष विद्यार्थ्यांना शिकविण्याकडे कमी आणि विकासकामांच्या तपासण्याकडे अधिक असणे, यामुळे शिक्षण व्यवस्थेचेसुद्धा अपरिमित नुकसान होणे, याकरता राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना किंवा हरियाणा राज्यात अति. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अनुक्रमे Quality Monitoring System व Quality Assurance Authority सारखी यंत्रणा उभारण्याची तीव्र गरज निर्माण झालेली असणे, सद्यस्थितीत शासनाच्या सर्व कामांमध्ये गुणवत्ता तपासणीसाठी किमान १ टक्का असलेला हा निधी संबंधित यंत्रणेकडून त्याचा योग्य विनियोग न होणे, याच निधीच्या माध्यमातून

उपरोल्लिखित यंत्रणांच्या खर्चाची तरतूद करणे शक्य असल्याने शासनास यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च न येणे,या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करून राज्यातील विविध विभागांमार्फत होणारी विकास कामे गुणवत्तापूर्ण होण्याकरीता सामान्य प्रशासन विभागामार्फत एसओपी तथा गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची उभारणी करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४) श्री. राजाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"श्रीक्षेत्र तुळजापूर येथील माता भगिनींनी गावातील युवक मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांच्या विळख्यात येत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडे करत करवाईची मागणी केलेली असणे, लोकप्रतिनिधी यांनी पोलिस अधीक्षक, धाराशिव यांना दि.२/२/२०२५ रोजी दिलेली माहिती व त्यांना स्थानिकांनी दिलेल्या गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव येथील स्थानिक गुन्हे शाखेने बेकायदेशीररित्या अंमलीपदार्थ बाळगल्यावरून तीन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला असणे,या प्रकरणात विविध राजकीय पक्षांशी संबंधित अनेकांना आरोपी केलेले असणे, असे असताना काही राजकीय व ठराविक प्रसार माध्यमातील व्यक्तींनी श्री क्षेत्र तुळजापूरचा होत असलेला अभूतपूर्व विकास बघता राजकीय द्वेषापोटी व आर्थिक कारणांसाठी षड्यंत्र रचून खोट्या व अर्धसत्य बातम्या वारंवार देऊन व मंदिराचा फोटो वापरून श्री क्षेत्र तुळजापूरची व ठराविक सत्ताधारी नेते तथा नागरिकांची बदनामी करत असणे, तुळजाभवानी मातेच्या मुख्य महंतांनी मुख्यमंत्री महोदयांना श्रीक्षेत्र तुळजापूरसह येथील समस्थ पुजारी व सेवेकरी वर्ग यांची बदनामी करत समाजात तेढ निर्माण करणा-या षड्यंत्राची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत करून शहरातील सर्व गैरव्यवसायावर कायमस्वरुपी प्रतिबंध घालणेबाबत निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, मा. मुख्यमंत्र्यांनी पोलिस अधीक्षक, धाराशिव यांना दि.१२.९.२०२५ रोजी चौकशीचे आदेश दिलेले असणे, हे षड्यंत्र रचणारे, वारंवार बदनामी करणा-यांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्री. विठ्ठल लंघे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अहिल्यानगर जिल्ह्यातील जगप्रसिद्ध शनैश्वर देवस्थानातील ऑनलाईन पूजा ॲप, क्यूआर कोड व देणगी पावती पुस्तकांच्या माध्यमातून उघडकीस आलेल्या शेकडो कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा तपास मागील सहा महिन्यांपासून अत्यंत संथ व संशयास्पद पद्धतीने सुरु असून, पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी उच्चस्तरीय सायबर तपासाचे आश्वासन दिल्यानंतरही प्रत्यक्षात तपास अहिल्यानगर सायबर क्राईमपुरताच मर्यादित असल्याचे स्पष्ट होणे, तपासादरम्यान उघड झालेले कोटीभर रुपयांचे इलेक्ट्रॉनिक व्यवहार, संबंधित खातेदारांची चौकशी न होणे, ॲप तयार करणाऱ्या कंपनीची माहिती उपलब्ध असूनही त्यांच्यावरील कारवाई न होणे, आरोपींची नावे उघड न करणे तसेच पुरेसे पुरावे नष्ट होण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे भाविकांमध्ये संताप व अविश्वास वाढणे, घाईघाईने दोन कर्मचाऱ्यांना आरोपी दाखवून तपासाची 'स्क्रिप्टेड दिशा देणे, तालुक्यातील नागरिक व शनीभक्तांकडून तपास सीबीआयकडे देण्याची जोरदार मागणी होत असणे, त्यामुळे हा गंभीर आर्थिक गुन्हा व भाविकांच्या श्रद्धेचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी शासनाने तत्काळ तपास सीबीआयकडे वर्ग करून पारदर्शक कारवाई करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"PESA क्षेत्रातील १७ संवर्गपैकी तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, वनरक्षक, शिक्षक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, कृषीसेवक, पशुधन पर्यवेक्षक इत्यादी विविध पदांवर कार्यरत उमेदवार आजही मानधन तत्वावरील तात्पुरत्या नियुक्तीमध्ये अडकलेले असणे, तर त्याच वेळेच्या सरळसेवा भरतीत परीक्षा दिलेले Non-PESA उमेदवार कायमस्वरूपी नियुक्त होऊन जवळपास एक वर्ष लोटले असणे, सन २०२४ च्या पदांसाठी उमेदवारांनी, पात्रता पूर्ण केली आणि मेरिटनुसार निवड प्रक्रिया पार पडली. तथापि, PESA प्रवर्गातील उमेदवारांना केवळ मानधन तत्त्वावर, ११ महिन्यांच्या करारावर, आणि शासन कर्मचारी नाहीत अशा नोंदीसह नियुक्त करण्यात आले असणे, ही गंभीर असमानता आणि भेदभावाची स्थिती असणे, वेतन, सेवासुविधा, नोकरीतील सुरक्षा यांचा अभाव असल्यामुळे

या उमेदवारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, माननीय सर्वोच्च न्यायालयाने कायम करण्याचे सकारात्मक निर्देश दिले असतानाही शासनाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे, याशिवाय १७ संवर्गापैकी कोतवाल, पोलीस पाटील, कामाठी, प्रयोगशाळा परिचर, स्वयंपाकी, वन अन्वेषक, आदिवासी विकास निरीक्षक, सर्वेक्षक या पदांची भरती अद्याप झालेली नसणे, तरी मानधन तत्त्वावरील PESA क्षेत्रातील सर्व कार्यरत उमेदवारांना त्वरित नियमित करण्यात यावे. तसेच १७ संवर्गापैकी भरती न झालेल्या पदांची भरती तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

आदिवासी विकास राज्यमंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मृद आणि जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सारंगवाडी ता.चिखली, जिल्हा बुलढाणा येथे संग्राहक तलाव व पूरसंरक्षक प्रकल्पाचे काम सन २००९ पासून सुरू असणे, निविदेतील अटीनुसार २०१५ मध्ये काम पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्यापही काम रखडलेले असणे, यामुळे प्रकल्पाची मूळ किंमत १६.६१ कोटी रुपयांवरून तब्बल २८०.६४ कोटी रुपयांवर पोहोचली असणे, अर्थात प्रकल्प किंमतीत सुमारे १५८९% म्हणजेच १६ पट वाढ झाली असणे, वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. पुणे या कंपनीने अधिकाऱ्यांच्या संगनमताने प्रकल्पाची किंमत अवास्तव वाढवलेली असणे, निविदा भरताना खोटी कागदपत्रे दिल्याबद्दल लोक आयुक्तांनी सदर कंपनीस काळया यादीत टाकून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिलेले असणे, एसीबीने उघड चौकशीचे आदेश दिलेले असणे, अद्याप उक्त प्रकरणी काहीही कारवाई झालेली नसणे, सबंधित अधिकाऱ्यांकडून कंत्राटदार कंपनीची पाठराखण केली जात असणे, सन २०२१ मध्ये लगतच्या टेल कालवा संकल्पन, नदी खोलीकरण कामासाठी २.३८ कोटी रुपयांचे देयक काम न करताच अदा केलेले असणे, या प्रकल्पातील गैरव्यवहारात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ छत्रपती संभाजीनगर, जिल्हा जलसंधारण अधिकारी बुलढाणा, उप विभागीय जलसंधारण अधिकारी चिखली इ.अधिकारी सहभागी असणे, कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेली ही कृती गंभीर असणे, सदर कंपनी विरुद्ध यापूर्वी वैभववाडी, चतुःशृंगी व गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असणे, प्रकल्पाच्या सातत्याने वाढलेल्या खर्चामुळे पारदर्शकता, गुणवत्ता, उपयोगिता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मृद व जलसंधारण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८) श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधले.

"मुंबईतील पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये गेल्या काही दिवसांत गंभीर विस्कळीतता निर्माण झाली असणे, दिनांक १ व २ डिसेंबर, २०२५ रोजी २,५०० मिमी जल वाहिनीवरील कामासाठी ३० तासांचे घेण्यात ओलेले शटडाउन, तसेच दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी १,२०० मिमी जलवाहिनीतील गळती दुरुस्तीसाठी ८ तासांचा बंदोबस्त घेण्यात आलेला असणे, त्यानंतर १७ वॉर्डांमध्ये १५% पाणी कपात लागू करण्यात आली असणे, या सलग शटडाऊनमुळे विशेषतः कुर्ला, एम/ईस्ट आणि एम/वेस्ट भागातील दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालेले असणे, झोपडपट्टी क्षेत्रांत पाणी साठवणुकीची सोय नसल्याने नागरीकांना पिण्याचे पाणी, स्वयंपाक व स्वच्छतेसाठी तीव्र अडचणी आलेल्या असणे, तसेच बहुमजली निवासी संकुलांमध्ये अनियमित पुरवठ्यामुळे रहिवाशांचे दैनंदिन कामकाज बाधित झाले असणे, बीएमसीकडून अचूक पूर्वसूचना व पुनर्पुरवठा वेळापत्रक न मिळाल्याने नागरीकांची गैरसोय आणखी वाढली असणे, पाणीपुरवठा व्यवस्थेचे तातडीने आधुनिकीकरण करणे आवश्यक असणे, मुख्य जलवाहिन्यांची नियतकालिक देखभाल सुनिश्चित करावी, पाणी बंद / कपातीचे अचूक व पालनयोग्य वेळापत्रक आधीच जाहीर करावे, पुनर्पुरवठा विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित करावी, झोपडपट्टी व बहुमजली निवासी संकुलांसाठी आपत्कालीन पाणीपुरवठा योजना तत्काळ राबवावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

९) श्री. महेश सावंत, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण) लक्ष वेधले.

"ग्रँटरोड येथील फ्लोरीएट इन्व्हेस्टमेंट, शापूरजी पालनजी तर्फे सिटी सर्वे क्र. १५५२ (गिरगाव) ७८०३ चौ.मी.भूखंडावरील जे.के. बिल्डिंग ०१ ते ते १० या उपकरप्राप्त इमारतींचा वि.नि.नि. ३३(७) अंतर्गत पुनर्विकास करताना स्टर्लिंग टॉवर या इमारतीत ५७० पैकी १५० घरांचे पुनर्वसन केल्याचे दाखवून १००० चौ.फूटाची ३८ घरे

बांधून- FSI घोटाळा करून कोट्यवधीचा महसूल बुडविणे, सन २००९ साली भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून जे.के.टॉवर A,B या २९ मजली इमारतीत २१५ रहिवाशांचे पुनर्वसन करून १७ वर्षे उलटूनही रहिवाशांच्या घरांची नोंदणी व सोसायटी स्थापन न करणे, पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या २०४ रहिवाशी यांच्या प्रस्तावित जे.के.टॉवर D विंग इमारत सन २०१७ मध्ये इमारत तोडल्यानंतर गेली ०९ वर्षे आ.यो.डी./सी.सी.प्रमाणित करून प्रत्यक्षात plinth चे बांधकामही पूर्ण न होणे, सन २०२२ मध्ये डी.सी.पी.आर.मधील बदलानुसार इंसेप्टिन FSI ५०% वरून ७८% झाल्यावर विक्रीसाठी एक विंग इमारतीचे १८ मजले वाढून ६३ मजल्याची प्रस्तावित करणे, मूळ रहिवाशी यांना ३५% फंजीबल प्रमाणे ४०५ चौ.फुटाचे घर देण्यास नकार देणे, विकासकातर्फे मासिक भाडे ०८ महिने न मिळणे व दादागिरी करणे, pollution mitigation गाईड लाईन्स चे उल्लंघन करणे, रस्त्याचा सेट बॅक हस्तांतरित न करणे, मूळ रहिवाशी यांची व शासनाची फसवणूक केलेली असूनही म्हाडा, मनपाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने स्थानिकामध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व फसवणुकीची भावना, याबाबत विकासकाच्या सर्व परवानग्याना स्थगिती देऊन कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१०) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"गोंदिया जिल्ह्याला सन २०२३-२०२४ मध्ये उत्पादित झालेल्या CMR तांदळासाठी आवश्यक असलेला FRK तांदूळ सरकारकडून मिळालेला नसतानाही संपूर्ण तांदळाचा लॉट LD FRK तांदळाने तयार केला गेला असणे, गोंदिया येथील जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सतीश आगडे म्हणून अतिरिक्त कार्यभार पाहत असणे, ते गेल्या दहा वर्षांपासून गोंदिया जिल्ह्यात असणे, त्याच जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात राहत असणे आणि पूर्वी भात गिरणी मालक असणे, चार वर्षांपूर्वी श्री. आगडे देवरीमध्ये गुणवत्ता निरीक्षक असणे, त्यावेळी देवरीमध्ये त्यांनी मंजूर केलेला तांदूळ केंद्रीय पथकाने मानवी वापरासाठी अयोग्य असल्याचे नोंदवले असणे, तो तांदूळ अजूनही देवरीच्या गोदामात साठविणे, या गोदामाचे गोदामाचे भाडे चार वर्षांपासून दिले जात असणे, यामुळे शासनाच्या तिजोरीवर अनावश्यक भार पडत असणे, गोंदियाचे डीएसओ श्री. सतीश आगाडे हे यासाठी जबाबदार असणे, गोंदिया

जिल्ह्यात सीएमआर तांदूळ जमा करण्यासाठी शासनाने १६००३८ मेट्रिक टन क्षमतेची गोदामे भाड्याने घेतली असणे, यात पारदर्शकता नसणे, काही गोदामांमध्ये ४ मिलर्स आहेत तर काहींमध्ये २५ मिलर्स आहेत तसेच गिरणी मालक त्यांच्या पसंतीच्या गोदामांमध्ये सीएमआर तांदूळ जमा करत असणे, असा अदांधुद गैरकारभार सुरु असूनही शासन याबाबत दुर्लक्ष करित असणे, परिणामी शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

११) डॉ. राहुल पाटील व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाराष्ट्र विधानसभा सन २०२४ निवडणुकीपूर्वी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करणे, सदर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील हजारो सुशिक्षित बेरोजगार युवकांनी ११ महिन्यासाठी कौशल्य विभागामार्फत शासकीय तसेच निमशासकीय सेवेत प्रशिक्षण घेतलेले असून या प्रशिक्षणाचा कालावधी १ डिसेंबर रोजी पूर्ण झालेला असणे, प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित आस्थापनेत कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिलेली असणे, परंतु अद्याप आश्वासन पूर्ण करण्यात आलेले नसणे, त्यामुळे परभणी जिल्ह्यासह राज्यातील प्रशिक्षण घेतलेले युवक-युवतींवर बेरोजगारी वेळ आलेली असणे, परिणामी सदर योजनेंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या सुशिक्षित प्रशिक्षणार्थ्यांमध्ये शासनप्रति निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने परभणी जिल्ह्यासह राज्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगार प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात आलेल्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून देण्याच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१२) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजना ही ०९ जुलै, २०२४ रोजी पासून सुरू असणे, या योजनेत १२ वी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी यांना प्रतिमाह ६००० रुपये, आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना प्रतिमाह ८००० रुपये व पदवी तसेच पदवीत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना रुपये १०००० प्रतिमाह प्रमाणे विद्यावेतन देण्यात येणे, सदरचे प्रशिक्षण शासनाने ०६ महिन्यावरून ११ महिन्याकरिता वाढविण्यात येणे, या योजनेतील अधिकाधिक प्रशिक्षणार्थी यांना खाजगी उद्योगातील प्रशिक्षणाचीआवश्यकता असणे, या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थी यांना मिळणाऱ्या कार्य अनुभवाच्या आधारे स्वरोजगार सुरू करणेसाठी शासनाकडून या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार / स्वयंरोजगारसाठी विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सचिव-१ यांनी, म.वि.स. नियम १०५ अन्वये सभागृहात चर्चेकरिता न आलेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (अ) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(ब) आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक ६ ते ३३ वरील तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) पर्यटन मंत्र्यांनी, महा मुंबई मेट्रो (एम ३) संचलन महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) उपमुख्यमंत्र्यांनी,

क) पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू असलेला कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढविणेबाबतचे पूरक स्पष्टीकरणात्मक ज्ञापन,

(ख) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण, महाराष्ट्र शासन यावरील अहवाल, (२) महाराष्ट्रातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान ट्रस्टसह प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या अंमलबजावणीवरील कामगिरी लेखापरीक्षण अहवाल, (३) सन २०२४-२०२५ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल, (४) सन २०२४-२०२५ या वर्षाचा वित्तीय लेखा अहवाल, खंड-एक व खंड-दोन,

(ग) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(३) वने मंत्र्यांनी, महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (महा-कॅम्पा) यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ चा लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) उद्योग राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२३-२०२४ या वर्षांचा वार्षिक अहवाल, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई (महानंद) यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(६) कृषी मंत्र्यांनी,

(क) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक अहवाल,

(ख) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(७) कृषी मंत्र्यांनी, महिला व बाल विकास मंत्र्यांकरिता,

(क) महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे तिसावा व एकतिसावा वार्षिक अहवाल तसेच

(ख) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(८) परिवहन राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, “संत्रा उत्पादकांना २०२३ मध्ये ५० टक्के अनुदान देण्याचा निर्णय होणे, मात्र तो निर्यातदारांना न मिळता शेतकऱ्यांना मिळणे,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी, हा पैसा शेतकऱ्यांनाच मिळेल, असे प्रयत्न असल्याचे सांगितले.

(१) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी, “ॲड. मंगेश ससाणे, व श्री. लक्ष्मण हाके यांच्यावरील हल्लेखोरांना पकडणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी, यावर कठोर कारवाई केली जाईल, असे सांगितले.

(२) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, “धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस करणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी, “स्त्री व पुरुष तसेच बालकांचे ‘खतना’ कृत्याचे विरुद्ध राज्यात गुन्हे घडत असताना पोलिसात गुन्हे दाखल न होणे व त्यासाठी निर्देश जारी करणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. हारून खान, वि.स.स. यांनी, “पाली येथील बस स्थानकाच्या दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घेणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, “समाज माध्यमांवर खोट्या पोस्ट टाकल्या जात असल्यामुळे त्याविरोधात कारवाई करणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी, ही पोस्ट टाकणाऱ्या व्यक्तीला शोधून त्यावर कारवाई केली जाईल, असे सांगितले.

श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, “विधिमंडळ सचिवालयातील तात्पुरत्या स्वरुपातील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

**३.** सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये पुढील प्रस्ताव. (मंत्र्यांचे उत्तर) -

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, भ्रष्टाचारात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, राज्यात घडत असलेला शेकडो कोटी रुपयांचा धान घोटाळा, संतोष देशमुख मृत्यू प्रकरणी अद्यापही आरोपींना अटक झालेली नसणे, कृष्णा आंधळे अद्यापही फरार असणे, नागपूर येथे मोठया प्रमाणावर एमडी व अन्य् ड्रग्सचे उत्पादन व साठा होत असणे, विविध समाजाच्या आरक्षणासंदर्भात राजकीय पातळीवर द्वेषपूर्ण वक्तव्ये व जाणूनबुजून तयार केलेला तणाव, विदर्भातील सोयाबीन, धान, कापूस उत्पादक अत्यंत अडचणीत असून अद्यापही शासनाकडून योग्य मदत न मिळणे, पिकाला हमी भाव मिळत नसणे, सरसकट कर्जमाफी करण्यात न येणे इत्यादी विषयाबाबत."

मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिले.

सभागृहाने तिन्ही प्रस्तावांवर विचार केला असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले.

**४.** माननीय अध्यक्षांनी, श्री. नानाभाऊ नारायणराव एंबडवार, माजी वि.स.स. व माजी मंत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

दिवंगत सदस्यांच्या शोकाकुल कुटुंबीयाकडे शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** सचिव (१) यांनी, पुढील यादी वाचून दाखविली—

(अ) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली :—

१. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

२. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

३. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५.

४. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५

५. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ – महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५

६. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

७. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५

८. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ – महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

९. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

१०. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ – हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५

११. सन २०२५चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ – महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

१२. सन २०२५चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५ – मामलतदार न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२५

१३. सन २०२५चे विधानसभा विधेयक क्रमांक १०६ – महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक,२०२५.

१४. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०८ – महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५.

(ब) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशींशिवाय परत केली :-

१. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०२ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

२. सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०४ – महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५.

(क) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

१. सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२.

**६.** संसदीय कार्यमंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला—

"विधानमंडळ समित्यांच्या दौऱ्यादरम्यान विधानमंडळ सदस्यांचे आचरण कसे असावे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती गठित करण्याबाबतचा प्रस्ताव."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**७.** समिती प्रमुख, विशेषाधिकार समिती यांनी पुढील प्रस्ताव मांडला –

"विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

१) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. रोहित पवार, वि.स.स. यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

२) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी "लय भारी" यु-ट्यूब वाहिनीचे संपादक / चालक श्री. तात्यासो ऊर्फ तुषार आबाजी खरात यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**८.** १) समितीप्रमुख, श्री. नरेंद्र भोंडेकर यांनी, "दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय विधानसभा सदस्य

श्री. गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात धक्काबुक्की करीत अत्यंत आक्षेपार्ह कृत्य करून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा व प्रतिमा मलीन केल्याने उद्‌भवलेले महाराष्ट्र विधानसभेचे विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणा" संबंधातील विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहास सादर केला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

अहवाल विचारात घेण्यात आला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) उपरोक्त विषयासंदर्भात संसदीय कार्यमंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता पुढील प्रस्ताव मांडला.

"दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात धक्काबुक्की करीत अत्यंत आक्षेपार्ह कृत्य करून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा व प्रतिमा मलीन केल्याने उद्‌भवलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणासंबंधातील विधानसभा विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदरहू अहवालातील समितीच्या अभिप्राय व शिफारशींशी सहमत असून असा ठराव करीत आहे की,

(१) संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेप्रमाणेच महाराष्ट्र विधानमंडळाची सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

(२) विधान भवनात येणाऱ्या सर्वच अभ्यागतांसाठी सुरक्षा तज्ज्ञ व सल्लागारांच्या अभिप्रायांनुसार एक स्वतंत्र नियमावली तयार करण्यात यावी व अशा नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

(३) अशा प्रसंगाना रोखण्यासाठी किंबहुना अशी घटना घडूच नये म्हणून सुरक्षा तज्ञ व सल्लागार तसेच पोलीस विभागाशी समन्वय ठेऊन प्रभावी अशी सुरक्षा व्यवस्था विधान भवनात निर्माण करण्यात यावी.

(४) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेशिका वितरण प्रणाली ही महाराष्ट्र पोलीस डेटाबेस बरोबर संलग्न करून त्याद्वारे अभ्यागतांची स्वयंचलित रिअल टाईम पार्श्वभूमी तपासणी प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी. ज्यामध्ये अभ्यागतांची गुन्हेगारी

पार्श्वभूमी असल्याचे प्रणालीला दिसून आल्यास त्या अभ्यागताची प्रवेशिका विनंती तात्काळ नाकारली जाईल. याप्रमाणे डिजिटल प्रवेशिका वितरण प्रणाली विधान भवनात या विषयातील तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार स्थापित करण्यात यावी.

(५) विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी विधानमंडळाच्या प्रसीमेत अभ्यागतांना घेऊन येताना दक्षता घ्याव्यात व सर्व सन्माननीय सदस्यांनी अभ्यागतांच्या सुरक्षा तपासणीमध्ये विधानमंडळाच्या सुरक्षा अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य करून एक आदर्श निर्माण करावा तसेच सन्माननीय सदस्यांच्या भेटीला येणाऱ्या अभ्यागतांची सुरक्षा तपासणी व सुरक्षा सूचनांचे सौजन्याने आणि शीघ्रतेने पालन करावे.

(६) सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री.नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री.सर्जेराव बबन टकले या अभ्यागतांनी प्रवेश नियमांचे उल्लंघन करीत विधान भवनाच्या मुख्य पोर्च येथे विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना केलेल्या धक्काबुक्कीमुळे विधानसभेच्या कामकाजामध्ये प्रत्यक्षपणे व्यत्यय निर्माण झाला. त्यांनी धक्काबुक्कीचे अतिशय आक्षेपार्ह, निंदनीय व गुन्हेगारी स्वरुपाचे गंभीर दुष्कृत्य केले. त्यामुळे विधानसभा सभागृह व विधानसभेचे सन्माननीय सदस्य यांचेबाबत जनमानसात संभ्रम व गैरसमज निर्माण झाला, माध्यमांद्वारे विधानमंडळाबाबत अत्यंत प्रतिकूल वृत्तांकन केले गेले. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य यांच्या प्रतिमेला व प्रतिष्ठेला तडा गेला म्हणून समिती श्री.नितीन हिंदुराव देशमुख व श्री.सर्जेराव बबन टकले यांच्या गंभीर कृत्यांसाठी त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही म्हणून श्री.नितीन हिंदुराव देशमुख त्याचप्रमाणे श्री.सर्जेराव बबन टकले यांना दोन दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी. तसेच त्यांना विधान भवनाच्या मुंबई व नागपूर येथील प्रसिमेत येण्यास या विधानसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत म्हणजेच सन २०२९ पर्यंत बंदी घालण्यात यावी.

कारावासात पाठविलेल्या व्यक्तीस विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर मुक्त केले जाते ही वस्तुस्थिती विचारात घेता विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वी संबंधित अवमानकर्ते यांची लगेच मुक्तता होऊन आवश्यक तेवढा त्यांच्या शिक्षेचा कालावधी पूर्ण न झाल्यास विधानसभेच्या एका किंवा अधिक अधिवेशनात त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेचा एकूण कालावधी पूर्ण करण्यासाठी पुढील अधिवेशनात त्यांना पुन्हा कारागृहात पाठविण्यात यावे.”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**९.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१०.** वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, (महिला व बाल विकास मंत्र्यांकरिता) शासकीय विधेयकांची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

श्री. अमोल खताळ, वि.स.स. यांनी, "संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथे ४ वर्षांच्या बालकाला बिबट्याने हल्ला करून ठार करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दर्शविलेल्या सर्व अर्धा-तास चर्चेच्या सूचना पुढील अधिवेशनात घेण्यात येतील, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सत्रकालीन कामकाजाचा आढावा –

माननीय अध्यक्षांनी, हिवाळी अधिवेशन काळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, "महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेश सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे बोलवावे, अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे," असे जाहीर केले.

माननीय अध्यक्षांनी, सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखविला.

> "मी आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे राज्यपाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी याद्वारे रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

यानंतर 'राष्ट्रगीत' म्हणण्यात आले.

विधानसभेचे अधिवेशन दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी संस्थगित झाले.

## विवरण क्रमांक - ८

सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील सभाध्यक्ष तालिकेवर म.वि.स. नियम ८ (१) मधील तरतुदीनुसार मा.अध्यक्षांनी खालील सदस्यांची नामनियुक्ती केली आहे.

(१) श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.

(२) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(३) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.

(४) डॉ.राहूल पाटील, वि.स.स.

(५) श्री.उत्तमराव जानकर, वि.स.स.

(६) श्री.रामदास मसराम, वि.स.स.

(७) श्री.समीर कुणावार, वि.स.स.

***

**विवरण क्रमांक -९**

विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर

सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

निरंक

***

## विवरण क्रमांक - १०

## विविध समित्यांच्या बैठका

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | कामकाज सल्लागार समिती | बुधवार, दि. ०३ डिसेंबर, २०२५ | विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार, दि. ०३ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कक्ष क्रमांक ०४०, तळमजला, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले<br>**:: निर्णय ::**<br>(१) संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावित दिनदर्शिकेतील दिनांक ८ ते १९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या कालावधीतील कामकाज विचारात घेवून सन २०२५ चे तृतीय हिवाळी अधिवेशनाचे कामकाज निश्चित करून ते सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर ते रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीपर्यंत घेण्यात येईल.<br>(२) सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजीचे प्रश्नोत्तरे शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ व मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजीचे प्रश्नोत्तरे रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजात दर्शविण्यात येतील. |

# विवरण क्रमाक ११

## शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८९ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१५ | कामगार | श्री. आकाश फुंडकर | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | |
| २ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | विधी व न्याय | मुख्यमंत्री | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ९/१२/२०२५ | १२/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५३ | |
| ३ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ | पणन | श्री. जयकुमार रावल | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १२/१२/२०२५ (सुधारणांसह संमत) | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५२ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ९/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५४ | |
| ५ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्र्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | विधी व न्याय | मुख्यमंत्री | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५५ | |
| ६ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्र्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५ | सामान्य प्रशासन | मुख्यमंत्री | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५६ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५७ | |
| ८ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५ | उच्च व तंत्रशिक्षण | श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | ९/१२/२०२५ | ९/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५८ | |
| ९ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठ (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | उच्च व तंत्रशिक्षण | श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | ९/१२/२०२५ | ९/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५९ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | १०/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ | १२/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६० | |
| ११ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | १०/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ (सुधारणेसह संमत) | १२/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६१ | |
| १२ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | १०/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६२ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | १०/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १२/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६३ | |
| १४ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०४ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५ | वित्त | श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५१ | |
| १५ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५ - मामलतदार न्यायालय (सुधारमा) विधेयक, २०२५ | महसूल | श्री. चंद्रशेखर बावनकुळे | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १२/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६४ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०६ - महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०२५ | विधी व न्याय | मुख्यमंत्री | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५० | |
| १७ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०८ - महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट् सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवसाय व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासाबंधी) (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२५ | गृहनिर्माण | श्री. एकनाथ शिंदे (उप मुख्यमंत्री) | १२/१२/२०२५ | १२/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १३/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६५ | |
| १८ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५ | विधी व न्याय | मुख्यमंत्री | १३/१२/२०२५ | १३/१२/२०२५ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषद देत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२५ | ग्रामविकास | श्री. जयकुमार गोरे | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ९/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ४८ | |
| २० | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५ | नगरविकास | श्री. एकनाथ शिंदे (उप मुख्यमंत्री) | ८/१२/२०२५ | ८/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १०/१२/२०२५ | ९/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ४९ | |
| २१ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ | नगरविकास | श्री. एकनाथ शिंदे (उप मुख्यमंत्री) | ९/१२/२०२५ | ९/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ११/१२/२०२५ | १०/१२/२०२५ | --- | --- | --- | --- | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ | गृहनिर्माण | श्री. एकनाथ शिंदे (उप मुख्यमंत्री) | ११/१२/२०२५ | ११/१२/२०२५ | विचारात घ्यावे खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १३/१२/२०२५ | १२/१२/२०२५ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६६ | |

## विवरण क्रमांक - १२

संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव.

निरंक

***

## विवरण क्रमांक - १३

## पुरःस्थापित अशासकीय विधेयके

(खालील अशासकीय विधेयके शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी पुरःस्थापित झाली.)

एकूण ०८ विधेयके

(१) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८३ – महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरु व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५.

(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८५ – महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, २०२५.

(३) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२५.

(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८७ - महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०२५.

(५) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५.

(६) डॉ.राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९० - महाराष्ट्र राज्यातील पदवीधर बेरोजगारांना सेवा- सुविधा (बेरोजगार भत्ता) देण्याबाबत विधेयक, २०२५

(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१- महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भात मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५

(८) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०७ - महाराष्ट्र अधिवक्ता संरक्षण विधेयक, २०२५

***

## विवरण क्रमांक - १४

## विचारात घेण्यात आलेली अशासकीय विधेयके

निरंक

**********

**टीप** : खालील दोन अशासकीय विधेयके शुकवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात विचारार्थ दर्शविण्यात आली होती. तथापि, उक्त विधेयकांवर सभागृहात चर्चा होऊ शकली नाही.

(१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५- कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५.

(२) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६- महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५.

*****

## विवरण क्रमांक – १५

## भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

| अ.क्र. | प्रभारी सदस्य | अध्यादेश | शेरा |
|---|---|---|---|
| १) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ७ :- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५. | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| २) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ८ :- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| ३) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ९ :- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| ४) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १० :- महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२५ | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| ५) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक ११ :- मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |
| ६) | श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १२ :- महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ | नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही. |

**विवरण क्रमांक – १६**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५-२०२६ च्या

पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक १० व ११ डिसेंबर, २०२५ रोजी

मागण्या मंजूर झाल्या.

पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग

| **अ. क्र** | **विभागाचे नाव** | **एकूण मागण्या** | **मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** |
| **(अ)** | | | |
| १ | नगरविकास विभाग | ५ | दि. ११ डिसेंबर, २०२५ |
| २ | गृहनिर्माण विभाग | २ | |
| ३ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | १ | |
| ४ | महसूल व वन विभाग | ४ | दि. ११ डिसेंबर, २०२५ |
| | | | |
| ५ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ६ | |
| ६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ७ | |
| | | -------- | |
| | **एकूण** | **२५** | |
| | | -------- | |

## ब) दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या

| अ.क्र | विभागांची नावे | एकूण मागण्या |
|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन विभाग | ५ |
| २. | गृह विभाग | ६ |
| ३. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ३ |
| ४. | वित्त विभाग | ३ |
| ५. | जलसंपदा विभाग | २ |
| ६. | विधी व न्याय विभाग | ४ |
| ७. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | ४ |
| ८. | ग्रामविकास विभाग | ४ |
| ९. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ३ |
| १०. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २ |
| ११. | नियोजन विभाग | ६ |
| १२. | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ |
| १३. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ३ |
| १४. | आदिवासी विकास विभाग | २ |
| १५. | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | १ |
| १६. | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | २ |
| १७. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ४ |
| १८. | महिला व बालविकास विभाग | १ |
| १९. | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभाग | १ |
| २०. | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ४ |
| २१. | अल्पसंख्यांक विकास विभाग | २ |
| २२. | मराठी भाषा विभाग | १ |

| **अ.क्र** | **विभागांची नावे** | **एकूण मागण्या** |
| --- | --- | --- |
| २३. | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | १ |
| २४. | मृद व जलसंधारण विभाग | २ |
| | | ----------- |
| | **एकूण मागण्या** | **६९** |
| | | ----------- |
| | ---------------------------------<br>एकूण : (अ) + (ब) = ९४<br>२५ ६९<br>---------------------------------- | |

***

## विवरण क्रमांक -१७

## सन २०२५-२०२६ चे पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

| अ.क्र. | विभाग | एकूण | मान्य | अमान्य | चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नगरविकास विभाग | ६४ | ४२ | २२ | दि. १० डिसेंबर, २०२५ |
| २ | गृहनिर्माण विभाग | २८ | २५ | ३ | |
| ३ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ११ | ४ | ७ | |
| ४ | महसूल व वन विभाग | १५ | ८ | ७ | दि. ११ डिसेंबर, २०२५ |
| ५ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ५ | ३ | २ | |
| ६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३८ | १७ | २१ | |
| | | ------------------------ | | | |
| | **एकूण** | **१६१** | **९९** | **६२** | |
| | | ------------------------ | | | |

| अ.क्र. | प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे | |
|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग | सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत. |
| २ | गृह विभाग | |
| ३ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | |
| ४ | वित्त विभाग | |
| ५ | जलसंपदा विभाग | |
| ६ | विधी व न्याय विभाग | |
| ७ | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | |
| ८ | ग्रामविकास विभाग | |
| ९ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | |
| १० | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | |
| ११ | नियोजन विभाग | |
| १२ | सार्वजनिक आरोग्य विभाग | |
| १३ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | |
| १४ | आदिवासी विकास विभाग | |
| १५ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | |
| १६ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | |
| १७ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | |
| १८ | महिला व बालविकास विभाग | |
| १९ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभाग | |
| २० | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | |
| २१ | अल्पसंख्यांक विकास विभाग | |
| २२ | मराठी भाषा विभाग | |
| २३ | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | |
| २४ | मृद व जलसंधारण विभाग | |

***

## विवरण क्रमांक - १८

## सन २०२५-२०२६ च्या पुरवणी विनियोजन विधेयक

## (पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी संमत झाले)

## पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | स्विकृत | अस्विकृत | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ ) | श्री. नाना पटोले, वि.स.स. | १ | २ | ३ |
| | **एकूण** | १ | २ | ३ |

***

## विवरण क्रमांक - १९

## अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

काही नाही

***

## विवरण क्रमांक - २०

## उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स नियम ११ अन्वये)

काही नाही

***

## विवरण क्रमांक २१

## निंदाव्यंजक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये )

काही नाही

***

## विवरण क्रमांक २२

## म.वि.स. नियम ३५ अन्वये एखाद्या व्यक्तीविरुध्द करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

(म.वि.स. नियम ३५ अन्वये)

काही नाही

***

## विवरण क्रमांक - २३

## म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदने

| अ.क्र. | मंत्री | विषय | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री | छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारण्यात येण्याबाबत | ९ डिसेंबर, २०२५ |
| २. | ॲड आशिष शेलार मा. सांस्कृतिक कार्य मंत्री | युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत दीपावली या सणाचा समावेश होण्याबाबत | १० डिसेंबर, २०२५ |
| ३. | श्री. एकनाथ शिंदे मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) | मुंबई शहरात सुधारित भोगवटा अभय योजना राबविण्याबाबत | ११ डिसेंबर, २०२५ |
| ४. | श्री नितेश राणे मा. मत्सव्यवसाय व बंदरे मंत्री | वैभववाडी कोल्हापूर रेल्वे मार्ग तातडीने तयार करण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु करण्यात येत असल्याबाबत | ११ डिसेंबर, २०२५ |
| ५. | श्री. जयकुमार रावल मा. पणन मंत्री | हेक्टरी २३ क्विंटल कापूस खरेदीची मर्यादा राज्यात सरसकट लागू करण्याबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |
| ६. | श्री. चंद्रशेखर बावनकुळे मा. महसूल मंत्री | बाबुलनाथ मंदिर ट्रस्ट, मलबार कबाला हिल, मुंबई यांच्या लिज नुतनीकरणाबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |
| ७. | श्री. चंद्रशेखर बावनकुळे मा. महसूल मंत्री | मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरु करणे व राबविण्याकरिता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करणेबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |

| अ.क्र. | मंत्री | विषय | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ८. | श्री. चंद्रशेखर बावनकुळे मा. महसूल मंत्री | मुंबई शहर व मुंबइ उपनगर जिल्हयातील शासकीय जमिनीवरील दिर्घ मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणेबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |
| ९. | श्री. चंद्रशेखर बावनकुळे मा. महसूल मंत्री | भोगवटादार वर्ग- २ मधून भोगवटादार वर्ग- १ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरण करणेबाबतच्या नियमांना काही सुधारणासह एक वर्षाची मुदतवाढ देणेबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |
| १०. | श्री. नितेश राणे मा. मत्सव्यवसाय व बंदरे मंत्री | पापलेट उत्पादनाच्या अनुषंगाने समाजमाध्यमांत उपस्थित चर्चाबाबत | १२ डिसेंबर, २०२५ |
| ११. | श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री | संरक्षण क्षेत्रालगतच्या जमिनी आणि इतर काही कारणांमुळे काही क्षेत्रांवर इमातीचा पुनर्विकास पूर्ण क्षमतेने करणे शक्य नाही अशा क्षेत्रातील इमातींचा पुनर्विकास व्हावा या हेतूने नवीन हाऊसिंग फॉर ऑल ही योजना तयार करून मुंबईमधील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत | १३ डिसेंबर, २०२५ |
| १२. | श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री | दहिसर व जुहू (डी.एन नगर) येथील रडारचे स्थलांतरण करण्याबाबत | १३ डिसेंबर, २०२५ |
| १३. | श्री. अतुल सावे मा. दिव्यांग कल्याण मंत्री | दिव्यांग-अदिव्यांग व दिव्यांग-दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याबाबत | १३ डिसेंबर, २०२५ |

| अ.क्र. | मंत्री | विषय | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १४. | श्री. नितेश राणे मा. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | दिनांक १२ मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयास स्थगिती देण्यात आल्याबाबत | १३ डिसेंबर, २०२५ |

***

## विवरण क्रमांक २४

## सदस्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

(म.वि.स. नियम ४८ अन्वये )

**निरंक**

***

**विवरण क्रमांक - २५**

**महाराष्ट्र विधानसभा**

द्वितीय (पावसाळी) अधिवेशन, २०२५

(म.वि.स. नियम ५७ अन्वये)

| | |
|---|---|
| एकूण प्राप्त झालेले प्रस्ताव | १ |
| मान्य झालेले प्रस्ताव | -- |
| अमान्य झालेले प्रस्ताव | १ |

| अ.क्र. | दिनांक | सदस्यांची नावे | विषय | मान्य/अमान्य |
|---|---|---|---|---|
| १. | ९/१२/२०२५ | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | "राज्यात शेतकऱ्यांच्या समस्याबाबत". | अमान्य |

***

## विवरण क्रमांक -२६

## अर्धा- तास चर्चा सर्वसाधारण (म.वि.स. नियम ९४ अन्वये)

| अ.क्र | सदस्यांचे नांव | विषय | सभागृहात चर्चा |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | "मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करून अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. | "नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| ३) | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | "विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | चर्चा झाली नाही. |
| ४) | श्री. महेश शिंदे, वि.स.स. | “राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करून त्यांच्या | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करून औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ५) | श्री. अस्लम शेख, वि.स.स. | "मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. | "चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन करून नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा. मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करून सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदयातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना." | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स. | “महाराष्ट्रातील होलार समाज अनुसूचित जातीतील (SC) २६ व्या क्रमांकावर असून या समाजाचा पारंपारिक व्यवसाय वाद्य वाजविणे, जुन्या चपला शिवणे हा असणे, या समाजाकडे शेत जमीन नसल्याने तारण मिळत नसणे, त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी कर्जही मिळत नसणे, तसेच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने बेरोजगारी व गरीबीचे प्रमाण जास्त असणे, महाराष्ट्र शासनाने १९७४ साली होलार, चांभार, ढोर व मोची या समाजासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ स्थापन करणे, परंतु सदर महामंडळ स्थापनेपासून होलार समाजाला या महामंडळामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधीत्व मिळालेले नसणे, सदर महामंडळ स्थापनेपासून अध्यक्ष व संचालक नसणे, माहिती अधिकाराखालील माहितीच्या आधारे असे दिसून येणे की २% सुध्दा कर्ज वाटप झालेले नसणे, त्यामुळे होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे गरजेचे असून याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली असणे, राज्यात ५० लाखाच्या पुढे होलार समाजाची लोकसंख्या असून महाराष्ट्रातील विविध भागात व्यवसायानुसार मातंग, चांभार, मोची अशा चुकीच्या नोंदी लागलेल्या असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी नेमलेल्या अभ्यास गटाने सिध्द करणे, त्यामुळे होलार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | "मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| ९) | श्री. विनोद निकोले, वि.स.स. | "मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट कॉंक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळ्यांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली | ११, १२, १३ व १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १०) | श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. | "बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुमारे १४,००० पेक्षा अधिक पागडी/सेस इमारती असणे, यापैकी अनेक इमारती १९४० पूर्वी बांधलेल्या असून अत्यंत जीर्ण अवस्थेत असणे, या इमारतींमध्ये लाखो कुटुंबे अतिधोकादायक परिस्थितीत वास्तव्य करत असून त्या कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत असणे, मात्र मालक व भाडेकरू यांच्यातील वाद तसेच एक समान पुनर्विकास धोरणाच्या अभावामुळे या इमारतींचा पुनर्विकास अद्यापही रखडलेला असणे, परिणामी रहिवाशांना असुरक्षित व अमानवीय परिस्थितीत राहण्यास भाग पाडले जात असणे, त्यामुळे या इमारतींच्या पुनर्विकासासाठी "इमारतीचे वय" या एका साध्या व स्पष्ट निकषाची आवश्यकता, या प्रकारातील सन १९६५ पूर्वीच्या सर्व पागडी/सेस इमारती जीर्ण अवस्थेत असोत वा नसोत त्यासाठी ठराविक काल मर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता, बी.डी.डी. पुनर्विकासाचा आदर्श समोर ठेऊन सेस/पागडी इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो मुंबईकरांना दिलासा | १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्यासाठी एक नवीन, स्पष्ट, सर्वसमावेशक व पारदर्शक शासन निर्णय (GR) तातडीने काढण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ११ | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | "पोंभुर्णा आणि करंजी (ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर) येथील एमआयडीसीमध्ये आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची आवश्यकता, जिल्ह्यातील आदिवासी तरुण-तरुणींना उद्योजक करण्यासाठी आदिवासी औद्योगिक विकास क्षेत्र निर्माण करण्याची आवश्यकता, आदिवासी युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी होणारे प्रयत्न जलदगतीने होत नसल्याने उद्योजकतेकडे त्यांची वाटचाल होत नसल्याचे दिसून येणे, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा आणि गोंडपिपरी तालुक्यातील करंजी येथील एमआयडीसीमध्ये प्लग ॲन्ड प्ले या धर्तीवर आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

## विवरण क्रमांक २७

## मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

( म.वि.स. नियम ९५ अन्वये )

निरंक

***

## विवरण क्रमांक- २८

## मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

( म.वि.स. नियम २३ अन्वये )

निरंक

***

**विवरण क्रमांक -२९**

**स्थगन प्रस्ताव**

**( म.वि.स. नियम ९७ अन्वये )**

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्याबाबत | अमान्य | ९ डिसेंबर २०२५ |
| २ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | राज्यात वाघांचा व बिबटयांचा नागरी वस्त्यांमध्ये मोठया प्रमाणात वावर वाढल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| ३ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | राज्यात वाघाच्या हल्यात होणारे मृत्यूबाबत | अमान्य | -- " -- |
| ४ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या मदतीबाबत. | अमान्य | -- " -- |
| ५ | श्री. भास्कर जाधव, वि.स.स. | मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारण्याबाबत | अमान्य | -- " -- |
| ६ | डॉ. नितिन राऊत, वि.स.स. | महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मनमानी पद्धतीने वीज दर वाढविल्याबाबत | अमान्य | -- " -- |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
|---|---|---|---|---|
| ७ | श्री. अमित देशमुख,<br>श्री. नानाभाऊ पटोले,<br>श्री. विश्वजित कदम,<br>श्री. अनिल मांगुळकर,<br>श्री. संजय मेश्राम, वि.स.स. | महाराष्ट्र शासनाने दि. १७.०३.२०२५ रोजी एकतर्फी आदेश जारी करून लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो नागरिकांचे वैध जन्म दाखले रद्द करणे, ज्यामुळे नागरिकांचे संवैधानिक हक्क आणि मूलभूत ओळखपत्रे गमावल्यामुळे उपजीविकेचे प्रश्न धोक्यात आल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| ८ | श्री. रईस शेख, वि.स.स. | भिवंडी महानगरपालिकेने डी.पी प्लॅन व मेट्रो-५ विस्ताराच्या अनुषंगाने रस्ता रुंदीकरणाकरिता बाधित होणाऱ्या घरे, दुकाने, टपऱ्या, गाळे यांच्या नुकसानभरपाईबाबत | अमान्य | -- " -- |
| ९ | श्री. साजिद पठाण, वि.स.स. | मौजे अकोला सीट नं. ३९ डी मधील भूखंड क्र.८०/१ क्षेत्रफळ ९६६८.८८ चौ.मी व भूखंड क.८०/१० क्षेत्रफळ २४५७९.८२ चौ.मी ही जागा वाणिज्य संकुल, सीटी बस स्थानक व भाजी बाजार प्रयोजनाकरिता विकसित करण्याकरिता महानगरपालिका, अकोला यांना हस्तांतरित करण्याबाबत | अमान्य | -- " -- |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १० | श्री. अबू आझमी, वि.स.स. | वाढत असलेल्या प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात असल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| ११ | डॉ. नितिन राऊत, वि.स.स. | विदर्भ विकासातील अनुशेष, शेतकरी आत्महत्या आणि बेरोजगारी इत्यादी विविध समस्यांबाबत | अमान्य | १० डिसेंबर २०२५ |
| १२ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ लिमिटेड मध्ये अनुकंपा नियुक्तीतील अनियमितता, विलंब याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| १३ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | कर्नाटक शासनाने शांततेने निदर्शने करणाऱ्या मराठी भाषिकांना केलेली अटक व मराठी महिलांना गोदामात स्थानबद्ध केल्याबाबत. | अमान्य | -- " -- |
| १४ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ लिमिटेडमधील अनुकंपा नियुक्ती अनेक वर्षांपासून पूर्णपणे प्रलंबित असल्याबाबत | अमान्य | ११ डिसेंबर २०२५ |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १५ | श्री. अबू आझमी, वि.स.स. | वाढत असलेल्या वायु प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत | अमान्य | १२ डिसेंबर २०२५ |
| १६ | डॉ. नितिन राऊत, वि.स.स. | विदर्भ विकासातील अनुशेष, नागपूर करार, शेतकरी आत्महत्या आणि बेरोजगारी इत्यादी विविध समस्यांबाबत | अमान्य | -- " -- |
| १७ | श्री. अमित देशमुख, वि.स.स. | लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो नागरिकांचे वैध जन्म दाखले रद्द केल्यामुळे नागरिकांचे संवैधानिक हक्क आणि मूलभूत ओळखपत्रे गमावल्यामुळे उपजीविकेचे प्रश्न धोक्यात आल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| १८ | श्री. अमोल खताळ, वि.स.स. | संगमनेर विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या जमिनीवरील पोकळीस्त व इतर हक्कातील कब्जेदार नोंदी हटवण्याबाबत | अमान्य | -- " -- |
| १९ | श्री. अमोल खताळ, वि.स.स. | संगमनेर विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या जमिनीवरील पोकळीस्त व इतर हक्कातील कब्जेदार नोंदी हटवण्याबाबत | अमान्य | १३ डिसेंबर २०२५ |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २० | श्री. अबू आझमी, वि.स.स. | बृहन्मुंबई महानगरपालिका तर्फे फोटो पासकरीता वाढविण्यात आलेल्या रकमेबाबत | अमान्य | -- " -- |
| २१ | डॉ. नितिन राऊत, वि.स.स. | विदर्भ विकासातील अनुशेष, नागपूर करार, शेतकरी आत्महत्या आणि बेरोजगारी इत्यादी विविध समस्यांबाबत | अमान्य | -- " -- |
| २२ | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | महाराष्ट्र शासनाने दि. १७ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देणेबाबत | अमान्य | -- " -- |
| २३ | श्री. अमित झनक, वि.स.स. | महाराष्ट्र शासनाने दि. १७ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देणेबाबत | अमान्य | -- " -- |
| २४ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | जि. चंद्रपूर, ता. सिंदेवाही, गुंजेवाही येथे वाघाच्या हल्ल्यात महिलेचा झालेला मृत्यू | अमान्य | १४ डिसेंबर २०२५ |
| २५ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | संत्रा निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांना सबसिडी देण्याबाबत | अमान्य | -- " -- |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | विषय | निर्णय | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २६ | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | नागपुर येथे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांवर लाठीचार्ज झाल्याबद्दल | अमान्य | -- " -- |
| २७ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | राज्यात वाढलेल्या ड्रग्सच्या प्रमाणाबाबत | अमान्य | -- " -- |

***

## विवरण क्रमांक – ३०
## सभागृहात उपस्थित करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे

| क्रमांक | सदस्यांचे नाव | थोडक्यात विषय | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. राजेश वानखेडे, वि.स.स. | अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ MIDC अंतर्गत रतन इंडिया औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये मोफत राखेच्या शासकीय धोरणाला डावलून होत असलेला राखेचा काळा बाजार | ९ डिसेंबर २०२५ |
| २ | श्री. अशोक पाटील, वि.स.स. | मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप (प) येथील रहीवासी श्री.मोहन नायर यांचा दि.२९/११/२०२५ रोजी सकीनाका पेट्रोल पंप येथे हत्येचा कट रचल्याबाबत | -- " -- |
| ३ | श्री. शंकर मांडेकर, वि.स.स. | उत्रोली-वडगाव (ता. भोर, जि. पुणे) येथील प्रस्तावित MIDC प्रकल्पाच्या प्रलंबित कार्यवाहीस तात्काळ गती देण्यासाठी आवश्यक निर्णय करण्याबाबत | -- " -- |
| ४ | श्री. अजय चौधरी, वि.स.स. | अभुदयनगर काळाचौकी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत | -- " -- |
| ५ | श्री. सुहास बाबर, वि.स.स. | खानापूर तालुक्यामध्ये मंजूर घरकुलांना मोफत वाळू उपलब्ध करून देण्याबाबत | -- " -- |

| क्रमांक (१) | सदस्यांचे नाव (२) | थोडक्यात विषय (३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| ६ | श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. | पुणे येथील ऐतिहासिक मामलेदार कचेरी परिसरातील वास्तुंचे जतन व संवर्धन करणेबाबत | -- " -- |
| ७ | श्री. हेमंत ससाने, वि.स.स. | पुणे येथील ऐतिहासिक मामलेदार कचेरी येथे आद्य क्रांतीकरक राजे उमाजी नाईक यांचे स्मारक करण्याबाबत | -- " -- |
| ८ | श्री. मुरजी पटेल, वि.स.स. | मुंबई झोपडी मुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असलेल्या अडचणीबाबत | -- " -- |
| ९ | श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव, वि.स.स. | कन्नड सोयगाव तालुक्यातील जलस्त्रोतांचे खोलीकरण व व्यवस्थापन करणेबाबत | -- " -- |
| १० | श्री. चरणसिंग ठाकूर, वि.स.स. | नागपूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादकता हंगाम २०२५-२६ साठी पुनर्निर्धारित करण्याबाबत | -- " -- |
| ११ | श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. | नाशिक जिल्ह्यातील कश्यपी धरणांतर्गत संपादित जमिनीबाबत प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व अन्य हक्कांचे लाभ न मिळाल्याबाबत | -- " -- |
| १२ | श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. | राज्यातील भटक्या विमुक्त प्रवर्गातील गोपाळ समाजाच्या विविध मागण्याबाबत | -- " -- |

| क्रमांक (१) | सदस्यांचे नाव (२) | थोडक्यात विषय (३) | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १३ | श्री. बाबुराव कदम-कोहळीकर, वि.स.स. | हदगांव तालुक्यातील (जि.नांदेड) वारकवाडी, वानवाडी, मांडवा परिसरातील बौध्द धर्माचे पवित्र तीर्थस्थळ असलेले जागतिक दर्जाचे उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र असून सदर ठिकाणी असलेले डोंगरातून एका खासगी कंपनीच्या ठेकेदाराकडून अवैधरित्या उत्खनन करण्यात येत असल्यामुळे डोंगर नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याबाबत | -- " -- |
| १४ | श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. | मनरेगा अंतर्गत क वर्ग नगरपालिका क्षेत्रात रोहयो योजना राबविण्याबाबत | -- " -- |
| १५ | श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. | सर्पदंश तसेच शेती कामातील यांत्रिक अवजारांमुळे होणारे अपघातावरील उपचार या रुग्णांचा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समावेश करून तात्काळ अमंलबजावणी करण्याबाबत | -- " -- |
| १६ | श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. | राज्यात मका खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत | -- " -- |
| १७ | श्रीमती सई डहाके, वि.स.स. | महावितरणचे कारंजा लाड, जिल्हा वाशिम येथे स्वतंत्र विभाग निर्माण करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देण्याबाबत | -- " -- |

| क्रमांक | सदस्यांचे नाव | थोडक्यात विषय | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १८ | श्री. नाना पटोले, वि.स.स. | पुणे शहरातील खराडी परिसरातील पुणे पेठ, पार्क प्रकल्पांमध्ये लिफ्ट प्रत्यक्षात न उभारता तत्कालीन लिफ्ट निरीक्षकांनी अवैद्य रित्या लिफ्ट परवाने व लायन्सस जारी केल्याबाबत | -- " -- |
| १९ | श्री. रईस शेख, वि.स.स. | (हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |
| २० | श्री. राहुल आवाडे, वि.स.स. | इचलकरंजी जि. कोल्हापूर येथे एल.सी.बी. (स्थानिक गुन्हे अन्वेषण) कार्यालय पुर्ववत सुरु करणेबाबत | -- " -- |
| २१ | श्री. विठ्ठल लंघे, वि.स.स. | शेतीसाठी रस्ता या धोरणातून शिव पाणंद रस्त्याबाबत अधिक स्पष्टता येणे आवश्यक असण्याबाबत | -- " -- |
| २२ | श्री. मोहन मते, वि.स.स. | उत्तरप्रदेश राज्याच्या धर्तीवर 'हलाल प्रमाणित' उत्पादनांच्या निर्मिती, विक्री आणि वितरणावर बंदी घालणारा कायदा करण्याबाबत | -- " -- |
| २३ | श्री. मोहन मते, वि.स.स. | गुजरात व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर राज्यात अँटी-लँड ग्रॅबिंग कायदा लागू करण्याबाबत | -- " -- |

| क्रमांक | सदस्यांचे नाव | थोडक्यात विषय | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २४ | श्री. निलेश राणे, वि.स.स. | विदर्भ व मराठवाडा या ठिकाणचे पावसाचे निकष कोकणाकरीता न लावता या ठिकाणच्या पावसाच्या प्रमाणानुसार या ठिकाणच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाचा दर्जा ठरवण्याबाबत | -- " -- |
| २५ | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नियमांचे उल्लंघन करून केलेल्या मनमानीबाबत | -- " -- |
| २६ | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | मुंबईतील गोरेगाव पूर्व दादासाहेब फाळके चित्रनगरीसह राज्यातील चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार/ज्युनिअर कलाकारांवर मालक/निर्माते यांच्याकडून सातत्याने अन्याय होत असल्याबाबत | -- " -- |
| २७ | श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स. | राज्य शासनाने मागेल त्याला सौर ऊर्जा पंप न देता नवीन वीज कनेक्शनची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याबाबत | -- " -- |
| २८ | श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. | मुंबईमध्ये सेस इमारती व चाळींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्विकासाच्या समस्या सोडविण्याबाबत | -- " -- |
| २९ | श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. | चंदगड (जि. कोल्हापूर) तालुक्यातून जाणारा बेळगांव-वेंगुर्ला १८० क्रमांकाचा राज्यमार्ग हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून दर्जोनित करून संपूर्ण १० मीटर रुंदीचा महामार्ग करण्याबाबत | -- " -- |

| क्रमांक | सदस्यांचे नाव | थोडक्यात विषय | सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ३० | श्री. महेश सावंत, वि.स.स. | दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्वच्छता व सुशोभीकरणाबाबत | -- " -- |
| ३१ | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | राज्यातील प्रत्येक गावातील स्ट्रीट लाईटची थकबाकी राज्य शासनाने भरण्यासह प्रत्येक खेडयामध्ये वाढील स्ट्रीट लाईटचा मार्ग मोकळा करण्याबाबत | -- " -- |
| ३२ | श्री. महेश लांडगे, वि.स.स. | पिंपरी-चिंचवड येथे महापालिकेने बांधलेल्या घरकुलात राहणाऱ्या रहिवाशांच्या समस्या सोडविण्याबाबत | -- " -- |
| ३३ | श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. | मंठा तालुक्यातील बरबडा-आकणी बृहद लघुपाटबंधारे प्रकल्प आणि आंबा, वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद येथील उच्च पातळी बंधाऱ्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत | -- " -- |
| ३४ | श्री. अबू आझमी, वि.स.स. | (हिंदी भाषण प्रलंबित) | -- " -- |

## विवरण क्रमांक - ३१

## औचित्याच्या मुद्दयांवरील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

निरंक

****

## विवरण क्रमांक - ३२

पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यमातून मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार संबंधीत मंत्र्यांनी केलेली निवेदने

निरंक

***

## विवरण क्रमांक- ३३

## अल्पकालीन चर्चा

(म.वि.स. नियम १०१अन्वये )

निरंक

***

## विवरण क्रमांक - ३४

## अल्पकालीन चर्चेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

निरंके

***

# विवरण क्रमांक – ३५

## लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| एकूण प्राप्त सूचना | : | १८६७ |
| एकूण स्विकृत संख्या | : | २९९ |
| एकूण चर्चा झालेले संख्या | : | ७० |

| अ.क्र. | सदस्यांची नावे | थोडक्यात विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद पठाण, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, डॉ. विश्वजित कदम, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. संजय मेश्राम, वि. स. स. | "मुंबईतील पवई येथील आर.ए. स्टुडिओमध्ये ऑडिशनच्या नावाखाली परभणी, लातूर आदी जिल्ह्यांसह राज्यातील विविध भागांतून आलेल्या १५ वर्षांखालील १७ मुलांसह एकूण २० जणांना रोहित आर्या नामक व्यक्तीने ओलीस ठेवल्याची व त्या अपहरणकर्त्याचा पोलिसांनी एन्काऊंटर केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२५ च्या अखेरच्या आठवड्यात घडणे, "मुख्यमंत्री माझी शाळा – सुंदर शाळा" या अभियानातील | दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महत्त्वाचा घटक असलेल्या पी.एल.सी. स्वच्छता मॉनिटर प्रकल्पातील सुमारे दोन कोटी रुपयांहून अधिक निधीच दिला नसल्याचा आरोप संबंधित रोहित आर्याने केला असणे, सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील काही शाळांना जाणूनबुजून चुकीचे गुण देऊन त्याच शाळांना विजेते घोषित करण्यात आल्याचा गौप्यस्फोट रोहित आर्याने केला असणे, तसेच त्या संदर्भात त्याने तत्कालीन शिक्षण मंत्र्यांच्या निवासस्थानासमोर अनेक वेळा उपोषण केले असणे, पोलीस कारवाईत मृत्यूमुखी पडलेल्या रोहित आर्या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने दिले असणे, परंतु अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे जनमानसांत पसरलेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या घटनेचा सखोल तपास करण्यासाठी आयोगाने विशेष तपास पथकाची (SIT) नियुक्ती करुन संबंधित दोषीवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २. | सर्वश्री. अतुल भातखळकर, चेतन तुपे, सुरेश भोळे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. योगेश सागर, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, मंगेश चव्हाण, महेश लांडगे, अनंत (बाळा) नर, सुनिल प्रभू, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, | "मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या अंदाजे एक लाखापेक्षा जास्त असताना, संपूर्ण शहरासाठी केवळ ८ निवारा केंद्रे (Shelters) कार्यरत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, ही समस्या केवळ मुंबईपुरती मर्यादित नसून ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, बदलापूर, अंबरनाथ | दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | नानाभाऊ पटोले, अमीन पटेल, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. साजिद पठाण, शिरीषकुमार नाईक, रामदास मसराम, संजय मेश्राम, हेमंत ओगले, अनिल मांगुळकर, मुरजी पटेल वि. स. स. | आणि उल्हासनगर येथेही असणे, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) आणि निवारा यासाठी मा. उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला दिलेल्या निर्देशांची अद्याप पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नसल्याने नवीन निवारा केंद्रे उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज असणे, कार्यरत निवारा केंद्रांना आणि भविष्यात उभारल्या जाणाऱ्या केंद्रांना पुरेसे पालिका कर्मचारी, पशुवैद्यक, अन्न-पाणी पुरवण्यासाठी आवश्यक निधी आणि संसाधनांची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व शहरात विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे शहरात मोठ्या प्रमाणात हजारो लोकांना श्वानांनी चावा घेतल्यामुळे झालेले मृत्यू, मुंबईत गेल्या वर्षात ७० व ठाण्यात १२ हजारापेक्षा जास्त नागरीकांना भटक्या श्वानांनी चावा घेतल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले असणे, तसेच जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नागेश्वर कॉलनी येथे दिनांक १ जून २०२५ रोजी अंगणात खेळत असलेल्या ४ वर्षाच्या बालकावर भटक्या श्वानांनी अचानक जीवघेणा हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याने त्याचा झालेला मृत्यू, यास्तव राज्यात भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्र (Shelters) उभारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आखण्याच्यादृष्टीने तसेच भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization) करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३. | श्री. तुकाराम काते, श्रीमती मनिषा चौधरी, वि. स. स. | "मुंबई शहर व उपनगरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सन २००१ पासून "दत्तक वस्ती योजना" सुरू केली असणे, त्यामध्ये सन २००१ मध्ये नऊशे रुपये मानधन देऊन नऊ हजार कामगार काम करीत असणे, त्यानंतर सन २०१३ पर्यंत ४८०० रुपये पर्यंत मानधनामध्ये वाढ झाली असणे, तसेच दीपावलीमध्ये २००० रुपये बोनस मिळत असणे, पण सन २०१३ मध्ये महानगरपालिकेने जुनी दत्तक वस्ती योजना बंद करून नवीन "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान वस्ती स्वच्छता योजना" या नावाने योजना अंमलात आणली असणे, या योजनेमध्ये सध्या १२००० कामगार काम करीत असणे, या कामगारांना फक्त रुपये ५४०० मासिक पगार मानधन म्हणून दिले जात असणे, या कामगारांना पूर्वी दिल्या जाणारा दिवाळी बोनस सुद्धा बंद करण्यात आला असणे, महानगरपालिकेच्या सफाई कामगारांप्रमाणेच काम करत असताना देखील त्या कामगारांप्रमाणेच या योजनेतील कामगारांना वेतन मिळत | दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नसल्याचा अहवाल कामगार आयुक्तांनी महापालिकेला दिलेला असणे, त्याची अंमलबजावणी महानगरपालिकेकडून होत नसणे, अनेकदा या सफाई कामगारांच्या जीवाला धोकाही होत असताना अशा परिस्थितीत हे कामगार काम करत असणे, या कामगारांना किमान वेतन व आरोग्य विमा, सुरक्षा विमा कवच सुविधा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ४. | डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, मोहन मते, सुनिल प्रभू, ज्ञानेश्वर कटके, अमित साटम,श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. शंकर मांडेकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, आशुतोष काळे, सत्यजित देशमुख, अमित विलासराव देशमुख, संजय मेश्राम, अमित झनक, विकास ठाकरे, साजिद पठाण, अस्लम शेख, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, चेतन तुपे, ॲड राहूल कुल, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री. रामदास मसराम, राजकुमार बडोले, दिलीपराव बनकर, दौलत दरोडा, रोहित पवार, | "राज्याच्या विविध भागांमध्ये बिबट्यांची प्रचंड दहशत वाढलेली असून बिबट्या मानवी वस्तीत शिरल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये व त्या दरम्यान वारंवार निदर्शनास येणे, माहे सप्टेंबर २०२५ मध्ये कळस ( ता. पारनेर) येथे एका तरुणाचा व पारनेर शहरात एका तीन वर्षीय बालिकेचा, खारेकर्जुने (ता. अहिल्यानगर) येथे पाच वर्ष मुलीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे उघडकीस येणे, जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात २० जणांचा मृत्यू झालेला असणे, गोंदियाच्या तिरोडा तालुक्यातील इंदोरा निमगाव येथे वडिलांसोबत शेतात गेलेल्या बालिकेवर बिबट्याने हल्ला केल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना, तसेच चंद्रपूर | दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | विठ्ठल लंघे, उमेश यावलकर, अब्दुल सत्तार, वि. स. स. | जिल्ह्यातील मूल तालुक्यातील चिचपल्ली वन परिक्षेत्रांतर्गत चिरोली बीट भगवानपूर कक्ष क्रमांक ६९६ मध्ये गुरे चराईसाठी गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडली असणे, पुणे जिल्हयातील ता.शिरुर, पिंपरखेड गावातील १३ वर्षीय मुलाचा बिबट्याच्या हल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०२५ रोजी घडलेली असताना याआधी १५ दिवसापूर्वी ५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा बिबट्याच्या हल्यात मृत्यु झाल्याची घटना घडली असणे, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर यांसह इतर जिल्ह्यांमध्ये बिबट्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढत होत असून सध्या राज्यात पाच हजारांपेक्षा जास्त बिबटे असणे, वन विभागाने जंगलांमध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार २२८५ बिबटे असल्याचे आढळून येणे, मात्र जंगलाबाहेर द्राक्ष, ऊस व कापसाच्या शेतात बिबट्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होणे, जंगलाबाहेर सर्व्हेक्षण केलेले नसणे, केवळ जुन्नर वन विभागामध्येच दोन हजार बिबटे असणे, पाच हजारपेक्षा जास्त बिबटे असतांना केवळ पाच बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी मिळालेली असल्याची धक्कादाय माहिती | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उघडकीस येणे, मानवी क्षेत्रात बिबट्या येऊन लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असणे, मागील ३ वर्षात सुमारे १७ हजार पाळीव प्राणी व २५० पेक्षा जास्त मनुष्यांची बिबट्याने हल्ले करुन शिकार केलेली असणे, त्यामुळे राज्यातील नागरीकांची जिवीतहानी व मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून मानवी जिवीतास मोठा धोका निर्माण होणे, यासाठी वाघ व बिबटयांपासून मानवांचे संरक्षण करण्यासाठी वन विभागातील वनाधिकारी व वन रक्षकांची पद भरण्याची आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही व उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.वने मंत्री यांचेकडे दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार केलेली असतांनाही, सदरबाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असल्याने राज्यातील नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. संजय उपाध्याय, सुनिल प्रभू, वि. स. स. | "मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ (मुंबई उपनगर) शुक्ला कंपाऊंड, दहिसर पूर्व येथे नागरिक गेल्या ५० वर्षापासून वास्तव्यास असणे, या रहिवाश्यांकडे शासनास आवश्यक असलेली लाईट बिल, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, झोपडीचा फोटोपास अशी कागदपत्रे असणे, असे असतानाही मुंबई महानगरपालिकेकडून या झोपडया तोडण्याची कारवाई माहे नोव्हेंबर,२०२५ च्या शेवटच्या आठवडयात करण्यात येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी वांरवार मुंबई महानगरपालिका यांचेशी विनंती वजा पत्रव्यवहार करुनदेखील कारवाईला स्थगिती न देणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांना लेखी निवेदन देण्यात येणे, कारवाई होत असल्याच्या कारणास्तव या वसाहतीतील ५०० कुटुंबांमध्ये निर्माण झालेले भितीचे व घबराटीचे वातावरण, शासनाने यासंदर्भात तातडीने निर्णय घेऊन या वसाहतीतील रहिवाशांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | श्री. हेमंत रासने, वि. स. स. | "पुणे शहरातील कसबा पेठ हा ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा भाग असून येथे असलेले शनिवार वाडा, सारसबाग यासारख्या सांस्कृतिक ठिकाणांवर दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक व पर्यटक येणे, परिणामी या परिसरात प्रचंड वाहतूककोंडी, प्रदूषण आणि अपघातांचे प्रमाण वाढणे, वाहतूक समस्येमुळे नागरिकांचा वेळ तसेच इंधनाचाही अपव्यय होणे, याकरीता सारसबाग येथून शनिवार वाडयापर्यंत ( बाजीराव रस्ता ) शनिवार वाडा ते स्वारगेट ( शिवाजी रस्ता ) परिसरापर्यंत भुयारी मार्ग होणे आवश्यक असल्याने या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची आवश्यकता, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका." | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | श्री. शंकर जगताप, वि. स. स. | "पुणे जिल्ह्यातील भोसरी एमआयडीसीतील अंबिका पावडर कोटिंग कंपनीमध्ये दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास एलपीजी गॅस गळती होऊन झालेल्या स्फोटात एका कामगारचा मृत्यू होणे तर पाच कामगार जखमी होणे, कंपनीतील स्फोटाच्या आवाजाच्या तीव्रतेने सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत हादरा बसणे, आगीच्या उंच ज्वाळा तसेच धूर पसरू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होणे, औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेबाबत नियमांचे कंपनी मालकांनी काटेकोर पालन न केल्याने अशा दुर्घटना वारंवार घडत असणे, उद्योगनगरीतील कारखाने व व्यवसायिक आस्थापनांची नियमित तपासणी तसेच उपकरणांची देखरेख आणि कामगारांना सुरक्षा प्रशिक्षण देणे आवश्यक असणे, कंपनीत घटनास्थळी मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस सिलिंडर मधून ज्वलनशील गॅसची गळती मोठ्या प्रमाणात झाल्याने गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याचा अंदाज असणे, सदर कारखान्याच्या सेफ्टी ऑडिटची तपासणी करण्याची आवश्यकता असणे, या एमआयडीसीतील सर्व कारखान्यांचे सेफ्टी ऑडिट करण्याबाबत कामगार व परिसरातील नागरिकांची मागणी असणे, शासनाचे या घटनेकडे अक्षम्य | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांच्या मनामध्ये शासनाप्रती पसरलेला प्रचंड असंतोष व निर्माण झालेले भीतीचे वातावरण, कामगारांच्या सुरक्षतेप्रती कंपनी मालकांच्या होत असलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ८. | श्री. मुरजी पटेल, वि.स.स. | "मुंबईतील अंधेरी पूर्व ते अंधेरी पश्चिम जोडणाऱ्या अंधेरी सबवेमध्ये प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असणे, परिणामी वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होणे, या सबवे मधील पाणी परिसरातील नागरिकांच्या घरामध्ये जाऊन मोठ्या प्रमाणात वित्तहानी होऊन जनजीवन विस्कळीत होत असणे, काही वेळा जीवित हानी देखील होणे, दरवर्षी पावसाळ्यात सततच्या घटनांमुळे जनमानसात तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, त्यामुळे पावसाळ्यात अंधेरी सबवे मध्ये पाणी साचू नये यासाठी कायमस्वरूपी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ९. | सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, अमित विलासराव देशमुख, | "दक्षिण मुंबईमधील कुलाबा, पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे | दिनांक १० डिसेंबर, २०२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अमित झनक, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. शिरीषकुमार नाईक, मिहीर कोटेचा, आदित्य ठाकरे, वि. स. स. | प्रकार घडत असणे, या जुन्या व जीर्ण इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे, यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्वेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास विलंब होत असणे, जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात येणे, परंतु दुरुस्तीचे काम न करता कंत्राटदाराकडून निधीचे पैसे काढून घेण्यात येणे, काही ठिकाणी तर कंत्राटदारांकडून १०० ते १४० टक्के कमी दराने निविदा भरण्यात येणे, यामुळे शासनाची घोर फसवणूक होणे, परिणामी येथील जुन्या इमारतींमधील रहिवाश्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. | "कुर्ला विभागातील साबळे नगर, संतोषी माता नगर व क्रांती नगर येथील रेल्वे वसाहतीत गेल्या अनेक वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांना रेल्वे प्रशासनाकडून निष्कासनाच्या नोटीसा बजावल्या असणे, बर्मा सेल लाईन शेजारील झोपडपट्टीतील रहिवाशांनाही सद्यस्थितीत पर्यायी जागा उपलब्ध नसल्यामुळे गंभीर समस्येचा सामना करावा लागत असणे,या वसाहतींमध्ये राहणाऱ्या सर्व कुटुंबांना पर्यायी जागा उपलब्ध करून देऊनच निष्कासन प्रक्रिया पार पाडावी अशी स्थानिकांची मागणी असणे,भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारने यासाठी तातडीने धोरण बनविण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ११. | सर्वश्री. अजय चौधरी, हारुन खान, वि. स. स. | "मुंबईतील जिजामातानगर, काळाचौकी येथील जवळपास २८०० झोपड्यांचा पुनर्विकास प्रकल्प गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे, विकासकाला सन २००४ मध्ये एल.ओ.आय. देणे, २०१४ मध्ये बांधकामाचा परवाना देण्यात आलेला असणे, परंतु आज तागायत पुनर्विकासाचे काम सुरू न होणे, रहिवाश्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी एसआरएकडे १३/२ ची कारवाई करण्यात यावी अशी केलेली मागणी, | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकासकावर कलम १३ (२) नुसार कारवाई करण्यासंदर्भात वारंवार सुनावणी झालेली असणे, तथापि अद्यापपर्यंत संबंधित विकासकावर कोणतीच कारवाई न होणे, उक्त झोपड्यांच्या पुनर्विकासासंदर्भात दि. ०८/१२/२०२३ रोजी पालकमंत्री, मुंबई शहर तथा गृहनिर्माण मंत्री यांचे दालनात झालेल्या बैठकीत विकासकाने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार पुनर्विकासाचे काम पुढील ६ महिन्यात न झाल्यास विकासकावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले असणे, संबंधित विकासकाकडून जाणीपुर्वक चालढकल करण्यात येणे, २ वर्ष उलटूनही विकासकाने अद्यापी पुनर्विकासाचे काम सुरू केलेले नसणे, तसेच एस.आर.ए.ने विकासकावर अद्याप कोणतीच कारवाई न करणे, शासनाने तातडीने पुनर्विकासाचे काम न करणाऱ्या संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची तसेच उक्त झोपड्यांचा पुनर्विकास त्वरीत करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | श्री. अमित झनक, वि. स. स. | "वाशिम जिल्हा हा केंद्र शासनाने आंकाक्षित जिल्हा घोषीत केलेला असणे, वाशिम जिल्हयाची आर्थिक परिस्थिती ही शेती पिकांवर अवलंबुन असणे, वाशिम जिल्हा हा तापी खोरे व गोदावरी नदीच्या खोऱ्याच्या मध्यभागी असणे, नदी जोड प्रकल्पांची घोषणा जेव्हा झाली तेव्हा वाशिम जिल्हयाचे नाव मुळ प्रस्तावात नसणे पण नंतर वाशिम जिल्हयाच्या नदीजोड प्रकल्पात समाविष्ट करण्यात आला असणे, पहिल्या टप्प्यात आराखडा तयार झाला त्यामध्ये वाशिम मध्ये कुठल्याही नदीचा समावेश झालेला नसणे, त्याकारणास्तव लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रामुख्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, मालेगाव तालुक्यातील चाकातिर्थ प्रकल्प हा जालना पुलगांव महामार्गावरील पुल पाण्याखाली जाईल याकरिता पुर्ण करण्यात आला नसणे, मात्र या महामार्गावरील पुलांचे निर्माण कार्य जलदगतीने सुरू असणे, त्यामुळे स्थानिक लोकांची व शेतकऱ्यांची मागणी नुसार चाकातिर्थ प्रकल्पाचे काम करण्यात यावे जेणेकरुन वाढलेल्या पाणी साठयामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल व मालेगाव शहराला शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, परंतु शासन याबाबत अदयापही उचित कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चीड व उद्रेकाची भावना लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ." | |
| १३. | सर्वश्री. सुनिल प्रभू, हारुन खान, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, मंगेश चव्हाण, विकास ठाकरे, संजय मेश्राम, विलास तरे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, मुरजी पटेल, वि. स. स. | "राज्य शासनातर्फे सुरू असलेल्या “मुख्यमंत्री लाडकी बहिण” योजनेत सुमारे १२ हजार ४३१ पुरुषांनी १३ महिने प्रत्येकी १५०० रुपये घेऊन सुमारे १६४ कोटी रुपयाचा अर्थिक घोटाळा केल्याची गंभीर बाब दिनांक २१ ऑक्टोबर, २०२५ रोजी माहिती अधिकारातून उघडकीस येणे, सदरहू योजनेचा पुरुष लाभार्थ्यांनी जुलै-२०२४ ते जुलै-२०२५ या कालावधीत लाडकी बहिण योजनेचे पैसे घेतले. त्यानंतर शासनाने पैसे देणे थांबविणे परंतु दिलेले पैसे वसूल करणेबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, यामुळे लाडकी बहिण योजनेमध्ये मोठयाप्रमाणात गैर लाभार्थ्यांनी लाभ घेऊन शासनाची अर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास येणे, एकंदरीतच लाडक्या बहीण योजनेची राज्यभर पारदर्शकपणे अंमलबजावणी करण्यामध्ये शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शासनास सुमारे १६४ कोटी रुपयाचा अर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, | दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपाययोजना व प्रतिक्रिया." | |
| १४. | डॉ. नितिन राऊत, वि. स. स. | "नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपुलावर माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये स्कुल व्हॅन व बसमध्ये झालेल्या भीषण अपघातात एका शालेय विद्यार्थ्यासह चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असणे, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि नागपूर पूर्व या तिन्ही प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात एकूण ३९९३ स्कूल बस व व्हॅन्सची नोंद झालेली असणे, यापैकी सुमारे ८ ते १० टक्के स्कूल बस व व्हॅन्सना फिटनेस प्रमाणपत्र नसल्याने त्या अनफिट असून त्याद्वारे विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक सुरू असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन, याबाबतची माहिती घेऊन अशा अनफिट स्कूल बस व व्हॅन्सवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| १५. | सर्वश्री. भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार, नरेंद्र भोंडेकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. हारुन खान, मोहन मते, मनोज जामसुतकर, निलेश राणे, चेतन तुपे, अमित विलासराव देशमुख, | "राज्यात माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर,२०२५ या कालावधीत २९ जिल्ह्यांतील ३०० पेक्षा जास्त तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झालेली असणे,२६६ तालुक्यांमध्ये १०० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झालेला असणे,अतिवृष्टी आणि पुरांमुळे ६८ लाख हेक्टर शेती | दिनांक ११ डिसेंबर, २०२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री संजय मेश्राम, नानाभाऊ पटोले, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमित झनक, विकास ठाकरे, साजिद पठाण, अस्लम शेख, अनिल मांगुळकर, शेखर निकम, अबू आझमी, राजेश मोरे, संजय देरकर, गजानन लवटे, रोहित पवार, हेमंत ओगले, देवराव भोंगळे, मंगेश चव्हाण, विजयसिंह पंडित, हिकमत उढाण, कैलास घाडगे पाटील, सत्यजित देशमुख, अभिजीत पाटील, राजेश विटेकर, रोहित पाटील, विलास तरे, चंद्रदीप नरके, महेश बालदी, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. उमेश यावलकर, नारायण कुचे, विक्रम पाचपुते, बबनराव यादव (लोणीकर), वि. स. स. | प्रभावित झालेली असून ६५ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले असणे, छत्रपती संभाजीनगर, वर्धा, सांगली, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा,वाशिम,अकोला, जालना, परभणी व अहिल्यानगर या जिल्ह्यातील सर्व तालुके पूर्णतः बाधित असणे,जळगाव, धुळे,नाशिक,नंदुरबार येथील ५ ते १० तालुके, पुणे, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी,सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झालेली असणे, शेतकऱ्यांच्या सर्वच पिकांची नासाडी झालेली असणे तर नदी,नाल्यांना महापूर येऊन शेकडो हेक्टर शेती मातीसह खरडून खराब झालेली असणे, राज्य शासनाने ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटी रुपयांची केलेली मदत, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात सदर मदत अत्यंत अपूरी असणे, राज्यात ओला दुष्काळ जाहिर करुन मदतीचे पॅकेज जाहिर करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, सदरची परिस्थीती पाहता राज्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना मदत दिली जावी याकरीता शेतकरी संघटना, लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मदत व पुनर्वसनमंत्री यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार | रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मागणी केलेली असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नुकसान भरपाई मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असुन अनेक शेतकऱ्यांची मानसिक अवस्था दोलायमान झालेली असणे,आपल्या न्याय्य मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्यात येत असून नागपूर येथील दिनांक ८ डिसेंबर, २०२५ पासून सुरू होणाऱ्या विधीमंडळाच्या अधिवेशनकाळात मोर्चा काढून आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | |
| १६. | सर्वश्री. विजयसिंह पंडित, हिकमत उढाण, राजेश विटेकर, वि. स. स. | "नाशिक तसेच जायकवाडी धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यास धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत सोडावा लागत असून या विसर्गामुळे गेवराई विधानसभा मतदार संघातील पाथरवाला, गुंतेगाव, सुरळेगाव, पांचाळेश्वर, राक्षसभुवन शनीचे, गुळज यांच्यासह एकूण ३२ गावांना दरवर्षी पूराचा गंभीर धोका होत असणे, सन २००६ मध्ये जायकवाडी | दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्यामुळे गोदावरी नदीला आलेल्या पुरात या ३२ गावांमधील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होऊन घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, अनेक नागरिकांना स्थलांतर करावे लागणे, त्यानुषंगाने शासनाने सदर ३२ गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला असणे, परंतु आज १९ वर्षे उलटूनही अद्याप पुनर्वसनाचे काम प्रलंबित असणे, यावर्षीही २०२५ मध्ये जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्यामुळे संबंधित गावांमध्ये पुन्हा एकदा पुरस्थिती निर्माण झालेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरलेले असणे, अशा परिस्थितीत प्रशासनाकडून वेळेवर व सक्षम उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असून त्यानुषंगाने संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी गेवराई तालुक्यातील ३२ गावांच्या पुनर्वसनाच्या निर्णयाला तात्काळ प्रशासनिक मान्यता देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १७. | श्री. अमित साटम, वि. स. स. | "मुंबई बंदर प्राधिकरणाच्या अखत्यारीतील व महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त असलेली मुंबई-अलिबाग माल वाहतूक व प्रवासी वाहतुकीच्या गेट वे ऑफ इंडिया,मुंबई येथे गेल्या | दिनांक ११ डिसेंबर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनेक वर्षापासून एकूण ५ जेटी अस्तीत्वात असून त्यापैकी १ ते ४ जेटीवरील वाहतूक ही शासनाच्या नियमाप्रमाणे फक्त ५ रुपये सेवा शुल्काप्रमाणे आकारणी होत असणे,परंतु अनपेक्षीतपणे जेटी नं.५ ही धोकादायक आहे असे दर्शवून तेथून प्रवासी व माल वाहतूक होऊ शकत नाही असे निर्देशीत करणे, सदर जेटी ही खाजगी व्यक्तीला हाताळण्याकरीता मुंबई बंदर प्राधिकरण (MPT) यांनी राजपत्र काढण्याअगोदर परवानगी दिलेली असणे,महाराष्ट्र शासनाने दि.२५ ऑक्टोबर, २०२५ रोजी **राजपत्र** काढून देणे, रॉयल बॉम्बे यॉट क्लब हा प्रायवेट क्लब सामान्य प्रवाशी व पर्यटकांना ही जेटी हाताळण्यासाठी (रु.७८+१८% GST) रु. ९२ प्रति प्रवासी आकारित असणे, तसेच सदर क्लबच्या सदस्यांकरिता रु. २३ प्रति प्रवासी असणे, सदरचा दर हा **राजपत्रात** नमुद नसुनही सदर क्लब स्वतःच्या मर्जीनुसार दर लागू करीत असणे, सदर दर हा शासनाच्या निर्धारित दराच्या १५ ते २० पट जास्तीचा असणे, शिवाय सदर व्यक्ती ही जेटी नं.५ ही प्रवासी वाहतुकीसाठी सुयोग्य असतांनाही प्रवाशांना, बोट चालक व मालकांना भिती दाखवून त्यांनी केलेल्या पर्यायी लोखंडी तराफा मार्गाचा पैसे आकारुन अवलंब करण्यांस भाग पाडणे, पर्यायाने प्रति प्रवाशी यांना | २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जाण्या-येण्यासाठी किमान २०० ते २५० रुपयांचा अतिरिक्त भार पडणे, त्यामुळे प्रवाशी, बोटचालक-मालक यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण पसरणे, वास्तविक या मार्गावरुन किमान १५० ते २०० बोटी रोज प्रवासी वाहतूक व नौकानयन करत असणे, सर्व बोटमालक व चालकांनी मिळून या अन्यायकारी वसूलीबाबत संबंधितांकडे सनदशीर मार्गाने आंदोलन करणे, या ठिकाणी असलेल्या एकूण ५ जेटी पैकी फक्त क्रमांक ५ चीच जेटी  ही जाणीवपूर्वक धोकादायक ठरवून त्याची दुरुस्ती न करणे, केवळ कांही लोकांच्या हितसंबधासाठी ही जेटी खाजगी व्यक्तीला हाताळण्यांसाठी देणे, यामध्ये गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| १८. | सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, वि. स. स. | मुंबई मध्ये रस्त्यावर बसून विविध व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांसाठी मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही ठोस धोरण नसणे, मुंबई महानगरपालिकेकडून रस्त्यावर बसून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येणे, आघाडी सरकारच्या काळात या फेरीवाल्यांसाठी एक धोरण बनविण्यात येणे, लोकसंख्येच्या २.५ टक्के फेरीवाल्यांना परवाना देण्याची तरतूद असणे, परंतु त्यात काही फेरीवाले पात्र तर काही | दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | फेरीवाले अपात्र होणे, या फेरीवाल्यांना केंद्र सरकारच्या माध्यमातून कर्ज देण्यात येणे, परंतु त्यांना व्यवसाय करु न दिल्यास त्यांच्याकडून कर्ज फेड करता न येणे, मुंबईमध्ये शहर फेरीवाला समिती ही महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बनविण्यात येणे, परंतु सदर कमिटी अद्यापही कार्यान्वित न होणे, श्रीमंत लोक मोठमोठ्या दुकानात अथवा शॉपींग मॉलमध्ये जाऊन खरेदी करु शकणे, परंतु सामान्य नागरीकांचा दरदिवशी या फेरीवाल्यांशी संपर्क होणे, या फेरीवाल्यांसाठी फेरीवाला क्षेत्र नसल्याने सतत या फेरीवाल्यांवर कार्यवाही होत असणे, मुंबई महानगर पालिकेच्या फेरीवाल्यांसाठी असलेल्या नियमांमध्ये सुधारणा होणे आवश्यक असणे, या मेहनती फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय करण्यासाठी संधी मिळणे गरजेचे असणे, त्यामुळे मुंबई महानगरपालिकेकडून या फेरीवाल्यांसाठी ठोस धोरण अंमलात येण्यासाठी पुढकार घेण्याची मागणी या फेरीवाल्यांकडून होणे, परिणामी या फेरीवाल्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | |
| १९. | श्री. शिवाजी पाटील, वि. स. स. | चंदगड (जि.कोल्हापूर ) मधील हेरे सरंजामसंदर्भात १९७२ | दिनांक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पासून प्रकरण प्रलंबित असणे, यामध्ये गावे, वाडी विभाजनानंतरची गावे यांचा समावेश असणे, दिनांक ३१ मे, २००१ च्या शासन निर्णयापूर्वी वाटप करावयाचे क्षेत्र १६००१ हेक्टर असून शासन निर्णयानंतर वाटप झालेले क्षेत्र ६०९१ हेक्टर असून त्यापैकी वाटप केलेले क्षेत्र ३७२१.३७ हेक्टर असणे, त्याचबरोबर वाटप करावयाचे क्षेत्र २३६९.६३ हेक्टरपैकी कॅम्प मध्ये पाटप केलेले क्षेत्र ९२५.६६ हेक्टर सध्या वाटपाचे शिल्लक क्षेत्र १४४३.९७ हेक्टर बाकी असणे, तत्कालीन मंत्रीमंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष घातल्यामुळे कामाला प्रत्यक्षात सुरुवात होणे, परंतु सदर कामे करतांना प्रशासकीय पातळीवर अनेक अडचणी येत असणे, याकरिता यामध्ये येत असलेल्या जाचक अटी शिथील करण्याची आवश्यकता, विविध कागदपत्रांच्या होत असलेल्या मागणीबाबत फेरविचार करण्याची गरज, तसेच शासकीय पट जी २०० तो कमी केल्यास सदर प्रक्रिया सुलभ होऊन शेतकऱ्यांच्या नावे जमीन होऊन अनेक वर्ष प्रलंबित असलेले प्रकरण निकाली काढण्यासाठी शासन स्तरावर तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना | ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| २०. | श्रीमती मंजुळा गावित, वि. स. स. | साक्री (जि.धुळे) तालुक्यात साक्री शहरात नगरपंचायत असून | दिनांक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निजामपुर जैताणे, म्हसदी-धमनार, पिंपळनेर, सामोडे, दहिवेल या गावांना प्रमुख बाजारपेठा असणे, साक्री तालुक्यातुन ३ राष्ट्रीय महामार्ग जात असून १ ) राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ सुरत-नागपुर २ ) प्रमुख राज्य मार्ग क्र. ७५३-B नंदुरबार नाशिक. ३ ) साक्री-पिंपळनेर-सटाणा-नाशिक ७५२-G जात असणे, साक्री, पिंपळनेर येथुन गुजरात राज्य जवळ असून नाशिक, शिर्डी, पुणे या शहरांकडे दळण-वळणाचे मार्ग असणे, तसेच साक्री तालुक्यात २ चाकी, ३ चाकी रिक्षा, चार चाकी, ट्रॅक्टर, ट्रक इ. वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात असून या वाहनांची नोंदणी करणे, वाहन चालविण्याचा परवाना काढणे अथवा वाहनासंबंधात काही समस्या उद्भवली तर वाहन मालकांना धुळे येथे प्रादेशिक परिवहन ( RTO ) कार्यालयात यावे लागणे, जुन्या-नव्या वाहनांची संख्या लक्षात घेता साक्री किंवा पिंपळनेर येथे प्रादेशिक परिवहन (RTO) कार्यालयाचा उपविभाग नियमित सुरू करणे अत्यंत गरजेचे असणे, त्यामुळे साक्री किंवा पिंपळनेर येथे प्रादेशिक परिवहन (RTO) कार्यालयाचा उपविभाग नियमित सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.मुख्यमंत्री व परिवहन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली असणे, तथापि, अद्याप | ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, परिणामी स्थानिक नागरिक व वाहनधारकांमध्ये वाढते नैराश्याचे वातावरण, शासनाने याबाबत तत्काळ निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | |
| २१. | सर्वश्री. विक्रम पाचपुते, प्रविण दटके, श्रीमती मंजुळा गावित, श्री. दिलीपराव बनकर, वि. स. स. | संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसामुळे जून ते सप्टेंबर महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात कांदा पिकाचे नुकसान झालेले असणे, जास्त पाऊस झाल्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नसणे, अतिवृष्टीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या निर्यातीवर परिणाम झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, आर्द्रतेमुळे वखारातील कांदा कुजून, बुरशी लागून विक्री योग्य राहिलेला नसणे, झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने निर्माण झालेली नैराश्याची भावना, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईकरिता शासनाने पंचनामे करण्याबाबत आणि नुकसान भरपाई देण्याबाबत तातडीची करावयाची कार्यवाही व उपायोजना. | दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| २२. | सर्वश्री. कृष्णा खोपडे, प्रविण दटके, मोहन मते, प्रताप अडसड, वि. स. स. | "नागपूर महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांनी अधिकार नसताना स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत अंदाजे २० कोटींच्या वर | दिनांक १२ डिसेंबर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गैरव्यवहार केला असणे, त्यावेळेसचे महापौर/सत्तापक्षाचे नेते यांनी सर्व कागदपत्रांसहीत सदर पो.स्टे.नागपूर येथे तक्रार दाखल करून FIR दाखल करणे, पोलीस विभागातर्फे या प्रकरणी कार्यवाही न होणे, या अधिकाऱ्याने स्मार्ट सिटी प्रकल्पामधील दोन महिला अधिकाऱ्यांसोबत अभद्र व्यवहार स्वतःच्या कार्यालयात बोलावून करणे, या महिला अधिकाऱ्यांनी हिम्मत दाखवून सदर पो.स्टे.नागपूर येथे तक्रार केल्याने याबाबतचा गुन्हा दाखल झालेला असणे,महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी या प्रकरणावर सुनावणी घेऊन मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांना कारवाईचे दिलेले निर्देष, शासनस्तरावर प्रकरण दोन वर्षापासून प्रलंबित असणे,डॉ.के.एच.गोविंदराज यांचे पत्र क्र.D/८२३प्रक्र१६३ नवि-३२,दि.०८/०१/२०२४ यांनी प्रधान सचिव, अपिल व सुरक्षा, गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण करणे,समितीने प्रकरण IAS अधिकाऱ्यांचे असल्यामुळे प्रलंबित ठेवणे, यासंदर्भात नागपूर (पूर्व) मतदारसंघाचे विधानसभा सदस्य यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी मुख्य सचिव,अपर मुख्य सचिव (गृह),पोलीस आयुक्त नागपूर | २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांना व दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव नवि-२, पोलीस आयुक्त, नागपूर यांना पुराव्यांसहीत कारवाई संदर्भात पत्र दिलेले असतानाही शासनस्तरावर कारवाई प्रलंबित असणे, हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्यामुळे उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, तोपर्यंत संबंधित नागपूर महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २३. | श्री. बापूसाहेब पठारे, वि. स. स. | "पुणे महानगरपालिकेत लोहगावसह इतर गावांचा सन २०१७ मध्ये समावेश होणे, सदर गावांच्या विकास आराखड्यास विलंबामुळे महापालिकेला विकासकामे करण्यास येत असलेल्या अडचणी येणे, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप विकास आराखड्यात गंभीर त्रुटी असणे, लोहगावातील अनेक प्रस्तावित रस्ते नागरिकांच्या घरांवरून दर्शविणे, स.न.९५ व इतर सर्व्हेनंबरमधून ३६ मी. रस्त्यालगत ३०० मी. वर मोकळी जागा असतानाही नागरीवस्तीतून, पुणे–अहिल्यानगर महामार्गावर खराडी जकात–नाक्यापासून केवळ २०० मी. अंतरावर ३६ मी. रुंदीचा | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रस्ता प्रस्तावित करून कृत्रिमपणे ०२ चौकांमुळे वाहतूक कोंडीची संभावना,अनेक आरक्षणे नागरिकांच्या भूखंडांवर प्रस्तावित करणे, मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या जमिनीवर आरक्षण नसल्याने हस्तक्षेप झाल्याची दाट शंका, आरक्षणांमुळे अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन होणे, एकाच जमीनमालकाच्या भूखंडावर ३६, २४, १८ मी.रस्ते,उद्यान,डिस्पेन्सरी, सार्वजनिक सुविधा अशी आरक्षणे, स.न.१३४ मध्ये ग्रामपंचायत काळापासून नागरिक वास्तव्यास असणे, सदर सर्व्हे नंबरमध्ये मोकळ्या जागा नसतानाही कमर्शियल झोन, पोरवाल रोड स.न.२९६ येथील घरांवर ग्रीन झोन करणे, सदर आराखडा करताना अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय पाहणी न करता कार्यालयीन नकाशांवर करणे, भूभागाची सद्यस्थिती, घरबांधणी, वाहतूक, लोकवस्तीचा विचार न करणे, सदर आराखड्याबाबत सखोल चौकशी करून आढळलेल्या त्रुटी,अनियमितता आणि व्यक्तीच्या संभाव्य हस्तक्षेपाची तपासणी आवश्यक असणे, नागरिकांच्या घरांवरून प्रस्तावित सर्व रस्ते रद्द करून मोकळ्या जागेतून पुनः प्रस्तावित करणे आवश्यक असणे, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या भूखंडांवरील आरक्षणांचा पुनर्विचार करून जमीन व उपजीविका संरक्षित करणे आवश्यक असणे, प्रारूप | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आराखडा प्रत्यक्ष पाहणी करून सुधारित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २४. | श्री. रईस शेख, वि. स. स. | "भिवंडी शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ११५ मौजे चाविंद्रा सर्वे नं ७ पै.१०६ पै हा सिटी पार्ककरिता आरक्षित असलेल्या जागेवर कचरा डपिंग ग्राऊंड करण्यात आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, मनपा क्षेत्रातील दैनंदिन जमा होणारा कचरा अनधिकृतपणे या ठिकाणी जमा केला जात असणे, सदर जागा ही सिटी पार्ककरिता आरक्षित असतांना गेल्या २० वर्षापासून यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदर जागेवर कचरा जमा होत असल्याने चाविंद्रा, पोगाव, रामनगर, गायत्रीनगर, नागांव येथील नागरिकांनी त्याला तीव्र विरोध करणे, सदरहू डपिंग ग्राऊंडमुळे आजुबाजुच्या गावातील नागरिकांचे, विदयार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येणे, नागरिकांनी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला असता यासंदर्भात तत्कालीन प्रशासक तथा आयुक्त यांनी नागरिकांसमवेत डपिंग ग्राऊड बंद करण्याबाबत महानगरपालिकेमध्ये बैठक घेऊन दिनांक २/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत पर्यायी व्यवस्था | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | होईपर्यंत करण्यात येईल असे दिलेले आश्वासन ,परंतु आज २०२५ सुरू झाले तरीही डपिंग ग्राऊंड अद्यापी बंद करण्यात आलेले नसणे, त्यामुळे नागरिक संतप्त होणे, डपिंग ग्राऊंड बंद न झाल्यास नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालुन सदरहू डपिंग ग्राऊंड तात्काळ बंद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २५. | श्री. मिहीर कोटेचा, वि. स. स. | "मुंबई शहर व उपनगर मधील प्रमुख शहरे जसे कि मानखुर्द गोवंडी येथील कांदळवन, नाले आणि जलवाहिन्यांवर मोठ्या प्रमाणात भर टाकून हजारो झोपड्या उभारण्याचे गंभीर प्रकार गेल्या काही वर्षांत वाढत असणे, तसेच विविध विभागांच्या मालकीच्या शासकीय खुल्या जागांवर भूमाफियांनी अतिक्रमण केलेले असणे, त्यात संबंधित विभागांकडून निष्क्रियता आणि काही ठिकाणी मिलीभगत असल्याची गंभीर माहिती समोर येत असणे, या अतिक्रमणांमुळे शहरातील नाले आणि जलवाहिन्या अडवल्या जात असून पावसाळ्यात पूरस्थिती वाढून नागरिकांचे जीवित व मालमत्तेचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असणे, कांदळवनाचा ऱ्हास होऊन पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत असणे, शहर नियोजन पूर्णपणे विस्कळीत | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | होत असणे, मोठ्या प्रमाणात रोगराई पसरून मनुष्यहानी होण्याची दाट शक्यता असणे, शासकीय मालमत्ता गिळंकृत करून जमीन माफियांचे जाळे अधिक बळकट होत असणे, गुन्हेगारी व अनैतिक व्यवहारांना चालना मिळत असणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा मार्फत 'नेत्रम' हे वेब बेस ॲप पी.एम. गती शक्ती (PM GATI SHAKTI ) बरोबर संयुक्तरित्या बनविलेले असणे, त्यामध्ये LAND JIHAD चे सर्व पुरावे असणे, सदर स्थिती बदलण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २६. | कॅप्टन आर. सेल्वन, वि. स. स. | "सायन रेल्वे स्थानक येथे सायन ( मुंबई शहर ) आणि मुंबई पश्चिम उपनगर यांना जोडणाऱ्या मध्य रेल्वे मार्गावर ROB पूल असणे, सदर पूल हा धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जुना पूल जमीनदोस्त करून नवीन पूल बांधण्याचे काम शासनातर्फे हाती घेण्यात येणे, मागील दीड वर्षापूर्वी पुलाचे काम सुरू झाले असून येथील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली असणे, सदर बांधकाम धीम्या गतीने सुरू असल्याचे निदर्शनास येणे, बांधकाम सुरू झाल्या पासून सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषणात वाढ होणे, सायन येथून धारावी आणि पश्चिम उपनगर यांना जोडणारा | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकमेव मार्ग बंद झाल्यामुळे पायी चालत जाणारे प्रवासी, दुचाकी आणि हलकी वाहने यांना पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने वाहतूक कोंडी होत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला असंतोष, रखडलेले पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करून प्रवाशांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | |
| २७. | सर्वश्री. मुरजी पटेल, अतुल भातखळकर, मंगेश कुडाळकर, वि. स. स. | "मुंबईमधील व मुंबई उपनगर मधील अनेक इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र रखडलेले असून काही विकासकांनी इमारती बांधणे परंतु इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले नसणे, भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे किंबहुना भोगवटा प्रमाणपत्र रखडलेले असल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतीमधील रहिवाशांना शास्ती कराच्या रूपाने तिप्पट चौपट कराची रक्कम भरावी लागत असल्यामुळे रहिवाशांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असणे, भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी इमारतीमधील रहिवासी महापालिकेकडे गेल्यास विकासक निघून गेल्याने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी लागणारे कागदपत्रे उपलब्ध होत नसणे, शास्ती रूपाने तिप्पट, चौपाटीचा आर्थिक भूर्दंड सोसावा लागत | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असल्याने व भोगवटा प्रमाणपत्र अभावी इतर महत्त्वाची कामे होत नसल्याने जनमानसात तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, त्यामुळे मुंबई व उपनगरातील भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींना तातडीने भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २८. | श्री. नानाभाऊ पटोले, वि. स. स. | "मुंबईतील गोरेगांव येथील लिंक रोडवरील देवी कन्याकुमारी एस.आर.ए योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी स्थानिक झोपडपट्टीवासियांनी संबंधित प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, या एस.आर.ए. योजनेत पात्र झोपडपट्टीवासियांवर अन्याय होत असतानाही याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करीत असणे, याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात चौकशी करण्याबाबत शासन दिरंगाई करीत असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| २९. | श्रीमती सरोज अहिरे, वि. स. स. | "अजंग ता.मालेगाव जि.नाशिक येथील महाराष्ट्र औद्योगिक | दिनांक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकास महामंडळाच्या गट क्रमांक ४०७/१ पैकी क्षेत्र १५.०० तसेच मौजे सातमाने शिवारातील ब्लॉक क्र.१४ या शासनाच्या मालकीच्या जागेवर कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता स्टोन क्रशर व गौणखनिज उत्खनन, खोदकाम व वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असणे, सदर ठिकाणी पर्यावरण, महसूल,उद्योग, वन विभाग, प्रदूषण मंडळ, प्राधिकरण यांची एकही वैध परवानगी नसताना संबंधित खाण माफियांनी संगनमताने शासनाची फसवणूक करून महसूली नुकसान करणे, MIDC क्षेत्रातील गटक्र. ४०७/१ पैकी क्षेत्र १५.०० मध्ये कोणत्याही स्टोन क्रशरला परवानगी नसणे, सदर ठिकाणी अवैध क्रशर व खनिज उत्खनन संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असणे, यामुळेच महसूल, पर्यावरण, वन, प्रदूषण मंडळ यांच्या मंजुरीशिवाय शासनाच्या जमिनीचा अनधिकृत वापर केला जात असणे, औद्योगिक क्षेत्रातील खनिज संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असणे, सदर शासन नियमांविरोधात खाण माफिया यांचेकडून गौणखनिज उत्खनन, ब्लास्टिंग, ट्रक वाहतूक सुरू असून सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणाला गंभीर हानी पोहचत असणे, दिनांक ०८ एप्रिल, २०२५ रोजी उपरचनाकार तथा विशेष नियोजन | १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्राधिकरण मऔविम, नाशिक यांनी तहसीलदार, मालेगाव यांना पाठविलेल्या पत्रामध्ये अजंग–रावळगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारच्या क्रशरला परवानगी देण्यात आलेली नाही असे स्पष्ट नमूद असणे, पर्यावरणीय परवानगी न घेता उत्पादन सुरू करणे, MPCB कडून हवा/पाणी प्रदूषण परवाना नसणे, महसूल व खनिकर्म परवाना नसताना उत्खनन व नियमबाह्य वाहतूक सुरू ठेवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३०. | सर्वश्री. संतोष बांगर, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, प्रकाश सोळंके, राजेश वानखेडे, राघवेंद्र पाटील, रोहित पाटील, संजय मेश्राम, सत्यजित देशमुख, वि. स. स. | " महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी-कर्मचारी, सी.आर.पी. व गावस्तरीय केडर यांच्या प्रलंबित शासन निर्णयाबाबत गंभीर गैरसमज निर्माण झाल्याचे वास्तव उघड होणे, गेल्या तीन वर्षांपासून ग्रामविकास विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान (MSRLM) यांच्या बैठकीत मंजूर केलेले निर्णय, स्वतंत्र'उमेद विभाग स्थापन करणे, ६२ वर्षांपर्यंत सेवा कार्यक्षमता ठेवणे, ग्रामसखी दर्जा, नवीन HR Manual (मानव संसाधन पुस्तिका) लागू करणे, CIF अनुदान, विमा-सुविधा, वेतनवाढ, व बाह्य संस्था कमी करण्याचे निर्णय अद्याप अंमलात न येणे, तर माहे मार्च, | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २०२६ नंतर समुदाय केडरचे मानधन बंद होण्याची भीती निर्माण होणे, यामुळे हिंगोली, नांदेड, जळगाव, सातारा, नागपूरसह राज्यभरातील ८४ लाख ग्रामीण कुटुंबांचे भविष्य अनिश्चित होत असल्याने असंतोष वाढणे, त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक हस्तक्षेप करून उमेदीतील सर्व प्रलंबित निर्णय कायमस्वरुपी निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३१. | ॲड. राहूल कुल, वि. स. स. | "पुणे रिंगरोडची संकल्पना २७ वर्षापूर्वी, १९९७ च्या प्रादेशिक आराखड्यात मांडली असणे, २०१४-१५ मध्ये प्रकल्प MSRDC कडे सोपवला असणे, १७० किमीचा रस्ता असून पुणे – पिंपरी चिंचवड शहरांच्या वाहतूक कोंडीच्या समस्यांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण असणे, आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच ४२००० कोटी रुपयांच्या सुधारित प्रस्तावाला प्रमा देण्यात येणे, विलंबामुळे २२००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाची किंमत वाढली असणे, ९०% भूसंपादन पूर्ण झाले असून प्रत्यक्षात काम चालू झालेलं नसणे, हडपसर - यवत सहापदरी उन्नतमार्गासाठी ५२६२ कोटी, पुणे-शिरूर ५३ किमी सहापदरी उन्नत मार्गासाठी ७५१५ कोटींची मंजुरी मिळाली असणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे तातडीने सुरू करण्याची | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आवश्यकता असणे, पुणे-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर ६ लेन ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे साठी अंदाजे १६००० कोटींच्या खर्चाची आवश्यकता असणे, तळेगाव ते शिक्रापूर हा उन्नत मार्ग देखील प्रस्तावित असणे, पुणे शहरात अनेकठिकाणी रस्त्यांचे, पुलांचे आणि मेट्रोचे काम चालू असल्यामुळे नागरिकांना ट्रॅफिक रांगांमध्ये उभे राहून त्रास सहन करावा लागणे, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उन्नत मार्ग, रिंगरोडची संकल्पना असून, साकारण्यास विलंब होणे, कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्याचे सांगण्यात आले असून कार्यवाही झाली नसणे, MSRDC, MSIDC व जिल्हाधिकारी पुणे यांनी समन्वय वाढवून विलंब टाळण्याची आवश्यकता, लोणीकाळभोर, ता.हवेली, पर्यंतचा प्रस्तावित मेट्रोमार्ग यवत, ता.दौंड, पर्यंत करण्याची मागणी, एकंदर सर्वंकष वाहतूक नियोजनाची गरज, वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असलेली नाराजी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयोजना." | |
| ३२. | सर्वश्री. भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, सिध्दार्थ शिरोळे, वि. स. स. | " पुणे महानगरपालिका हद्दीत, खडकवासला विधानसभा मतदारसंघात धनकवडी, भारती विद्यापीठ, शिवणे, धायरी, वारजे, सिंहगड रस्ता, बावधन व इतर उपनगरांत वाढती | दिनांक १२ डिसेंबर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लोकसंख्या, वाहनसंख्या आणि वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली असणे, वाहतूक कोंडी व अपघातांची वाढलेली शक्यता हे पुणे मनपात स्वतंत्र तांत्रिक "वाहतूक नियोजन विभाग" नसल्याचा परिणाम असणे, सिग्नल समन्वय, जंक्शन सुधारणा, मार्ग नियोजन व वाहतूक व्यवस्थापन तांत्रिक तज्ञता नसल्याने व्यवस्थापन होत नसणे, पिंपरी–चिंचवड महापालिकेत वाहतूक अभियांत्रिकी व शहरी नियोजन तज्ञांचा विभाग कार्यरत असताना पुण्यात अशी यंत्रणा नसणे, डीपी रस्ते, सेवा रस्ते व रस्त्यासाठी आरक्षित भूखंडांचा विकास प्रलंबित असल्याने वाहतूक कोंडी वाढली असून आरक्षित जमिनीवरील अतिक्रमणे, मार्ग अरुंद व असुरक्षित बनवित असणे, सनसिटी नदीवरील पूल व इतर उड्डाणपूल बांधकामांदरम्यान पोहोच रस्त्यांचे पूर्वनियोजन न केल्याने वाहतूक अडथळे वाढले असणे, ही स्थिती पाहता स्वतंत्र तांत्रिक "वाहतूक नियोजन विभाग" स्थापन करणे आवश्यक असणे, अनुभवी ट्रॅफिक प्लॅनर नेमणे, उपनगरांमध्ये वाहतूक नियंत्रणासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, प्रलंबित डीपी रस्ते, सेवा रस्ते व पोहोच रस्त्यांची कामे अतिक्रमणमुक्त करणे, तसेच मागील तीन वर्षांत व पुढील वर्षभरात रस्ते व सेवा | २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रस्त्यांच्या विकासासाठी झालेला खर्च व प्रस्तावित निधी तसेच मतदारसंघात आवश्यक तेथे कोणत्या खात्यांतून निधी वर्ग केला असणे याबाबतचा तपशील, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३३. | श्री. सुनिल शेळके, वि. स. स. | "मौजे मंगरूळ, (ता. मावळ, जि. पुणे) येथे गट नं ४१, ४२, ४६ हे सर्वे नंबर afforestation म्हणजे वनीकरणासाठी राखीव क्षेत्र म्हणून आरक्षित असलेल्या क्षेत्रातील बेसुमार झाडांची वृक्षतोड केली असून येथील माती, मुरूम व डबर प्रकारचे गौण खनिजाचे अवैधरीत्या उत्खनन झालेले असणे, सदर विषयाबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये दिनांक २० मार्च, २०२५ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली असून सदर लक्षवेधी सुचनेला उत्तर देत असताना मा. मंत्री महोदयांनी याबाबत संबंधित अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी माहिती न घेता चुकीच्या सर्वे नंबरमधून उत्खननाकरिता परवानगी दिली व त्यांच्या परवानगीनंतर अवैधरीत्या सदर उत्खनन झालेले आहे असे सांगणे, तसेच वन परिक्षेत्रात काही ठिकाणी शेड्यूल आणि काही नॉन शेड्यूल असलेली झाडे तोडताना परवानगी घेतलेली नसणे, सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून शासन यामध्ये विभागीय आयुक्तांमार्फत | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चौकशी करेन आणि या जागेचे शासनाकडून संपूर्ण मोजमाप व सर्वेक्षण करुन साधारण एक महिनाभरात त्यांचा अहवाल घेण्यात येईल असे आश्वासित करणे, सदर विषयाबाबत आजमितीस ८ महिने इतका कालावधी उलटला असून शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यासंदर्भात स्थानिकांकडून वारंवार होत असलेल्या मागणीकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये शासनाविषयी वाढलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३४. | सर्वश्री. बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार, नारायण कुचे, वि. स. स. | " परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या १७३ गाव वॉटर ग्रीड मधील ५२ तर ९५ गाव वॉटर ग्रीड मधील एकही गावांमध्ये पाणी पोहोचले नसणे, दि.७ डिसेंबर, २०२३ रोजी १७३ गाव वॉटर ग्रीडचे १३ कोटी रुपयांचे तर २७ डिसेंबर, २०२३ रोजी ९५ वॉटर ग्रीडचे १३ कोटी रुपये असे २६ कोटी रुपये अंतिम बिल काम पूर्ण न करता अदा करण्यात आले असणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे तत्कालीन मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने आर्थिक व भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्याचा खोटा अहवाल | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनास सादर केला असणे, मुख्य जलकुंभापासून जलकुंभापर्यंत, जलकुंभापासून गावातील पाण्याच्या टाकीपर्यंत हायड्रोलिक टेस्ट केलेली नसणे, पाण्याची टाकी, चेंबर बांधणे, पाईपलाईनसह वॉल-रिटर्न वॉल टाकणे इत्यादी कामे अपूर्ण असणे, पाईपलाईन फूट दीडफूट खोदल्याने लिकेज आणि फुटतुट होतं असणे, कामाचा दर्जा तपासण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली नसणे, कुठलीही शहानिशा न करता दोन्ही योजनेचे मिळून २६ कोटी रुपये फायनल बिल काम अपूर्ण असताना देण्यात येणे, अपहार करणाऱ्या सर्व भ्रष्ट अधिकारी- कंत्राटदाराच्या वैयक्तिक मालमत्तेवर बोजा टाकून अपहाराची रक्कम वसूल करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना." | |
| ३५. | श्री. विजयबापू शिवतारे, वि. स. स. | "पुरंदर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील रस्त्यांची अतिशय दुरवस्था होणे, सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य होणे, अनेक ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र तयार होणे, मोठ्या प्रमाणात अपघात होऊन नागरिकांचे जीव जाणे, वारंवार सूचना देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केलं जाणे, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभागात कार्यकारी अभियंता | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पदी व पुरंदर येथील उपअभियंता पदी अत्यंत अकार्यक्षम अधिकारी कार्यरत असणे, दोनही अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कार्यपद्धतीमुळे नागरिक हैराण होणे, पुरंदर तालुक्यात आतंरराष्ट्रीय विमानतळ, राष्ट्रीय महामार्ग, लॉजिस्टिक पार्क, आयटी पार्क असे प्रकल्प प्रगतीपथावर असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे भांडवली गुंतवणुकीस उद्योजक आणि गुंतवणूकदार न धजावणे, त्याचा विपरीत परिणाम पुरंदर तालुकाच नव्हे तर पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राच्या विकासावर होणे, सार्वजनिक बांधकाम विभागात निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोळ घालणे, निविदा प्रक्रिया पारदर्शी नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३६. | श्री. साजिद खान पठाण, वि. स. स. | "विदर्भ कबड्डी असोसिएशनमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार, गैरव्यवहार व मनमानी कारभार सुरू असल्याचे डिसेंबर, २०२५ मध्ये उघड झाले असणे, सदर पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंची दिशाभूल करून त्यांच्याकडून पैसे उकळणे, खोटी आश्वासने देणे, प्रमाणपत्रांची परस्पर विक्री करणे, तसेच ॲमेचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या लेटरहेडवर खोट्या सह्या करून न्यायालयात खोटी कागदपत्रे सादर | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्याचे गंभीर प्रकार उघड झाले असणे, राष्ट्रीय खेळाडू कु. छकुली पेटकर हिने या त्रासामुळे आत्महत्या केली असणे, तिच्या निवेदनानुसार पदाधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे तीने हे पाऊल उचलल्याचे स्पष्ट होणे, विविध पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी देऊनही FIR दाखल न झाल्याने पीडितांना न्याय मिळत नसणे, म्हणून विदर्भ कबड्डी असोसिएशन बरखास्त करून संबंधित पदाधिकारी यांचेवर तात्काळ FIR नोंदवून एसआयटीमार्फत तपास सुरू करण्याची तसेच मृत खेळाडूंच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता तसेच या प्रकरणातील विदर्भ कबडडी असोसिएशनमध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची एसआयटी मार्फत चौकशी करुन असोसिएशन तात्काळ बरखास्त करुन दोषी पदाधिकारी व चंद्रपूर जिल्हयाचे सचिव यांच्यावर तात्काळ FIR दाखल करुन तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३७. | डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री. उत्तमराव जानकर, अभिजीत पाटील, वि. स. स. | "सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने एप्रिल २०१९ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्याच्या प्रलंबित अनुदानाबाबत दि.११ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंत्री मदत व पुनर्वसन यांनी चाराछावणी चालकांच्या कागदपत्रांमद्धे काही त्रुटींची पूर्तता करण्याकरिता विभागीय आयुक्त पुणे यांच्या कार्यालयातील किमान उपायुक्त यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे संबंधित चाराछावणी चालकांची सुनावणी घेऊन राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार पात्र चाराछावणीचा सुधारित प्रस्ताव शासनास दिनांक २८ जून, २०२४ रोजी सादर करण्यात येणे, सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील चाराछावणीधारकांचे प्रलंबित देयकाबाबत अनुक्रमे रु.२०,८६,९०,५९३/- व रु.१२,०७,५०,७३१/- इतक्या सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करून या प्रस्तावास मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक १ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात येऊन राज्य आपत्ती प्रतिसाद निधिमधून चारा छावणी चालकांच्या प्रलंबित अनुदानाचा खर्च करण्यात येणार असून, यास्तव विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून दिनांक २८ जून,२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्ताव राज्य कार्यकारी समितीसमोर सादर करून समितीने दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या राज्य कार्यकारणी समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे सदर प्रस्तावाची पुनश्च फेरपडताळणी करून फेर प्रस्ताव सादर | रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यास निर्देश देणे, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी राज्य कार्यकारिणी समितीकडे प्रस्ताव पाठविणे, या प्रस्तावावर राज्य कार्यकारिणी समितीने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने चाराछावणीधारक अनुदानापासून वंचित राहिल्याने असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ३८. | श्री. राजेश विटेकर, वि. स. स. | "परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील विविध गैरप्रकारांकडे सहकार आयुक्त पुणे यांच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, १५२ पदांच्या भरतीसाठी मान्यता असताना बँकेस "अ" दर्जा दाखवून मंजूर आकृतीबंधानुसार सर्व ४२१ जागा सरळसेवा पद भरतीसाठी नियमबाह्यरित्या संचालकांनी ठराव मंजूर करणे, आकृतीबंधच्या १००% प्रमाणे जागा भरणे धोकादायक असताना सहकार आयुक्त पुणे यांनी ठराव न फेटाळणे, वारसाला नोकरीत घेण्याकरीता सर्रासपणे अनफिट दाखवून ५० ते ६० जणांकडून लाखो रुपये घेऊन बँकेत नोकरीत घेणे, ११ प्रोबेशन कर्मचाऱ्यांना सप्टेंबर, २०२५ दरम्यान नियमबाहयरित्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता घेऊन कायम करणे, नोकर भरतीसाठी पात्रता नसतानाही बँकेत | दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोकरी देणे, संचालक, त्यांचे नातेवाईकांना, हितसंबंधातील लोकांना नियम व निकष डावलून जवळपास शंभर कोटी रुपयांचे कर्ज वाटप करणे, सदर प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय सहनिबंधक व सहकार आयुक्त पुणे यांच्या स्तरावरून दुर्लक्ष होणे, पाथरी तालुक्यातील विविध सहकारी सोसायटी मधील पदाधिकारी यांना हाताशी धरून नियमबाह्यरित्या कर्ज वाटप करणे, जिंतूर येथील माजी आमदार यांनी सन २०२५ दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी तक्रार करणे, बँकेच्या अंदाधुंद कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, वरील सर्व गैरप्रकार व लेखापरीक्षण विभाग यांच्या कारभाराची सहकार विभागाकडून चौकशी होण्याची गरज, यावर शासनाने केलेली कारवाई व त्यावरील उपाययोजना." | |
| ३९. | श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. | "मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील अनेक ठिकाणी पुर्नर्विकास प्रकल्पांतर्गत अनेक बहुमजली इमारतींचे बांधकाम सुरू असणे, सदर बांधकामे करतांना विकासक यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुरक्षिततेची काळजी न घेता नियमबाहय पध्द्तीने कामे सुरू असणे, बहुमजली इमारतींची कामे सुरू असल्याने उंचावरुन पडणारे साहित्य आजुबाजूच्या परिसरामध्ये | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेल्या चाळींवर व वस्तींवर पडत असणे, उक्त साहित्य वजनदार असल्याने रस्त्यावरुन जाणाऱ्या रहिवाशांवर पडत असल्याने वारंवार अपघात घडत असणे, या कारणास्तव नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत असणे, दिनांक ८ आक्टोबर, २०२५ रोजी मे.श्रध्दा लाईफस्पेस यांच्या माध्यमातून विकास प्रकल्पाच्या साईटवरुन बांधकाम साहित्य पडून कु. संस्कृती अनिल कोटीयन या २२ वर्षीय तरुणीला आपला जीव गमवावा लागला असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबतचे निदर्शनास आणलेले असतानाही या प्रकरणी दोषी व्यक्तींवर आवश्यक कारवाई होत नसणे, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची व असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ४०. | श्री. हिकमत उढाण, वि. स. स. | "मौजे महाकाळा येथील समर्थ सहकारी साखर कारखाना, महाकाळा (ता. अबंड) व सागर सहकारी साखर कारखाना, तिर्थपूरी (जि. जालना) व्यवस्थापनाने अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ऊस देयकातून बेकायदेशीररित्या विविध कारणांनी रक्कम कपात केलेली असणे, सदर | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कपातीविरोधात अनेक वर्ष ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण व आंदोलन करून न्यायासाठी आवाज उठविला असणे, अनेक वर्षापासून स्थानिक शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असणे, सदर कपातीच्या रकमेबाबत विचारणा केली असता कारखाना व्यवस्थापनाकडून कोणतेही समाधानकारक निर्णय अद्याप घेतलेला नसणे, समर्थ कारखान्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेली खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशीय सेवा भावी संसस्थेमार्फत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या रकमेवर तसेच शेअर्स वाटपात करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये आर्थिक गैरव्यहार कलेला असणे, आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, सहकार आयुक्त कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय तसेच केंद्रीय सहकार मंत्री यांच्याकडे लेखी अर्ज तक्रार दाखल करुनही देखील त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल अद्याप शासनाकडून घेतलेली नसून शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नसणे, त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे थकित रकमेचा परतावा मिळाला नसल्यास आत्महत्या करण्याकरिता परवानगीची मागणी कलेली असणे, बळीराजाच्या हक्काची | झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रक्कम परत मिळवून देण्याकरिता व शेतकऱ्यांना आत्महत्येपासून रोखण्याकरिता न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ४१. | श्री. गोपिचंद पडळकर, वि. स. स. | "जत तालुक्याची भूमी ही रामायण-महाभारत काळापासून “मंगल परिसर” आणि “शक्ती पीठांची भूमी म्हणून प्रख्यात असणे, राजकीय कारणामुळे तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे आणि प्रस्थापित नेतृत्वाच्या उदासिनतेमुळे या भूभागाचा धार्मिक व सांस्कृति वारसा व विकास अद्यापपर्यंत झालेला नसणे, जतच्या भूमीचे महत्व सिध्द करणारे प्रमुख शक्ती पीठे जत तालुक्यात असणे, महाभारतातील बकासूर ज्या शक्ती देवतेची उपासना करित होता त्या एकविरा देवीचे मंदिर डफळापूर येथे असणे, कुंती मातेचे एकमेव स्थान जतपासून जवळच कोत्यनबबलाद येथे असून कुंती मातेचे हे भारतातील एकमेव मंदिर स्थान असणे, महाराष्ट्र-कर्नाटकाचे श्रध्दास्थान श्री धान्नमा देवी, गुड्डापूर आणि बनशंकरी, बनाळी ही मोठी शक्तीपीठे असणे, स्थानिक कुलदेवता श्री यल्लमा देवी, यब्बावा, उटगी, कालीमाता, जत, महालक्ष्मी, खलाटी, आदिशक्ती मुरुगुबाई, मेंढीगिरी आणि श्री माय्यक्का मंदिर, जत यांसारखी अनेक जागृत देवस्थाने जत तालुक्यात असणे, | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यामुळे राज्य आणि केंद्र शासनाकडून धार्मिक पर्यटन विकास अंतर्गत जत तालुक्याला विशेष निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानकि लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, जत तालुक्याचा धार्मिक विकास झाल्यास पर्यटन वाढून जत तालुक्यात रोजगार निर्मिती होणार असणे, त्यामुळे जत तालुक्याला देवभूमी म्हणून घोषित करुन धार्मिक स्थळांचा विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| ४२. | श्री. रत्नाकर गुट्टे, वि. स. स. | "परभणी जिल्ह्यातील गंगाखेड ही श्री संत जनाबाईंच्या जन्माने पावन झालेली भूमी असुन गोदावरीच्या काठावरील या स्थानास दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाणे,येथे दरवर्षी दर्शनासाठी हजारो दिंड्यांतुन लाखो भाविक येत असणे, येथे भेट देणाऱ्या भाविकांसाठी भक्तनिवास, सार्वजनिक शौचालय त्याचप्रमाणे भौतिक सेवासुविधांचा असलेला अभाव,त्यामुळे भाविक व वारकऱ्यांची होत असलेली गैरसोय, राज्यातील इतर संतांच्या जन्म अथवा समाधी स्थळांचा विकास करण्यात आलेल असणे, परंतु याबाबतीत गंगाखेड येथील संत जनाबाई संस्थान कायम उपेक्षितच राहिलेले असणे, शासनाने या ठिकाणी भक्तनिवास,सार्वजनिक शौचालय बांधकाम, भैतिक सेवा- | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुविधा व म्युझियम उपलब्ध करून देणे गरजेचे असणे, उक्त ठिकाणी विविध विकास कामे करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे दि.११/०२/२०२३ रोजी लेखी निवेदनाद्वारे केलेली असणे,तथापि अद्यापही विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे, श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखडा संदर्भामध्ये परिपूर्ण प्रस्ताव नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आलेला असणे, उच्चाधिकार समितीकडे यासंदर्भात बैठक झालेली असून आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता करून प्रस्ताव नगरविकास विभागाकडे दाखल केलेले असणे, सदरील प्रस्ताव राज्याचे मुख्य सचिव यांच्यामार्फत शिखर समितीपुढे ठेऊन मा.मुख्यमंत्री यांनी संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास तात्काळ मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | |
| ४३. | श्री. देवराव भोंगळे, वि. स. स. | "चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा शहरातील नगरपालिकेच्या शेजारी मुख्य रस्त्याच्या लगतचे ७० वर्षाहून अधिक काळ उभे | दिनांक १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेले वृक्ष शासनाच्या व संबंधित प्रशासनाच्या परवानगीशिवाय तोडले असल्याची बाब समोर येणे, यानंतर संबंधित वृक्ष तोडण्याची तक्रार नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे व जिल्हा प्रशासन तसेच राज्य शासनाच्या विविध मंत्र्यांकडे केली असणे, सदर वृक्ष तोडत असताना वृक्ष प्राधिकरण समितीची कोणतीही परवानगी न घेणे, यामध्ये प्रामुख्याने नगरपरिषद चे तात्कालीन मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी यांचा समावेश असणे, सदर प्रकरणात पोलिसांमध्ये तक्रार दिल्यावरसुद्धा त्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणताही तपास पोलिसांमार्फत न होणे, संबंधित दोषी अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी पोलीस प्रशासनमार्फत या प्रकरणात दिरंगाई होत असणे, या सर्व प्रकरणाची गंभीर दखल घेत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देणे, त्याअनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, या सर्व प्रकरणाचे गांभीर्य पाहता संबंधितांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ४४. | श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | "जळगाव शहरातील महापालिकेच्या व्यापारी संकुलातील २३६८ गाळेधारकांचा भाडेपट्टा नूतनीकरण भाडेपट्टा कर | दिनांक १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मुल्यांकन दर २ किंवा ३% प्रमाणे आकारणे व नवीन दर मुदत संपल्याच्या कालावधी लागू न करणे, जळगाव शहर महानगरपालिकेने मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनाक ७ नोव्हेंबर, २०२५ या दिवशी महापालिका जळगाव यांना यासंदर्भात आदेश देऊन सुद्धा मा. मुख्यमंत्री यांचे आदेशाला न जुमानता अद्यापपर्यंत या संदर्भात कुठलीही कार्यवाही न करणे, तसेच अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसणे, मा. मुख्यमंत्री यांचे आदेश असताना सुद्धा अद्यापपर्यंत प्रस्ताव शासनास सादर न करणे, या महापालिकेच्या आयुक्त, उपायुक्त व अधिकारी यांच्यावर त्वरित कार्यवाही करणेसंदर्भात तसेच जळगाव शहरातील महापालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांना भाडे पट्टा नूतनीकरण नवीन सुधारित भाडेपट्टा कर मुल्यांकन दर निश्चित करणेसाठी मनपा स्तरावर भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण .. समिती गठीत करण्यात आलेली असून, सदर समिती मार्फत भाडेपट्टा कर मुल्यांकन दर हे जुन्या मुल्यांकन दरापेक्षा केवळ १% कमी म्हणजेच ७% प्रमाणे करावयाचे ठरविले असणे, परंतु सदरील दर अत्यंत अवाजवी असणे, यामुळे भाडेपट्टा कर मुल्यांकन दर २ किंवा ३% प्रमाणे आकारण्यात येणेसाठी | डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना." | |
| ४५. | सर्वश्री. अतुल भातखळकर, मनोज जामसुतकर, वि. स. स. | "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (SRA) माध्यमातून उभारल्या जाणाऱ्या पुनर्वसित इमारतींना विकासकांकडून एका घरासाठी ४० हजार रुपये इतका कॉर्पस फंड आकारला जात असणे,परंतु, उंच इमारती उभारल्या जात असल्याने लिफ्ट, अतिरिक्त जिने, अग्निशमन यंत्रणा इत्यादींमुळे वाढलेला मेंटेनन्स इमारतीमधील रहिवाशांना परवडत नसणे,त्यामुळे, सदर रक्कम रु. ४० हजार वरून रु. १ लाख पर्यंत वाढवून देण्याची गरज असणे,तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन इमारतींमध्ये सामायिक सुविधांवरील खर्च विशेषतः कॉमन पॅसेजमधील विजेची देयके, उद्वाहन (लिफ्ट) वैगेरे अशा गोष्टींचा भार रहिवाशांना सहन करावा लागणे,त्यामुळे, SRA मार्फत बांधल्या जाणाऱ्या इमारतींना OC देण्यापूर्वी विकासकांनी सोलार पॅनेल बसविणे बंधनकारक करण्याची आवश्यकता असणे,त्यामुळे, कॉर्पस फंड रु. ४० हजार वरून रु. १ लाख पर्यंत वाढवून देण्याकरिता व इमारतींना OC देण्यापूर्वी विकासकांनी सोलार पॅनेल बसविणे बंधनकारक करण्याकरिता ठोस निर्णय घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६. | श्री. निलेश राणे, वि. स. स. | " मृद व जलसंधारण विभाग, कुडाळ ( जि.सिंधुदुर्ग ) तालुक्यातील आंब्रड सारमळे येथील धरणाला १९९६ साली मिळालेली प्रशासकीय मान्यता, १९९६ साली मान्यता मिळूनही २९ वर्ष प्रकल्प प्रलंबित असणे, सदर कामाची निविदा पी के.कोंडेकर या ठेकेदारास १९९८ साली देण्यात येणे, त्यावेळी निविदा किंमत २ कोटी ५४ लक्ष ८३ हजार ८५० असणे, सदर प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे सुधारित मान्यता करुन २ कोटीचा प्रकल्प आता ३४ कोटींवर जाणे, मूळ निविदा किंमतीपेक्षा तब्ब्ल ३२ कोटी रुपयांनी प्रकल्पाची किंमती वाढलेली असतांनाही अदयापही काम अपूर्ण असणे, आजपर्यंत सदर प्रकल्पावर १६ कोटी ४० लक्ष एवढा खर्च होणे, उर्वरित १८ कोटी ५३ लक्ष एवढी रक्कम शिल्लक असणे,सदर प्रकल्पात वेळकाढूपणा होत असून शासनाची एकप्रकारे फसवणूक सुरू असणे,प्रकल्पाच्या कामात मोठ्या प्रमाणात विभागाच्या अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार सुरू असणे, अशा प्रकारे अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असणे,अनेक कामांकरीता ठराविक ठेकेदारांनाच कामे देऊन प्रत्यक्षात कामे न करता उचलण्यात येत असलेली बिले, ठेकेदार व अधिकारी संगनमत करुन चुकीचे अहवाल शासनास सादर करुन देयके अदा | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करुन घेत असणे,यावरुन शासनाची व जनतेची होत असलेली फसवणूकयाबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सखोल चौकशी करुन प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच दोषी ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया." | |
| ४७. | श्री. वरुण सरदेसाई, वि. स. स. | "वांद्रे (पूर्व) येथील सर्वे क्र. ३२९, न.भु.क्र. ६२९/१२३४/अ/१ या शासकीय भूखंडावर शासकीय वसाहतीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देणे, याबाबत राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र. साबांज-२०२३/प्र.क्र.२१/मिव्य-१, दि. १४.१०.२०२४ मध्ये शासकीय वसाहतीतील दिर्घकाळ वास्तव्यास असलेल्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी/ कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला वांद्रे शासकीय वसाहतीतील भूखंड देण्यात येत असल्याचे नमूद केलेले असणे, शासनाने अद्यापपर्यंत सदर बाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनात हक्काचे घर मिळणेबाबत निर्माण होणारी संभ्रमावस्था, शासनाने याबाबत शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे उपलब्ध करून | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्याकरिता तातडीने भूखंड आरक्षित करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | |
| ४८. | श्री. सिध्दार्थ खरात, वि. स. स. | "शेतकऱ्यांचे शेतात पीक तयार होताच ते घरी अथवा साठवण्याच्या ठिकाणी पोहचवणे आवश्यक असणे, तथापि रस्त्याअभावी शेतकऱ्यांना ते शक्य होत नसणे, राज्यात मोठ्या प्रमाणात शेतरस्त्यांचा असलेला अभाव, शेतरस्ते नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्ग खडतर ठरत असणे, लोकप्रतिनिधींनी वारंवार शेतरस्ते / पाणंद रस्त्यांची शासनाकडे केलेली मागणी, त्यानुषंगाने शासनाने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते ही योजना मनरेगा व राज्य रोहयो च्या सहभागातून सुरू करणे, शासनाकडून शेतरस्ते/ पाणंद रस्ते, गावजोड रस्त्याचे सुमारे १६ हजार प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असणे, तथापि या रस्त्यांसाठी मंजूर करण्यात आलेला नियतव्यय तथा निधी वितरण अत्यंत अल्प असणे, त्यामुळे या कामांवर होत असलेला विपरीत परिणाम, शेतरस्त्यासाठी शेतकऱ्यांकडून जमीन देतांना सहमती नसणे, त्यामुळे अशा कामांवर त्याचा परिणाम होणे, त्यासाठी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देऊन प्रति कि.मी. चा समावेश सुधारित करण्याची | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तरतुद करणे, चालू हिवाळी अधिवेशनात या विभागाला मागील देणी व पुढील कामांसाठीच्या निधीची पुरवणी मागणी देखिल समाविष्ट न होणे, एकुणच या विभागाकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मंजूर कामे होण्याबद्दल निर्माण झालेला संभ्रम व या योजनेचे भवितव्य व परिणाकारकता याबद्दल करावयाची कार्यवाही व उपाययोजना, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ४९. | श्री. अमिन पटेल, वि. स. स. | "म्हाडा प्राधिकरणाकडून कार्यकारी अभियंता संवर्गातील रिक्त पदांच्या पदोन्नतीसाठीची DPC (खात्यातंर्गत सेवाज्येष्ठता समिती) प्रक्रिया दिर्घकाळ प्रलंबित असणे, यामुळे अनेक उपअभियंता पदावरील कार्यरत अभियंते पदोन्नतीसाठी मागील अनेक वर्षापासून वंचित असणे, सदर पदोन्नती प्रक्रिया सेवाज्येष्ठतेनुसार अपेक्षित असुन सन २०२२ पासून पदोन्नती, पात्रता, जेष्ठता व सेवानोंदीचे सर्व निकष पूर्ण झाले असूनही केवळ DPC (खात्यांतर्गत सेवाज्येष्ठता समिती) प्रक्रिया वेळेत न होणे, म्हाडाकडे आधिच कर्मचाऱ्यांचा तुटवडा असणे, त्यामुळे अनेक पदे रिक्त असणे, अभियंता संवर्गातील ज्येष्ठता यादी निश्चीत असूनही वर्षानुवर्षे एकाच पदावर कार्यरत असल्याने व जास्तीच्या सेवाकाळात पदोन्नती न मिळाल्याने | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभियंत्यांचे मानसिक धैर्य खचणे व त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होणे, पदोन्नतीसाठी पात्र असलेले अनेक अधिकारी, अभियंता निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणे, त्यामुळे वेतनवाढ, आर्थिक विवंचना आणि करिअर वृध्दीची नुकसानी याची भिती या अभियंत्यामध्ये निर्माण होणे, म्हाडा आस्थापनेतील कार्यकारी अभियंता संवर्गातील अनेक पदे दिर्घकाळ रिक्त राहिल्यामुळे कार्यरत असणाऱ्या प्रकल्पांवर नकारात्मक परिणाम होणे, सर्व संवर्गांमध्ये मागील काळापासून DPC प्रक्रिया पूर्ण झाल्या असून फक्त याच संवर्गात DPC प्रक्रिया प्रलंबित असणे, परिणामी उप/कार्यकारी अभियंत्यावर येणाऱ्या वरिष्ठ पदाच्या अतिरिक्त कार्यभारामुळे प्रशासनावर दुष्परिणाम होणे, त्यामुळे कार्यकारी अभियंता उपअभियंता व अभियंता यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ५०. | श्री. किशोर जोरगेवार, वि. स. स. | "राज्याच्या ऊर्जा धोरणात सौर ऊर्जेवर मोठा भर देण्यात येत असणे, तथापि सौर ऊर्जा ही केवळ दिवसा उपलब्ध होत असून रात्रीच्या वेळी विजेची गरज भागवण्यासाठी आजही कोळसा आधारित विजेवरच अवलंबून राहावे लागणे,दिवसा सौर ऊर्जा उपलब्ध असल्याने औष्णिक विजेची गरज ४० ते | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५० टक्के तर रात्रीच्या वेळी १०० टक्क्यांवर असणे, सध्याचे बहुतांश वीज प्रकल्प हे सुमारे ४० वर्षांपूर्वीचे जुन्या तंत्रज्ञानावर आधारित असणे, या प्रकल्पांची रचना सतत एकाच क्षमतेने चालण्यासाठी केलेली असल्याने,विजेच्या बदलत्या मागणीनुसार उत्पादन त्वरित कमी-जास्त करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होत नसणे,त्यामुळे दिवसा कमी लोड आणि रात्री पूर्ण क्षमतेने लोड मॅनेज करण्यासाठी लवचिक आणि नव्या पिढीतील औष्णिक वीज केंद्रांची आवश्यकता असणे,चंद्रपूर येथे 'रिप्लेसमेंट प्रोजेक्ट' उभारणे तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत फायदेशीर असणे, येथे आधीपासूनच मुबलक पाणी,कोळसा, स्वतःची जमीन,रेल्वेचे विस्तृत जाळे आणि वेकोलिच्या (WCL) कोळसा खाणी उपलब्ध असणे,तसेच औद्योगिक जिल्हा असल्याने प्रशिक्षित कर्मचारी आणि तांत्रिक मनुष्यबळही उपलब्ध असणे,तसेच चंद्रपूरजवळच 'भद्रावती पॉवर ग्रीड' असल्यामुळे विजेच्या मागणी-पुरवठ्याचे संतुलन (Grid Stability) राखणे आणि वीज त्वरित ट्रान्सफर करणे अत्यंत सोपे असणे, वरील सर्व तांत्रिक,भौगोलिक आणि आर्थिक बाबींचा विचार करून चंद्रपूर येथे वीज निर्मिती करिता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'रिप्लेसमेंट पॉवर प्रोजेक्ट' | झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | |
| ५१. | सर्वश्री. सुहास कांदे, अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, मनोज जामसुतकर, मुफ्ती मोहम्मद, अजय चौधरी, संजय देरकर, गजानन लवटे, अबू आझमी, वि. स. स. | "नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील एका ३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर शेजारील २४ वर्षीय मुलाने लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना दि.१६.११.२०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे उघडकीस येणे, बलात्कार केल्यानंतर त्या नराधमाने मुलीचा दगडाने ठेचून तीची अतिशय क्रुरतेने केलेली हत्या, मुलगी बेपत्ता झाल्याने पीडित मुलीच्या आई-वडिलांनी तिचा शोध घेतला असता चिमुकलीचा मृतदेह सापडणे, सदर प्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात येणे, या गंभीर प्रकरणामुळे स्थानिक ग्रामस्थांसह संपूर्ण राज्यात संताप व्यक्त करण्यात येणे, सदर प्रकरणी दोषी असलेल्या आरोपीला त्वरित फाशी देण्याची मागणी करीत ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन करणे, तसेच मालेगावमध्ये दि.२१.११.२०२५ रोजी बंद पाळण्यात येणे, राज्यातील विविध भागात या घटनेचा निषेध करण्यासाठी मोर्चे काढण्यात येणे, सदर घटना राज्याला काळीमा फासणारी असणे, शासनाने यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी करुन दोषींवर त्वरीत कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२. | सर्वश्री. अमोल खताळ, काशिनाथ दाते, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. रामदास मसराम, संजय मेश्राम, हेमंत ओगले, आशुतोष काळे, वि. स. स. | "राज्यातील जिल्हा अहिल्यानगर स्थित संगमनेर शहरात गेल्या काही दिवसांत अमली पदार्थांच्या तस्करीचे प्रकार समोर येत असताना आता या रॅकेटमध्ये अतिशय घातक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'एमडी' (मेफेड्रोन) ड्रग्सचा समावेश झाल्याने चिंतेचे वातावरण निर्माण होणे, माहे नोव्हेंबर २०२५ वा त्यासुमारास पुणे-नाशिक महामार्गावरील गणेशनगर परिसरातून तब्बल ४३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांमार्फत जप्त केला असणे, त्याचबरोबर नशेसाठी वापर होणाऱ्या औषधांची खरेदी-विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, नशेसाठी म्हणून वापरल्या जात असलेल्या बाटल्या, इंजेक्शनच्या सिरीज अवैध उद्योग धंदे संगमनेर शहरात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, नशेचे पदार्थ विक्रीचे प्रकार किंवा तस्करीचे प्रकार हे हप्तेखोरीतून घडत असल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल होत असणे, आतापर्यंत अटक करण्यात आलेले आरोपी, आरोपींकडून नेमकी गोळा केलेली माहिती, ड्रग्सचे स्त्रोत इत्यादीचा अचुक तपास करून नशेखोरीस आळा घालण्याची गरज असणे, वाढत्या ड्रग्ज तस्करीमुळे विशेषतः तरुण वर्ग या नशेच्या | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहारी वेगाने जात असल्याची सार्वत्रिक भिती व्यक्त केली जात असणे, नशेच्या व्यापाराला मूळापासून नष्ट करण्यासाठी पुढील काळात अधिक कडक व सखोल तपास सुरू ठेवण्याची नितांत आवश्यकता असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ५३. | श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | "चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळु तस्करी सुरू असणे, दि.२८ ऑक्टोबर २०२५ रोजी, रात्री श्री. दिनेश दोनाडकर यांचा अवैध वाळुने भरलेला हायवा ट्रक क्र. एमएच-३६-एए-९९३३ एसडीपीओ यांनी जप्त करणे, त्यावर तब्बल १० दिवस कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, याप्रकरणी ५० हजार रुपये एसडीपीओ यांनी घेतल्याचे ट्रक मालक श्री. दिनेश दोनाडकर यांनी कबूल केलेले असणे, दुसरे प्रकरण दि. १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी, रात्री ११ वाजता नागभीड हद्दीत कुणाल दोनाडकर यांचा अवैध वाळुचा ट्रॅक्टर एसडीपीओ यांनी पकडणे, त्यावर किरकोळ २००० रु चा दंड आकारुन सोडून देण्यात येणे, तोच ट्रॅक्टर दुसऱ्या दिवशी दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी ब्रम्हपुरी येथे पोलीस निरीक्षक यांनी पकडून चालक कुणाल दोनाडकर यांच्याविरुद्ध रीतसर गुन्हा नोंद करणे, दोन्ही प्रकरणे पाहता एसडीपीओ हे जाणीवपूर्वक | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गुन्हेगारांशी संगनमत करुन परस्पर प्रकरणे निकाली काढत असणे, मात्र कनिष्ट अधिकारी त्याच प्रकरणी कर्तव्य बजावत गुन्हा नोंदवत असणे, एसडीपीओ यांची कार्यप्रणाली पोलीस प्रशासनाविरोधात असून शिस्तीचा भंग करणारी असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना." | |
| ५४. | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि. स. स. | "भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील बेटाळा येथील रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राट मे. केशवप्रिया इन्फ्रास्ट्रॅक्चर्स मालाड मुंबई यांना देण्यात येणे, त्यांनी शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून बेकायदेशीर वाळूचे उत्खनन व हायवा ट्रकने वाहतूक करणे, त्यामुळे अनेक रस्ते खराब होऊन रहदारीस अयोग्य होऊन वारंवार अपघात होणे, भंडारा जिल्ह्यातील पवणी येथील रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राट मे.अनोज कुमार अग्रवाल रामदास पेठ नागपूर यांना देण्यात येणे, त्यांनी शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून बेकायदेशीर ३४ हजार ६०० च्या वर ब्रास वाळूचे उत्खनन करून शासनाचे किमान ६५ करोड रुपयांचे नुकसान केले असणे, या बाबतचा अहवाल अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना सादर करणे, असे असताना सुध्दा अद्यापही कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, कंत्राटदार व महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि पोलीस | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभाग यांच्या संगनमताने हा अवैध धंद्याचा प्रकार सुरू असणे, या सर्व गंभीर प्रकरणी तक्रार होऊन सुध्दा संबंधितांवर अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरत असलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ५५. | श्री. हिरामण खोसकर, वि. स. स. | "समृध्दी महामार्गावरील घोटीपासून त्र्यंबकेश्वर येथिल ज्योतिर्लिंगाला जोडणाऱ्या चारपदरी रस्त्यासाठी ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात येत आहेत त्यात २२ गावे ही आदिवासीबहुल गावे असून ती पेसा कायदयांतर्गत अनुसूचित क्षेत्रात येणे, आदिवासी जमिनी बिगर-आदिवासीं विक्रीकर कायदेशीर निर्बंध असल्याने या गावांमध्ये जमिन व्यवहार अत्यंत कमी असणे, त्यामुळे संदर्भासाठी घेतल्या जाणाऱ्या नोंदणीकृत विक्री दरांमध्ये वास्तव मूल्य प्रतिबिंबित होत नसणे, ही गावे इगतपुरी व त्र्यंबकेश्वर या वेगाने विकसित होणाऱ्या भागामध्ये असूनही या विकासाचा लाभ आदिवासींना भरपाई स्वरुपात न मिळणे, बहुतांश बाधित आदिवासी शेतकरी हे लहान जोतधारक भात उत्पादक असून अल्प भरपाई मिळाल्यास त्यांच्या उपजिविकेचा आधारच नष्ट होण्याची आणि कायमस्वरुपी आर्थिक अस्थिरतेची भिती, भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिनियम, २०१३ च्या कलम २६ नुसार बाजार भावावर गुणक लावण्याचे नियम राज्य शासन ठरविणे, सद्यस्थितीत या भागातील जमिनींना गुणक १ लागू करण्यात येत असणे, केवळ काही जमिनी महामार्गालगत आहेत या कारणावरुन त्या ग्रामीण स्वरुपाच्या असूनही त्यांना विकासक्षम न मानता गुणक २ नाकारण्यात येत असल्याने हे आदिवासी भागांसाठी अन्यायकारक असणे, समृध्दी महामार्गाच्या भूसंपादनाच्या वेळी राज्य शासनाने विशेष परिस्थिती लक्षात घेऊन अतिरिक्त लाभ व प्रिमियम मंजूर केले त्याच धर्तीवर पेसा लागू असलेल्या आदिवासी गावांना आर्थिक भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ५६. | सर्वश्री. विक्रम पाचपुते, तानाजी मुटकुळे, योगेश सागर, देवराव भोंगळे वि. स. स. | "ई-पिक पाहणीची नोंद करताना राज्यातील गावांमध्ये मोबाईलला रेंज असणे, परंतु शेतामध्ये रेंज नसणे, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ई-पिक पाहणीचे ॲप मोबाईलवर डाऊनलोड करता येत नसल्यामुळे पिक पाहणीची नोंद करता येत नसणे, यापुर्वी पिक पाहणीची नोंद तलाठी करत असणे, पिक पाहणीसाठी तलाठी यांना पिक पाहणी सहाय्यक म्हणून नेमण्यात आलेले असणे, परंतु सदर पाहणी करण्यासाठी सहाय्यक हे संपूर्ण गावात जाऊ शकत | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नसणे, राहिलेल्या पिक पाहणीसाठी तलाठी यांच्या लॉगीनला ॲक्सेस मिळणे गरजेचे असणे, मका, सोयाबीन, तूर व धान यांची नोंद नसल्यामुळे धान खरेदी करताना ७/१२ वरती एक नोंद नसल्यामुळे अडचणी निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ५७. | श्री. प्रविण तायडे, वि. स. स. | "अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील वासणी मध्यम प्रकल्पावर रु.६४३.५१ कोटी खर्च झाला असणे, प्रकल्पामुळे एकुण ५०४३ हे. सिंचन क्षेत्र अपेक्षित असणे, २०१७ पासून दायित्वाअभावी प्रकल्पाचे काम रखडलेले असणे, त्यामुळे ६५.६५ कोटीचे दायित्व मंजुर करणे अत्यावश्यक व त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे असणे, याचप्रमाणे अचलपूर तालुक्यातील अपूर्ण असलेले बोर्डी नाला प्रकल्प, राजना बॅरेज प्रकल्प, राजुरा प्रकल्प अपूर्ण असणे, याबाबतही निर्णय घेणे आवश्यक असणे, शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ५८. | श्री. अतुल भोसले, वि. स. स. | "पुणे-बंगळूर आशियाई महामार्गाच्या सहापदीकरणाच्या कामामुळे कराड शहरालगत उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात | दिनांक १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, मात्र कामाच्या दिरंगाईमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, रुंदीकरणाच्या कामामुळे जागोजागी खोदकाम, महामार्गालगत मोठमोठे खड्डे, सुरक्षा रेंलिगचा अभाव, साईडपट्टीवर दगडांची मांडणी, अनावश्यक ठिकाणी बॅरिगेटस, ब्लिकर्स, सबलर, इंडिकेटर्सची कमतरता, धोकादायक ठिकाणी फलकांचा अभाव, उपमार्गावर खड्याचे साम्राज्य, साचलेले पाणी, चिखलामुळे होणारी घसरगुंडी यामुळे प्रवाशांच्या जीवावर बेतणे, काही दिवसांपूर्वीच वाठार येथे महामार्गालगत सहलीला जाणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना बस अपघातात झालेली गंभीर दुखापत, गेल्या काही महिन्यात महामार्गावर झालेल्या अपघातामध्ये अनेकांनी जीव गमावणे, तसेच गंभीर जखमी होणे, सातारा ते कोल्हापूर ह्या १२० कि.मी.चा प्रवासास तीन तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, एकाचवेळी सर्व ठिकाणी ही कामे केली जात असल्याने धोकादायक परिस्थती निर्माण झाल्यामुळे अपघांतामध्येही दिवसेंदिवस होणारी वाढ थांबविण्यासाठी वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कर्मचारी, योग्य दिशादर्शक फलक, अपघात टाळण्यासाठी स्पीड ब्रेकर, पथदिवे उभारणी करण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५९. | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | "मौजे भडकंबे (ता.वाळवा, जि.सांगली) येथे नियमाचे उल्लंघन करुन गौण खनिज उत्खनन सुरू असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे,खडी क्रेशर व मुरुम व गौण खनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात होत असल्याने डोंगर पट्ट्यात बांधण्यात आलेल्या को. बंधाऱ्यांमध्ये पाण्याची लेवल टिकून राहत नसणे, ओढ्यांमध्ये मुरुमाचा भराव टाकल्यामुळे ओढा बुजुणे, पाझर तलावाचे बांधकाम बंद पाडणे, शा.नियमानुसार खडी क्रेशर व डंपर वाहतूक न होणे,भडकंबे तांदुळवाडी रोडवरील नागोबा मंदिराला डंपर चालकाने धडक दिल्याने मंदिराला धोका, दिवस-रात्र उत्खनन सुरू असणे, दगड उडून शेतात जाऊन पडत असल्याने शेताचे, घरांचे, नुकसान, घरांना तडे जाणे, झाडे, वन्यप्राणी, आदि पर्यावरणाचा ऱ्हास, आवाजामुळे ग्रामस्थांच्या झोपेवर व आरोग्यावर परिणाम, एकावेळी कमीत कमी ४ फूट परवानगी असतांना २० ते २५ फुट सुरुंग लावण्यात येत असल्याने सार्वजनिक रस्ते, पाणंद रस्ते, मंदिरे, नाले, ओढा, जलाशय, जि.प शाळेतील विद्यार्थी यांना धोका, सततच्या वाहतूकीमुळे रस्त्याची दुरवस्था, शेतीच्या उत्पादनावर होत असलेला परिणाम, खणण उत्खनन परवाना देण्यामागच्या मूळ उद्देशाला बगल, गावातील एकालाही | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोजगार उपलब्ध न होणे, नियमांचे उल्लंघन करुन सुरू असलेल्या खडी क्रेशर, मुरुम व गौण खनिज उत्खननासंदर्भात ग्रामस्थांनी सातत्याने केलेल्या तक्रारी, पोलीस स्टेशनमध्ये अनेक तक्रारी, शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने सखोल चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करुन तात्काळ खडी क्रेशर, मुरुम व गौण खनिज उत्खनन बंद करण्याची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | |
| ६०. | सर्वश्री. प्रविण दटके, प्रताप अडसड, कृष्णा खोपडे, मोहन मते, वि. स. स. | "महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीच्या अभिन्यासातील भूखंड भाडेपट्ट्यावर देण्यात आलेले असणे ,त्यापैकी काही भूखंडांकरिता त्या त्या महानगरपालिकेची त्या त्या वेळी जागेची डिमांड वसूल करून काही अभिन्यासातील भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने तर काही भूखंड निरंतर भाडेपट्ट्याने दिलेले असणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या अभिन्यासासाठी भूखंडाकरिता महानगरपालिकेच्या जागेची किंमत वसूल केलेली असून सुद्धा ३० वर्षांचे भाडेपट्टे हे निरंतर भाडेपट्ट्याने दिलेले असल्याने भाडेपट्ट्याचे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मुक्त भूखंड धारकांना महानगरपालिकेच्या स्थावर विभागाकडे भाडेपट्टा नूतनीकरण, भाडेपट्ट्याचे हक्क | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | हस्तांतरण, बांधकाम करण्याचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी करिता जावे लागत असणे, त्यापासून भूखंड धारकांना नाहक त्रास होत असल्याने निर्माण झालेली तीव्र नाराजीची भावना, तथापि महानगरपालिकेने अभिन्यासातील भूखंडांकरिता जागेची किंमत वसूल केलेली असल्यास भूखंड भाडेपट्ट्यावर ठेवणे संयुक्तिक नसल्याने भूखंड मालकी तत्त्वावर हस्तांतरित करून भूखंड धारकांना भूखंडाचे मालकी हक्क प्रदान करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ६१. | श्रीमती अनुराधा चव्हाण, वि. स. स. | "राज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पायाभुत सुविधांची विविध कामे सुरू असणे, यामध्ये समृद्धी महामार्ग, खुल्ताबाद – फुलंब्री महामार्ग या आणि अशा अनेक कामांच्या गुणवत्तेवर तक्रारी होऊनही दखल न घेतल्याने गुणवत्तेबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण होणे,या कामांची सुयोग्य अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभागांकडे SOP तथा गुणवत्ता तपासणी करता यंत्रणा राज्याकडे नसणे, परिणामी कामांची गुणवत्ता ढासळून तीच कामे पुन्हा करण्याची नामुष्की राज्यावर येणे,नगर विकास विभागाची कामे तपासणी साठीची जबाबदारी शासकिय तंत्रनिकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांकडे असल्याने त्यांचे लक्ष | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना शिकविण्याकडे कमी आणि विकासकामांच्या तपासण्याकडे अधिक असणे,यामुळे शिक्षण व्यवस्थेचेसुद्धा अपरिमित नुकसान होणे,याकरता राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना किंवा हरियाणा राज्यात अति.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अनुक्रमे Quality Monitoring System व Quality Assurance Authority सारखी यंत्रणा उभारण्याची तीव्र गरज निर्माण झालेली असणे, सद्यस्थितीत शासनाच्या सर्व कामांमध्ये गुणवत्ता तपासणीसाठी किमान १ टक्का असलेला हा निधी संबंधित यंत्रणेकडून त्याचा योग्य विनियोग न होणे,याच निधीच्या माध्यमातून उपरोल्लिखित यंत्रणांच्या खर्चाची तरतूद करणे शक्य असल्याने शासनास यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च न येणे,या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करुन राज्यातील विविध विभागांमार्फत होणारी विकास कामे गुणवत्तापूर्ण होण्याकरीता सामान्य प्रशासन विभागामार्फत एसओपी तथा गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची उभारणी करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | |
| ६२. | श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि. स. स. | "श्रीक्षेत्र तुळजापूर येथील माता भगींनीनी गावातील युवक मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांच्या विळख्यात येत असल्याची | दिनांक १४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडे करत करवाईची मागणी केलेली असणे,लोकप्रतिनिधी यांनी पोलीस अधीक्षक, धाराशिव यांना दि.२/२/२०२५ रोजी दिलेली माहिती व त्यांना स्थानिकांनी दिलेल्या गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव येथील स्थानिक गुन्हे शाखेने बेकायदेशीर रित्या अंमलीपदार्थ बाळगल्यावरून तीन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला असणे,या प्रकरणात विविध राजकीय पक्षांशी संबंधित अनेकांना आरोपी केलेले असणे, असे असताना काही राजकीय व ठराविक प्रसार माध्यमातील व्यक्तींनी श्री क्षेत्र तुळजापूरचा होत असलेला अभूतपूर्व विकास बघता राजकीय द्वेषापोटी व आर्थिक कारणांसाठी षडयंत्र रचून खोट्या व अर्धसत्य बातम्या वारंवार देऊन व मंदिराचा फोटो वापरून श्री क्षेत्र तुळजापूरची व ठराविक सत्ताधारी नेते तथा नागरिकांची बदनामी करत असणे,तुळजाभवानी मातेच्या मुख्य महंतांनी मुख्यमंत्री महोदयांना श्रीक्षेत्र तुळजापूरसह येथील समस्थ पुजारी व सेवेकरी वर्ग यांची बदनामी करत समाजात तेढ निर्माण करणाऱ्या षड्यंत्राची चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत करून शहरातील सर्व गैरव्यवसायावर कायमस्वरुपी प्रतिबंध घालणेबाबत निवेदनाद्वारे | डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मागणी केलेली असणे, मा. मुख्यमंत्र्यांनी पोलीस अधीक्षक, धाराशिव यांना दि.१२.९.२०२५ रोजी चौकशीचे आदेश दिलेले असणे, हे षडयंत्र रचणारे, वारंवार बदनामी करणाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| ६३. | सर्वश्री. विठ्ठल लंघे, मुरजी पटेल, वि. स. स. | “अहिल्यानगर जिल्ह्यातील जगप्रसिद्ध शनैश्वर देवस्थानातील ऑनलाईन पूजा ॲप, क्यूआर कोड व देणगी पावती पुस्तकांच्या माध्यमातून उघडकीस आलेल्या शेकडो कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा तपास मागील सहा महिन्यांपासून अत्यंत संथ व संशयास्पद पद्धतीने सुरू असणे, पावसाळी अधिवेशनात मा.मुख्यमंत्री यांनी उच्चस्तरीय सायबर तपासाचे आश्वासन दिल्यानंतरही प्रत्यक्षात तपास अहिल्यानगर सायबर क्राईमपुरताच मर्यादित असल्याचे स्पष्ट होणे, तपासादरम्यान उघड झालेले कोट्यावधी रुपयांचे इलेक्ट्रॉनिक व्यवहार, संबंधित खातेदारांची चौकशी न होणे, ॲप तयार करणाऱ्या कंपनीची माहिती उपलब्ध असूनही त्यांच्यावर कारवाई न होणे, आरोपींची नावे उघड न करणे तसेच पुरेसे पुरावे नष्ट होण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे भाविकांमध्ये संताप व अविश्वास वाढणे, घाईघाईने दोन कर्मचाऱ्यांना आरोपी दाखवून तपासाची | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 'स्क्रिप्टेड दिशा देणे, तालुक्यातील नागरिक व शनीभक्तांकडून तपास सीबीआयकडे देण्याची जोरदार मागणी होत असणे, त्यामुळे हा आर्थिक गुन्हा व भाविकांच्या श्रद्धेचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी शासनाने तात्काळ तपास सीबीआयकडे वर्ग करून पारदर्शक कारवाई करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ६४. | डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, मोहन मते, चेतन तुपे, वि. स. स. | "PESA क्षेत्रातील १७ संवर्गांपैकी तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, वनरक्षक, शिक्षक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, कृषीसेवक, पशुधन पर्यवेक्षक इत्यादी विविध पदांवर कार्यरत उमेदवार आजही मानधन तत्वावरील तात्पुरत्या नियुक्तीमध्ये अडकलेले असणे, तर त्याच वेळेच्या सरळसेवा भरतीत परीक्षा दिलेले Non-PESA उमेदवार कायमस्वरूपी नियुक्त होऊन जवळपास एक वर्ष लोटले असणे, सन २०२४ च्या पदांसाठी उमेदवारांनी, पात्रता पूर्ण केली आणि मेरिटनुसार निवड प्रक्रिया पार पडली. तथापि, PESA प्रवर्गातील उमेदवारांना केवळ मानधन तत्त्वावर, ११ महिन्यांच्या करारावर, आणि शासन कर्मचारी नाहीत अशा नोंदीसह नियुक्त करण्यात आले असणे, ही गंभीर असमानता आणि भेदभावाची स्थिती असणे, वेतन, सेवासुविधा, नोकरीतील सुरक्षा यांचा | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभाव असल्यामुळे या उमेदवारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, माननीय सर्वोच्च न्यायालयाने कायम करण्याचे सकारात्मक निर्देश दिले असतानाही शासनाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे, याशिवाय १७ संवर्गापैकी कोतवाल, पोलीस पाटील, कामाठी, प्रयोगशाळा परिचर, स्वयंपाकी, वन अन्वेषक, आदिवासी विकास निरीक्षक, सर्वेक्षक या पदांची भरती अद्याप झालेली नसणे, तरी मानधन तत्वावरील PESA क्षेत्रातील सर्व कार्यरत उमेदवारांना त्वरित नियमित करण्यात यावे. तसेच १७ संवर्गापैकी भरती न झालेल्या पदांची भरती तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका." | |
| ६५. | श्रीमती श्वेता महाले, वि. स. स. | "सारंगवाडी ता.चिखली,जिल्हा बुलढाणा येथे संग्राहक तलाव व पूरसंरक्षक प्रकल्पाचे काम सन २००९ पासून सुरू असणे, निविदेतील अटीनुसार २०१५ मध्ये काम पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्यापही काम रखडलेले असणे, यामुळे प्रकल्पाची मूळ किंमत १६.६१ कोटी रुपयांवरून तब्बल २८०.६४ कोटी रुपयांवर पोहोचली असणे, अर्थात प्रकल्प किंमतीत सुमारे १५८९% म्हणजेच १६ पट वाढ झाली असणे,वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे या कंपनीने अधिकाऱ्यांच्या संगनमताने | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रकल्पाची किंमत अवास्तव वाढवलेली असणे,निविदा भरताना खोटी कागदपत्रे दिल्याबद्दल लोक आयुक्तांनी सदर कंपनीस काळ्या यादीत टाकून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिलेले असणे,एसीबीने उघड चौकशीचे आदेश दिलेले असणे,अद्याप उक्त प्रकरणी काहीही कारवाई झालेली नसणे, सबंधित अधिकाऱ्यांकडून कंत्राटदार कंपनीची पाठराखण केली जात असणे, सन २०२१ मध्ये लगतच्या टेल कालवा संकल्पन,नदी खोलीकरण कामासाठी २.३८ कोटी रुपयांचे देयक काम न करताच अदा केलेले असणे, या प्रकल्पातील गैरव्यवहारात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ छत्रपती संभाजीनगर, जिल्हा जलसंधारण अधिकारी बुलढाणा, उप विभागीय जलसंधारण अधिकारी चिखली इ.अधिकारी सहभागी असणे, कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगनमताने केलेली ही कृती गंभीर असणे,सदर कंपनी विरुद्ध यापूर्वी वैभववाडी,चतुःशृंगी व गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असणे, प्रकल्पाच्या सातत्याने वाढलेल्या खर्चामुळे पारदर्शकता, गुणवत्ता,उपयोगीतता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असणे,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६. | श्रीमती सना मलिक, वि. स. स. | "मुंबईतील पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये गेल्या काही दिवसांत गंभीर विस्कळीतता निर्माण झाली असणे, दिनांक १ व २ डिसेंबर, २०२५ रोजी २,५०० मिमी जल वाहिनीवरील कामासाठी ३० तासांचे घेण्यात ओलेले शटडाउन, तसेच दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी १,२०० मिमी जलवाहिनीतील गळती दुरुस्तीसाठी ८ तासांचा बंदोबस्त घेण्यात आलेला असणे, त्यानंतर १७ वॉर्डांमध्ये १५% पाणी कपात लागू करण्यात आली असणे, या सलग शटडाऊनमुळे विशेषतः कुर्ला, एम/ईस्ट आणि एम/वेस्ट भागातील दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालेले असणे, झोपडपट्टी क्षेत्रांत पाणी साठवणुकीची सोय नसल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी, स्वयंपाक व स्वच्छतेसाठी तीव्र अडचणी आलेल्या असणे, तसेच बहुमजली निवासी संकुलांमध्ये अनियमित पुरवठ्यामुळे रहिवाशांचे दैनंदिन कामकाज बाधित झाले असणे, बीएमसीकडून अचूक पूर्वसूचना व पुनर्पुरवठा वेळापत्रक न मिळाल्याने नागरिकांची गैरसोय आणखी वाढली असणे, पाणीपुरवठा व्यवस्थेचे तातडीने आधुनिकीकरण करणे आवश्यक असणे, मुख्य जलवाहिन्यांची नियतकालिक देखभाल सुनिश्चित करावी, पाणी बंद / कपातीचे अचूक व | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पालनयोग्य वेळापत्रक आधीच जाहीर करावे, पुनर्पुरवठा विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित करावी, झोपडपट्टी व बहुमजली निवासी संकुलांसाठी आपत्कालीन पाणीपुरवठा योजना तत्काळ राबवावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ६७. | श्री. महेश सावंत, वि. स. स. | "ग्रँटरोड येथील फ्लोरीएट इन्व्हेस्टमेंट,शापूरजी पालनजी तर्फे सिटी सर्वे क्र. १५५२ (गिरगाव) ७८०३ चौ.मी.भूखंडावरील जे.के.बिल्डिंग ०१ ते ते १० या उपकरप्राप्त इमारतींचा वि.नि.नि. ३३(७) अंतर्गत पुनर्विकास करताना स्टर्लिंग टॉवर या इमारतीत ५७० पैकी १५० घरांचे पुनर्वसन केल्याचे दाखवून १००० चौ.फूटाची ३८ घरे बांधून- FSI घोटाळा करून कोट्यवधीचा महसूल बुडविणे, सन २००९ साली भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून जे.के.टॉवर A,B या २९ मजली इमारतीत २१५ रहिवाश्यांचे पुनर्वसन करून १७ वर्षे उलटूनही रहिवाश्यांच्या घरांची नोंदणी व सोसायटी स्थापन न करणे, पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या २०४ रहिवाशी यांच्या प्रस्तावित जे.के.टॉवर D विंग इमारत सन २०१७ मध्ये इमारत तोडल्यानंतर गेली ०९ वर्षे आ.यो.डी./सी.सी.प्रमाणित करून प्रत्यक्षात plinth चे बांधकामही पूर्ण न होणे, सन २०२२ मध्ये | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | डी.सी.पी.आर.मधील बदला नुसार इंसेप्टिन FSI ५०% वरून ७८% झाल्यावर विक्रीसाठी एक विंग इमारतीचे १८ मजले वाढून ६३ मजल्याची प्रस्तावित करणे,मूळ रहिवाशी यांना ३५% फंजीबल प्रमाणे ४०५ चौ.फुटाचे घर देण्यास नकार देणे,विकासकातर्फे मासिक भाडे ०८ महिने न मिळणे व दादागिरी करणे, pollution mitigation गाईड लाईन्स चे उल्लंघन करणे,रस्त्याचा सेट बॅक हस्तांतरीत न करणे, मूळ रहिवाशी यांची व शासनाची फसवणूक केलेली असूनही म्हाडा,मनपाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने स्थानिकामध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व फसवणूकीची भावना, याबाबत विकासकाच्या सर्व परवानग्याना स्थगिती देऊन कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ६८. | श्री. नानाभाऊ पटोले, वि. स. स. | "गोंदिया जिल्ह्याला २०२३-२०२४ मध्ये उत्पादित झालेल्या CMR तांदळासाठी आवश्यक असलेला FRK तांदूळ सरकारकडून मिळालेला नसतानाही संपूर्ण तांदळाचा लॉट LD FRK तांदळाने तयार केला गेला असणे, गोंदिया येथील जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सतीश आगडे म्हणून अतिरिक्त कार्यभार पाहत असणे, ते गेल्या दहा वर्षांपासून गोंदिया | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जिल्ह्यात असणे, त्याच जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात राहत असणे आणि पूर्वी भात गिरणी मालक असणे, चार वर्षांपूर्वी श्री. आगडे देवरीमध्ये गुणवत्ता निरीक्षक असणे, त्यावेळी देवरीमध्ये त्यांनी मंजूर केलेला तांदूळ केंद्रीय पथकाने मानवी वापरासाठी अयोग्य असल्याचे नोंदवले असणे, तो तांदूळ अजूनही देवरीच्या गोदामात साठविणे, या गोदामाचे गोदामाचे भाडे चार वर्षांपासून दिले जात असणे, यामुळे शासनाच्या तिजोरीवर अनावश्यक भार पडत असणे, गोंदियाचे डीएसओ श्री. सतीश आगाडे हे यासाठी जबाबदार असणे, गोंदिया जिल्ह्यात सीएमआर तांदूळ जमा करण्यासाठी शासनाने १६००३८ मेट्रिक टन क्षमतेची गोदामे भाड्याने घेतली असणे, यात पारदर्शकता नसणे, काही गोदामांमध्ये ४ मिलर्स आहेत तर काहींमध्ये २५ मिलर्स आहेत तसेच गिरणी मालक त्यांच्या पसंतीच्या गोदामांमध्ये सीएमआर तांदूळ जमा करत असणे,असा अदांधुद गैरकारभार सुरू असुनही शासन याबाबत दुर्लक्ष करित असणे, परिणामी शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ६९. | डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, हेमंत ओगले, संजय उपाध्याय, | "महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीपूर्वी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करणे, सदर | दिनांक १४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अब्दुल सत्तार, वि.स.स. | योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील हजारो सुशिक्षित बेरोजगार युवकांनी ११ महिन्यासाठी कौशल्य विभागामार्फत शासकीय तसेच निमशासकीय सेवेत प्रशिक्षण घेतलेले असून या प्रशिक्षणाचा कालावधी १ डिसेंबर रोजी पूर्ण झालेला असणे, प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित आस्थापनेत कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिलेली असणे, परंतु अद्याप आश्वासन पूर्ण करण्यात आलेले नसणे, त्यामुळे परभणी जिल्ह्यासह राज्यातील प्रशिक्षण घेतलेले युवक-युवतींवर बेरोजगारी वेळ आलेली असणे, परिणामी सदर योजनेंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या सुशिक्षित प्रशिक्षणार्थ्यांमध्ये शासनप्रती निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने परभणी जिल्ह्यासह राज्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगार प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात आलेल्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून देण्याच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ७०. | श्री. अमित साटम, वि. स. स. | "शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजना ही | दिनांक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ०९ जुलै,२०२४ रोजी पासून सुरू असणे, या योजनेत १२ वी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी यांना प्रतिमाह ६००० रुपये, आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना प्रतिमाह ८००० रुपये व पदवी तसेच पदवीत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना रुपये १०००० प्रतिमाह प्रमाणे विद्या वेतन देण्यात येणे, सदरचे प्रशिक्षण शासनाने ०६ महिन्यावरून ११ महिन्याकरिता वाढविण्यात येणे, या योजनेतील अधिकाधिक प्रशिक्षणार्थी यांना खाजगी उद्योगातील प्रशिक्षणाचीआवश्यकता असणे, या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थी यांना मिळणाऱ्या कार्य अनुभवाच्या आधारे स्वरोजगार सुरू करणेसाठी शासनाकडून या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार / स्वयंरोजगारसाठी विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | १४ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा झाली. |
| ७१. | श्री. सुधीर मुनगंटीवार वि. स. स. | "आणीबाणी विरोधामध्ये जिवाची पर्वा न करता स्वातंत्र्याकरिता स्वातंत्र्यलढा मधे उतरणारे लोकतंत्र सैनानींच्या वारसांच्या नोंदणीकरिता राज्यस्तरावर सर्वत्र एकच पध्दतीचा अवलंब न करणे, नविन अर्ज करताना सरकारी परिपत्रकास अफीडेव्हीटवर सदर अर्जास मंजूरी नसणे, परंतु अनेक ठिकाणी बोगस अर्जांचा स्विकार करणे, त्यामुळे खऱ्या स्वातंत्र्य | स्वीकृत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सैनानींच्या वारसावर अन्याय होणे, छत्तीसगड राज्य सरकारने ज्या प्रमाणे मानधन वाढीव विषय कायद्यात रूपांतरीत करून घेणे, याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये कायदा नसणे, याबाबीकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ७२. | श्री. अभिमन्यु पवार,श्री. विकास ठाकरे,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अमित विलासराव देशमुख,श्री. अमित झनक,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्रीमती ज्योती गायकवाड,श्री. विश्वजित कदम,श्री. संजय मेश्राम,श्री. साजिद खान पठाण, श्री. रामदास मसराम,श्री. अनिल मांगुळकर,श्री. शिरीषकुमार नाईक, श्री. विलास भुमरे,श्री. राहूल कुल, श्री. राजकुमार बडोले, वि. स. स. | " राज्यात पदवीधर व पदवीधर अंशकालीन कर्मचारी सन १९९१ ते २००३ या कालावधीत विविध विभागात ३०० रुपये मानधनावर सेवा केली असणे, सदरील कर्मचाऱ्यांना मा. न्यायालयाने हजेरी सहाय्यक, जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन कर्मचारी यांना शासन सेवेत सरळ सेवेने कायम करण्याबाबत निर्णय दिलेला असणे, सदरील पैकी अंशकालीन कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याऐवजी शासनाने शासकीय नौकर भरती मध्ये १०% आरक्षण लागू केले असणे, नोकरीसाठी वयोमर्यादा ४६ वर्षाहून ५५ वर्षापर्यंत केलेली असणे, उशिरा शासकीय सेवेत नियुक्ती मिळाली असल्याने आणि निवृत्ती वेतनास पात्रतेसाठी सेवा कालावधी १० वर्ष पूर्ण होणे नियमानुसार आवश्यक असणे, सदरील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी २००५ पूर्वी शासनाच्या सेवेत मानधन तत्वावर काम केलेले असल्याने व शासनाने सन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू केली असल्याने सदरील अंशकालीन कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तसेच पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६२ वर्ष करण्याबाबत पदवीधर अंशकालीन संघटनेची सातत्याने मागणी असणे, सदरील मागणीबाबत राज्य शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने पदवीधर अंशकालीन कर्मचारी वर्गात तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली असणे, सदरील मागणीबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | |
| ७३. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " जिल्हा सातारा कराड येथील विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमीन उपलब्ध करुन देणाऱ्या २२ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना शासनाने गेले १३ वर्षापासून ते अद्यापपर्यंत जमीन मोबदल्याची थकीत रक्कम उपलब्ध करुन दिली नसल्याची माहिती नुकतीच निदर्शनास येणे, सन-२०१२ पासून जमीन मोबदल्याची देय रक्कम थकित असणे, सदरहू थकित रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी शासनस्तरावर गेले ५ वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असता, शासनाने दि.२६.०८.२०२४ रोजी प्रकल्पबाधित शेतकऱ्यासाठी २० कोटी रुपये निधी मंजूर करुन सदरहू रक्कम जिल्हा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पातळीवर पाठविण्यात येणे, शेतकऱ्यांना मोबदला रक्कम तात्काळ देण्यात येणे असे शासनसदरहू निधी परंतु सदरहू रक्कम प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना उपलब्ध करुन न देता एमआयडीसीने सदरचा २० कोटीचा बेकायदा वापर करुन तसेच निधीचा वापर केल्याचे युटीलायझेन सर्टीफिकेट देण्यात येणे, यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मोबदल्याच्या मिळणाऱ्या रक्कमेपासून वंचित रहावे लागल्याने त्यांची झालेली प्रचंड गैरसोय, या संदर्भात बाधित शेतकऱ्यांनी कराड तालुक्यातील प्रांत अधिकारी यांना संपादित जमिनीचा मोबदला मिळावा याकरिता, सातत्याने अनेक वेळा विनंती अर्ज, निवेदने देऊन व पाठपुरावा करुनही, अद्याप यावर जिल्हाधिकारी व प्रांत अधिकारी यांनी कार्यवाही करण्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| ७४. | श्री. रवी राणा वि. स. स. | " जिल्हाधिकारी, अमरावती यांनी आदेश क्रमांक कक्ष-२६/अका/महसुल/कावि-२४७/२०२० दिनांक ०६.०३.२०२० अन्वये भातकुली तालुका येथील न्यायालय इमारत बांधकामासाठी आवश्यक जागेचा आगाऊ ताबा देण्याचे आदेश दिलेले असणे, सदर आदेशानुसार तलाठी, भातकुली | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भाग-१ यांनी दिनांक ०७.०४.२०२१ रोजी मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, अमरावती यांना त्या जागेचा प्रत्यक्ष ताबा दिल्याचे नोंदविले असणे, तरीही आजतागायत भातकुली येथे न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू झालेले नसणे, न्यायिक सुविधा नसल्यामुळे नागरिकांना न्यायालयीन कामांसाठी अमरावतीकडे जावे लागत असणे, संबंधित निधी व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करून बांधकाम सुरू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ७५. | श्री. चरणसिंग ठाकूर वि. स. स. | " धर्मादाय आयुक्तालयात अधीक्षक पदावर कार्यरत असणारे हे सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावर पदोन्नतीस पात्र असणे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त पदावरील पदोन्नती अधीक्षक संवर्गातून विभागीय परिषदद्वारे करणे,धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नतीकरिता विभागीय परीक्षा नियमाच्या प्रारूपात सदरील परीक्षा एकूण तीन संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील असे प्रावधान केले असणे, तथापि सदरील प्रावधानास विधी व न्याय विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाने विरोध केला असणे, सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय संबंधित शासकीय | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी कर्मचारी हे वरिष्ठ पदासाठी पात्र ठरत नसणे, धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नतीकरिता विभागीय परीक्षा नियमाच्या प्रारूपात विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून कोणत्याही व्यक्ती सूट मिळणार नाही असे प्रावधान करण्यात येणे, कर्मचाऱ्यांनी सध्याच्या पदावर किमान १५ वर्षे सेवा पूर्ण केल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्ष पूर्ण झालेला दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतरच्या लगेच त्या सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आणूनही करणे उचित राहील असा अभिप्राय विधी व न्याय विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाने देणे, शासनाचे विभागीय परिषदेचे धोरण विधी व न्याय तसेच सामान्य प्रशासन विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष करणे, धर्मादाय संघटनेत असे एकूण चार पात्र अधीक्षक असून ज्यांनी वयाची ५० वर्षे पूर्ण केली आहे तसेच त्यांचे वय व अनुभव यांचा कुठलाही विचार धर्मादाय संघटनेतील साहेब धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नती करिता विभागीय परीक्षा नियमात केला नसणे, धर्मादाय संघटनेच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट ब पदावर पदोन्नती करिता विभागीय परीक्षांचे नियम विधी व न्याय विभाग,सामान्य प्रशासन विभागाने नमूद केल्याप्रमाणे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दुरुस्त करण्यात यावेत, विभागीय परीक्षांच्या नियमातून जास्तीत जास्त तीन संधीची अट रद्द करावी, वयाची ५० वर्ष पूर्ण झालेल्या अधीक्षकांना विभागीय परिषदेतून सूट द्यावी,विभागीय परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करणे व तपासणीसाठी विद्यापीठावरील अनुभवी प्राध्यापकांची नियुक्ती करावी,धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त पदावरील एकूण मंजूर ८२ पदांपैकी पदोन्नतीच्या कोट्यातील सर्वच पदे रिक्त असल्याने पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान, पारदर्शक, कालबद्ध विभागीय परीक्षांनी पदोन्नतीच्या सामायिक धोरणात संगत होईल या दृष्टीने करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही." | |
| ७६. | श्री. अभिमन्यु पवार वि. स. स. | " लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुक्यातील सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपामुळे जमीनदोस्त झालेल्या २७ गावांचे शासनाने पुनर्वसन केले असणे, सदरील पुनर्वसित अ वर्गवारीच्या गावात पुनर्वसन अंतर्गत घरांचे बांधकाम करण्यात आले परंतु पक्की अंतर्गत रस्ते, नाली बांधकाम वीज, पाणी, स्मशानभूमी आणि इतर मुलभूत सुविधांचा अनुशेष राहिला असणे, सदरील भूकंप पुनर्वसित गावात तसेच भूकंपग्रस्त ब आणि क वर्गवारीच्या गावात मुलभूत सुविधा उपलब्ध करून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी लातूर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून एकत्रित आराखडा आपत्ती निवारण अंतर्गत शासनास सादर केला असणे, सदरील आराखड्यास निधीसह मंजुरी देण्याचे आश्वासन मा.मदत पुनर्वसन मंत्री महोदय यांनी विधानसभा अधिवेशनात दिलेले असणे, भूकंपग्रस्त पुनर्वसित व भूकंपामुळे घरे बाधित झाल्यामुळे भीती पोटी स्वयं पुनर्वसित झालेली ब वर्गवारीची आणि विस्तारवाढ झालेल्या क वर्गवारीच्या गावातील नागरिकांची पक्की अंतर्गत रस्ते, नाली, पाणी, वीज, ग्रामपंचायत इमारती सह सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम आदी मुलभूत सुविधाचा विकास करण्याबाबत नागरिकांची सातत्याने मागणी असल्याने सदरील भूकंपपुनर्वसित "अ" आणि भूकंपग्रस्त "ब" आणि "क" वर्गवारीच्या सर्व गावात जिल्हाधिकारी लातूर यांनी सादर केलेल्या मुलभूत सुविधांच्या अनुशेषाच्या प्रस्तावास आवश्यक निधीसह मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ७७. | श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. सुनिल प्रभू,<br>श्री. रोहित पवार, श्री. योगेश सागर,<br>श्री. भास्कर जाधव, श्री. मोहन मते वि. स. स. | "सातारा जिल्हयातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने गळफास लावून आत्महत्या केल्याचे उघड होणे, या महिलेने आत्महत्यापूर्वी आपल्या हातावर पेनाने | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुसाईड नोट लिहिली असणे, या महिला डॉक्टरने आत्महत्यापूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोट मध्ये पोलीस उपनिरीक्षकाने ४ वेळा बलात्कार केल्याचे नमूद केले असणे, पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी वरिष्ठांवर दबाव असणे, या महिला डॉक्टरची आत्महत्या की हत्या हा प्रश्न निर्माण होणे, महिला डॉक्टरने आत्महत्या केली नसून तिची सुनियोजित पध्दतीने हत्या करण्यात आली असल्याचा संशय अनेकांकडून व्यक्त केला जाणे, महिला डॉक्टर रात्री १.०० वाजता घर सोडून हॉटेलमध्ये का गेली, तिला प्रवेश कसा देण्यात आला, खोली बुक करण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे तपासली गेली का असे अनके मार्मीक प्रश्न उपस्थित केले जाणे, मृत महिला डॉक्टरच्या आई-वडीलांकडून न्याय मिळण्याची मागणी केली जाणे, या घटनेकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ७८. | श्री. सुनिल प्रभू,श्री. साजिद खान पठाण वि. स. स. | " मुंबईत निशित पटेल या ब्रिटीश नागरिकांस २ मनपा सहाय्यक आयुक्त, मुंबई, महिला पोलीस शिपाई आणि दोन बाऊन्सरने गंभीर मारहाण करुन उलट त्यांच्यावर ६० कोटी रुपयाची खंडणी मागितल्याचा खोटा आरोप केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, तसेच वांद्रे येथील पुनर्विकास | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रकल्पातील ८० कोटी रुपये निधी हडप केल्याचा खोटा आरोप करण्यात येणे, सदरहु सहाय्यक महापालिका आयुक्तांनी परळ येथील एफ साउथ बैठका घेऊन, वांद्रे पुनर्विकास प्रकल्पात स्वस्त दरात घरे देण्याचे व जादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महापालिका अधिकारी,अभियंता, बॉलीवूड अभिनेत्यासह अनेकांना गुंतवणूक करण्यास भाग पाडणे,पुनर्विकास प्रकल्पाची चौकशी न करता,सहायक आयुक्तावर विश्वास ठेवून ८० कोटी रुपयाचा निधी निशित पटेल यांचे मार्फत जमा करणे, व जमा केलेला निधी त्याच दिवशी पटेल यांनी सहाय्यक आयुक्तांकडे सूपुर्द केला असतानाही सहाय्यक आयुक्तांनी त्यांचेवर निधी हडप केल्याचा खोटा आरोप करणे,यानंतर निशित पटेलचे अपहरण करुन त्यास बंदुकीचा धाक दाखवुन मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी देणे, यांसदर्भात प्रकरण जीवावर बेतल्याने पटेल यांनी मा.मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त यांना लेखी तक्रार देऊनही अद्याप त्याची शासनाकडून दखल न घेणे, अतिथी देवः भवः म्हणाऱ्या भारतातील महाराष्ट्रात ब्रिटीश नागरिकाचा झालेला अवमान, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपाययोजना ." | |
| ७९. | श्री. चेतन तुपे,श्री. शंकर मांडेकर,श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर,श्री. राहूल कुल,डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. रोहित पाटील, वि. स. स. | " पुणे - बंगलोर महामार्गावरील पुणे येथील नवले पूलावर दिनांक १३ नोव्हेंबर , २०२५ रोजी भरधाव कंटेनरने १७ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत ८ जणांचा जागीच झालेला मृत्यु तसेच २५ ते ३० जण गंभीर जखमी होऊन त्यांची प्रकृती चिंताजनक असणे, राज्यातील सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, मुंबई, ठाणेसह इतर जिल्हयातून तसेच कर्नाटक, तामिळनाडू, केरळ या राज्यातून येणारी-जाणारी लाखो अवजड प्रवासी वाहने यामुळे वाढलेली रहदारी, पुणे येथील नवले पूल अरुंद असल्यामुळे शहरातील व शहराबाहेरील वाहनांची असंख्य संख्या यामुळे वर्षानुवर्षे होत असलेली वाहतूक कोंडी, १ - २ किलोमीटर प्रवासासाठी अर्धातास ते १ तासापेक्षा जास्त वेळ लागणे, नेहमीच होत असलेली वाहतूक कोंडी व अपघात याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी वाहतूकदार व प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले हाल, आर्थिक नुकसान व वेळेचा अपव्यय, रहदारीच्या प्रमाणात अरुंद पूल / रस्ता अपूरा पडत असल्यामुळे हे अपघात टाळण्यासाठी व सुरळीत वाहतूक होण्यासाठी शासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्याची तसेच | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कायमस्वरुपी मोठा रस्ता करण्याची आवश्यकता लक्षात घेता तात्काळ शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ८०. | श्री. तुकाराम काते, वि. स. स. | " देवनार टेलिकॉम फॅक्टरी वसाहत भारत सरकारचा उपक्रम बीएसएनएल च्या कर्मचाऱ्यांकरता उभारण्यात आली असणे, सध्या कंपनी बंद झाल्यामुळे कर्मचारी नसल्याने टेलिकॉम फॅक्टरी वसाहती मधील इमारत खाली असणे व बहुतांश जागा रिकामे असल्याने शासनाने त्या जागेवर जेल उभारण्याचं आरक्षण टाकले असणे, सदर जेल उभारण्याच्या जागेला लागून देवनार गाव श्री दत्तगुरु सोसायटी असोसिएशन, साई श्रद्धा सोसायटी, गोदरेज शेरनिटी, नीलकंठ गार्डन, साई सिमरन सोसायटी, चेतन अपार्टमेंट, रायकर चेंबर्स, सारसबाग आणि बीआरसी कर्मचाऱ्यांची वसाहत असल्याने जेल उभारल्यानंतर धोका होण्याचा संभव येथील स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केला असल्याने सदर जागेतील जेलचे आरक्षण बदली करणे अत्यावश्यक असल्याने याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | कित्ता |
| ८१. | श्री. विश्वनाथ भोईर वि. स. स. | " ठाणे जिल्ह्यातील कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात देहव्यापार करणाऱ्या महिलांचा होत असलेला वावर, त्यामुळे महिला प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लागत असून त्यांच्यात निर्माण झालेले भीतीचे वातावरण, तसेच सदर परिसरात महिला, विद्यार्थीनी व तरुणींच्या असुरक्षिततेचा निर्माण झालेल प्रश्न, कल्याण परिसरातील हॉटेल, लॉजिंग इतर ठिकाणी सदर देहव्यापारी महिला अवैधरित्या देहव्यापार करीत असणे, त्याकडे संबंधित विभागाचे होते असलेले दुर्लक्ष, सदर देहव्यापारी महिलांमुळे शहराची होत असलेली बदनामी, परिणामी स्थानिक नागरीकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, कल्याण पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असलेल्या अवैध देहव्यापाराला आळा घालण्याच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करुन अवैधरित्या देहव्यापार करणाऱ्या महिलांवर व हॉटेल, लॉज मालकांवर तसेच त्यांना पाठिशी घालणाऱ्या पोलीसांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ८२. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " मुंबई महानगरपालिकेतर्फे पावसाळ्यापूर्वी अनेक रस्त्यांचे कॉंक्रीट कामासाठी वाहतूक विभागाचे ना हरकत करता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जयवंत संकपाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक यांच्याशी संपर्क साधला, महापालिकेचे अधिकारी यांना न पाठवता कंत्राटदाराला त्यांच्याकडे पाठवा असे बोलले, लोकप्रतिनिधी म्हणून विनंती करूनही त्यांना | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कोणत्या कारणासाठी कंत्राटदाराला बोलवायचे होते याबाबत संशय निर्माण झाला असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर कामासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त वाहतूक विभाग यांची भेट घेतली तरीही त्यांनी परवानगी देण्यात सहकार्य केले नसणे, त्यामुळे रस्त्याचे काम न झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असणे, चेंबूर रेल्वे स्टेशन येथे वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाय योजना करण्यासाठी सांगूनही दुर्लक्ष करणे, सेंट ग्रेगोरिएस शाळा येथे ओपीएस शाळा सुटल्यानंतर होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या वेळेस पोलीस शिपाई ठेवून मदत करण्याची विनंती करूनही दुर्लक्ष करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांना फोनवरून याबाबत विनंती करत असताना उलट बोलून आमच्याकडे मनुष्यबळ नाही ते काही करू शकत नाही तुम्हाला काय करायचे ते करा अशा उर्मट भाषेत लोकप्रतिनिधीशी बोलणारे श्री जयवंत संकपाळ यांच्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज देऊनही त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | |
| ८३. | श्री. रवी राणा वि. स. स. | " पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी त्यांचे पत्र क्र.२०२५/४०१दि.१४/०१/२०२५ रोजी पोलीस संचालक, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मुंबई यांना पाठविलेल्या संदर्भित प्रस्तावांनुसार राजापेठ व फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे प्रशासकीय विभाजन करून एम.आय.डी.सी परिसरात नवीन पोलीस स्टेशन स्थापन करण्याची तसेच बडनेरा व राजापेठ पोलीस स्टेशनचे विभाजन करून साईनगर येथे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याची आवश्यकता स्पष्ट करण्यात आली असणे, अमरावती शहराची वाढती लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्राचा विस्तार आणि वाढती कायदा-सुव्यवस्था आवश्यकता लक्षात घेता या दोन नवीन पोलीस स्टेशनची उभारणी अत्यावश्यक ठरत असणे, प्रस्तावानुसार दोन्ही ठिकाणच्या नवीन पोलीस स्टेशन इमारतींसाठी निधी मंजूर करून बांधकामाची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे देण्यात यावी, जेणेकरून बांधकामाची गुणवत्ता, गती आणि मानकांनुसार अंमलबजावणी सुनिश्चित होईल. संबंधित क्षेत्रातील पोलीस पथकांवरील वाढता ताण कमी करणे, त्वरित प्रतिसाद क्षम पोलीस व्यवस्था निर्माण करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी पोलिसिंग उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रस्ताव अत्यंत उपयुक्त असून तातडीने शासनाने मान्यता प्रदान करून निधी मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ८४. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | "मुंबईतील वांद्रे येथे राम अर्बन इन्फ्रा लि.( SRUIL ) सध्या दिवाळखोरीत प्रक्रियेत असुन या प्रकल्पासाठी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड "इंडियाबुल्स" हाऊंसिग फायनान्स लिमिटेड कडून निधी घेण्यात आला असणे, पंरतु कायदेशीर अडचणी निर्माण झाल्याने प्रकल्पाच्या पूर्णतेत आणि आर्थिक नियमनात अडथळे निर्माण झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, याकारणास्तव इंडियाबुल्सने SRUIL चे खाते बदनाम म्हणून घोषीत केल्याने पॅलेस रोयाल ची खोटया लिलाव प्रक्रियेद्वारे Honest Shelter Pvt Ltd या शेल कंपनीला विक्री करण्यात आली असुन सदरहू कंपनी ही इंडियाबुल्सची एक कंपनी असल्याचे दिसून येणे, यामुळे या प्रक्रियेत इंडियाबुल्सने सदर कंपनीची SRUILकोटयावधी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक व बनावट कागदपत्राचा वापर करण्यता आल्याने या प्रकरणी राज्य सरकारचे मुंद्राक शुल्क व इतर महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुनही याबाबत संबंधित जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने शासनाने त्वरीत याबाबत तातडीने करावयाची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| ८५. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " चेंबूर विधानसभा क्षेत्रामध्ये महानगरपालिका प्रभाग क्रमांक १५२ मधील रोड क्रमांक २१ येथील निवासी क्षेत्रातील धार्मिक मालमत्तेचा वापर होत असून सदर परिसरातील नागरिकांच्या जीविताचा धोका निर्माण झाला असणे, सदर परिसरात हिरो मोटरसायकलचे गोडाऊन असल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात मोटरसायकलचे बेकादेशीर साठवणूक केलेली असणे, तसेच आपत्कालीन व्यवस्थेसाठी कोणतेही यंत्रणा नाही रोड नंबर २१ शेजारी अनेक सोसायटी असल्यामुळे दाट लोक वस्ती असणे, मोटरसायकल ने आण करण्यासाठी मोठ-मोठ्या गाड्या सदर ठिकाणी येत असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, नागरिकांना नाहक त्रास सहन वाहतूक कोंडीचा करावा लागत असणे, सदरबाबत चेंबूर स्टेशन परिसरातील रोड क्रमांक २१ येथील मशिद परिसराचा अनधिकृत मोटरसायकल गोदामासाठी निष्कासन कारवाई करण्याबाबत पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ यांना विनंती तक्रार अर्ज करूनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | कित्ता |
| ८६. | श्री. अमोल खताळ,श्री. सुनिल प्रभू,श्री. अस्लम | " राज्यातील नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथे यू के येथील | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | शेख,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अमिन पटेल,श्री. विश्वजित कदम,श्री. अमित विलासराव देशमुख, श्री. विकास ठाकरे,श्रीमती ज्योती गायकवाड,श्री. साजिद खान पठाण, श्री. शिरीषकुमार नाईक,श्री. रामदास मसराम,श्री. संजय मेश्राम,श्री. हेमंत ओगले, श्री. अनिल मांगुळकर, श्री. किसन कथोरे, वि. स. स. | परदेशी नागरिकांनी माहे सप्टेंबर मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य विम्याच्या नावाखाली फसवणूक करत एक बनावट कॉल सेंटर सुरू केल्याची घटना उघडकीस येणे, पालघर व रायगड जिल्ह्यात अशा प्रकारचे कॉल सेंटर यापूर्वी संबंधित आरोपी यांनी चालविले असणे, अशी माहिती त्यांनी सी.बी.आय. यंत्रणेला दिल्याचे वृत्तपत्रातील बातमीत प्रसिद्ध करण्यात आले असणे, पूर्वी रायगड येथे कार्यरत असणारे वरिष्ठ पोलीस अधिकारी सध्या अहिल्यानगर या ठिकाणी कार्यरत असून त्यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असणे, याप्रकरणी सखोल चौकशीअंती संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली सार्वत्रिक मागणी, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सर्वसामान्य जनतेत पसरलेला असंतोष व तीव्र संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ८७. | श्री. अमल महाडिक,श्री. राजेश क्षिरसागर, वि. स. स. | " कोल्हापुरातील कळंबा परिसरात दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी घरगुती गॅसचा पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनमधून गॅस गळती झाल्याने प्रचंड स्फोट होण्याची घटना घडणे, यामध्ये अनंत भोजने (वय ६०), शीतल भोजने (वय २९), प्रज्वल भोजने (वय ५) यांचा दुर्दैवी मृत्यू होणे, यामुळे गॅस | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाईपलाईन सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणे, निष्काळजीपणा, तांत्रिक त्रुटी यांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणे, घडलेल्या घटनेची चौकशी होवून दोषींवर कडक कारवाई होणे आवश्यक असणे, गॅस पाईपलाईनच्या सुरक्षेबाबत उपाययोजना व वापराबाबत प्रबोधन होणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया" | |
| ८८. | श्री. नानाभाऊ पटोले,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. विकास ठाकरे,श्री. रामदास मसराम,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्रीमती ज्योती गायकवाड,श्री. विश्वजित कदम,श्री. संजय मेश्राम,श्री. अनिल मांगुळकर,डॉ. नितिन राऊत वि. स. स. | "नागपूर येथे भरधाव वाहने चालवून अपघाताच्या घटना सातत्याने घडत असणे, येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आरबीआय चौकात दुचाकीला टँकरने धडक दिल्याने जखमी झालेल्या अल्पवयीन बहिण भावाचा दुर्दैवी मृत्यू व एकजण गंभीर जखमी झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास येणे, या अपघाताला कारणीभूत एनएल १ एजी ०८६८ क्रमांकाचा टँकरचालक फरार असणे, तसेच जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हददीत भरधाव वाहनाने धडक दिल्याने एका मजूराचा जागीच मृत्यू होणे, याही घटनेतील वाहनचालक फरार असणे, शहरात मागील काही महिन्यांपासून अपघातांच्या घटना सातत्याने घडत असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामतुळे गुन्हे घडत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषांचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | |
| ८९. | श्रीमती सना मलिक वि. स. स. | " पोलीस दलातील स्थापत्य अभियांत्रिकीची महत्त्वाची ६० पदे गेली ७ वर्षे रिक्त ठेवण्यात आली असणे, सदरहू ६० पदे भरण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने किती वेळा अधिकारी उपलब्ध नसल्याची माहिती गृह विभागाला दिली आणि या महत्त्वाच्या भरती प्रक्रियेचा कालबद्ध कार्यक्रम शासनाने निश्चित केला आहे का? असल्यास, ही सर्व ६० पदे कधीपर्यंत (प्रतिनियुक्ती/सरळसेवा/करार) पूर्ण भरली जातील? अंतर्गत पदोन्नती प्रस्तावः पोलीस महासंचालक कार्यालयाने जानेवारी २०२२ मध्ये सादर केलेल्या, पोलीस दलातीलच पात्र अभियांत्रिकी (सिव्हिल) पदवीधारक कर्मचाऱ्यांकडून ही पदे भरण्याच्या महत्त्वपूर्ण प्रस्तावावर शासनाने अद्याप निर्णय का घेतला नाही? हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून पदस्थापना करण्याची प्रक्रिया शासन कधी सुरू करणार आहे? आर्थिक नुकसानीचा तपशीलः अभियंत्यांच्या अनुपस्थितीमुळे पोलीस विभागाला लहान दुरुस्तीसाठीही | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सार्वजनिक बांधकाम विभागावर अवलंबून राहावे लागले. यामुळे, बांधकामाच्या खर्चात झालेली अपेक्षित वाढ, दुरुस्तीसाठी लागलेला अतिरिक्त वेळ आणि पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निवासावर झालेल्या परिणामामुळे झालेले नुकसान याची तपशीलवार माहिती शासनाने सभागृहाला द्यावी.जबाबदारी निश्चिती व कारवाईः २०१७ पासून आजपर्यंत हा प्रशासकीय विलंब आणि हलगर्जीपणा करणाऱ्या गृह विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांवर शासन जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ९०. | श्री. राघवेंद्र पाटील वि. स. स. | " धुळे जिल्हा पोलीस दलाच्या अधिनस्त असलेल्या धुळे तालुका पोलीस ठाणे व सोनगीर पोलीस ठाण्याचे क्षेत्रफळ मोठे असल्याअमुळे धुळे ग्रामीण भाग साक्री हा उपविभाग असुन सदर उपविभागत धुळे तालुका, सोनगीर, साक्री व पिंपळनेर पोलीस ठाणे कार्यरत असून तालुका पोलीस ठाणे अंतर्गत नेर, आर्वी, शिरुड व मुकटी असे ०४ पोलीस दुरक्षेत्र कार्यान्वित असणे, धुळे तालुका पोलीस ठाणेचे हद्दीतुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ०३, मुंबई आग्रा क्र. ०६, सुरत नागपुर क्र. २११, व धुळे- | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सोलापुर असे राष्ट्रीय महामार्ग असून या महामार्गावरुन रात्र दिवस वाहनाची वरदळ असून मोठी हद्दीमुळे पोलीस कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढून अपराधी गतिविधींवर लक्ष नसल्याने नागरिकांना गुन्हा व अपघातानंतर मदतीसाठी मोठ्या प्रमाणावर समस्या उद्‌भवणे, मोठी हद्द असल्यामुळे गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे शक्य नसणे, धुळे तालुका पोलीस ठाण्याचे विभाजन होऊन नविन स्वतंत्र कुसुंबा पोलीस ठाण्याची निर्मितीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक १२५/प्र.लि/पो.स्टे.-निर्मिती/२०११/३८२/ धुळे, दिनांक ०४/०८/२०११ अन्वये मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर असून त्यावर अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही." | |
| ९१. | श्री. राघवेंद्र पाटील वि. स. स. | " ता.जि. धुळे ग्रामीण येथील मौजे बोरीस या परिसरात विजेचा पुरेसा दाब उपलब्ध होणे,सद्यस्थितीत बोरीस उपकेंद्राला २२० केव्ही कुंडाणे उपकेंद्र येथून पुरवठा होणे, फिडरचे वीज पुरवठ्याचे अंतर हे ५५-५७ किमी एवढे असणे, सदरचे अंतर जास्त असल्याने कुंडाणे फिडर ओवरलोड होणे, यामुळे शेतकऱ्यांना सुरळीत, सुयोग्य दाबाने वीजपुरवठा होत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नसणे,तसेच अतिरिक्त लोडशेडिंगमुळे वीज उपकरणे नेहमी जळत असून इतर समस्या निर्माण होणे, परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना खूप अडचणींचा सामना करावा लागणे, तसेच मौजे बोरीस या परिसरात औद्योगिक वसाहत खूप मोठ्या प्रमाणत असणे,मौजे बोरीस या परिसरात १३२/३३ केव्हीचे नवीन अतिउच्च दाब उपकेंद्र निर्मिती करणे गरजेचे असणे,सदर उपकेंद्र मंजूर असून जागेची मोजणी देखील झाली असणे, उपकेंद्राचा प्रस्ताव सादर झाला असणे, बोरीस येथील उपकेंद्र महापारेषणच्या सन २०२५ -२६ च्या आराखड्यात घेण्यात येणे, परंतु महापारेषणच्या सुधारित आराखड्यात ते २०३१-३२ ला घेण्यात येणे, परंतु शेतकऱ्यांची मागणी व समस्यांचा विचार करता सदर उपकेंद्र तात्काळ होणे गरजेचे असणे, मौजे बोरीस, ता.जि.धुळे येथे १३२/३३ केव्हीचे अतिउच्च दाब उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| ९२. | श्री. राघवेंद्र पाटील वि. स. स. | " धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघामध्ये धुळे-अवधान १३२/३३ या अति उच्च दाब केंद्रावरून ५५ ते ६० कि.मी. पर्यंत शिरूड भागात- कुंडाणे, कुसुंबा, चौगाव, सौंदाणे, जुनवणे, उद्योगनगर, आर्वी, विंचूर, वेल्हाणे, चिंचखेडे, मुकटी, फागणे, कृषी महाविद्यालय, नवलनगर, सुतगिरणी, चक्कर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बर्डी, नकाणे, पावर हाउस, पारोळा रोड, एम.आय.डी.सी.-६ एवढे ३३/११ च्या २० उपकेंद्रावर विजपुरवठा होणे, या धुळे-अवधान येथील १३२/३३ उच्चदाब केंद्राचा बिघाड झाल्यास किंवा देखभाल दुरुस्ती असल्यास या लाईनीवरील २० ३३/११ उपकेंद्र बंद पडून यामुळे सुमारे ५० ते ६० हजार शेतकऱ्यांची गैरसाय होणे, त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी (धुळे ग्रामीण) दि. २२.०३.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री व मा.ऊर्जा राज्यमंत्री यांच्याकडे शिरूड नविन १३२/३३ अतिउच्चदाब केंद्राची याविषयाची मागणी करण्यात आली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही." | |
| ९३. | श्री. राजेश मोरे वि. स. स. | “ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील १४ गावे तसेच शिळ-देसाई व मुंब्रा-कळवा परिसरात टोरेंट पॉवर लिमिटेड कंपनीकडून शेतकरी व सामान्य नागरिकांवर करण्यात येणारी अन्यायकारक वीजबिल आकारणी, योग्य व्होल्टेज न मिळाल्यानंतरही सरासरी १०० युनिट वापरकर्त्यांना १ हजार युनिटपर्यंत बिल लावून मनमानी वसुली करणे, शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या शेतात अनधिकृत रीतीने विद्युत खांबे व ट्रान्सफार्मर उभारुन जबरदस्तीने कामे करणे, तसेच या भागांत गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून दमदाटी करून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घरात घुसून धमक्या देण्याच्या घटना सातत्याने घडत असणे, या गैरप्रकारांमुळे काही शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झाल्याच्या तक्रारी देखील प्राप्त होणे, उक्त प्रकरणी कंपनीकडून शेतकऱ्यांच्या थकबाकीसंदर्भात कोणताही प्रतिसाद न देणे आणि दादागिरीच्या वृत्तीने वसुली करणे यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण होणे, यामुळे स्थानिकांत निर्माण झालेले भितीचे वातावरण, याबाबत यावर शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित कंपनी विरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ९४. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " चंद्रपूर जिल्ह्यातील व नागपूर विभागात मोठ्या प्रमाणात कोल वासरी मध्ये होत असलेले गैरव्यवहार माहे डिसेंबर, २०२५ मध्ये समोर येणे, यामध्ये प्रामुख्याने सन २०२१ पासून महाजनकोचे एम एस एम एस सी यांनी कॉल वासरीचा काम चार कंपन्यांना देत असणे, सदर बाबी बाबी तीन कंपन्यांना देण्यात येणाऱ्या कोळसा पुरवठा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असणे त्यामध्ये प्रामुख्याने हिंद एसीबी आर आय पी एल यांच्या समावेश असणे, सन २१-२५ या चार वर्षांमध्ये सदर कंपन्यांवरती साडेसातशे कोटी रुपयांची दंड देऊन रिकवरी कॉल होणे, एम एस एम सी याची नोडल एजन्सी नोंदणी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, सदर कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी महाजनकोने आपल्या नोडल एजन्सीला वारंवार पत्र व्यवहार करणे परंतु नोडल एजन्सी यांनी निविदास सूचना देत असताना ज्या बँक गॅरंटी ची आवश्यकता असते ते बँक गॅरंटी न घेत असणे व त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी कोणतीही कारवाई अद्याप पर्यंत न करत असल्यामुळे शासनाच्या होत असलेले कोटयवधीचे नुकसान यावर शासनाने करावयाची कारवाई उपाययोजना" | |
| ९५. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " न. भू क्र. ४६९- अ चेंबूर येथील राज्य शासनाच्या शासकीय जागा बांधा वापरा हस्तांतर करा या तत्त्वावर सध्याच्या हब टाऊन या खाजगी कंपनीला ज्या अटी आणि शर्तीवर देण्यात आली त्या सर्व अटी आणि शर्तीचे सदरच्या खाजगी विकासाच्या कंपनीने उल्लंघन केले असणे, अटी व शर्तीनुसार सदर विकासकामे सर्वप्रथम सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम करून देणे कमप्राप्त असणे त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह व इतरही शासकीय कार्यालयांच्या इमारतींचा समावेश असणे, परंतु सर्व इमारतींचे बांधकाम अत्यंत संथ गतीने करत असणे, कधी कधी तर ते बांधकाम बंदच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकासकाने सदरचे बांधकाम बंद ठेवून त्याने त्याच्या स्वतःच्या विक्री करता असलेल्या इमारतीचे व त्यामधील व्यापारी गाळे या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून स्वतःचा फायदा केला असणे, शासकीय इमारतींचे अटी आणि शर्तीचेनुसार कालावधीत पूर्ण करून देणे कम प्राप्त असणे भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहाचे बांधकाम हे विकासक पूर्ण करत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब असणे, त्यांनी शासकीय जागा ज्या अटी व शर्ती वर विकास करण्यासाठी घेतलेले आहे त्यांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | |
| ९६. | श्री. बबनराव यादव (लोणीकर), श्री. नारायण कुचे वि. स. स. | " शेगाव पंढरपूर रोड व पूल ३ वर्षात पूर्ण करण्यासंदर्भात कटीबध्दता असणे, असे असताना १० वर्ष होऊन सुद्धा परतूर माजलगाव दोन तालुक्यात १० किलोमीटर काम प्रलंबित असणे, नवीन पुलाचं काम होऊन ७ वर्षे झाली असताना दोन्ही बाजूच्या पोच मार्गाचे काम बाकी असणे, मागील ५ वर्षापासून सातत्याने प्रत्येक अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला असणे, मंत्री महोदय यांनी ६ महिन्यात काम पूर्ण करू असे वारंवार आश्वासन दिलेले असणे, गोदावरीसह गंगा सावंगी - लोणी दोन गावामधील पूल १० वर्षापासून अपूर्ण असणे, रस्ते | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंडळाचे मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता उपअभियंता अधिकारी विधिमंडळ कार्यालयाला सचिवांना खोटी माहिती देऊन दिशाभूल करत असणे, सभागृहात सदरील काम सहा महिन्यात पूर्ण करण्याचे आश्वासन दिलेले असताना हे काम ५ वर्षात पूर्ण झाले नसणे, सभागृहाची दिशाभूल करणारे खोटी माहिती देणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणे, या महामार्गाचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे अधिकाऱ्यांनी पूर्ण न करणे, कंत्राटदाराला दंड लावणे, ब्लॅकलिस्ट करण्याची नोटीस देणे, अनामत जप्त करणे यापैकी कोणतीच कारवाई केलेली नसणे, सदरील काम पूर्ण करून घेण्यात अपयशी ठरलेल्या बेजबाबदार अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ९७. | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | " मुंबई मालाड पूर्व येथील जय हनुमान पाडा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सुमारे ५८ रहिवाशांची घरे अपात्र असताना ही विकासकाने करार करून पाडण्यात आली असणे, त्यामध्ये सर्व रहिवाशांकडे १९९५ च्या आधीचे पुरावे असतानाही केवळ ते पहिला मजल्यावरील रहिवासी असल्याचे कारण सांगून त्यांना अपात्र केले गेले असणे, त्यामध्ये, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रहिवाशांनी पोलीस तक्रार करूनही त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल घेण्यात आलेली नसणे, त्यामुळे रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत योग्य ते लाभ देण्याकरिता उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पात्र करून रहिवाशांना त्यांचे हक्काचे घर देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| ९८. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबईतील चेंबुर मधील अमर महल परिसरातील पंचशील नगर मध्ये ६०० झोपडीधारक रहिवाशी कुटुंबाच्या पुर्नवसनासाठी एसआरए योजनेतंर्गत बांधलेल्या १७ मजली टॉवर इमारतीमध्ये गेले ९ वर्षापासून विकासक आणि एसआरए प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या रहिवाशी कुटुंबाने दि.१५.१०.२०२५ रोजी प्रकल्पासंबंधित समस्या सोडविण्यासाठी सोसायटीच्या आवारात आमरण उपोषण सुरू करण्यात येणे, अग्नी सुरक्षा यंत्रणा बंद असणे, घरामधील गळती आणि उदवाहनाची दुरावस्था आदी समस्यामुळे रहिवाशी कुटुंबांची प्रचंड गैरसोय होत असणे, येथील इमारतीमधील अनेक घरामध्ये पाणी गळती होणे, इमारतीमधील एकुण-११ पैकी तीनच उदवाहने कार्यरत असणे. १७ मजली इमारत असल्याने उदवाहनासाठी रहिवाश्यांना अर्धातास ताटकळत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उभे रहावे लागत असणे, यासंदर्भात स्थानिक रहिवाश्यांनी मा. मुख्यमंत्री, महापालिका आयुक्त आणि झोपू प्राधिकरणाकडे अनेकवेळा लेखी तक्रार करुनही, अद्यापही शासनाकडून त्याची दखल न घेण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ९९. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " चेंबूर खारदेव नगर येथे सतीश बालन ( विकासक ) यांनी संत गाडगे महाराज एस आर ए बिल्डिंगचे काम करताना झोपडीधारकांना इमारतीमध्ये द्यावयाच्या सुविधांचे हमीपत्र सोसायटीला व झोपडीधारकांना दिले असणे, हमी पत्रातील नमूद मुद्द्यानुसार कंपनीद्वारे गच्ची पाणी गळतीविरोधक केली जाईल आणि कंपनीद्वारे दहा वर्षाची हमी दिली जाईल, आग विरोधक सामुग्री बसवण्यात येईल लिफ्ट साठी जनरेटर देण्यात येईल, झोपडीधारकांना फर्निचर साठी रुपये २५००० देण्यात येईल, लिफ्ट इमारत आणि जनरेटर यांचा दहा वर्षाचा मेंटनस सोसायटी नावे बँकेत जमा करण्यात येईल असे अनेक हमी पत्रातील नमूद सुविधांची कामे सदनिकाधारकांना बिल्डिंगमध्ये उपलब्ध करून न दिले असणे, सोसायटीची परवानगी न घेता इमारतीमध्येच चौदावा पंधरावा माळा विक्रीसाठी निवासी गाळे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बांधून विक्री केले असणे, इमारतीचे गच्चीवरील पिण्याचे पाणी साठवण टाकी आणि इतर मजल्यांवर लिकेज होऊन कधीही टाकी फुटण्याची स्लॅब कोसळण्याचा धोका निर्माण झाला असणे,तसेच आग लागल्या नंतर सुद्धा विकासकावर कोणतीही कारवाई झाली नसणे, विकासक यांच्याकडे वारंवार तक्रार करून ही उपाययोजना न होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, विकासक एस आरए बिल्डिंग बांधून निघून जातात व भविष्यातील अडचणींना झोपडीधारकांना तोंड द्यावे लागते तरी झोपडीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी विकासकाला बंधनकारक करावे याबाबत शासनाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १००. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " वर्सोवा-अंधेरी शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.प्लॉट नं.६८, वर्सोवा-अंधेरी शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.प्लॉट नं.६७, वर्सोवा-अंधेरी शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.प्लॉट नं.६६, सरदार वल्लभाई पटेल नगर, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम) मुंबई या संस्थेच्या बैठया चाळीतील घरांचा पुनर्विकास प्रलंबित असणे, चाळीतील ९५ टक्के घरे मोडकळीस आली असल्याने रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दरम्यान निदर्शनास आले असणे, उक्त तिन्ही संस्थेने बी.जी.शिर्के रिडेव्हलपमेंट ॲन्ड गॅस प्रा.लि.पुणे यांना संमती पत्र देवून निवड केली असणे, या विकासकांनी तिन्ही संस्थेचा सयुंक्त पुनर्विकास करण्यासंदर्भात प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा,मुंबई यांच्याकडे दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून संयुक्त पुनर्विकासाला शासनाने अद्याप मान्यता दिली असणे, संयुक्त पुनर्विकासाला तातडीने मंजूरी देण्याच्या दृष्टीने शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली भिती व असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना " | |
| १०१. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " मुंबईतील घाटकोपर, पूर्व येथी राजश्री आरकेड, इमारत क्रमांक ४२, या इमारतीचे पुनर्विकास नव्याने करण्यात आला असुन या इमारतींचा मंजूर नकाशानुसार पाया व खोदकाम केलेले नसल्याने मुंबई मनपाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, उक्त इमारतींचे निकृष्ट दर्जाचे काम झाले असल्याने या इमारतीचा भाग, बंदिस्त कंपाऊंड, संबंधित | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झाडे व बगिचा कोसळणे इत्यादी घटना घडल्या असुन याबाबत स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हाही दाखल करण्यात आला असुनही अद्यापही राजश्री डेव्हल्पर्स या विकासकांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नसणे, याकारणास्तव या इमारतीतील रहिवाशी व स्थानिक जनतेत भिती निर्माण झाली असल्याने शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करुन दोषापिंतावर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | |
| १०२. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | "मुंबईतील वांद्रे (पूर्व) शासनाच्या झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (एसआरए) कार्यालयात उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेले प्रशांत सुर्यवंशी या अधिकाऱ्याची नियमानुसार ३ वर्षानंतर अन्यत्र झालेली बदली रद्द करुन पुन्हा त्याच विभागात नियुक्तीसाठी कार्यवाही करीत असल्याची धक्कादायक माहिती नुकतीच उघडकीस येणे, सदरहू वादग्रस्त अधिकाऱ्यांने एसआरए विभागात काम करतांना अनेक गैरप्रकार व अर्थिक घोटाळे केलेले असतांनाही, एसआरए प्राधिकरणाने त्यांच्यावर चौकशी करुन कोणतीच कारवाई न करणे, त्यानंतर नियमानुसार बदलीचे आदेश प्राधिकरणाने मंजूर केलेले असतानाही, सुर्यवंशी यांनी बदली झालेल्या ठिकाणी सेवेत रुजू न होता, सुमारे ८ महिने गैरहजर राहून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्राधिकरणाच्या आदेशाचे उल्लंघन व अवमान केल्याचा प्रकार घडणे, सदरहू भ्रष्ट अधिकाऱ्यांने मंत्रालय स्तरावर उच्च अधिकारी यांचेबरोबर राजकीय दबाव व अर्थिक संगनमत करुन पुन्हा एसआरए विभागात नियुक्तीकरिता प्रयत्न करीत असल्याची माहिती उपलब्ध होणे, सुर्यवंशी यांनी ३ वर्षाच्या कालावधीत जारी केलेले परिशिष्ठ-२ आणि पात्र/अपात्र प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, सदरहू वादग्रस्त अधिकारी, प्रशांत सुर्यवंशी यांच्या अर्थिक संगनमताने बदली रद्द करणेबाबतच्या प्रकरणाची तसेच या कामात मदत करणाऱ्या संबंधिताची चौकशी करुन यातील दोषीविरुध्द शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १०३. | श्री. मुरजी पटेल वि. स. स. | " मुंबई झोपडी मुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणे, परंतु खाजगी मिळकतीवर असलेल्या अनेक झोपडपट्टी पुनर्वसन योजना मिळकतीच्या मालकी वादामुळे भूसंपादन न झाल्याने रखडलेल्या असणे, खाजगी मिळकतीचे अनेक वारस किंबहुना एकाहून अधिक मालक असल्याचे वाद असल्यामुळे योजनेस खाजगी मालकाकडून संमती / ना हरकत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मिळत नसणे, परिणामी अनेक वर्षापासून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राखडलेल्या असून सदरच्या योजना मार्गी लावण्यासाठी तसेच भविष्यातील खाजगी मिळकतीवरील योजना तातडीने पूर्ण करता यावे, यासाठी खाजगी मिळकती वरील मालकाच्या संमती ना/हरकत लवकर मिळण्यासाठी व विशिष्ठ कालावधीत मिळकत भूसंपादन होण्यासाठी ठोस धोरण निर्माण करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | |
| १०४. | श्री. मुरजी पटेल वि. स. स. | " मुंबईमध्ये SRD योजने अंतर्गत हाती घेतलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना काही प्रमाणात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांने ताब्यात घेऊन पूर्ण केलेल्या असणे, परंतु अनेक SRD योजने अंतर्गत हाती घेतलेल्या योजना रखडलेल्या असून त्या योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणांने ताब्यात घेतलेल्या नसणे, SRD अंतर्गत रखडलेल्या योजनामधील झोपडीधारकांच्या झोपड्या निष्कासित करण्यात आलेल्या असून सदरचे झोपडीधारक बेघर झालेले असणे, सदरच्या योजना पूर्ण करून झोपडीधारकांना न्याय आणि त्यांच्या हक्काचे घर देणे हे शासनाचे आद्य कर्तव्य असणे, झोपडीधारकांना न्याय येण्यासाठी SRD योजने अंतर्गत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना तातडीने पूर्णत्वास नेण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांने ताब्यात घेऊन सदरच्या योजना पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. " | |
| १०५. | श्री. मुरजी पटेल वि. स. स. | " मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेले बरेचशे प्रकल्पास २५ ते ३० वर्षाहून अधिक काळ झालेला असणे, योजनेतील झोपडीधारकांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केलेली असून अतिशय उत्तम पद्धतीने संस्थेचा कारभार करीत असून एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहत असणे, सदरच्या इमारती जीर्ण होणाच्या वाटेवर असून काही प्रमाणात जीर्ण झालेल्या असणे, भविष्यात इमारतीचा पुनर्विकास होण्यासाठी किंबहुना करण्यासाठी सदर योजनेतील बांधलेला इमारतीच्या मालमत्तेची मालकी गृहनिर्माण संस्थेच्या नावे करण्यासाठी डिम्ड कन्व्हेयन्स होण्याची आवश्यकता यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता |
| १०६. | श्री. अनंत (बाळा) नर वि. स. स. | " मुंबईतील आरे दुग्ध वसाहत हा अंदाजे ३१३३ एकरचा भूभाग असून हा निसर्गरम्य भाग असणे,मुंबई शहराचे फुफ्फुस असल्याचे मानले जात असणे, सदर भागातील काही भाग वन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागाच्या अखत्यारित येत असणे, तर काही विभाग दुग्ध विभागाच्या अखत्यारित येत असणे, शासनाच्या विविध विभागाच्या अखत्यारित असलेल्या या आरे वसाहतीचा विकास होणे आवश्यक असणे, आरे वसाहतीचे पर्यटन स्थळ करण्याबाबतची मागणी करण्यात येत असणे, या विभागाचा विकास होण्याकरिता सर्वप्रथम येथील झोपडयांचा विकास होणे गरजेचे असणे, शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांचे सर्वेक्षण करुन त्यांना सन २०११ पर्यतचा लाभ मिळावा सदर विभागामध्ये झोपडयांचे सर्वेक्षण सन १९९५ मध्ये झाले असून या वसाहतीतील अतिक्रमणाचा विचार केला तर त्याला अटकाव करण्यात न यणे, याकरिता येथील अनधिकृत झोपडीधारकांच्या विळख्याला अटक करणे आवश्यक असुनही याबाबत शासन दुर्लक्ष करित असल्याने येथील स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया " | |
| १०७. | श्री. अजय चौधरी वि. स. स. | " मुंबईतील अभ्युदयनगर काळाचौकी येथील म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे,मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांचेकडून दि.०१/१२/२०२१ रोजी अभ्युदयनगरच्या एकत्रित | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुनर्विकासाबाबत मुद्देनिहाय खुलासा पाठविण्यात येणे, त्यामध्ये ७४० चौ.फुटाची सदनिका (रेरा कार्पेट) प्राप्त होऊ शकेल असे स्पष्ट नमूद करण्यात येणे, अभ्युदनगर म्हाडा वसाहत समुह पुनर्विकासाबाबत दि.१०/०१/२०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचेकडे Cand D Agency ची नियुक्तीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येणे, अभ्युदयनगर म्हाडा वसाततीच्या पुर्नविकासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे, बैठका आयोजिक करुन केलेला पाठपुरावा, ३३ (५) अंतर्गत Cand D Agency मार्फत सदर वसाहतींच्या पुर्नविकासाठीच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता देण्यात येणे, याबाबत दि.०६/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित होणे, उक्त वसाहतींच्या पुनर्विकासासाठी ७ वेळा टेंडर काढण्यात येऊनही त्यास विकासकांकडून प्रतिसाद न मिळाल्याने सदरचे टेंडर रद्द करण्यात येणे,तद्नंतर माहे एप्रिल, २०२५ मध्ये सह्याद्री अतिथीगृह येथे मा.मुख्यमंत्री यांच्या समवेत घेण्यात आलेल्या बैठकीत ६३५ चौ.फुटावरुन ६२० फुटांच्या घरांचे नवीन टेंडर काढण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यानंतर पुन्हा नव्याने ५ वेळा टेंडर काढण्यात येणे, परंतु | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाने पुनर्विकासाच्या निवेदेबाबत कोणतीही अधिकृत घोषणा न करणे, तसेच पुनर्विकासाच्या कामास अद्याप सुरुवात न होणे, शासनाने तातडीने अभ्युदयनगर म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्याच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | |
| १०८. | श्री. मंगेश कुडाळकर वि. स. स. | " नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथील पोलीस वसाहतीमध्ये एकूण १९ जीर्ण इमारती असून सुमारे ५८० सदनिका असणे,या इमारती अत्यंत जीर्णावस्थेत असणे, मुंबईतील म्हाडा वसाहतीवर एकूण १७ पोलीस वसाहती असणे, ह्या १७ वसाहतींचा म्हाडा मार्फत पुनर्वसन होणार असणे, सदर प्रकल्पामध्ये नव्याने तयार होणाऱ्या घरांबाबत स्थानिक पोलीस अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांची अशी मागणी असणे, ही घरे त्यांना माफक दरात उपलब्ध करून मिळावी असे पोलीस पत्नींची मागणी असणे, पोलीस कर्मचारी हे शहराच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र परिश्रम घेत असणे, त्यामुळे त्यांच्या निवासाची योग्य सोय होणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | कित्ता |
| १०९. | श्री. कालिदास कोळंबकर वि. स. स. | " कोरबा मिठागर वडाळा पूर्व येथील पुनर्वसन प्रकल्प गेल्या वीस वर्षापासून रखडलेला असणे, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोजी झोपडी धारकांची विशेष सर्वसाधारण सभा (जीबीआर) एकमताने मंजूर होऊन विकासक म्हणून एयूए इन्फ्रा एलएलपी (रबर वाला ग्रुप) यांची नियुक्ती करण्यात आली असणे, कोरबा मिठागर झोपडपट्टीत गरीब, कामगार, मजूर, मध्यमवर्गीय लोक राहत असून येथे मुबलक प्रमाणात जागा उपलब्ध असल्यामुळे धारावी आणि वरळीतील बीडीडी चाळीप्रमाणे त्यांना ५०० चौरस फुटांची घरे देण्याची होत असलेली मागणी, सदर कोरबा मिठागरातील झोपडपट्टी धारकाला ५०० चौरस फुटाचे घर देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ११०. | श्री. अजय चौधरी, श्री. आदित्य ठाकरे, वि. स. स. | " मुबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास इमारत मालकाच्या मुजोरी व आढमुठी भूमिकेमुळे गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे, सदर मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीमध्ये जीव मुठीत घेऊन रहिवाशी वास्तव्य करीत असणे, कधीही सदर धोकादायक इमारती कोसळून वारंवार अपघाती घटना घडलेल्या असणे, सदर उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाला चालना मिळावी व मुजोर इमारत मालकांना चाप बसावा याकरीता शासनाने म्हाडाच्या अधिनियमात सुधारणा करुन नवीन कलम ७९-अे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अस्तित्वात आणणे, परंतु सदर अधिनिमानुसार कारवाई करण्यास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असणे, त्यामुळे उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांची मुजोरी वाढून पुनर्विकास रखडलेला असणे, त्यामुळे भविष्यातही सदर धोकादायक इमारतीमध्ये अपघात होऊन मोठी जीवित हानी होण्याची शक्यता, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रीया." | |
| १११. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " मुंबईतील बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा पूर्व येथील टाटा कॉलनी, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या नोंदणीकृत संस्थेच्या संचालक मंडळाच्या बरखास्तीनंतर एक वर्षाकरिता म्हाडाकडून प्रशासक नेमण्यात येऊनही मागील ७ ते ८ वर्षापासून संस्थेच्या निवडणुका घेण्यात आल्या नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये आढळून येणे, तसेच या नोंदणीकृत संस्थेच्या वैधानिक मंडळाकडून दोषदुरूस्ती, नियमित मासिक व वार्षिक सर्वसाधारण सभा झालेल्या नसणे, या रहिवासी संस्थेच्या विकासासाठी सन २००५ मध्ये डी.बी.रिअलटी कंपनीसोबत करार झाला असणे, सदर नोंदणीकृत संस्थेचे एकूण ४९५ | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदस्य असताना सन २०११ मध्ये विकासकाने रिअल्टी कंपनीच्या नावे ३५० निवासी सदनिकांसाठी ८० लाख, सन २०२० मध्ये उर्वरीत १५० सदनिकांसाठी २ कोटी व समिती सदस्यांना ४ कोटी रक्कम अदा करून खरेदी केलेल्या असणे, परंतु यावेळी स्टॅम्प ड्युटी भरली नसणे, जागेचे कन्व्हेअन्स आजही संस्थेच्या नावे असताना प्राधिकृत प्रशासक मंडळाने बेकायदेशीरपणे नाहरकत प्रमाणपत्र व निवासी जागेवर व्यावसायीक बांधकामास परवानगी दिली असणे, करारबद्ध डीबी रिअल्टी कंपनी दिवाळखोरित असताना अनधिकृतरित्या प्रेस्टीज कंपनी कामे पाहत असणे, प्रशासक मंडळ व कंपनी विकासक यांमध्ये संगनमत असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून दोषी विकासकाविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ११२. | श्री. अनंत (बाळा) नर वि. स. स. | " मुंबईतील जोगेश्वरी गुंफा व महाकाली गुंफा परिसरात फार मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी असणे पंरतू या परिक्षेत्रामध्ये पुरातन जोगेश्वरी गुंफा तसेच महाकाली गुंफा असणे त्यामुळै या विभागात पुनर्विकास करणे किंवा विकासाची कामे करण्यास निर्बंध असणे, या परिक्षेत्रामध्ये सन २००४ मध्ये ही बाब | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | न्यायप्रविष्ठ बाब झाली असणे, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार गुंफेपासून १०० कि.मी. पर्यत कोणतेही बांधकाम करण्यात येत नसणे, परंतु न्यायप्रविष्ठ बाब होण्यापूर्वी किंबहुना न्यायालयाचे आदेश निर्गमित होण्यापूर्वी या विभागात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई मनपा , इमारत प्रस्ताव के/पूर्व विभाग यांच्या माध्यमातून अनेक प्रकल्प सुरू असणे व काही प्रकल्प सुरू असणे, काही प्रकल्प पुर्ण झाले व काही अर्धवट अवस्थेत असणे, ही बाब केंद्र शासनाशी निगडीत असल्याने सन्मा. मुख्यमंत्री यांनी या प्रकरणी नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता पुढाकार घेऊन सर्व समस्यांचे एकत्रित विचार करुन काही निर्णय घेण्याची आवश्यकता असुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | |
| ११३. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " मालाड पूर्व येथील सीटीएस क्र. ५२१, ५२१/१ ते ८, ५२१/१० ते १७, ५२२, ५२२/१ ते ११, ५२३. ५२४. ५२४/१ ते १२, ५२५/१ ते ४, ५२७, ५२७/१ ते २६,५२८,५२८/१ ते ११,५३०.५३०/१ ते १६,५३२.५३२/१ | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ते १३,५३३(भाग), ५२९. ५२९/१ ते १५. ५३३/१ ते १००, ५३३/१०७ ते ४८४, ५३३/४८६ ते ६४३, ५३३/६४८. ५३६, ५३६/१ ते ५, ५३७, ५३७/१ ते ७, ५८०, ५८०/१ ते १३, ५८१८/३४ (भाग), ५८१८/३४/१/१० ते ३३ या विस्तृत जमिनीवरील खोत डोंगरी एसआरए सीएचएस लि. या पुनर्विकास प्रकल्पास दि. १२ जून २००९ रोजी मंजुरी मिळूनही आजतागायत ८०० पेक्षा अधिक रहिवाशांचे पुनर्वसन झालेले नसणे, अनेक रहिवाशांना मागील ५–६ वर्षांपासून भाडे न मिळाल्याने त्यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये विकासक शाह हाऊसकॉन (SHPL) विरोधात आंदोलन केले असणे, SHPLने विविध वित्तीय संस्थांकडून अवैधरित्या निधी उभारून तो वैयक्तिक फायद्यासाठी वळविल्याचे, तसेच प्रकल्पाबाबत चुकीची माहिती देऊन KTPL कंपनी तसेच रहिवाशांची फसवणूक केल्याचे आरोप असणे, KTPLसोबत विकास करार करूनही त्यांच्यावर दबाव आणून बोगस नोटिसाद्वारे करार रद्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सीटीएस क्र. ५२६ ही ट्रस्टची जागा असून स्पष्ट हक्कपत्र नसतानाही SHPLने एसआरएची परवानगी घेऊन जागा हडप करण्याचा प्रयत्न केला तसेच अतिक्रमणधारकांकडून | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अवैधरित्या पैसे उकळून कोट्यवधींचा गैरव्यवहार केल्याचेही समोर आले असणे, या सर्व पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी SHPLची चौकशी करून त्यांना काळ्या यादित टाकण्याची मागणी मा. मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र्यांकडे केली असून शासनाने तातडीने कारवाई कारण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रीया." | |
| ११४. | श्री. संजय उपाध्याय वि. स. स. | " ग्रेस अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (अताहुल्ला अन्सारी आणि कुटुंब) आणि पीएनआर डेव्हलपर्स अँड बिल्डर्स या संयुक्त उद्यमाने चेम्बूर गाव, ता.कुर्ला, मुंबई येथील सीटीएसक्र.१२३ (pt.), १८३५(pt.), ११६(pt.) वर चार प्रस्तावित गृहनिर्माण संस्था (सोसायट्या)-इंडियन/संत रोहिदास/कोहिनूर/वत्सला एसआरए सीएचएसएलऱ्यांच्यासाठी एकत्रित झोपडपट्टी पुनर्वसन योजना (Slum Rehabilitation Scheme) हाती घेणे, विकासकाचे वास्तुविशारद (Architect) असलेले सोमाली पारुई (आर्कोआर्किटेक्ट) [आणि आता झिशान अताहुल्ला अन्सारी-व्ह्यूडायमेंशन यांच्या उत्तराधिकारी म्हणून] यांनी २५८० चौरस मीटर क्षेत्रफळाची जमीन, जीमनोरंजन मैदान म्हणून आरक्षित आहे, ती मुंबई महानगरपालिकेला | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (MCGM) "खुले आकाश"(open to sky) म्हणून परत देण्याचे आश्वाशसित करणे, त्यामुळे एसआरए ने विकसकांनी सादर केलेल्या एकत्रित योजनेला मंजुरी दिली असणे, परंतु एसआरएच्या काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून, विकासकांनी मनोरंजन मैदानासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ पूर्वीमान्य केलेल्या आणि वास्तविक असलेल्या २५८० चौरस मीटरऐवजी, फसवणूक करून १०३० चौरसमीटर असे नोंदवून घेणे, मुंबई महानगरपालिकेनेही विकसकांकडून विकासआराखड्यात (DPPlan) आरक्षित असलेल्या क्षेत्रापेक्षा खूपच कमी क्षेत्रफळाची ही जमीन उच्च-तणाव (HighTension) वीज पुरवठा वाहिन्यांच्या (Electricity Supply Lines) थेट खाली ठेवली आणि ती जागा त्यांनी MCGM ला हस्तांतरित करित स्वीकारलेली असणे,वीजवितरणकंपनी (या प्रकरणात टाटा पॉवर) अशा बांधकामांना किंवा विकास योजनांना ज्या अटी आणि शर्तींवर "ना हरकत प्रमाणपत्र" (No Objection) देते, त्यादेखील एसआरएने दिलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध नसणे, उच्च-तणाव वीज पुरवठा वाहिन्यांच्या खाली किंवा जवळ ठेवता येत नाही. अन्यथा,अशा मनोरंजन मैदानाचा वापर करणाऱ्यांना | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आरोग्याचे धोके आणि त्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्यारची दाट शक्यंता असणे,यामुळे संपूर्ण आरक्षित भूखंडाचे (१००२९.५चौरस मीटर) सुरुवातीचे मूल्यांकन आणि LOI मधील कार्यान्वयन आकृती यांमध्ये गंभीर विसंगती निर्माण होण, एकूण भूखंडापैकी फक्त अंदाजे १५.२७% क्षेत्र आरक्षित असणे, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन गैर कारभार करणाऱ्या संबंधित दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही." | |
| ११५. | श्री. सुनिल कांबळे वि. स. स. | " पुणे, लोहियानगर परिसरातील सर्वे नं. ५३९ मधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार, बनावट लाभार्थी यादी, अनधिकृत बांधकामे व मालक तसेच शासनाची गंभीर फसवणूक झाली असल्याचे निदर्शनास आले असणे, सन १९६३ पासून कायदेशीररित्या सुरू असलेल्या सॉ मिल (लाकूड वखार) असलेल्या ओपन प्लॉटवर अस्तित्वात नसलेल्या ३०० बनावट झोपड्यांचा दाखला देऊन SRA प्रकल्प मंजूर केला गेला असणे, स्थळ पाहणी, पंचनामा वा सरकारी मोजणी न करता बांधकाम परवानग्या देण्यात आल्या असणे, या प्रकल्पातील ८०० झोपड्यांचे निष्कासन, चार इमारतींचे अनधिकृत पूर्ण बांधकाम, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | STP न बांधता मिळवलेला ओ.सी., तसेच पात्र लाभार्थ्यांना घरे न देणे—ही अत्यंत गंभीर बाब निदर्शनास आली असणे, प्लॉट क्र. १६१ व १६२ मध्ये मूळ लाभार्थी यांना आजपर्यंत घरे मिळालेली नाहीत, बनावट प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली असून महानगरपालिका प्रशासनाशी संगनमत करत TDR गैरवापर झाल्याचीही तक्रारी आहेत. तसेच कोथरुड CTS ६६० या प्रकल्पात ३७ मुळ झोपडीधारक असताना त्याव्यतिरिक्त १२३ बनावट झोपडीधारक दाखवून साधारण १०० कोटींची फसवणूक झाल्याचे दिसून येत असणे, सदर प्रकरणांची तात्काळ सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि यामध्ये मूळ पात्र लाभार्थी यांचे हित जोपसावे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया." | |
| ११६. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबईतील मालाड पूर्व रामलीला मैदानातील कुदंनलाल सैगल नाटयगृह इमारतीमध्ये मुंबई महापालिकेने आक्टोंबर-२०२३ मध्ये नव्याने सुरू केलेल्या पी-पूर्व नवीन विभागीय कार्यालय अद्यापही पुर्ण क्षमतेने कार्यालय सुरू झाले नसल्याने, प्रशासकीय कामासाठी स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब दि.२९.१०.२०२५ रोजी निदर्शनास येणे. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याआधी महापालिकेचे मालाड पश्चिमेला पी-उत्तर वार्ड कार्यालय असल्याने मालाड पूर्वेकडील नागरिकांना महापालिकेशी संबंधित दैनंदिन कामे करण्याकरिता नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असणे. नागरिक व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार सदरहू कार्यालय पी-पूर्व विभागात कार्यालय सुरू करण्यात येणे, परंतु त्यास २ वर्ष इतका कालावधी होऊनही, अद्याप पी-पूर्व वार्डला पुर्णवेळ सहाय्यक आयुक्त प्राप्त न करता पी-उत्तर वार्डच्या सहाय्यक आयुक्तावर अतिरिक्त जबाबदारी सोपविण्यात येणे, सदरहू पी-पूर्व कार्यालयात पाणीपुरवठा व घनकचरा आणि ग्राहक सेवा केंद्र सुरू असून याव्यतिरिक्त कोणतीही प्रशासकीय कामे या कार्यालयात होत नसल्याने नागरीकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्तांची प्रत्यक्ष भेट घेऊन, निदर्शनास आणून देऊनही अद्याप याबाबत शासन तथा महापालिकेतर्फे शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे. याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| ११७. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबई महापालिकेच्या पुल विभाग, प्रमुख अभियंता, जल | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभियंता, रस्ते व वाहतूक, किनारा प्रकल्प, इमारत व परिरक्षण आदी विभागातील महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी मंजूरी दिलेल्या १२२ दुय्यम आणि ३४ सहाय्यक अभियंता मिळून एकुण १५६ अभियंत्याच्या बदली आणि बढती प्रकरणात अनियमितता झाल्याने लोकप्रतिनिधींनी दिलेल्या तक्रारीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.२१.१०.२०२५ रोजी स्थगिती देण्यात येणे, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी परस्पर गैरव्यवहार व अनियमितता करुन मंजूरी दिलेल्या १५६ अभियंत्याच्या बदलीला स्थगिती देण्याची नामुष्की महापालिका प्रशासनावर ओढावणे, महापालिकेत प्रमुख अभियंता, उपप्रमुख अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता व दुय्यम अभियंताची पदे मिळून ६७७ अभियंत्याची पदे रिक्त असणे, उक्त पदे भरणेबाबत एक वर्षापूर्वी गट-अ परिक्षेचा पेपर फुटल्याने पुनः परिक्षा प्रक्रिया राबविण्यात येणे, शिवाय मर्जीतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कारभार कोणाच्या निर्देशाने दिला जातो याचा तपास होणे आवश्यक असणे, सदरहू बदली पदोन्नती प्रकरणात कोटयावधी रुपयांचा अर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी)द्वारे चौकशी करण्याची, लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मागणी करणे, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| ११८. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " चेंबूर घाटला महापालिका वसाहत संक्रमण छावणी १०० / ३७८ गाळे बैठ्या पत्राचाळी सन १९७५-७६ साली स्थलांतरित प्रकल्पबाधितांसाठी मुंबई महापालिकेने बांधल्या असणे, त्यात प्रकल्पग्रस्त राहण्यास उत्सुक नसल्याने सदर निवासस्थाने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना मालकी हक्क तत्त्वावर देणार आहोत असे सांगून सदर कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या असणे, मौखिक आदेश प्रत्यक्षात सन १९८९ मध्ये निवासस्थान मालकीहक्क तत्त्वावर देण्यासंदर्भात सुधार समिती ठराव मंजूर होणे व सन १९९१ साली महापालिका आयुक्त यांनी मालकीहक्क तत्वावर देण्यासंदर्भात आणि पुनर्विकास करण्यासंबंधी मंजुरी देण्या आले असणे, सदर धोरणात्मक निर्णयानुसार मागील सुमारे ४५ वर्षापासून कर्मचारी वास्तव्यास असणे, त्या कारणाने कर्मचाऱ्यांनी निवासस्थान न खाली करणे, यास्तव महापालिकेने सेवानिवृत्त कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, उपदान, अंश राशी करण, रजा रोखीकरण व मासिक निवृत्ती वेतनादी दावे रोखून ठेवले असणे, वडिलांचा महापालिका निवासनाचा पत्ता सेवाअभिलेखात व sapप्रणालीमध्ये मध्ये | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोंद असल्यामुळे त्यांच्या मनपाच्या सेवेत असे नातेवाईक वारस यांचे निवृत्तीवेतन आदी दावे सुद्धा रोखून ठेवण्यात आलेले असणे या कारणाने यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, आर्थिक परिस्थिती बिकट असणे, मुलांचे शिक्षण लग्न होत नसणे, याचा गांभीर्याने विचार करणे अत्यावश्यक असणे, याबद्दल शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| ११९. | श्री. रवी राणा वि. स. स. | " गोपालनगर रेल्वे अंडरपासचे बांधकाम कामाची गती वाढविणे, नागरिकांना वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका व दैनंदिन प्रवास सुखकर व्हावा मूलभूत सुविधा करुन देण्यात यावे यासाठी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता चे दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी व मनपा आयुक्त, प्रशासक व रेल्वे अधिकारी यांच्या उपस्थितीत अधिकृत पाहणी केली असणे, आयोजित करण्यात आली असणे, तथापि मनपा व रेल्वे विभागांदरम्यान आवश्यक समन्वय न होऊन प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते या कामाचे लोकार्पण करण्याचे संबंधाने पाहणी दरम्यान सूचनां दिल्या असणे, तरीही मा. मुख्यमंत्री यांचेकडून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करायवयाची कार्यवाही व उपाययोजना .“ | |
| १२०. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " मुंबईतील जिजामाता नगर, चेंबूर येथे दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजी सायं. ७ वा. मोनोरेल बंद पडून रुळावरून घसरलीची घटना घडणे, या मोनोरेल मध्ये प्रवास करत असलेले ५८२ प्रवासी अडकले असणे, या अपघाताच्या वेळेस प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी आपत्कालीन खिडकी नसणे, मोनोरेल मधील वातानुकुलीत यंत्रणा बंद पडल्याने प्रवाशांना त्रास सुरू होणे, अग्निशामक दलास मोनोरेलच्या काचा फोडून प्रवाशांना बाहेर काढण्यास २ तास लागणे, मोनोरेल मध्ये ५८२ प्रवासी प्रवेश करत असताना मोनोरेल स्टेशन वरील सुरक्षारक्षकांनी प्रवाशांना थांबवले नसल्याने मोनोरेलवर प्रवासी वाहतूक करताना ताण आला असणे, अपघाताच्या वेळेस वाहनातील व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी जशी आपत्कालीन खिडकी असते तशी मोनोरेल बंद पडल्यानंतर प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी आपत्कालीन खिडकीची व्यवस्था करण्यात आलेली नसणे, मोनोरेलच्या रेल्वे रुळाच्या ब्रिजला काही ठिकाणी तडे गेल्याचे निदर्शनास आले असतानाही प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नसणे, अनेकदा मोनोरेलवर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अपघात होऊनही मोनोरेल प्रशासनाने गांभीर्याने आजपर्यंत कोणत्याही उपाययोजना प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केलेल्या नसणे, मोनोरेल प्रशासनाकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत होत असलेल्या दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १२१. | श्री. अजय चौधरी वि. स. स. | " महाराष्ट्र विधीमंडळ सदस्यांना आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नागरी सुविधाकरिता निधी दिला जाणे, सदर निधीबाबत वित्त व नियोजन विभागाने नियम व सुचना निर्गमित केलेल्या असणे,त्यानुषंगाने नागरी सोयी-सुविधांच्या कामांची शिफारस करणे हा विधीमंडळ सदस्यांचा हक्क असणे, असे असतानाही मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-२ क्षेत्रात आमदार/खासदार यांनी शिफारस केलेल्या कामांकरिता म्हाडाला "नाहरकत प्रमाणपत्र" देण्यात येणार नाही असा प्रस्ताव महापालिका उपायुक्त (परिमंडक-२) यांनी दि.२४ मार्च,२०२५ रोजी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्या मंजुरी करिता पाठवणे, त्यास आयुक्त यांनी एप्रिल, २०२५ मध्ये मंजुरीही देणे, त्यानुसार अति. महापालिका आयुक्त(शहर) यांनी म्हाडा प्राधिकरणास "ना हरकत प्रमानपत्र" देण्यात येणार नाही असे पत्र पाठवणे, तसेच आमदार/खासदार यांचा नागरि- | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुविधाचा विकास निधी महापालिकेस वर्ग करावा असे संबंधित पत्रात नमूद करणे, तसेच म्हाडा प्राधिकरणास निधी वर्ग करण्याच्या प्रचलित नियमानुसार आमदार/खासदार यांनी शिफारस केलेल्या कामांना महापालिकेकडून म्हाडाला पाच ते सहा महिने "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येत नसणे, त्यामुळे अनेक नागरी-सुविधांची कामे प्रलंबित असणे, परिणामी विधीमंडळ सदस्याच्या हक्काचा निधी त्यांनी शिफारस केलेल्या कामांना न वापरता महापालिका आपल्या मर्जीने सदर निधी वापरण्याची शक्यता निर्माण होणे, त्यामुळे शासनाने महापालिकेचा सदर प्रस्ताव तात्काळ रद्द करून नागरी-सुविधांच्या कामाकरिता म्हाडा झोपडपट्टी सुधार मंडळास निधी वर्ग करण्याची प्रचलित पद्धत सुरू ठेवण्याच्या अनुषंगाने तातडीने महापालिकेस सूचना देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १२२. | श्री. अजय चौधरी वि. स. स. | " मुंबईतील वीर जिजामाता भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयातील शक्ती वाघाचा दि. १७ नोव्हेबर, २०२५ रोजी मृत्यू झालेला असणे, मृत्यू नंतर १० दिवस याबाबतची बातमी प्रसिध्द न करणे, शक्ती वाघाचा मृत्यू प्राणिसंग्रहालयातील वरिष्ठ अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणा व दुर्लक्षामुळे होणे, पशुवैद्यकीय अधिकारी श्रीम. कोमल पवार यांची भूमिका संशयास्पद असणे. या गंभीर घटनेची सखोल चौकशी करावी अशी लोकप्रतिनीधी यांनी मा. वनमंत्री, अपर मुख्य सचिव-वने तसेच राज्य प्राणिसंग्रहालय प्राधिकरण यांच्याकडे दि. २७/११/२०२५ रोजी मागणी केली असणे, शासनाने चौकशी समिती नेमण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया " | |
| १२३. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " मुंबई महानगरपालिकेतील प्रमुख लेखापाल ( वित्त )विभागात अनेक डेव्हल्पमेंट प्रकल्पांची ब्रिजेस इत्यादीची बिले मंजूरीला व रक्कम अदा करतांना करोडो रुपयांचा भ्रष्टाचार सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, मुंबई मनपाच्या एफआरडी विभागामधील अनेक कर्मचारी/अधिकारी मागील अनेक वर्षापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने व विकासकाबरोबर संगनमताने अनेक गैरप्रकार लपविण्याकरिता अवैधरित्या कामे करुन संबंधितांकडून अनेक कोटींची मागणी करुन मुंबई मनपाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडवून विकासकांना वाढीव क्षेत्रफळाचा, चटई क्षेत्रफळाचा फायदा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करुन देऊन कोटयवधीचा भ्रष्टाचार करुनही शासन याबाबत दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोषाची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| १२४. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | "मुंबईतील पवई परिसरातील एल ॲण्ड टी या कंपनीच्या ताब्यातील भूखंडावर मोठ्या प्रमाणावर नियोजन प्राधिकरणाची व पर्यावरणविषयक मंजुरी न घेता बांधकाम करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, या बांधकामात सदनिकांची नोंदणी करणारे नागरिक भविष्यात फसविले जाण्याची शक्यता असल्याने बांधकाम प्रकल्पाची तपासणी करण्याबाबत शासनाकडे पत्राद्वारे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापही शासन दुर्लक्ष करित असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया " | कित्ता |
| १२५. | श्री. सिध्दार्थ शिरोळे,श्री. काशिनाथ दाते, श्री. चेतन तुपे,श्री. शंकर मांडेकर,श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर,डॉ. जितेंद्र आव्हाड, | " महाराष्ट्रातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे अपघाती मृत्यू ही एक गंभीर समस्या निर्माण होणे, मागील पाच वर्षांत सर्वोच्च न्यायालयात एका याचिकेच्या सुनावणी दरम्यान ही | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रोहित पाटील, ॲड. राहूल कुल,<br>वि. स. स. | धक्कादायक माहिती उघड होणे, महाराष्ट्रात पाच वर्षांत २,१३६ नागरिकांचा खड्ड्यांमुळे जीव जाणे, या आकडेवारीनुसार खड्ड्यांमुळे झालेल्या मृत्यूंच्या संख्येत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असणे, मुंबई उच्च न्यायालयाने वारंवार रस्त्यांवरील खड्ड्यांच्या समस्येवर गंभीर चिंता व्यक्त करणे,पुण्यातील रस्त्यांवरील खड्डे देखील अनेकदा जीवघेणे ठरले असून खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातांमध्ये काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागणे आणि अनेक जण गंभीर जखमी झालेले असणे, काही प्रकरणांमध्ये निष्काळजीपणासाठी ठेकेदार आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली असणे, खड्डे व खराब रस्त्यांमुळे वाहन चालवणारे नागरिक, विशेषतः दुचाकीस्वार, मणक्याच्या आणि पाठीच्या विकारांना बळी पडत असणे, रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावणे, परिणामी मोठी वाहतूक कोंडी होणे, अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा ताण वाढल्यामुळे नागरिकांना दररोज या समस्येचा सामना करावा लागणे, पुणे शहरातील रस्त्यांची दुर्दशा होण्यामागे आणि खड्डे बुजवण्यात येणाऱ्या अपयशामागे प्रशासकीय आणि धोरणात्मक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्रुटी असल्याचे दिसून येणे, त्यामुळे पुणे शहरातील नागरिकांमध्ये शासनाबद्दल तीव्र नाराजीची भावना असणे, पुणे शहरातील खड्डे तातडीने दुरुस्त कारण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १२६. | श्री. अमित साटम वि. स. स. | " मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील डि एन नगर येथे एअरपोर्ट अथॉरिटीच्या जमीनीवर असलेल्या ट्रान्समिशन टॉवर्सच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पुर्नविकासासाठी हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध असणे, यामुळे डि एन नगर व गुलमोहोर या परिसरातील विकास खोळंबलेला असणे, अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे गेल्या ४० ते ५० वर्षापासून राहत असलेल्या इमारती जीर्ण झाल्या असणे, सदर निर्बधामुळे येणाऱ्या नजीकच्या काळामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबे राहत असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत असे घोषीत करण्यात आले तर रस्त्यावर येण्याची शक्यता असणे, सदर जमीनीवर असलेले ट्रान्समिशन टॉवर इतरत्र हलवून डी एन नगर व गुलमोहोर परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याची आवश्यकता असणे, डी एन नगर व गुलमोहोर परिसर या आजूबाजूच्या परिसरामध्ये असलेला हाईट | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये शासनाने पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर सदर विषयाचा निर्वाळा करण्याचे वचन दिलेले असणे, तसेच पावसाळी अधिवेशनात पुढील सहा महिन्यात होईल असे आश्वासन दिलेले असणे, परंतु अद्याप पर्यंत सदर विषयांमध्ये कोणतीही प्रगती झाली नसून सदर विषय हा गेली पाच वर्ष प्रलंबित असल्यामुळे सदर परिसरातील बेघर होण्याची पाळी येत असल्यामुळे लोकांमध्ये शासनाबाबत तिव्र संतापाची भावना निर्माण होत असल्यामुळे सदर विषयावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १२७. | श्री. मुरजी पटेल वि.स.स. | " मुंबई, गोरेगाव, पश्चिम द्रुतगती महामार्गालगत असलेली नेस्को एक बहुआयामी कंपनी असून कंपनी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणे सदर कंपनीच्या अनेक उप कंपन्या असणे, त्यांच्याकडून विविध प्रकारचे अनेक उत्पादने उत्पादन करून याठिकाणी त्यांचे मोठे-मोठे प्रदर्शने, अधिवेशने, फूडकोर्ट व तसेच आंतरराष्ट्रीय मोठे मोठे व्यापार मेळे, सांस्कृतिक कार्यक्रमे आयोजित केले जात असणे, सदरची प्रदर्शने, सांस्कृतिक व इतर कार्यक्रमे तसेच इतर विविध कार्यक्रमे दररोज आयोजित केले जात असून यात सदर प्रदर्शनासाठी व कार्यक्रमासाठी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मोठ्या प्रमाणात लाखोच्या संख्येने वाहने येत असल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर व इतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत असणे, वाहतुकीच्या कोंडीचा नागरिकांना व प्रवाशांना मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत असणे, त्याचा नाहक मनस्ताप होत असल्याने नागरिकांमध्ये व प्रवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असणे, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १२८. | श्री. शिवाजी पाटील वि. स. स. | " चंदगड (जि.कोल्हापूर) येथील आजी – माजी सैनिकांनी देशाची २५ते ३० वर्ष देशसेवा करुन नोकरीत जमा केलेल्या पैशातून घर घेण्याकरिता एकत्र येऊन चंदगड नगर पंचायत हददीतील गट नंबर ७४८ मधील जमीन खरेदी करणे, सदर जमीन खरेदी करतांना सारासार विचार न करता शेती झोनमधील जमीन खरेदी केल्यामुळे आजी- माजी सैनिक तांत्रिक अडचणी सापडलेले असणे, सदर जमीन शेती झोन असल्याने त्यांचे घर बांधण्याचे स्वप्न भंग होणे, तयांच्यात निर्माण झालेली उदासिनता, सदर जमीन शेती झोनमधून रहिवाशी झोन मध्ये वर्ग करण्याबाबत केलेली सैनिकांनी मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाने सैनिकांच्या घराच्या स्वप्नाचा विचार करता सदर जमीन शेती झोनमधून रहिवाशी झोन मध्ये वर्ग करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका ." | |
| १२९. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबईतील गोरेगाव (प.) लिंक रोड, बांगूरनगर येथील ६ लाख चौ.मी.क्षेत्रापैकी सार्वजनिक बाग, खेळाचे मैदान, क्रीडा संकुल, रुग्णालये आदीसाठी आरक्षित असलेल्या २ लाख चौ.मी.क्षेत्रफळाच्या भुखंडावर शासनाने भूखंडाच्या आरक्षणानुसार प्रकल्प उभारण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अतिक्रमण होऊन, भूखंड गमाविण्याचा धोका निर्माण झाल्याचा प्रकार नुकताच दि.०२.१२.२०२५ रोजी उघडकीस येणे, बांगूरनगरमधील एकुण ६ लाख चौ.मी. क्षेत्रापैकी ४ लाख चौ.मी.क्षेत्रात ५० खाजगी गृहनिर्माण सहकारी संस्था १९६९ पासून अस्तित्वात असून, यामध्ये २० हजार रहिवाशी वास्तव्य करीत असणे, सदरहू भूखंडावरील आरक्षणे ही गेले ५६ वर्षापासून कायम असून त्यांनतर राज्य शासनाने मंजूर केलेल्या २०३४ च्या नवीन डीपीआरनुसार देखील आरक्षणे कायम असणे, परंतु आरक्षित भूखंडाचे संरक्षण करण्यास शासन व महापालिकेस अपयश आल्याने, भूखंडावर अतिक्रमण होऊन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भूखंड गमाविण्याचा निर्माण झालेला धोका,तसेच बांगूरनगर शेजारील भागात कांदळवन नष्ट करुन सीआरझेड क्षेत्रात भराव टाकुण मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे करण्यात येणे, या संदर्भात बांगूरनगर रेसिडेन्ट असोसिएशन तसेच मुंबई महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी बांगूरनगर पोलीस ठाण्यात ५ ते ६ वेळा गुन्हे नोंदवूनही अद्याप यावर कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, डीपीआर २०३४ नुसार शासनाने सार्वजनिक राखीव भूखंडाचे संरक्षण करुन त्यावरील अतिक्रमणे काढून सार्वजनिक हितार्थ प्रकल्प उभारण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही" | |
| १३०. | श्रीमती मंदा म्हात्रे वि. स. स. | " नवी मुंबई शहर हे झपाट्याने विकासाच्या मार्गाने जात असणे, नवी मुंबई शहर हे मुंबई महानगर प्रदेशातील एक वेगाने वाढणारे क्षेत्र असणे, अशा सुनियोजित शहराला या अनधिकृतपणे उभ्या असलेल्या आर.सी.सी.बांधकाम व धाब्यामुळे नवी मुंबई शहराला बकाल स्वरूप निर्माण होणे, सदर धाबे रात्री उशिरापर्यंत चालू असणे त्यामुळे सदर धाब्यांवर, आमली पदार्थ विक्री, दारू विक्रीच्या माध्यमातून अनैतिक प्रकार घडण्याची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शक्यता नाकारता येत नसणे, सदर धाब्यावर सिडको व नवी मुंबई महानगरपालिका मार्फत दि.०५/०८/२०२५ रोजी तोडक कारवाई करण्यात आली असणे, परंतु पुन्हा एकदा धाबा मालकाने बांधकाम करून बेकायदेशीर धाबा उभारला असणे, त्यामुळे बेकायदेशीर अनधिकृत असलेल्या धाब्यांवर सिडको व नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई पोलीस प्रशासन ही कोणत्याच प्रकारची कार्यवाही करीत नसणे, याबाबत सिडको व नवी मुंबई महानगरपालिका,नवी मुंबई पोलीस अधिकाऱ्यांचे या धाबे मालकांबरोबर धागेदोरे आहेत का ? हे तपासणे अत्यंत महत्वाचे असणे व बेलापूर सेक्टर १२/१३ रेती बंदर येथील परिसरात अनधिकृतपणे उभ्या असलेल्या आर.सी.सी. बांधकामांवर व धाब्यांवर पूर्णपणे जमीनदोस्त करण्याची तोडक कारवाई करण्याचे आदेश देणार का ? व धाबे मालकावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १३१. | डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | " नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवनातील साधुग्रामच्या जागेतील १ हजार ८२५ झाडे तोडण्याचा निर्णय घेतलेला असणे, यामध्ये ४०० पेक्षा जास्त वडाची झाडे तोडण्यात येणार असणे, सिंहस्थ भूमीमध्ये तपोवन परिसरात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | साधुग्रामसाठी असंख्य प्राचीन वृक्ष नष्ट करण्याचा घाट शासनाने घातलेला असल्याची धक्कादायक बाब दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी उघडकीस येणे, महानगरपालिकेने साधुग्राम परिसरात २२० कोटींचे कमर्शीयल पार्क प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू केलेली असणे, सदर प्रकल्पासाठी हजारो डेरेदार प्राचीन वृक्षांची कत्तल करण्यात येणार असणे, सदर वृक्षतोडी विरोधात वृक्षप्रेमी व पर्यावरणप्रेमींनी माहे नोव्हेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यापासून दररोज आंदोलने सुरू केलेली असणे, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी पर्यावरणप्रेमी व नागरीकांनी तपोवनातील झाडांच्या भोवताली रिंगण करुन फेरी मारणे, झाडांना मिठी मारुन चिपको आंदोलन केलेले असणे, सदर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्यासाठी वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमी व सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री, मा.पालकमंत्री,नाशिक जिल्हा, जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही केली जात नसणे, यामुळे राज्यभरातील वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक संघटना, जागरुक नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चिडीची भावना, सदरची वृक्षतोडीचा निर्णय रद्द न घेतल्यास दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजीपासून सुरू होणाऱ्या नागपूर येथील विधीमंडळाच्या अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, मोठे प्राचीन वृक्ष पर्यावरणाच्या दृष्टीने तसेच मानवी जीवनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्वाचे असल्याने सदरच्या वृक्षांचे संवर्धन व जोपासना करणे गरजेचे असणे, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १३२. | श्री. रवी राणा वि. स. स. | "अमरावती शहरातील मध्यभागी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भव्यदिव्य असे स्मारक उभारण्यात यावे, ज्यातून डॉ. आंबेडकरांच्या महान कार्याचा गौरव होईल व भावी पिढीला प्रेरणा मिळेल, अशी स्थानिकांची दीर्घकाळापासूनची अपेक्षा असणे, संबंधित परिसरातील आवश्यक खाजगी जागा शासनाने विकत घेऊन स्मारक उभारण्यासाठी अनेक वेळा अमरावती महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठका घेऊन हा विषय पुढे आणण्यात आला असणे, तसेच या कृती आराखड्यास मंजुरी मिळावी आणि स्मारक उभारणीसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून शासनाकडे वारंवार पत्रव्यवहारही करण्यात आला | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, या स्मारकाचे उभारणे हे शहराच्या वैचारिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीशी निगडित असून, त्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे अत्यंत आवश्यक असणे, आवश्यक निधी मंजूर करून पुढील सर्व प्रशासकीय कार्यवाही गतीने पूर्ण करण्यात यावी याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १३३. | श्री. राजेंद्र गावित. वि. स. स. | "पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ५६, ८४ व ९४ मधील तब्बल ३५ तलाव हे पुरातन काळातील ऐतिहासिक तीर्थ तलाव असूनही, मागील पाच वर्षांपासून त्यांच्या दुरुस्ती, देखभाल व स्वच्छतेकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले असून, तलावांची योग्य साफसफाई न करता महापालिकेकडून सुमारे दहा कोटी रुपये खर्च दाखविण्यात आला असणे, अनेक तलावात शेवाळ व वेलींची प्रचंड वाढ झाल्याने स्नानासाठी येणाऱ्या यात्रेकरूंच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणे, तसेच काही तलावांमध्ये मत्स्यपालन करणाऱ्या ठेकेदारांकडून घाणेरडे पदार्थ टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत विचारणा केल्यास संबंधित ठेकेदारांकडून दमदाटी केली जाणे, उक्त प्रकरणी माहिती अधिकाराखाली तलाव लिलावाची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | माहिती मागितल्यास पालिकेतील प्रभाग-ई चे अधिकारी तीन महिन्यांपासून माहिती लपवीत असणे, सदर प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करुन तलावांची स्वच्छता त्वरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १३४. | श्री. अबू आझमी. वि. स. स. | " "भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत भिवंडी शहरातील प्रमुख अंजूरफाटा ते राजीव गांधी चौक रोडवरील दुकाने आणि घरे यांना मेट्रो प्रकल्प व प्रारूप विकास आराखडा यांच्या नावाखाली केवळ २४ तासांचा नोटीस देऊन, कोणताही पंचनामा न करता आणि कोणतीही नुकसानभरपाई न देता तोडण्यात आले असल्याची बाबा दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अंजूरफाटा–राजीव गांधी चौक हा मार्ग पुढे कल्याण रोड–टेमघर मार्गाशी जोडला जात असल्याने संपूर्ण मार्गावरील (कल्याण रोड) सर्व दुकानदार, घरमालक तसेच मार्गावरील मंदिरे, मशिदी, दरगाह इत्यादी धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांमध्येही संभाव्य तोडक कारवाईबाबत तीव्र भीतीचे वातावरण निर्माण होणे, राज्य सरकारने राजीव गांधी चौक ते टेमघर मार्गावरील ५ मंदिरे, २ मशिदी, २ दरगाह, १ कब्रस्तान, १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्मारक तसेच हजारो नागरिकांचे घर व रोजगार सुरक्षित ठेवण्यासाठी सुमारे १७०० कोटी खर्च करून भूमिगत मेट्रोचा निर्णय घेतला असतानाही भिवंडी निजामपूर महानगरपालिका त्याच मार्गावर रस्ता रुंदीकरणाची योजना राबवत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संभ्रम व चिंता निर्माण होणे, होत असलेली कारवाई थांबविण्याकरिता मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, आयुक्त एमएमआरडीए यांना भेटून निवेदन देण्यात येणे, सदर विषयी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १३५. | श्री. रईस शेख वि. स. स. | " भिवंडी–निजामपूरमहानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत डबघाईचीअसणे, मनपातर्फे अनेक कामेसुरु, सध्यस्थिती तमौ.चाविंद्रा-पोगाव येथील आरक्षण क्रमांक १२४ अ या भूखंडावर प्र.आवास योजनेतंर्गत ६३४८ घरांचा प्रकल्प प्रस्तावित, सध्याच्या दरानेसदर प्रकल्पाची किंमत १००० कोटी रुपये असणे, भिवंडी शहरहे मजुरांचे शहर याठिकाणीआर्थिक दुर्बल घटकांसाठी लोकांनाही घरे परवडणारी नसणे, त्याचबरोबर सदर प्रकल्प हा शहराच्या मध्यभागी असून व मनपाच्या कचरा डम्पिंग ग्राऊंडच्या लगत असणे, व यापेक्षा बऱ्याच कमी किंमतीत घरे विक्रीसाठी उपलब्ध नसणे,असे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असतांनाही मनपाने प्रकल्प हाती घेण्यापूर्वी कार्यक्षमता,साध्यता,शक्यता तपासणे गरजेचे असतांनाही प्रकल्प प्रस्तावित करणे, त्याचबरोबर मनपा क्षेत्रामधील धोकादायक व जुन्या/ मोडकळीस आलेल्या इमारतीचा समूह विकास पध्दतीने पुनर्विकासास चालना मिळण्याकरिता सदर योजने अंतर्गत विकास करावयाच्या क्षेत्रामध्ये पुनर्निमाण करतांना वाढीव घनतेनुसार लागणारे आवश्यक रुंदीचे रस्ते, खुले क्षेत्र व इतरआवश्यक सोयी सुविधा पुरविणेअशक्य होणे, त्याकरिता एकत्रिकृत वि.नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम मध्ये शिथिलता आणण्याची, प्र.क्र १० मध्ये City S.Regulation अंतर्गत मनपासाठी विशेष तरतुदीची आवश्यकता, मनपा कार्यक्षेत्रातसी.सीटी.व्ही बसविण्या करिता रस्ता खोदतांना मनपाची जलवाहिनी, इलेक्ट्रीक केबल नादुरुस्त करणे, रस्ताखोदाई करतांना जेसीबी मशिनच्या सहायाने शहरातील मुख्य दळणवळणाचे रस्तेखोदुन डेब्रीज व इतर मटेरियल न उचलता तेथेच ठेवल्यामुळे नागरिकांना होत असलेली अडचण, जागोजागी खोदकाम केल्यामुळे अनेकदा होत असलेले अपघात, तसेच रस्ताखोदाई परवानगी मिळण्याकरिता अर्ज केले असता विना शुल्क देण्यात आलेली | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परवानगी, उक्त कंपनी कडून कोणतेही रस्ते खोदाई शुल्क न आकारल्यामुळे जलवाहिनी,इलेक्ट्रीक केबल दुरुस्तीचा खर्च मनपाला करावा लागणे, रस्ता दुरुस्ती करिता अंदाजे रक्कम रु ३५,०१,४२,६८२/- इतका खर्च अपेक्षितअसणे, उक्त कंपनीकडे रस्ते दुरुस्तीचा खर्चवसुल करणे अथवा रस्तेतात्काळ दुरुस्ती होणेआवश्यकता तसेच मनपाची स्थितीपाहता शासनाने रस्ता दुरुस्ती करिता निधी उपलब्ध करुन देण्याची नितांतआवश्यकता, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ प्रकल्पात भिवंडी विभागात भुयारी मार्गाऐवजी पूर्वीप्रमाणे उन्नत मार्गाने मेट्रो उभारण्याची मागणी होणे, भिवंडी शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे व स्व. राजीव गांधी उड्डाणपूलांचे पुनर्निर्माण करून नागपूरच्या धर्तीवर मेट्रोसह उड्डाणपूल उभारणी आवश्यक असणे, शहरातील अनेक रस्ते रुंदीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत तात्काळ निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १३६. | श्री. रवी राणा वि. स. स. | " विद्यमान मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या पत्राद्वारे नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या धर्तीवर अमरावती महानगरपालिका मुख्यालयाची अत्याधुनिक व सुसज्ज नवी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इमारत उभारण्यासाठी आवश्यक निधी मंजुरीसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीं शासनास प्रस्ताव सादर केला असणे, शासनाने प्राथमिक कार्यवाही करून मनपा अमरावती यांना आवश्यक कागदपत्रे व प्रकल्पविषयक तपशील सादर करण्यासाठी सूचित केले असणे, प्रशासक व आयुक्त, अमरावती महानगरपालिकेने दिनांक ०४/०९/२०२५ रोजी प्रस्तावित इमारत प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल ( DPR ) नगर विकास विभाग, नवि-१६, मंत्रालय, मुंबई यांना सादर केला. त्यानंतर दिनांक १४/१०/२०२५ रोजी प्रकल्पासंदर्भातील अद्ययावत माहिती व पूरक कागदपत्रे पुनः पाठवून प्रकरणाचा नियमित पाठपुरावा केला असणे, वरील सर्व बाबींचा विचार करता, अमरावती मुख्यालयाच्या नव्या अत्याधुनिक इमारतीसाठी शासकीय मंजुरी, निधी वितरण व प्रशासकीय मान्यता तातडीने देणे आवश्यक असून निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १३७. | श्री. अमिन पटेल,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. अस्लम शेख,श्री. रईस शेख वि.स.स. | " मुंबईमध्ये शहर व उपनगरास जोडणारे वाहतुकीचे उड्डाणपूल असणे, हे उड्डाणपूल मुंबईचे सौंदर्य खुलवित असणे, निवडक ठिकाणी उड्डाणपुलाखाली सुशोभिकरण करण्यात आलेले असणे, वाहतुकीचा महामार्ग असलेल्या या उड्डाणपुलाखाली | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जागांवर अवैध अतिक्रमण झालेले असणे, उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेचा सुनियोजित वापर व्हावा अशी सामान्य मुंबईकरांची भावना असणे, मकदूम शाह महिमी (र.अ.) उड्डाणपुलाखाली महापालिकेच्या बी विभागाच्या माध्यमातून सुशोभीकरणाचे काम करण्यात येणे, या उड्डाणपुलाखाली करण्यात आलेले सुशोभीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे, मकदूम शाह महिमी उड्डाणपुलाखाली तीन / चार बेट बनविण्यात आले असणे, या ठिकाणी हो – हो बसचा आर्ट गॅलरी, वाचनालयासाठी आणि कॅन्टीन साठी वापर करण्यात आला असणे, या बस संदर्भातील त्रुटी त्यावेळी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्या असणे, व याबाबत संबधितांना वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आला असणे, परंतु आजमितीस जैसे थे असेच काहीसे दृश्य असणे, बऱ्याच त्रुटी या सुशोभिकरणाच्या कामामध्ये आढळून येताना दिसत असणे, सर जे. जे. मार्ग पोलीस ठाण्यापासून ते मनीष मार्केट पर्यंत करण्यात आलेले सुशोभीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे, या सौंदर्यीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, परिणामी सामान्य मुंबईकर नागरीकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने यावर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १३८. | श्री. अनंत (बाळा) नर वि. स. स. | " मुंबई मनपा च्या रुग्णालयात किंवा अन्य विभागात कंत्राटी पध्दतीने कामगार भरती केली जात असणे, कंत्राटदाराकडून कर्मचारी घेतले जातात त्या कंत्राटी पध्द्तीने भरती केलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी , विमा, इत्यादी शासनाच्या प्रचलित नियमानुसार लाभ उपलब्ध करुन देणे कंत्राटदाराला बंधनकारक असणे, परंतु संबंधित कंत्राटदार कोणत्याही सुविधा कर्मचाऱ्यांना सुविधा पुरवित नसल्याने या कामगारांची मोठी गैरसोय होत असणे, एखादा कर्मचाऱ्यांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला तर विमा कार्डाचा त्याला उपयोग होत नसणे, उक्त कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड पडत असणे, अशाच प्रकारची गैरसोय मुंबईतील जोगेश्वरी पुर्व येथील मनपा रुग्णालयात होत असल्याने येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोणत्याही सुविधा शासनाच्या नियमाप्रमाणे मिळत नसल्याने या कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली चिड व असुरक्षिततेची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया" | कित्ता |
| १३९. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " अकोला महानगरपालिका अंतर्गत सर्वे क्रमांक १५ अकोले | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बुद्रुक येथे महापालिका अंतर्गत विकास आराखडा मध्ये २४ मीटर रस्त्याला लागून असलेल्या अभिनय ची मंजुरी घेत असणे, त्याच्यानंतर सदर आराखडा मध्ये दाखवण्यात आलेला रस्ता सदर विकासक ने मुल मालकाकडून खरेदी करत असणे, सदर आरक्षित रस्त्यावर दि.१०.०४.०८ ला मूळ मालकाची खोटी स्वाक्षरी दाखवून गुंठेवारी प्रकरण दाखल करणे, दि २३.०६.०८ ला महानगरपालिका ने कोणती शहानिशा न करता सदर प्रकरणात गुंठेवारी प्रकरण मान्यता देणे, सदर प्रकरणात गुंठेवारी मान्यता असताना दिनांक १६.०९.०९ रोजी शेत जमीन दाखवून त्याची खरेदी विक्री होत असणे, सदर प्रकरणात ७८ आर जमिनीमधून ३९ आर जमीन गुंठेवारी प्लॉट दाखवून उरलेल्या ३९ आर जमीन एपोरच रस्ता दाखवून सदर अभिनयास मंजुरी घेणे पुन्हा त्याच दाखवलेल्या रस्त्याला नुकसानभरपाई मिळवणं करिता प्रकरण दाखल केले, त्या अधिकारीला वास्तविकरीत्या कोणती अधिकार प्राप्त असताना त्याने अधिकाऱ्यांचा गैर उपयोग करत या प्रकरणांमध्ये महानगरपालिकाचे अडीच कोटी रुपयांचे नुकसान करत असल्याची बाब समोर येणे, हा प्रकार अत्यंत गंभीर असून याप्रकरणी शासनाने सदर अधिकारी वर तातडीने शासनाला | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | फसवल्याबद्दल फौजदारी स्वरूपाची कारवाई करणे व या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १४०. | श्री.सुनिल कांबळे, श्री. भिमराव तापकीर, वि. स. स. | " पुणे महानगरपालिकेने “नॅशनल क्लीन एअर प्रोग्रॅम" अंतर्गत जुलै २०२१ मध्ये ८०.०९ लाख खर्चून तीन धूळनियंत्रण टँकर खरेदी केले आणि त्यांच्या अतिरिक्त खर्चही मंजूर केला असणे, मात्र हे टँकर गेली तीन वर्षे प्रत्यक्ष वापरात न आणता अडगळीत पडल्याचे समोर आले असणे, ही गंभीर प्रशासकीय निष्काळजी आणि निधी अपव्ययाची बाब आहे. टँकरचा “मर्यादित वापर" झाल्याचा दावा GPS लॉग, रूट शीट किंवा अधिकृत नोंदींनी समर्थित नसल्याने निधीचा गैरवापर व तथ्य दडपण्याचा संशय निर्माण होतो. याचबरोबर रस्त्यावरील धूळ साफ करण्यासाठी असणारी इतर यंत्रसामग्री व वाहने मोठ्या प्रमाणात दुरवस्थेत असून, त्यांची कार्यक्षमता संपलेली असूनही कागदोपत्री काम दाखवले जात असणे, ही बाब परिस्थिती अधिक गंभीर करते. म्हणजेच प्रत्यक्षात धूळ नियंत्रणाची कोणतीही परिणामकारक यंत्रणा कार्यरत नाही. विशेष म्हणजे मागील तीन वर्षांमध्ये घनकचरा विभागाच्या खरेदी व निविदा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रक्रियांमध्ये वारंवार गंभीर अनियमितता आढळून आल्या असून महापालिकेचे कोट्यवधी रुपये निष्फळ खर्चात गेले असणे, त्यामुळे टँकर प्रकरणातील अपारदर्शकता ही विभागाच्या संपूर्ण तीन वर्षांच्या कामकाजाच्या लेखापरीक्षणाची गरज अधोरेखित करणे, तसेच आता पुन्हा ₹८४.९० लाखांची निविदा काढून तेच टँकर फक्त तीन रस्त्यांवर वापरणे अवैज्ञानिक असणे, म्हणून संपूर्ण प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदाऱ्या निश्चित करणे व GPS-आधारित ट्रॅकिंग अनिवार्य करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १४१. | श्रीमती देवयानी फरांदे,श्रीमती सरोज अहिरे वि. स. स. | " नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळा पर्वणी होणार असणे, यासाठी विविध कामे नाशिक महानगरपालिकेकडून केली जात असणे, यात प्रामुख्याने सांडपाण्याची व्यवस्था पावसाळी गटार , पिण्याची पाईप लाईन व एम एन जी एल ची पाईपलाईन व सीसीटीव्हीच्या वायर भूमिगत करणे, यासारखी कामे करण्यात येणार असणे याबाबतचे अंदाजपत्रक तयार करताना मोठ्या प्रमाणावर त्रुटी असणे, पिण्याची पाईपलाईन टाकतांना नागरिक वापर करत असणाऱ्या जॉगिंग ट्रॅक व इतर नागरी सुविधा यांचे नुकसान होणे, हे नुकसान तसेच रस्त्यावरून भूमिगत पाईपलाईन व भूमिगत सांडपाणी योजना टाकताना होणारे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रस्त्याचे नुकसान, हे दुरुस्त करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अंदाजपत्रकात न करणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण होऊ शकणारा असंतोष, परिपूर्ण व पाईपलाईन टाकल्यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करून नव्याने अंदाजपत्रक तयार करण्याची असणारी आवश्यकता, रस्त्याच्या अंदाजपत्रक तयार करताना देखील योग्य प्रकारे अंदाजपत्रके तयार नकरता अपूर्ण अंदाजपत्रक तयार करणे, रस्त्याचे काम केल्यानंतर पाच वर्षात सदर रस्ता खोदायला लागणार नाही यासाठी आवश्यक तरतूद करण्याची असणारी आवश्यकता,रस्ता खोदायला लागल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्याची असणारी आवश्यकता,आयुक्त तथा प्रशासक नाशिक महानगरपालिका यांचे या बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यामुळे लोकांमध्ये निर्माण होणारी असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १४२. | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | " नाशिक महानगरपालिका क्षेत्रात नाशिक महानगर पालिके द्वारे करण्यात आलेल्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता असणे, नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत काढण्यात आलेल्या ई-टेंडर क्रमांक | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | NMC/E-tender Cell/०३/२०२५-२६ संदर्भात देखील मोठ्या प्रमाणावर अनियमितता असणे, पहिल्यांदा टेंडर काढल्यानंतर ते ओपन करण्यात आलेले नसताना केवळ एका ठेकेदारावर टेंडर ओपन करण्यात येणे, किरकोळ करण्यासाठी टेंडर रद्द न करण्याचे शासन निर्णय असताना एकाच ठेकेदाराचे नावाने टेंडर ओपन करण्यात येणे, शाब्दिक छळ करून टी अँड टी कंपनीचे टेंडर रद्द करण्यात येणे, टेंडर प्रक्रिया करणाऱ्या अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांचा टेंडर घेणाऱ्या कंपनीत असणार सहभाग, त्यातून महानगरपालिकेची माहिती दिली जाऊन महानगरपालिकेचे होतं असणारे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान, याबाबत वरिष्ठ पातळीवरून तसेच आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी पत्र देऊन देखील त्याकडे दुर्लक्ष केले जाणे, लोकप्रतिनिधींना पत्राचे उत्तर देखील न देणे, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, अधिकाऱ्यांच्या सुरू असणारा मनमानी कारभार त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| १४३. | श्री. राजु तोडसाम वि. स. स. | " स्व.मंजुळा माधव तेलंग यांचे वारसा हक्काने कायदेशीर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वारस श्रीमती कांता गिरीजा शांकर तेलंग यांच्या मालकीच्या न.भू.क्र.७२४/५ विलेपार्ले (पूर्व),ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर या मालमत्तेचे शासनाची दिशाभूल करीत खोटे व बनावटी कागदपत्रे बनवून श्री. मंगेश माधव तलंग यांनी मे. एस. के. रिलेटर्स यांच्याशी करार करून गैरकायदेशीर बांधकाम करीत असणे, सदर व्यक्तीने कु. मंजुळा माधव तेलंग तसेच मंगेश माधव तलंग यांनी तेलंग या आडनावाचा गैरफायदा घेऊन मंजुळाबेन माधव तेलंग हिच्या जामनगर येथील फलागाव (गुजरात) येथील मृत्यु दाखविले परंतु सदर चौकशी केल्यावर त्या गावी मंजुळा यांचे कोणतेही नातेवाईक नसल्याचे कळते, तसेच वडील महादेव उर्फ माधव तलंग यांना पालघर येथील गाव विसरोळी येथील रहिवारी व तेथेच मृत झाल्याचे कळते, परंतु सदर गावात ग्रामपंचायत चौकशी केल्यावर अशा नावाचे कोणतेही व्यक्ती किंवा त्याचे नातलग या गावी राहत नसल्याचे समजणे, अशाप्रकारे मंगेश माधव तलंग यांनी शासनाची दिशाभूल करुन खोटे दस्तऐवज बनवून सदर जागा हडपण्याचा प्रयत्न करणे, जा.क्र.क्र.१२/२४ दि.१२.०३.२०२४ कृष्णात कणषे,जिल्हाअधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर यास व जा.पत्र क्र.०६/२४ दि.०८-०८-२०२४ आयुक्त, बृहन्मुंबई | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महानगरपालिका यास मे.एस.के.रिलेटर्स यांच्यावर कायदेशिर कारवाई करुन तात्काळ बांधकामास स्थगिती देण्याबाबत दिले परंतु अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसणे, मंजुळा माधव तेलंग हिचे वारसास कांता गिरीजाशंकर तेलंग या दलित महिलेला न्याय मिळवून देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १४४. | श्री. संजय गायकवाड, वि. स. स. | " बुलढाणा शहराच्या सन १९९१ च्या मंजूर विकास योजना आराखडयामध्ये सर्व्हे नं.४/१ मध्ये Play Ground चे आरक्षण असणे, शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २१ डिसेंबर १९९५ रोजी राज्यातील शहराच्या विकास योजनेमध्ये क्रिडांगणासाठी आरक्षित असणाऱ्या जागां मध्ये कोणताही फेरबदल करण्यांत येऊ नये याबाबत शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय झालेला असणे, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सदर क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जमिनीवरच नियमबाहय रित्या अकृषक आदेश पारीत करुन नियमांचा भंग करणे, सदर आरक्षित क्षेत्र असलेल्या काही भागावर एका जमिन मालकाने बेकायदेशिररित्या गुंठेवारी नियमानुकुल अधिनियमाखाली नगर परिषदेकडून परवानगी प्राप्त करुन सदर जागेचा मंगल कार्यालय | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | या प्रयोजनार्थ वाणिज्य वापर चालु करणे, सदर जागेवर गुंठेवारी अधिनियमाखाली भुखंड नियमानुकुल करण्याबाबत नगर परिषदेने बेकायदेशिररित्या दिलेला आदेश, त्यावर दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणे, सदर भुखंडावर झालेले अनाधिकृत बांधकाम पाडणे, खेळाचे मैदान या प्रयोजनार्थ सुविधा क्षेत्र म्हणून दर्शविलेली सदर जागा शासनाने ताब्यात घेणे, तसेच या नियमबाहय गुंठेवारी प्रकरणात जबाबदार असलेल्या संबंधितांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| १४५. | श्री. अमल महाडिक. वि. स. स. | " राज्य शासनाच्या स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदार संघांमध्ये घनकचरा निर्मूलन प्रकल्प उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना ऑगस्ट २०२५ मध्ये निवेदन देणे कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ठिकाणी घनकचरा उठाव करतात टिपऱ्यांची संख्या पुरेशी नसल्याने बऱ्याच ठिकाणी दोन-तीन दिवसातून घनकचरा उचलला जात नसल्याने नागरिकांना मोठ्या समस्या येत असणे, यामुळे शहरात दुर्गंधी पसरून आरोग्याच्या समस्या ही निर्माण होत असणे, कोल्हापूर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शहरात किमान ५० सीएनजी टिपर उपलब्ध करण्याची मागणी करूनही याची पूर्तता प्रशासनाकडून होत नसल्याने शहरातील नागरिक नाराजी व्यक्त करीत असणे, त्यासाठी शासनाकडून स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत कोल्हापूर दक्षिण विभागात स्वतंत्र घनकचरा निर्मूलन प्रकल्प उभारण्यात यावा त्यासाठी पुरेसे प्रमाणात निधी देण्यात यावा अशी कोल्हापूर येथील स्थानिक लोकप्रतिनिधीची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना" | |
| १४६. | श्री. अमल महाडिक,श्री. राजेश क्षिरसागर वि. स. स. | " कोल्हापूर महानगरपालिकेचा सुधारित आकृतिबंध शासन निर्णय क्रमांकः- कोमपा-२०२३/प्र.क्र.२७/नवी-१९ मार्च २०२४ ने मंजूर करण्यात येणे, याद्वारे वर्ग १ ते ४ संवर्गातील ४४४५ पदभरती करिता मंजुरी देणे, परंतु, यातील सुमारे १७२२ पदे (३९ टक्के) पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणे, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी करण्यात येणे, मात्र अद्यापि शासनाने सदरचे रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, याबाबत शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेतील असलेली रिक्त पदे भरण्याबाबत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ." | |
| १४७. | श्री. अमल महाडिक वि. स. स. | " कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये पवडी विभागामध्ये काम करीत असलेल्या १०० कर्मचाऱ्यांना को.म.न.पा प्रशासनाने कामाच्या सोयीसाठी सन २००२ साली आरोग्य खात्यामध्ये वर्ग केलेले असणे, त्यानुसार आरोग्य खात्या अंतर्गत या कर्मचाऱ्यांनी रस्ता सफाई, गटर, चॅनेल सफाई, कचरा गाडी व घंटागाडी अशा कामावर प्रत्यक्ष काम करणे, यापैकी अनेक कर्मचारी सेवा निवृत्त झाले असल्याने या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वारसांना वारसा हक्कानुसार नोकरी मिळणेबाबत लेखी पत्रान्वये मागणी केली असता को.म.न.पा कडून त्यांना आपण खुल्या प्रवर्गातील असल्याने वारसा हक्कानुसार नोकरी देता येत नसल्याचे सांगण्यात येणे, त्यामुळे या सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या वारसावर उपासमारीची वेळ आलेली असणे, अशाप्रकारे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसा मध्ये पसरलेली भीती, परंतु शासन धोरणानुसार सेवा निवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्यांच्या शिक्षणानुसार वारसा हक्कानुसार नोकरी मिळणेबाबत सदर सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनी विनंती अर्ज केलेला असणे, त्यास्तव सदरहू कोल्हापूर महानगरपालिकेतील सेवा निवृत्ती कर्मचाऱ्यांच्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वारसांना वारसा हक्क तत्वानुसार नोकरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| १४८. | श्रीमती सरोज अहिरे वि. स. स. | " शासनाने नाशिक जिल्हा व तालुक्यांमध्ये नाशिक महानगरपालिकेला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेकरीता तसेच देवरगांव, धोडेगाव, कश्यपीनगर व गाळोखी या गावांना शेतीकरीता पाणीपुरवठा करण्यासाठी कश्यपी धरण बांधण्यात आलेले असणे, सदर धरणाचे काम सुमारे २८ वर्षापूर्वीच पूर्ण झालेले असणे, कश्यपी धरणासाठी तेथील आदिवासींच्या जमिनी संपादित केलेल्या असणे तथापि नाशिक महानगरपालिकेने कश्यपी धरणग्रस्तांच्या धरणग्रस्तांना नोकऱ्या न देणे, नुकसान भरपाई न देणे यासह अनेक मागण्यांची अदयापी पूर्तता करण्यात आलेली नसणे, याबाबत शासनाने १९९२ च्या धोरणानुसार सर्व संबंधिताना लाभ देण्याबाबत आदेश देऊनही त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, परिणामी कश्यपी धरणांतर्गत जमिनी संपादित करणाऱ्या नागरिकांची तसेच सर्वसामान्य जनतेची होत असलेली दिशाभूल त्याबाबत धरणग्रस्तांना नोकऱ्या देण्याबाबत तसेच देण्यात येणारे लाभ मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | कित्ता |
| १४९. | श्रीमती सरोज अहिरे, | " शासनाच्या माध्यमातून क्लीन गोदावरी मोहिम राबविण्यात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती सीमा महेश हिरे, वि. स. स. | येत असणे, या मोहिमे अंतर्गत नाशिक महानगरपालिकेकडून फिल्ट्रेशन प्लाँटमधून ट्रीटेड वॉटर (प्रक्रियायुक्त पाणी) गोदावरी नदीत सोडले जात असणे, तथापि एकीकडे, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि. ४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास कुठूनही नाले किंवा ड्रेनेज नदीपात्रात सोडले जाणार नाही असे सांगण्यात येणे, परंतु शहरातील गंगापूर परिसरापासून तपोवनापर्यंत तब्बल दहा ठिकाणी पावसाळी पाईपलाईन मधून सांडपाणी तर १२ छोटे नाले नदीत मिसळले जाण्याची दिवसेंदिवस वाढणारे प्रकार, त्याबाबत महापालिकेने कालबाहय झालेल्या तंत्रज्ञानामुळे २०२० मध्ये केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यात येणे, परंतु सदर प्रस्ताव आतापर्यंत मंजूर झालेला नसणे, तसेच राष्ट्रीय हरित लवादाने नियोजित आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली गोदावरी प्रदुषण रोखण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात येणे, तथापि त्याप्रकरणी पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, परिणामी, तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रती चिडीची भावना, याबाबत शासनाने मा.मुख्यमंत्री, मा.राष्ट्रीय हरित लवाद तसेच सन २०२० मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आलेला प्रस्ताव, याबाबत शासनाने | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १५० | श्री. साजिद खान पठाण वि. स. स. | " तत्कालीन सरकारने अकोला जिल्हयात विविध विकास प्रकल्पांना देण्यात आलेली मंजुरी, सदर कामांमध्ये अकोला (शिवाणी ) विमानतळ, भूमिगत गटार योजना, राजराजेश्वर मंदिर परिसराचा विकास यासह अनेक कामांना प्रशासकीय मंजूरी देणे, सदर कामे प्रगतीपथावर असल्याबाबत आजी सरकारकडून होत असलेले दावे, प्रत्यक्षात मंजूरी मिळूनही अदयाप निधी प्राप्त होणे, विदर्भासाठी अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प रखडल्यामुळे विदर्भाचा विकासास बसलेली खीळ, ग्रामदैवत श्री राजेराजेश्वर मंदिराला “ब" वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळूनही निधी अभावी विकास खुंटलेला असणे, सदर कामाकरीता ५० कोटीचा निधी मंजूर असणे, त्याचबरोबर विमानतळ शहरात निधी अभाव प्रलंबित, भूमिगत गटार योजनेसाठी ७५० कोटी रुपये मंजूर, यापैकी एकही टप्प अदयाप महापालिकेला मिळालेला नसणे,शासनाकडून घोषणा पलीकडे काहीही कार्यवाही न होणे, प्रकल्प कागदावरच असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून विदर्भाच्या विकासाला गती मिळावी यादृष्टीने पावले उचलावीत व तात्काळ मंजूर निधी अदा/ | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वितरीत करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १५१. | श्री. मोहन मते, वि. स. स. | "मुंबईतील गिरगाव येथील केळेवाडीतून चर्नीरोड स्टेशनकडे जाणारा पादचारी पूल (FOB) नूतणीकरणासाठी सुमारे ५ वर्षांपूर्वी सन २०१९ मध्ये तोडण्यात आला असणे, त्याच्या जागी आता नवीन पूल बांधण्याचे काम तब्बल ४ वर्षांपासून प्रलंबीत असणे, मुळात धोकादायक नसतानाही हा पूल पाडण्याच्या मुंबई महानगरपालिकेच्या निर्णयास स्थानिक जनेतेने केलेला तीव्र विरोध, त्यामुळे तत्कालिन मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी हा पूलांच्या उभारणीचे काम तातडीने पूर्ण करण्याचे दिलेले आश्वासन, परंतु आजमितीपर्यंत सदरहू आश्वासनाची पूर्तता करण्यात मुंबई महानगरपालिकेला आलेले अपयश, परिणामी स्थानिक नागरिकांची विशेषतः आबालवृद्ध, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी यांची होत असलेली गैरसोय, त्यांना वाहतुकीचा रस्ता ओलांडून रेल्वे स्टेशन गाठण्यासाठी करावी लागत असलेली कसरत, त्यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रति पसरलेली नाराजीची भावना, यास्तव मुंबईतील गिरगाव येथील केळेवाडीतून चर्नीरोड स्टेशनकडे जाणारा पादचारी पूलाची (FOB) तातडीने उभारणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपाययोजना." | |
| १५२. | श्री. संजय उपाध्याय वि. स. स. | " २ ऑक्टोबर वसाहत किडवाईरोड शाळा बिल्डरने पुनर्वसन योजनेत घेतली परंतु बांधून दिलीच नसणे, टॉवर बांधून विकून टाकले असणे, रहिवाशांचे पुनर्वसन सन २०१५ ला झाले असणे, यावर शिक्षण समितीत प्रचंड पडसाद उमटणे, टॉवर विकण्यास NOC कशी दिली गेली ? या NOC ला मनपा वॉर्डअधिकारी यांनी आक्षेप का घेतला नाही ? शिक्षण विभागातील अधिकारी यांनी आक्षेप न घेता जोपर्यंत शाळेचे पुनर्वसन होत नाही तो पर्यंत अशी NOC देणे म्हणजे मोठा घोटाळा असणे, दि. ८ डिसेंबर, २०१७ रोजी बिल्डरला टॉवर विकण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या एस.आर.ए.अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करणे आवश्यक असणे, या NOC ला आक्षेप न घेता संमती देणारे वॉर्ड अधिकारी एफ दक्षिण विभाग व अन्य दोन अधिकारी हे यात सहभागी दिसणे, २ ऑक्टोबर वसाहत किडवाई रोड शाळेत सन २००९ ला २५० विद्यार्थी होते ही शाळा हडप करण्यासाठी वनरूम किचन मध्ये ज्यात टॉयलेट-बाथरूम किचन सोडून फक्त १० फूट जागा बसण्यास होती तेथे ही शाळा तात्पुरती हलवली. शाळेची विद्यार्थी संख्या वनरूम | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | किचन मध्ये हलवल्याने ६५ इतकी कमी होणे, हळू हळू पालकांनी मुलांना शाळेत टाकणे बंद केले असणे, ९ वर्ग खोल्या थोडे मैदान ३७८६.५५ चौ.फूट जागा असलेली शाळा ४ वन रुम किचनमध्ये बसवल्याने शाळा बंद होणे, या बाबत अलिकडील काळात दि.१०/०८/२०२५रोजी मनपा शिक्षण विभागाने २ पत्र बिल्डरला दिली असणे, परंतु २०१६ ते २०२५ पर्यंत शाळा मिळवण्यासाठी मनपा शिक्षण विभागाने कोणतीच गंभीर पावले उचलली नसणे, या गंभीर घोटाळ्या प्रकरणाची चौकशी करत संबंधीतांवर तात्काळ पोलीसांत गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही." | |
| १५३. | श्री. राघवेंद्र पाटील, वि. स. स. | " धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघातील व महानगर पालिका हद्दीतील ११ गावांच्या अतिक्रमित गावठाण जागेवर मागील २५ ते ३० वर्षांपासून अनेक कुटुंब एकाच जागेवर कायम वास्तव्यास येणे, सदर जागेवर वास्तव्य करत असतांना त्यांच्याकडून नगरपालिकेची घरपट्टी व पाणीपट्टी शासन नियमानुसार नियमित वसूल केली जाणे, स्वतःच्या मालकीची जागा नसल्याने त्यांना बँकेकडून कर्ज मिळत नसणे व इतरही शासकीय लाभापासून त्यांना वंचित रहावे लागणे, धुळे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विधानसभा मतदार संघातील व म.न.पा. हद्दीतील अतिक्रमित गावठाण जागेवर राहणाऱ्या रहिवाश्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना हक्काचा ७/१२ मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १५४. | श्री. राजेश मोरे वि. स. स. | " ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील टेमघर, सर्वे क्र. ८०/१३/०, घर क्र. ४६२/०मक, टेमघरपाडा येथे श्रीमती जयश्री सुरेश दिवेकर यांच्या मालकी हक्काच्या जागेवर दुसऱ्या व्यक्तीकडून दादागिरी करत सुमारे २ हजार चौ. फुटांचे दगडी पायावर वीटांचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून, दिनांक १८ जानेवारी, २०२५ व २६ जून, २०२५ रोजी महानगरपालिकेकडे लेखी निवेदन करूनही प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याची कारवाई न होणे, दि. ११ जून, २०२५ रोजी महानगरपालिकेने बांधकाम अनधिकृत घोषित करून आदेश बजावले तरीही कार्यवाही कागदोपत्रीच मर्यादित राहणे, तसेच दि. ०७ जुलै, २०२५, २२ जुलै, २०२५ व १० सप्टेंबर, २०२५ रोजी पोलीस विभागाशी झालेल्या पत्रव्यवहारानंतरही प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने महानगरपालिका व पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, नागरिकांमध्ये संगनमताचा संशय वाढणे आणि सामान्य नागरिकांच्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | न्यायप्राप्तीवरील विश्वासाला धक्का पोहोचणे, याबाबत या अनुषंगाने टेमघरपाड्यातील अतिक्रमण तात्काळ हटवून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| १५५. | श्री. राजेश मोरे वि. स. स. | "ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली तालुक्यातील डोंबिवली MIDC निवासी विभागातील ३५ ते ४० वर्षांपूर्वी उभारलेल्या अनेक इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याने त्या कोसळण्याची शक्यता वाढणे, रहिवाशांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होणे, या गंभीर प्रश्नावर MIDC व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्यातील संयुक्त पाहणीसंदर्भातील कारवाई समाधानकारक न दिसणे, तसेच दोन्ही संस्थांच्या टाऊन प्लॅनिंग नियमांतील विसंगतीमुळे पुनर्विकास प्रस्ताव अनेक महिन्यांपासून प्रलंबित राहणे, रहिवाशांच्या सुरक्षेसाठी तातडीचे पुनर्वसन, सुरक्षात्मक उपाययोजना किंवा आर्थिक मान्यता देण्यासंदर्भात शासन स्तरावर निर्णयाचा अभाव दिसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत यावर डोंबिवली MIDC परिसरातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."" | |
| १५६. | श्री. हेमंत रासने, वि. स. स. | " पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतीची दुरावस्था झाली असून कसबा मतदार संघामध्ये एकूण इमारतीची संख्या ४४ असून यामध्ये पूरग्रस्त ४ बैठी चाळी ४ असणे, पुणे शहरात ७८ चाळी व इमारती बैठीघरे असून बैठी घरे वसाहती १० असणे, एकूण सदनिका ३४५९ असून यामध्ये नादुरुस्त सदनिकांची संख्या १८७ असणे, अनेक इमारतीमध्ये मनपा सेवक बिगर महानगरपालिका सेवक सेवानिवृत्त सेवक राहत असून त्यांना अनेक मूलभूत सोयी-सुविधापासून वंचित रहावे लागणे,यामध्ये प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था नसणे,ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसणे, इमारतीमध्ये स्लॅब गळती होणे,काही इमारतीमध्ये स्लॅब पडल्यामुळे नागरिकांना अनेक वेळा दुखापत झाल्याच्या घटनाही घडणे, महापालिकेला भाडे भरुनही सोयी सुविधांपासून नागरिकांना वंचित रहावे लागणे,पुणे महानगरपालिकेने काही वसाहतीचे उदाहरणार्थ राजेंद्रनगर येथील वसाहतीचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू केलेली असून, परंतु त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांनी मालकी हक्काने घरे द्या तसेच या ठिकाणी पूरग्रस्त सुध्दा रहात असून त्यांचाही निर्णय प्रशासन अद्यापपर्यंत घेऊ शकला नसणे तसेच | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनेक अडचणींना महापालिका प्रशासनाकडून कोणीतीही सकारात्मक उत्तरे अथवा कारवाई अद्यापपर्यंत करण्यात न येणे, परिणामी या नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन येथील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. " | |
| १५७. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " मुंबईतील सांताक्रुझ पश्चिम येथील साई दुर्गा को हौ. सो. एफ. पी.नं. ९४ ते १०३, १०६ (पार्ट) पी.एम. रोड खोतवाडी या जमिनीवर विविध आरक्षणे वगळून नियमबाह्यपणे मॉलचे बांधकाम करणे, एसआरए गहाण ठेवून खाजगी बँकेकडून कर्ज उचलून विकासक व वास्तुविशारद यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याने आर्थिक गुन्हे अन्वेषण चौकशी करणे बाबतची मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाकडे केलेली असणे, सदर एसआरए प्रकल्प राबविताना विकासकाने नियमबाह्यपणे आयआयसीआय बँकेकडून ८५ करोड रुपये व भिलवाडा फायनान्सकडून ३५ करोड कर्ज घेऊन एसआरएप्रकल्प गहाण ठेवणे, नियमबाहयपणे रस्त्यावर मॉलचे बांधलेले असणे, ३ विहिरी बुजविल्याप्रकरणी वास्तूविशारद व | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकासकांस दिनांक १०.०६.२०१९ कारणे दाखवा नोटीस तसेच त्यांचेवर दिनांक ४/१२/२०१९ रोजी एफआयआरही नोंदविलेला असणे, विकासकांनी नियमबाह्यरित्या अनधिकृत कामे केल्याबाबत एसआरएने कोट्यवधी रुपयांची दंडात्मक फी भरण्याबाबत दिनांक २१.०५.२०२१ रोजी विकासकास कळविलेले असणे, विविध आरक्षणे गिळंकृत करुन विकासकामार्फत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी विकासकांवर, वास्तुविशारद संबधित एसआरए उपप्रमुख अभियंता, डीपी अभियंता यांची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| १५८. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " हॉरमस हाऊस पुनर्विकास प्रकल्पात सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार व FSI घोटाळ्याबाबत चौकशीची मागणी होत असणे,हा प्रकल्प एम/एस कार्प इस्टेट प्रा. लि. आणि श्री. नामन रेसिडेन्सी प्रा. लि. यांच्याकडून डीसीपीआर २०३४ च्या नियमन ३३ (१२) (A) आणि (B) अंतर्गत राबवला जात असणे २०.०६.२०२५ रोजीच्या सुधारित अहवालानुसार, लाइसेंसिंग सर्व्हेअर (L.S.) M/s तलाटी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ॲड पार्टनर्स LLP यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला सादर केलेल्या फाइल क्र. E/B४३९५/GS/A ला (सुब. अभियंता (बी.पी.) सिटी-एक्स आणि सह. अभियंता (बी.पी.) सिटी-VI) मान्यता दिली असणे, या अहवालात PAP दाव्यांची टप्याटप्प्याने वाढ दाखवली असून, सुरुवातीची १७ PAP संख्या होती त्यास वाढ होऊन आता ७६ PAP पर्यंत नेण्यात आली असणे, त्यामध्ये मोठ्या प्रमानात नियमाचे उलंघन करण्यात आले असणे, यात नियमन ३३ (१२) (A) व (B) तसेच नियमन ३१ (३) अंतर्गत मिळणाऱ्या प्रोत्साहनात्मक आणि फंजीबल FSI लाभांचा समावेश असणे ,परंतु ७६ PAP पैकी कोणत्याही PAP चे अंतिम NOC ला नियमबाह्य मान्यता देण्यात अली, तरीही बांधकाम ३५ व्या मजल्यापर्यंत काम सुरू ठेवण्यात आले असणे, आवश्यक कागदपत्रांशिवाय C.C. (Commencement Certificate) नियमबाह्य दिलेले असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना" | |
| १५९. | श्री. मंगेश कुडाळकर, श्री. अतुल भातखळकर, वि. स. स. | " मुंबईतील सुमारे २५ हजार इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) चटईक्षेत्र निर्देशांक नियमांचा भंग केल्यामुळे व अन्य काही कारणास्तव रखडले असणे, त्यामध्ये, ही बांधकामे नियमानुकूल करण्याकरिता मुंबई महानगर पालिकेने या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संदर्भातील अहवाल नगर विकास खात्याकडे सादर केलेला असणे, परतू, अद्यापावेतो सदर अहवालावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे, मुंबई शहरातील हजारो नागरिकांना पाण्याचा दुप्पट भार नाहक सोसावा लागत असणे, त्यामुळे, विना ओसी इमारतींच्या पाण्याचा दर हा ओसी असलेल्या इमारतीं प्रमाणे लागू करण्याबाबत व इमारतींच्या ओसीसाठी ठोस अभय योजना आखण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया" | |
| १६०. | श्री. सुनिल कांबळे वि. स. स. | " पुणे महानगरपालिका प्रशासनामध्ये सध्या विविध महत्त्वाच्या पदांवर बाहेरच्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना उसनवारीवर, प्रतिनियुक्तीवर किंवा इतर माध्यमांतून नेमण्यात येत असल्याचे निदर्शनास येत असणे, विशेष म्हणजे पुणे महानगरपालिकेमध्येच संबंधित पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, तांत्रिक कौशल्य, स्थानिक अनुभव आणि प्रशासकीय वरिष्ठता असलेले अधिकारी उपलब्ध असतानाही त्यांना डावलून बाहेरून अधिकारी आणण्याची ही प्रवृत्ती संपूर्णपणे अन्यायकारक ठरत असून, महापालिका प्रशासनातील स्थापित सेवा-अधिकार, पदोन्नतीची शिस्त, अंतर्गत कार्यक्षमतेची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ओळख आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या मनोबलावर प्रतिकूल परिणाम करणारी असणे, राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कॅडर-स्ट्रेंथनिंग आणि आंतरिक अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्याबाबत आखून दिलेल्या धोरणांना अशा नेमणुकीमुळे छेद जात असल्याचेही या प्रकरणातून दिसते. महानगरपालिकेतील पात्र अधिकारी उपलब्ध असताना बाहेरून अधिकाऱ्यांना संधी देणे हे केवळ प्रशासनिक दृष्ट्या अनुचित नसून, स्थानिक सेवेवर विश्वास कमी करणारे आणि शासनाच्या पारदर्शकतेवरील धारणा कमकुवत करणारे ठरते. वरीलप्रमाणे गंभीर परिस्थितीचा विचार करून, पुणे महानगरपालिकेमधील विद्यमान पात्र अधिकाऱ्यांना न्याय्य प्राधान्य देऊन, बाहेरून उसनवारी/प्रतिनियुक्तीच्या नेमणुका तात्काळ पुनर्विचारात घेण्यात याव्यात आणि सेवाविषयक अधिकार व वरिष्ठता तत्त्वांचा आदर राखणारी स्पष्ट व पारदर्शक नियोजन प्रणाली शासनाने तत्काळ अमलात आणावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया " | |
| १६१. | श्रीमती स्नेहा दुबे वि. स. स. | " "वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ८००० गृहनिर्माण संस्था, शेकडो चाळी घरे आणि ५२ महसूली गावात हजारो घरे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आदिवासी पाडे असणे, महानगरपालिकेने सीसी दिलेल्या हजारो इमारतींपैकी जवळपास ९०% इमारतींना ओसी दिलेली नसणे, त्याचप्रमाणे वसईच्या मूळ गावातील तसेच गावठणातील घरांना,आदिवासी पाडयातील ५० वर्ष जुन्या घरांबाबत सी.सी./ओ.सी.चा प्रश्न निर्माण होत नसणे, मागील ३० ३५ वर्षांन आता वसई विरारसाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असणे, मा. सर्वोच्य न्यायालयाने दिनांक १७/१२/२०२४ रोजी दिलेल्या आदेशांचा चुकीचा अन्वयार्थ लावून वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात सरसकट नळ जोडणी नाकारणे, या मुद्यावर दिनांक १६/०७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा होऊन "सीसीच्या आधारे पाणी देण्यात यावे" असे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दिले असणे, मात्र ५ महिन्याच्या कालावधीनंतरही महानगरपालिकेकडून या आदेशांची अंमलबजावणी न होणे, दिनांक १७/१२/२०२४ पूर्वीच्या इमारतींना घरांना नळ जोडणी देण्यास कोणतीच बाधा नसल्याची धारणा पक्की करण्याची विनंती महानगरपालिकेने नगर विकास विभागाकडे केलेली असणे, मात्र मागील ६ महिन्यात यावर नगरविकास विभागाकडून कोणतेच उत्तर दिले जात नसणे, दिनांक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १६/०७/२०२५ रोजीच्या बैठकीतील आदेशांचीही महानगरपालिकेकडून अंमलबजावणी न करणे, परिणामी पुरेसे पाणी उपलब्ध असूनही वसई विरारकरांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| १६२. | श्रीमती स्नेहा दुबे वि. स. स. | " वसई विरार शहर महानगरपालिकेने सीसी दिलेल्या हजारो इमारतींपैकी जवळपास ९०% इमारतींना अद्याप ओसी दिलेली नसणे, मागील ३०-३५ वर्षानंतर आता पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असणे, मात्र ओसी दिल्यानसल्याच्या कारणास्तव या इमारतींतील रहिवाश्यांना महानगरपालिकेकडून स्वतंत्र नळजोडणी न देणे, या मुद्यावर दि. १६/०७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा होऊन वसई विरार क्षेत्रात ओसी देण्यासाठी अभय योजना लागू करावी व महानगरपालिकेची थकबाकी घेऊन त्यांना तात्काळ ओसी देण्यासाठी धोरण निश्चित करावे" असा निर्णय झालेला असणे, मात्र ५ महिन्यानंतरही महानगरपालिकेकडून या आदेशांची अंमलबजावणी न होणे, इमारतीला ओसी न घेणाऱ्या विकासकांच्या इतर मालमत्तावर बोजा लावून त्यांचा नवीन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रकल्प मंजूर केला जाणार नाही असे आश्वासन लक्षवेधी सूचनेवर दि. ०९ जुलै २०२५ रोजी शासनाकडून दिलेले असणे, तसेच या विकासकांची 'काळी यादी" तयार करून राज्यातील सर्व महानगरपालिकांना पाठविण्याचे निर्देश सन्माननीय तालिका अध्यक्षांकडून दिलेले असणे, मात्र अद्याप यावर महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही सुरू न करणे, परिणामी अजूनही या इमारतींना ओसी देण्याची प्रक्रिया सुरू केली गेली नसल्याने, मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| १६३ | श्रीमती स्नेहा दुबे वि. स. स. | " वसई विरार शहर महानगरपालिकेत पूर्वीच्या नगरपरिषदा मधून वर्ग करून घेतलेले आणि सन २०१३ मध्ये नव्याने भरती केलेले वैद्यकिय अधिकारी आणि पॅरामेडीकल स्टाफ मागील १५-२० वर्षे शहरात आरोग्य सेवा देत असणे, सन २०१४ मध्ये महानगरपालिकेतील आरोग्य विभागासाठी ४६५ पदांचा आकृतीबंध मंजूर केला असणे, या पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करताना १०-१५ वर्षे सेवेत असलेल्या वैद्यकिय अधिकारी-पॅरामेडिकल स्टाफला सामावून घेण्यासाठी आवश्यक तरतूद सेवा प्रवेश नियमात न केल्याने या स्टाफला | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सेवेत सामावून घेण्यासाठी तांत्रिक अडचणी निर्माण होणे, या कर्मचाऱ्यांनी त्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर दि. १८/०७/२०२४ रोजी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, महानगरपालिकेत कार्यरत ३९४ वैद्यकिय अधिकारी आणि पॅरामेडिकल स्टाफला महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव महानगर पालिकेकडून नगर विकास विभागाकडे सादर करणे, मात्र १ वर्षाच्या कालावधीनंतरही या प्रस्तावावर अद्याप अंतिम निर्णय न होणे, परिणामी या अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष आणि नैराश्याची भावना, महानगर पालिकेच्या रुग्णालयातील रेडिओलॉजिस्ट, बधिरीकरण तज्ञ अशी महत्वाची पदे मागील ८-१० महिन्यापासून रिक्त असल्याने रूग्णांचे हाल होत असणे, परिणामी नागरिकांमध्ये प्रशासनाविरुद्ध रोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १६४. | श्री. दिलीप लांडे वि. स. स. | " मुंबई उपनगरी जिल्ह्यातील मोहिली व्हिलेज व असल्फा व्हिलेज, साकीनाका हा संपूर्ण परिसर डोंगराळ, झोपडपट्टीप्रधान व नागरी सुविधांपासून वंचित असल्याने नागरिकांचे सामाजिक-आर्थिक जीवन आजही अत्यंत दयनीय स्थितीत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, मुंबई विकास आराखडा २०३४ मध्ये सदर परिसरास हरित पट्टा दर्शविल्यामुळे एस.आर.ए., महानगरपालिका किंवा खाजगी विकासकांद्वारे झोपडपट्टी पुनर्विकास करणे पूर्णतः अशक्य होणे, परिणामी हजारो झोपडीधारक गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसन, मूलभूत सुविधा व सुरक्षित वास्तूंच्या प्रतीक्षेत अडकून राहणे, झोपडपट्ट्यांचे डोंगराळ भूस्खलन प्रवण स्वरूप लक्षात घेता आपत्तीचा धोका गंभीरपणे वाढत जाणे, सदर हरित पट्टा कायम ठेवल्याने परिसराच्या विकासावर संपूर्ण बंदी येणे, नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होणे व शासनाच्या सर्वसमावेशक विकास धोरणालाही बाधा पोहोचणे, त्यामुळे सदर परिसरातील हरित पट्टा तात्काळ रद्द करून निवासी झोन आरक्षण करण्याची मागणी सातत्याने होत असून, जनजीवनाच्या सुरक्षेकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १६५. | श्री. किशोर जोरगेवार वि. स. स. | " राज्यातील अनेक महत्त्वाच्या विभागांमध्ये लेखा व वित्तीय कामकाजाशी संबंधित अनेक पदे दीर्घकाळापासून रिक्त असणे,सदर पदांवर भरती प्रक्रियेतील अटी व निकष बदलल्यामुळे वाणिज्य शाखा पदवीधरांवर झालेला अन्याय, यापूर्वी अशा पदांसाठी B.Com ही प्रमुख व मूलभूत पात्रता | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असून त्यात बदल करुन शासनाने “Any Degree" अशी अट टाकणे,तसेच काही ठिकाणी ३ ते ५ वर्षांचा अनुभव अनिवार्य करण्यात येणे, त्याचप्रमाणे काही खाजगी कोर्सेस अनिवार्य करण्यात येणे, या निर्णयामुळे वाणिज्य शाखा पदवीधर तरुणांमध्ये वाढता असंतोष, राज्यात सहकार विभागातील लेखापरीक्षक पदांची सुमारे ३२२ पदे रिक्त असणे, मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) लेखा व लेखापरीक्षण विभागातील अनेक पदे गेली दहा वर्षे भरण्यात आलेली नसणे, राज्यातील इतर विभागांमध्ये देखील लेखा व वित्तीय शाखेशी संबंधित मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून भरती स्थगित असणे, त्यामुळ वाणिज्य शाखा पदवीधर विद्यार्थ्यांकडून सहकार विभाग, BMC तसेच इतर विभागांतील लेखापरीक्षक व लेखा विभागातील सर्व रिक्त पदांची तातडीने भरती करण्याची आवश्यकता, लेखा व वित्तीय शाखेशी संबंधित सर्व पदांसाठी B.Com हीच अनिवार्य शैक्षणिक पात्रता ठेवण्याची तसेच ३ ते ५ वर्षांचा जाचक अनुभव व अनावश्यक खाजगी कोर्सेसची अट रद्द करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १६६. | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | " नाशिक शहरात उत्पादन शुल्क विभागाकडून बियर बार व | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दारू विक्री परवाना देताना मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असणे, बियर बार व दारू दुकानासाठी लागणाऱ्या कमीत कमी गरजांकडे देखील दुर्लक्ष करून दारू विक्री परवाना दिला जात असणे, बारसाठी परवानगी देताना शौचालय, ड्रेनेज व्यवस्था व पार्किंग नसणाऱ्या जागांवर देखील परवानगी दिली. जात असणे, सर्वोच्च न्यायालय यांचे आदेश असतांना व धर्मदाय आयुक्त विस्वस्त संस्थांना मान्यता देत आसतांना मंदीरासाठी नोंदणीची अट टाकली जाणे, त्यामुळे शहरात सर्वत्र अस्वच्छतेचे वातावरण तयार होत असणे, तसेच रस्त्यावर गाड्या लागल्यामुळे वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. वर्षानुवर्ष कार्यरत असणाऱ्या देवळाच्या जवळ बिअर बारला परवानगी देऊन शहरातील धार्मिक वातावरण खराब करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जात असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सांगितल्यानंतर देखील उत्पादन शुल्क विभागाची अडमुठी पणाची भूमिका घेतली जात आहे. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्यामुळे उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांसह या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तत्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १६७. | श्री. सुधीर मुनगंटीवार वि. स. स. | " चंद्रपूर जिल्हयामधील भद्रावती तालुक्यात मा. न्यायालयाने स्पष्ट आदेश दिल्यानंतरही शेतजमीनीच्या फेरफाराचा निर्णय न घेता तहसिल प्रशासनाकडून टाळाटाळ केल्यामुळे तहसिलदारांच्या निष्क्रियतेला कंटाळून परमेश्वर ईश्वर मेश्राम या शेतकऱ्याने तहसिल कार्यालयातच विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडणे, मृताची मौजा कुरडा गावात वडिलोपार्जीत शेती असणे, त्यांचे वडील जिवंत असताना त्यांनी शेतजमीन विधीवत विक्री करून मुलगा परमेश्वर मेश्राम यांच्या नावे करणे, मा. न्यायालयाने देखील उक्त प्रकरण मान्य करणे, असे असतानाही तहसिल कार्यालय भद्रावती मधून फेरफाराबाबत विविध कारणे दाखवून टाळाटाळ करणे, प्रशासकीय यंत्रणेच्या निष्क्रीय कार्यपध्दतीला कंटाळून या शेतकऱ्याने विष प्राशन करुन आत्महत्या करणे, या गंभीर घटनेकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.." | कित्ता |
| १६८. | श्री. निलेश राणे वि. स. स. | " राज्याच्या वाळू–रेती निर्गती धोरणास दि. ८/४/२०२५ रोजीच्या मंत्री मंडळाची मान्यता, त्यानुषंगाने वाळू /रेती निर्गती धोरण-२०२५ चा शासन निर्णय असतांनाही वाळू | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपलब्धतेमध्ये अडचणी, सिधुदुर्ग जिल्हयात मोठ्या प्रमाणात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा -२ व रमाई आवास या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना घरकुले मंजूर,शहरात/ग्रामीण भागात अनेकांची बांधकामे सुरू असून वाळूच्या अभावामुळे घरांचे बांधकाम अर्धवट स्थितीत व काही कामे ठप्प असणे, तालुका प्रशासनाकडून वाळूमाफियांवर कारवाया होत असल्या तरी त्याची झळ सर्वसामान्य बांधकाम करणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांसह बांधकाम व्यावसायिकांना बसणे, ग्रामीण व शहरी भागात वाळूचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण होणे, जादा दरांनी वाळू खरेदी करण्याची आलेली वेळ, ४ हजार र.प्रति ब्रासवरुन १२ ते १३ हजार रुपये ब्रासवर जाणे, जिल्हा प्रशासनाने वाळू वितरण प्रक्रीया गतीमान करुन घरकुल लाभार्थ्यांना तातडीने वाळू उपलब्ध करुन देण्याची गरज,घाटांचे लिलाव वेळेत करण्याचे महसूल विभागाचे आदेश असतांनाही जाणीवपूर्वक दिरंगाई,अदयापी बहुतेक ठिकाणी वाळू चोरी, नुकतेच जालना तहसिलदारांना वाळू प्रकरणी गोळीबार झाल्याची घटना ताजी असणे, वाळु अभावी घरकुलाची कामे लांबणीवर पडत असल्याने घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना मुदतवाढ मिळावी व शासन | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | धोरणानुसार पाच ब्रास वाळू मोफत मिळावी अशी ग्रामस्थांकडून मागणी,तसेच सर्व घरकुल लाभार्थींना घरपोच वाळू रॉयल्टीची पावती पोहच करणे बंधनकारक असून सदर रॉयल्टी लाभार्थ्यांना ८ दिवसांत न मिळाल्यास तहसिलदार यांना जबाबदार धरण्यात येणार असल्याचे मा.मंत्री महोदयांचे आश्वासन, शासनाच्या काही धोरणांचा फटका गोरगरीबांना बसत असल्याने वाळू अभावी होणारी समस्या लक्षात घेऊन वाळू घाटांचे लिलाव व वाळू पुरवठा सुरळीत करण्याची गरज,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १६९. | श्री. विश्वनाथ भोईर, श्रीमती सुलभा गायकवाड वि. स. स. | " कल्याण (प.) (जि.ठाणे) येथे ५०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय (कॉटेज हॉस्पिटल) उभारण्याची मागणी स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे करण्यात येणे, तथापि अद्याप उपजिल्हा रुग्णालय सुरू न होणे, सदर रुग्णालयाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.०७/०८/२०२५ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केलेला असणे, तसेच याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनीही जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, त्यानुषंगाने तहसिलदार, कल्याण यांनी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दि.०९/१०/२०२५ रोजी मौजे वाडेघर. ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ९/१, क्षेत्र ३-१५-० हे.आर.प्र. पैकी २-००-० ही गुरचरण जागा प्रस्तावित करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास अद्यापही मंजूरी देण्यात आलेली नसणे, त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असणे, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन कल्याण पश्चिम येथे ५०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेला शासकीय भूखंड तात्काळ उपलब्ध करुन देऊन रुग्णालयाच्या उभारणीच्या कामास सुरुवात करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| १७०. | श्री. नानाभाऊ पटोले,श्री. भास्कर जाधव,श्री. मनोज जामसुतकर,श्री. महेश सावंत वि. स. स. | " पुणे येथील महारवतन जमीन, ज्याची बाजारभावानुसार किंमत सुमारे ₹१८०० कोटी रुपये आहे, ती केवळ ₹ ३०० कोटी रुपयांत खरेदी करण्यात येऊन, फक्त ₹ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरून हा व्यवहार करण्यात आल्याचा गैरव्यवहार नोव्हेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात घडला असणे, सदर प्रकरणात शासनाची सुमारे ₹१५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले असणे,या प्रकरणात विद्यमान | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपमुख्यमंत्री महोदयांच्या पुत्रांचे नाव पुढे आले असल्याने या संपूर्ण व्यवहाराची चौकशी करण्यात आली असणे,परंतु चौकशी अंती दोषी व्यक्तींवर अद्यापही कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड, तरी याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही, तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया" | |
| १७१. | श्री. समाधान आवताडे वि. स. स. | " मुंबईतील माहीम येथील सह दुय्यम निबंधक (मुंबई शहर क्र. ५) यांच्या कार्यालयात नोंदणीकृत दस्त क्र. ४५२१/२०२३ मध्ये खोट्या कागदपत्रांच्या आधारे व मालकांची माहिती लपवून शासनाचे सुमारे ७० लाख रुपयांचे नुकसान केल्याबाबत दिनांक १६ जून, २०२५ रोजी तक्रार केली असणे, श्री. जीवन तेलंग यांच्या मालकीच्या 'त्रिवेणी अपार्टमेंट' मधील समुद्रकिनारी असलेल्या फ्लॅट नं. १-अे या सुमारे १० कोटी शासकीय मूल्य (बाजारमूल्य २५ कोटी) असलेल्या मालमत्तेला, 'त्रिवेणी नर्सिंग होम' ची मालमत्ता असल्याचे भासवून, केवळ ४५ हजार रुपये मुद्रांक शुल्क भरून शासनाची दिशाभूल करण्यात आली असणे, सदर प्रकरणात श्री. गिरीश शामजी छेडा व श्रीमती अंजू गिरीश छेडा यांना खोटे भाडेकरू दाखवून आणि मूळ मालक (श्री. तेलंग) यांना पूर्णपणे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अंधारात ठेवून त्यांचे मालकी हक्क बेकायदेशीररीत्या बदलण्यात आले असणे, या गंभीर प्रकारास जबाबदार असणारे बिल्डर, नोंदणी अधिकारी व शासनाप्रती नागरिकांचे निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यावर संबंधित बिल्डर व नोंदणी अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | |
| १७२. | श्री. समाधान आवताडे वि. स. स. | " मौजे वरुडे, ता.शिरूर, जि.पुणे येथे आत्माराम जयवंत कलाटे, प्रकाश हुकुमचंद गांधी यांचे मालकीची व ताबेवहीवाटीची गट नं.४१९/४१६/२ ही मिळकत असणे,कलाटे व गांधी कुटूंबीय पुणे शहारामध्ये वास्तव्यास असल्याचा गैरफायदा घेणारे श्री बाळा धुमाळ,लक्ष्मण फंड व किरण काळे हे रात्रीअपरात्री सदर मिळकतीतून बेकायदेशीरपणे, चोरून मुरूम उत्खनन करून वाहतूक करीत असणे,सदर मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे उत्खनन होत असल्याची बाब जमिनीच्या मालकांस समजताच त्यांनी दि.०६/०४/२०२३ रोजी शिकापूर पोलीस स्टेशन येथे लेखी व ११२ या नंबर वर व स्टेशन डायरीला देखिल नोंदी केले असणे,त्यामुळे सदर तक्रारीच्या अनुषंगाने शिकापुर पोलीसांनी पंचनामा केले असणे, सदर जमिन मालकांनी पोलिसांस | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बेकायदेशीर उत्खननाचे व वाहतूक करतानाचे पुरावे दिले असणे, पोलिसांनी याबाबत पंचनामा केल्यानंतर पुढे कोणतीही कार्यवाही केली नसणे, तहसिलदार, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याशी संगनमत करून उलट जमिनमालकांचे जमिनीवर बेकायदेशिरपणे केलेल्या उत्खननाचा क.गौ.ख./अना.दंड. उत्ख/एसआर/३९/२०२३, दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या आदेशाने बोजा चढविले असणे, याबाबत शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण यावर शासनाने तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांना बडतर्फ करून करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १७३. | श्री. विजय वडेट्टीवार,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. विकास ठाकरे,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्री. साजिद खान पठाण,श्री. रामदास मसराम,श्री. अनिल मांगुळकर,डॉ. विश्वजित कदम,डॉ. ज्योती गायकवाड,श्री. संजय मेश्राम वि. स. स. | " "पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरातील तब्बल ४० एकर जमीन सरकारी नियम वाकवून विकत घेण्याचा प्रकार समोर येणे, ज्या जमिनीची विक्री होऊ शकत नाही ती जमीन नियमांची पायमल्ली करुन विकत घेत असल्याची बाब दिनांक ०५.११.२५ रोजी उघडकीस येणे, सदर नियमाची पायमल्ली करून जमिनीची विक्री करून घेणाऱ्या संबंधित ठेकेदार बिल्डर व कंपनी विरुद्ध शासनामार्फत अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसणे, परिणामी जनतेत पसरलेले तीव्र | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असंतोषाचे वातावरण, सदर प्रकरणांमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या नियमाबाहेर जाऊन खरेदी विक्रीला परवानगी दिली व सातबारा वरती नाव लावली अशा अधिकाऱ्यांवर शासनामार्फत तसेच शासनाच्या कोट्यावधीचा महसूल बुडवणाऱ्या संबंधित ठेकेदार बिल्डर व कंपनीविरुद्ध शासनामार्फत फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १७४. | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | “ मुंबई उपनगर जिल्हा कुर्ला गाव तुंगवा येथील सर मोहम्मद युसूफ ट्रस्टच्या नावे असलेली मिळकतीचा सीएस क्र.१०६ (पैकी) १०७-अ,क,ड मधील ६१५०.३० चौ.मी. तसेच याच गावातील इशा असोसिएट्स च्या मिळकतीचा सीएस क्र, १०५,१०९,११०,११५ मधील २००००.१०० चौ.मी क्षेत्राचा मिळून बाजारभावानुसार १७० कोटी रुपये किमतीचा टीडीआर अवघ्या १६ लाख, २२ हजार रुपयाचे दस्ताद्वारे हस्तांतरित करुन यामध्ये शासनाची व महापालिकेची फसवणूक करुन कोट्यवधी रुपयाचा अर्थिक घोटाळा झाल्याचा धक्कादायक प्रकार दि.१.१२.२०२५ रोजी निदर्शनास येणे, उक्त मिळकतीचे १९५६ भूसंपादन केल्यानंतर १९८६ साली अवार्ड जाहीर करुन सर मोहम्मद युसूफ ट्रस्टच्या खात्यावर ७५ हजार ९१७ इतकी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नुकसान भरपाईची रक्कम शासनाने भरण्यात येऊनही सदरहू मिळकतीच्या ट्रस्टीनी शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन अधिग्रहित जमीनीची नुकसान भरपाईची रक्कम अदा केली असतांनाही ट्रस्टींनी मा. न्यायालयात याचिका दाखल करुन व मा. न्यायालयाच्या निकालाच्या आधारे टीडीआर मंजूर करुन कोटयावधी रुपयाचा अर्थिक घोटाळा करण्यात येणे, या संदर्भात फारुक ए आर युसूफ यांनी दि.०३.०१.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| १७५. | श्री. रईस शेख वि. स. स. | "भिवंडी शहर तसेच ग्रामीण परिसरातील अनेक नागरिकांकडून वैयक्तीक कारणास्तव किंवा वारसहक्काने प्राप्त झालेल्या जमिनीचा पोटहिस्सा मोजणी करुन घेण्यासाठी भूमीअभिलेख विभागाकडून "ना हरकत दाखल्याची होत असलेली मागणी,विशेषत :भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात सुधारितविकास योजना शा.निर्णय क्र १२९९/३३१/सीआर-४५ /९९ युडी -१२ दि .३०/०३/२००१ | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तसेच सम निर्णय दि ०८/०७/२००३ अन्वये मंजूर झालेली असून अंमलात आलेली असणे, त्याचबरोबर शासन निर्णय क्र दिनांक ०२/१२/२०२० नुसान एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (डीसीपी आर) लागू असूनत्यामध्ये " ना हरकत दाखला "देण्याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नसणे,असे असतांनाही भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांकडून होत असलेली "ना हरकत दाखल्याची मागणी, परिणामी नागरीकांना जमिनीचा पोटहिस्सा मोजणी करुन घेण्यासाठी येत असलेल्या अडचणी,सातत्याने महसूल व स्थनिक संस्थच्या कार्यालयात माराव्या लागणाऱ्या फेऱ्या,भूमी अभिलेख विभाग व स्थनिक संस्था यांच्यात परस्पर समन्वयातून पोटहिस्सा मोजणीसाठी आवश्यक "ना हरकत दाखला "याबाबत एकसमान,पारदर्शक व सुस्पष्ट मार्गदर्शक तत्वे तयार करण्याची आवश्यकता,तसेच याकरिता स्वतंत्र शासन निर्देश /परिपत्रक निर्गमित करण्यात यावे,जेणेकरुन जमिनीच्या मोजीसाठी सुलभ, वेळबध्द आणि ई - प्रणालीवर आधारित सुलभ उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घालून " नाहरकत दाखल्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | |
| १७६. | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | " महाराष्ट्र शासनाची आणि आदिवासी महिला यांची सर्व्हे क्र.२६३/२, न.भू.क्र.-६१९, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व गाव-मालाड, तालुका-बोरीवली या ज़मीनीसंदर्भात विकासका मार्फत फसवणूक झाली असने, यासंदर्भात तातडीने चोकशी व्हावी तसेच दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत असे निवेदन आदिवासी महिला लक्ष्मीबाई पागे यांनी अप्पर मुख्य सचिव महसूल व वनविभाग (ज-३) मंत्रालय अणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांना २७/०५/२०२५ रोजी दिले असणे, त्यानंतर ०६/०६/२०२५ रोजी महसूल व वनविभाग यांच्यातर्फे जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांना यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात यावी आणि स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ अहवाल सादर करण्यात यावा, असे कळविण्यात आले असणे, जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी त्यानुसार उचित कार्यवाही करून आपला स्वयंस्पष्ट अहवाल अद्यापही दिलेला नसणे, आदिवासी महिलेच्या ३१ गुंठे जमीनीबाबत विकासकाने शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि रहिवाशी असा सर्वांची फसवणुक केलेली असल्याचे स्पष्ट होत असताना | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आदिवासी महिलेच्या अर्जावर आणि महसूल व वन विभागाने दिलेल्या पत्रावर कार्यवाही होण्यास विलंब होत असल्यास त्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १७७. | श्री. किशोर जोरगेवार,श्री. राजेश क्षिरसागर,श्री. विक्रम पाचपुते वि. स. स. | " “महाराष्ट्राला संताची आणि मंदिराची गौरवशाली परंपरा लाभलेली असणे, राज्यातील मंदिरे आणि देवस्थाने आपल्या संसकृतीचे आणि श्रध्देची जागृत केंद्रे असणे, राज्यातील अनेक देवस्थास्थांना छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते सामान्य भाविकांपर्यत अनेकांनी जमिनी दान दिलेल्या असणे, तथापि राज्यातील देवस्थानांच्या जमीन सद्यःस्थितीत सुरक्षित नसून देवस्थानाच्या हजारो एकर शेतजमीनी भूमाफियांनी हडपलेल्या असणे, देवस्थान इनाम जमिनी (इनाम वर्ग-३) या कायद्याने अहस्तांतरणीय (non-transferable) असूनही भूमाफियांनी स्थानिक महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्याची आर्थिक संगनमत करुन मोठ्या प्रमाणात जमीनी हडप केलेल्या असणे, इनाम रजिस्टर आणि गाव नमुना ३ मध्ये बेकायदेशीरपणे फेरफार करुन देवस्थानांची नावे वगळण्यात येणे, देवस्थानच्या जमीनी बळकावण्याचे प्रकार संपूर्ण राज्यात पहायला मिळणे, जमीनी हडपणे हा गंभीर फौजदारी गुन्हा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मानणारा सक्षम कायदा आपल्याकडे नसल्यामुळे भूमाफियांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नसणे, परिणामी दिवसेंदिवस देवस्थानच्या जमीनी बळकावण्याचे प्रकार उघडकीस येणे, देवस्थान जमिनीच्या संरक्षणासाठी राज्यात गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश व आसाम राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही राज्य शासनाने "ॲन्टी लॅन्ड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा" लागू करण्याची मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाकडून शासनाकडे वारंवार करण्यात आलेली असणे, शासनाने याबाबत तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."" | |
| १७८. | श्री. अर्जुन खोतकर वि. स. स. | " "जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून या प्रकल्पासाठी हजारो शेतकऱ्यांची उपजीविकेची साधने असलेली शेती सरकारने संपादित करण्याची अधिसूचना काढली असणे, सदर अधिसूचनेस ३ वर्षे उलटूनही भूसंपादन प्रक्रिया अंतिम न होणे, जिल्हाधिकारी यांच्याकडून तातडीने कोणतीही कार्यवाही होत नसल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना वेठीस धरत असणे, अद्याप जमिनी मोजणीच्या पलीकडे प्रक्रिया पुढे न सरकणे, त्यातच एकरी अडीच कोटींचे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बाजारमूल्य असताना २०-२५ लाखांची मुल्यांकने काढून बाधित शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रयत्न करणे, खरंतर ज्यावेळेस जमीन खरेदी करायची त्यावेळचे भाव लागू होणे अपेक्षित असणे, परंतु शासनाने या जमिनींना पूर्वीचेच बाजारभाव लागू केले असणे, याबाबत शेतकरी आंदोलन सुरू असून या शेतकरी आंदोलनाचा आज २२१ वा दिवस असून याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली चीड व असंतोषाची भावना, या गंभीर प्रश्नाकडे शासनकर्त्यांनी लक्ष देऊन प्रत्यक्ष पाहणी करून शासकीय दर आणि सर्वाधिक बाजार मूल्य याचा तुलनात्मक अभ्यास करून जो जास्त दर निघेल त्याचा संदर्भ घेऊन मुल्यांकन ठरवण्याची आवश्यकता, या बाबत बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."" | |
| १७९. | श्री. सुरेश धस वि. स. स. | " मौजे पिसार्वे ता. पनवेल जि. रायगड येथील स. नं. १६/१/अ/१ क्षेत्र १.४५.२८ हे.आर हे श्री. चरपट आल्या कांबळे यांच्या मालकीची जमीन भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरण करण्यासाठी तहसीलदार | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पनवेल यांच्याकडे १९ जून २०२५ रोजी अर्ज केला असणे, जमिनीचे मूल्यांकन ३,५८,९३,८००/- रु. होत असताना व शासनाला भरावयाची अधिमूल्याची रक्कम १,७९,४६,९००/- रु. होत असल्याने सदर जमीन मिळकतीचे श्री. चरपट आल्या कांबळे यांच्याकडून त्याच स. नं १६/१/अ/१ क्षेत्र १.४५.२८ हे. आर या जमिन मिळकतीचे ०.४०. ०० हे. आर व ०.४०. ०० हे. आर असे दोन तुकडे करून दोन वेगवेगळे अर्ज एकाच दिवशी दाखल करून घेतला असणे, विकासकासोबत (बिल्डर) भविष्यात बिल्डिंगमध्ये निघणाऱ्या फायद्याच्या वाट्यात हिस्सा ठरवून तहसीलदार निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांनी भ्रष्टाचार करण्याच्या हेतूने तसेच शासनाची पूर्वपरवानगी न घेता शासनाचे अधिकार भ्रष्टाचार करण्याच्या हेतूने स्वतः वापरले असल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच शासनास जमा होणारा महसूल स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले असणे, याबाबत शासनाने श्री. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून चौकशी करण्याचे आदेश निर्गमित करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | |

| | | | |
|---|---|---|---|
| १८० | श्री. संदिप क्षीरसागर, श्री. प्रकाश सोळंके, वि. स. स. | "बीड शहरातून आणि बीड मतदार संघातून जाणारा सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ या महा मार्गाच्या भूसंपादनामध्ये २४१ कोटीचा झालेला गैरव्यवहार नुकताच उघडकीस येणे, या रस्त्याकरिता संपादित केलेल्या जमिनीपेक्षा जास्त भूसंपादन दाखवून जास्तीचा मावेजा दलालांनी आणि तत्कालीन जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी यांनी घेवून शेतकरी आणि शासनाची फसवणूक करणे, या संबंधात बीड येथील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली असणे, तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे नमुने हस्ताक्षर अद्यापही पाठविण्यात न आल्यामुळे पोलिसांकडून हे प्रकरण दडपण्याचा व्यक्त करण्यात येत असलेला संशय, या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता |
| १८१. | श्री. विलास तरे वि. स. स. | " पालघर जिल्ह्यातील विराथनखुर्द या गावात शासकीय नोंदीत तलाव अस्तित्वात नसताना,खोट्या तलावाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर अवैध माती उत्खनन करून शासन, पाटबंधारे विभाग,महसूल विभाग आणि स्थानिक नागरिकांची सरळसरळ फसवणूक करण्यात आलेली असणे,संबंधित गावाच्या सर्वे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नं.६०/अ/६ मध्ये कधीही तलाव अस्तित्वात नसणे,तरीही ग्रामपंचायत व काही अधिकारी यांनी संगनमताने तलाव असल्याचे खोटे दर्शवून गाळ काढण्याची परवानगी मिळवलेली असणे,गुरुचरण जागा असल्यामुळे पहिली परवानगी अमान्य केली गेली असणे, मात्र,दुसऱ्या वेळी खोटा तलाव दाखवून जीआर इन्फ्रा कंपनीला गाळ काढण्याची परवानगी मिळवण्यात आली असणे, त्यासाठी ग्रामसभा घेताना ग्रामसेवक उपस्थित नसणे, अंगणवाडी सेविका यांनी खोटे 'सचिव' दाखवून खोटे ठराव मंजूर करण्यात येणे, मोजणी,क्षेत्र पाहणी न करता तलाव मान्य करणे, १०,००० ब्रास रॉयल्टी घेतल्याचे दाखवले,पण प्रत्यक्षात लाखो ब्रास उत्खनन करताना ब्लास्टिंगचाही वापर केलेला असणे, ब्लास्टिंगमुळे आजूबाजूच्या घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाणे, बोरवेलचे पाणी आटणे, गावातील मुख्य रस्ते उखडणे,वहिवाट पूर्णपणे नष्ट होणे अशी भयावह परिस्थिती निर्माण झालेली असणे,या सर्व प्रकारांमध्ये ग्रामपंचायत सरपंच,पंचायत सदस्य,सर्कल अधिकारी,मंडळ अधिकारी,लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांनी संगनमताने ग्रामस्थांची दिशाभूल करून शासनाला चुकीची माहिती दिलेली असणे,याबाबत शासनाने ग्रामस्थांना संपूर्ण नुकसान भरपाई | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १८२. | श्री. नारायण कुचे, वि. स. स. | " जालना तालुक्यातील सर्वे नंबर २८८/ब व २८८/क या जमिनी संदर्भात महसूल विभागाकडून गंभीर अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असणे,सदर तहसीलदार, जालना यांनी दिनांक २४/०५/२०२४, १५/०४/२०२५, ०७/०५/२०२५ व ०४/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशांमध्ये परस्परविरोधी निष्कर्ष नोंदविण्यात आले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या चौकशीच्या आदेशाची जबाबदारी पुन्हा त्याच तहसीलदारांकडे सोपविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले असणे,जी प्रशासनिक दृष्ट्या चुकीची व पक्षपातीपणाची शंका निर्माण करणारी असणे तसेच ०४/११/२०२५ च्या आदेशानंतर अपीलाची मुदत न संपता मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी फेरफार क्रमांक १९०८७ व १९०४१ तातडीने नोंदवून अंमलबजावणी केली आहे असेही आढळून आले असणे, सदर या फेरफारात जमिनीचा वर्ग मूळ वर्ग-२ वरून वर्ग-१ असा चुकीने बदलण्यात आलेला असून, नोंद प्रक्रिया, जाहीर प्रकटन व नोटीस देणे या महत्त्वाच्या कायदेशीर पायऱ्या पूर्ण करण्यात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आलेल्या नसणे, सदर प्रकरणात महसूल अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर संशय निर्माण होत असल्याची शक्यता वजा खात्री होत असल्याचेही प्राथमिक अंदाज निष्पन्न होत असणे, त्यामुळे शासनाने किंवा महसूल विभागाने या सर्व प्रकरणाची तातडीने स्वतंत्र व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होण्याची स्थानिक नागरिकांची मागणी असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया" | |
| १८३. | श्री. उत्तमराव जानकर वि. स. स. | " माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा-देवघर व गुंजवणी प्रकल्प धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे निरा-देवघर प्रकल्पाचे पाणी किंवा गुजवणीचे पाणी निरा उजवा कालव्यास उपलब्ध होत नसणे, त्यामुळे निरा उजवा कालव्याच्या मुळ लाभक्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होणे, निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील मुख्य कालवा किमी १३४/७६० येथून खाजगी/ सहकारी उपसा सिंचन योजनेचे काम प्रलंबित असणे, सदरच्या खाजगी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजना करुन माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांना पाणी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींची मागणी असणे, त्यानुषंगाने निरा-देवघर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रकल्पांतर्गत तालुक्यातील सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त असणे, त्यानुसार शासन निर्णय, धोरण व पाणी उपलब्धता इ. बाबींचा अभ्यास करुन सदर प्रकरणी शासनाकडून उचित कार्यवाही होत नसणे, निरा-देवघर प्रकल्पाचा मुख्य कालवा १५८ किमी लांबीचा असून, किमी ० ते ६५ मधील कालवा कामे ही पारंपारिक उघड्या पध्दीतीने पूर्ण झालेली असून किमी ६६ ते १५८ हा बंदिस्त नलीकेद्वारे प्रस्तावित कामे प्रलंबित असणे, तर किमी ६६ ते ८७ ची प्रगतीत असलेली कामेही अद्यापी प्रलंबित असणे, सदरच्या कामाच्या खर्चाचा प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये समावेश असून निधीअभावी सदरहू कामे प्रलंबित असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १८४. | श्री. संतोष बांगर वि. स. स. | " महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२ जुलै, २०२४ च्या आदेशान्वये राज्यातील २० जिल्ह्यांतील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमध्ये गट-क व गट-ड ची ६ हजार ८३० पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून, हिगोली, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अकोला, लातूर, जळगाव, ठाणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांमध्ये या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कंत्राटी मनुष्यबळ नियुक्त केले जाणे, तसेच हिंगोली जिल्ह्यामध्ये बाह्ययंत्रेणेद्वारे भरती करताना मे. स्मार्ट सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनी पुणे संबंधित अधिकारी पदावर नियुक्ती करण्यासाठी पाच लाख रुपये रकमेची मागणी करून नियुक्त करत असूनही कर्मचाऱ्यांना वेतन देखील कमी देण्यात येणे, यामुळे बाह्यस्त्रोत नियुक्त्यांमुळे नियमित कर्मचाऱ्यांच्या भरतीवर परिणाम होत असून, रुग्णालयांतील कामकाजाची सातत्यता, जबाबदाऱ्या, उत्तरदायित्व, सुरक्षा तपासणी, कायदेशीर दायित्व व सेवा गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, काही ठिकाणी आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ पाठविणे, तर काही ठिकाणी अपुरी मनुष्यबळ उपलब्धता यामुळे जिल्हा व तालुका पातळीवर रुग्णसेवा बाधित होणे, तरी या जिल्ह्यांत नियमित कर्मचारी भरती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| १८५. | श्री. नानाभाऊ पटोले, श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " राज्यात सीईटी परिक्षेच्या रजिस्ट्रेशन व ॲडमिशनमध्ये सीईटी सेल २०२१ मध्ये गैरव्यवहार झाला असून सीईटी सेल मध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने खोटी व बनावट | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कागदपत्रे सादर करणे, दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी निविदेमध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने तीच बनावट कागदपत्रे सादर केली असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, सीईटीचे प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी सीएपी (सामान्य प्रवेश प्रक्रिया ) या विद्यमान विक्रेत्यांसह सीईटी सेलच्या निविदांसाठी एक कार्टेल तयार करुन निविदामध्ये फेरफार केला असून सेल विशिष्ट कंपनीला नियुक्त केली असणे, या कंपनीमध्ये प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांचा अभाव असणे, एमबीए सारख्या परिक्षेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असतानाही अशी बनावट कंपनीची नियुक्ती करणे, या कंपनीकडे अनुभवाचे खोटी कागदपत्रे केली असणे, त्यामुळे सीईटी विद्यार्थ्यांना परिक्षा फीमध्ये जादाचे पैसे भरावे लागत असून शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असूनही याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असणे, यामुळे नागरिक प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया " | |
| १८६. | श्री. नानाभाऊ पटोले,श्री. नरेंद्र भोंडेकर,श्री. | " मौजा भोजापूर, ता, जि.भंडारा येथील गट क्र. १९९ व इतर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | संजय मेश्राम वि. स. स. | गटातील अधिकृत जागेचे रहिवाशांच्या गोसेखुर्द प्रकल्पावी २१/३/१९९७ च्या अधिसूचनेनुसार मौजा भोजापूर येथील गोसेखुर्द प्रकल्पबाधीत २०.६२ हे. आर जमीन संपादीत करावयाची होती परंतु प्रत्यक्षात १२.५५ हे.आर एवढीच जमीन संपादीत करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, ८.०७ हे.आर. जमीन अजूनही बाधित असुन ती अद्यापही संपादीत करण्यात आलेली नसणे, उर्वरित जमीन संपादीत करण्याकरिता संबंधित प्रकल्पग्रस्तांनी वारंवार निवेदन, आंदोलने करुनही  शासन दुर्लक्ष करीत असणे, त्यानंतर पिडीतांनी मा. उच्च न्यायालयात संबंधित क्षेत्राचे कागदपत्रे व पुरावे तपासून संबंधित क्षेत्राचे भूसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही १२ आठवडयात करण्याचे आदेश देण्यात येणे, परंतु अद्यापही संबंधित जिल्हाधिकारी भंडारा व संबंधित अधिकारी यांनी अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही सुरू केली नसल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेली चिड व उद्रेकाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| १८७ | श्री. रवी राणा वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील निम्न पेढी प्रकल्पामुळे हातुर्णा, अळणगाव, गोपगव्हाण, कुंडखुर्द, कुंड-सर्जापूर, सावरखेड व | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ततारपूर ही गावे मोठ्या प्रमाणात बाधित झाली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्यानुसार जिल्हाधिकारी अमरावती यांनी शासनाला पाठवलेल्या प्रस्तावात प्रकल्पग्रस्तांच्या महत्त्वाच्या व न्याय्य मागण्यांचा समावेश असणे, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या ऐवजी ऐच्छिक स्वरूपात रु ५,२५,००० "खासबाब" मदत देण्याची मागणी असून यामुळे गरीब कुटुंबांचे शिक्षण, उपजीविका व भविष्यातील गरजा पूर्ण होतील. पुनर्वसित भुखंडांवरील सातबाऱ्यात नमूद कब्जा-हक्काची रक्कम कमी करावी, तसेच २०१३ च्या भूसंपादनात काहींना १.५ तर काहींना २ चा गुणक देण्यात झालेल्या विषमतेचा थांगपत्ता लावून सर्वांना सरसकट २ च्या गुणकाने मोबदला द्यावा. गावठाणातील बेघरांना पुनर्वसित ठिकाणी भुखंड मिळावा व शिल्लक शेतीसाठी पोच-रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करावे. सावरखेड-ततारपूर येथील १६९ मालमत्ता धारकांना नियमित लाभ मिळावा तसेच वलगावमार्गे सावरखेड व कुंडखुर्द शेतजमिनींसाठी पर्यायी रस्ता करावा. वासेवाडी गावाचे प्रलंबित पुनर्वसन तातडीने मंजूर करणे अत्यावश्यक असणे, ही मागणी प्रकल्पग्रस्तांच्या न्याय व सुलभ पुनर्वसनासाठी तातडीने शासनाने मान्य करण्यात यावी, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १८८. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " तापी पाटबंधारे अंतर्गत बोदवड उपसा सिंचनयोजना ला सन १९९९ मध्ये प्रथम मान्यता देण्यात येणे, सदर मान्यतेनंतर हे काम सुरू होत असणे, या उपसा सिंचन योजनेअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या लाभ क्षेत्रात समावेश होत असणे, सदर उपसा सिंचन योजनेचा लाभ क्षेत्र ४२४२० हेक्टर असणे, त्याचा नंतर बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुका व मलकापूर तालुक्याच्या समाविष्ट करण्यात येणे, सदर योजना उत्तर महाराष्ट्राची असून या योजनेला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत क्षेत्रातील लाभो क्षेत्र दाखवून विदर्भाचा निधी वापरल्या असल्याची माहिती समोर येणे, परंतु याबाबतीत विविध तक्रार झाल्यानंतर विदर्भ क्षेत्रात काम कामना झाल्याने सदर निधी वापरला घेतले असल्याचे सुद्धा समोर येणे, यामुळे विदर्भातील प्रकल्पावरती परिणाम होणे परिणाम स्वरूपी या निधीची किती काम करण्यात आले व कोणते काम करण्यात आले या सर्व प्रकरणाची तपास यंत्रणेमार्फत चौकशी होणे गरजेचे असणे, यामध्ये तापी पाटबंधारे येथील प्रमुख अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात निधीच्या भ्रष्टाचार करत असणे व ज्या ठेकेदाराला काम देण्यात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आले त्याला देयके ना देता, ज्या व्यक्तीला काम सब लेट करण्यात आलेला आहे त्याच्या नावाने देयके देत असल्याची तक्रार होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १८९. | श्री. प्रविण तायडे वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील वासनी या मध्यम प्रकल्पला ८०० कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर असून या प्रकल्पाचे काम २०१७ पासून अपूर्ण असणे, या वासनी धरणाचे काम अजूनपर्यंत अपूर्ण असून १५७ कोटीचे पीडीएनच्या कामाचे टेंडर काढण्यात आले असणे, धरणाचे कामच अजून अपूर्ण आहे तर पीडीएनच्या कामाचे टेंडर कसे काय काढण्यात आले हा प्रश्न निर्माण झाला असणे, या प्रकल्पाचा निधी अजूनही अखर्चित रूपात पडलेला असून वासनी प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या नागरिकांना व शेतकरी सिंचनापासून वंचित असणे, धरणाचे काम अपूर्ण असताना १५७ कोटीचे पीडीएनच्या कामाचे टेंडर कसे काय काढण्यात आले याची चौकशी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची गरज, यात दोषी असणाऱ्यांविरुद्ध करावयाची कडक करावाई व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता |
| १९०. | श्री. चेतन तुपे,श्री. धर्मरावबाबा आत्राम,श्री. | " राज्यात वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे दरवर्षी १० ते | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रतापराव पाटील चिखलीकर,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. मंगेश चव्हाण,श्री. राजकुमार बडोले,श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, श्री. अनंत (बाळा) नर,श्री. रोहित पाटील, श्री. दौलत दरोडा वि. स. स. | ४० हजार कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचे गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतील शाश्वत विकास केंद्राने केलेल्या अभ्यासातून दिनांक ३ ऑक्टोंबर, २०२५ रोजी निदर्शनास आलेले असणे, सदर वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाच्या केवळ एक ते दोन टक्केच भरपाई शेतकऱ्यांना मिळत असणे, त्यानुसार शेतकऱ्यांपैकी ५४ टक्के शेतकऱ्यांनी किमान एक पीक सोडले असून मोठ्या क्षेत्राची राखण अवघड होत असल्याने ६२ टक्के शेतकऱ्यांनी शेतीचे क्षेत्र कमी केल्याचेही या अभ्यासातून स्पष्ट होऊन शेतकऱ्यांच्या मते दरवर्षी वन्यप्राण्यांमुळे प्रतिहेक्टरी सरासरी २७ हजाराचे नुकसान होत असणे, पिकांची राखणदारी करण्यासाठी वन्य प्राण्यांना रोखण्यासाठी बुजगावणे, काटेरी तारांचे कुंपण, सामुहिक राखण, सौर कुंपणे अशा उपायांची उपयुक्तता केवळ २५ टक्के असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असणे, वन्य प्राण्यांमुळे शेतीचे सर्वाधिक नुकसान कोकणात होत असून तेथे रानडुक्कर, माकडांमुळे अनेक कुटुंबाना परसबाग बंद करुन दर आठवडयात भाजी विकत आणावी लागत असणे. तर मराठवाडा, खान्देश सारख्या मर्यादित जंगल असलेल्या भागातही शेतकऱ्यांना काही पिके पूर्णपणे सोडावी लागणे, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळाल्याशिवाय वन्यजीवांचे दिर्घकालीन संवर्धन शक्य नसणे, याबाबत शासनाने तातडीने कृती न केल्यास शेतकरी आणि वन्यजीव या दोन्हीना गमावण्याचा असलेला धोका, हे लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | |
| १९१. | श्री. सत्यजित देशमुख वि. स. स. | " चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/ अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात आले असूनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयीसुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण, जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात आले असणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देवून सरकारने जमीन व घरांचे संपादन करुन नुकसान भरपाईपोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुनर्वसनासाठी पात्रच होवू न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वनसंरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलनाद्वारे करुनसुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाबाबत प्रचंड नाराजी व चिडीची भावना निर्माण असणे, त्यानुषंगाने गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदयातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देवून प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| १९२. | श्री. अभिमन्यु पवार वि. स. स. | " मौजे याकतपूर ता.औसा जि.लातूर येथील जिल्हाधिकारी लातूर यांनी वन विभागास हस्तांतरित केलेले सर्वे न.२३३ क्षेत्र १०.३६ हे.आर हे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ नुसार प्राथमिक राखीव वन म्हणून घोषित करण्यात आलेले असणे, सदरील प्राथमिक राखीव वनातील डोंगर माथ्यावर याकतपूरसह परिसरातील गावांचे श्रद्धास्थान असलेले पुरातन देवी मंदिर असून याठिकाणी दररोज या भागातील नागरिक दर्शनासाठी या ठिकाणी येत असणे, या देवी मंदिराचा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उल्लेख/नोंद जमीन हस्तांतरण कार्यवाहीत सदरील घोषित प्राथमिक राखीव वन च्या नोंदीमध्ये करण्याची आवश्यकता असतानाही त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, सदरील मंदिरासाठी जाणे येणे साठी वन विभागाने स्वतंत्र रस्ता सोडलेला असणे ,मंदिराचा विकास करणे आणि भक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याने ग्रामपंचायत याकतपूर यांनी सदरील देवी मंदिर व समोरील जमीन वन विभागाच्या मालकीतून वगळण्याबाबत ठरावाद्वारे २०२३ मध्ये वन परिक्षेत्र अधिकारी लातूर यांच्याकडे मागणी केली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी लातूर यांनीही सदरील प्रकरणी उचित कार्यवाही करण्याबाबत निवेदन दिले असणे,परंतु विभागीय वन अधिकारी धाराशिव यांनी केंद्र शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता असल्याचे कळविले असणे, सदरील देवी मंदिर व त्यासमोरील जमीन वन विभागाच्या मालकीतून वगळण्याबाबत व ग्रामपंचायातीस वळती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | |
| १९३. | श्री. महेंद्र दळवी वि. स. स. | " ता.रोहा, जि.रायगड, मधील जलजिवन मिशन अंतर्गत कुंडलीका २६ गावे प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | राबविण्यात येत असणे, सदर योजनेच्या कामाचे निविदा मे.एवियन आयइएल इन्फ्रा जे.व्ही. यांना दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी २४ महिन्यांच्या कालमर्यादेत एकूण रु.३३.४० कोटी रुपयांचे देण्यात आलेली असणे, सदर योजनेवर आज मितीला रु.१९.३५ कोटी रुपये खर्च झालेला असणे, परंतु सदर योजनेचे कालमर्यादा उलटून योजनेवरील झालेला खर्च पाहता संत गतीने काम सुरू असणे, परिणामी योजना अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, प्रलंबित काम पूर्ण करुन पाणीपुरवठा योजनेचा २६ गावांना लाभ देण्याकरिता तसेच उक्त ठेकेदारास काळ्या यादीत समाविष्ट करुन गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १९४. | श्री. अतुल भातखळकर,श्री. हारुन खान,श्री. मुरजी (काका) पटेल,श्री. निलेश राणे वि. स. स. | " सातिवली (ता. वसई, जि. पालघर) येथील श्री हनुमंत विद्यामंदिर शाळेत दिनांक ८ नोव्हेंबर, २०२५ रोजी अनेक विद्यार्थी शाळेत उशिरा आले असताना शिक्षकांनी दफ्तर खांद्यावर घेऊन १०० उठाबशा काढा अशी कठोर शिक्षा दिली असणे, १० मिनिटे उशिरा आल्याने शिक्षिकेने दिलेल्या १०० उठाबशांच्या शिक्षेमुळे तब्येत बिघडून इयत्ता ६ वी च्या वर्गात शिकत असलेल्या एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा जे.जे. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रूग्णालयात उपचारा दरम्यान झालेला मृत्यू, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित वर्ग शिक्षक व शाळा व्यवस्थापना विरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याची आवश्यकता, आरटीई २००९ कायद्यानुसार कोणत्याही विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक शिक्षा देणे हा गुन्हा असतानाही विद्यार्थ्यांना अशाप्रकारची कठोर वागणूक दिल्याने पालकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण, याबाबत भविष्यात शालेय विद्यार्थ्यांना अशी अमानुष शारीरिक शिक्षा करू नये यासाठी शारीरिक शिक्षेवर बंदी घालणाऱ्या नियमांची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी नवीन यंत्रणा किंवा मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| १९५. | श्री. काशिनाथ महादु दाते सर,श्रीमती सुलभा खोडके,श्री. रोहित पाटील वि. स. स. | " राज्यातील हजारो शाळांमध्ये अध्यापनासाठी संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा, काही शाळांमध्ये वीजच नसल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या यूडायस प्लस २०२४-२५ या अहवालातून ऑक्टोबर २०२५ मध्ये निदर्शनास येणे, हजारो शाळांमध्ये मुलामुलींचे कार्यक्षम स्वच्छतागृह नसणे,राज्यात हजारो सरकारी व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरेच नसणे, हजारो शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी पडताळणी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झालेली नसणे, अनेक शाळांमध्ये विद्यार्थी वाहतुकीसाठी कोणतेही सुरक्षा उपाय नसणे, हजारो शाळांमध्ये शाळा सुरक्षा समिती, अभ्यागत नोंदणी, आचारसंहिता समिती नसणे, हजारो शाळांना 'पोक्सो' कायद्याच्या तरतुदी कळवल्या नसल्याच्या गंभीर बाबी आढळून येणे, या सुरक्षेच्या कारणावरून माननीय उच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त करणे, विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे वाढलेले असणे , अनेक विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्याने वा अवैद्य असल्यामुळे हजारो विद्यार्थी शासनाच्या योजना पासून वंचित असणे ,काही शाळेत शिक्षिका नसल्याने मुलींना समस्या भेडसावणे, अनेक प्राथमिक शाळा बंद पडत असून त्यामध्ये शिक्षक नसणे, अनेक विद्यार्थी शाळेत गेले नसल्याने गुन्हेगारीकडे वळणे,अनेक शाळांमध्ये लहान विद्यार्थी-विद्यार्थिनीवर अत्याचार होत असणे, अनेक शाळेत शिक्षक मद्यपान व गुटखा खात असल्याचे निदर्शनास येणे, एकंदरीत राज्यातील शाळेचा घसरत चाललेला दर्जा, यामुळे विद्यार्थी पालकांच्या मनात पसरलेले भीतीचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण व सुरक्षा देणेबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया " | |

| | | | |
|---|---|---|---|
| १९६. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | "संपूर्ण महाराष्ट्र राज्यांमध्ये प्रथम मान्यता हीच कायमस्वरूपाची मान्यता ग्राह्य धरली जात असताना मुंबई महापालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांना प्रत्येक पाच वर्षानंतर मुदतवाढ घेणे बंधनकारक असणे, मुंबईतील फक्त इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या प्राथमिक शाळा मुदतवाढ लादली जाऊन मान्यता घेताना शाळा व्यवस्थापन यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असणे, मुंबई महापालिका शिक्षण विभागाकडून क्लार्क पासून ते माननीय आयुक्तांपर्यंत मान्यता फाईल मंजूर घेण्यास प्रचंड कालावधी लागत असणे, मागील १५ वर्षापासून अनुदान पासून वंचित असलेल्या मुंबईतील ९२ शाळांना आपल्या सरकारने अनुदान देण्याचा निर्णय घेतला व त्या प्रस्तावाला माननीय आयुक्त मुंबई महापालिका यांनी दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी मंजुरी देऊनही ४९० स्क्वेअर फुटाच्या वर्ग खोल्या असणे बंधनकारक असल्याची जाचक अट टाकल्याने व मान्यता मुदतवाढ न दिले असल्याने मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान प्रस्ताव मंजूर होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मध्यांन भोजन या सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| १९७. | श्री. संतोष बांगर वि. स. स. | " सरस्वती एज्युकेशन ॲकेडमी ट्रस्ट, गणेश मंदिर रोड, मांडा, टिटवाळ संचलित सरस्वती इंग्लिश स्कूल, मांडा, टिटवाळा, ता.कल्याण, जि.ठाणे ही शाळा अनधिकृतपणे सुरू असणे, सदर शाळेला नवीन युडायस क्रमांक देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांना प्राप्त झाला ही बाब निदर्शनास येणे, सदर संस्था व शाळा अनधिकृतरीत्या सुरू असून सदर शाळेवर कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांनी दि.०१/०७/२०२५ रोजी प्रशासन अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना दिलेले असणे, असे असतांनाही माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये सदर शाळेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांनीच युडायस क्रमांक देण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे शिफारस केलेली असणे, त्यामुळे सदर प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे शक्यता असणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन अनधिकृत ठरविण्यात आलेल्या शाळेला युडायस क्रमांक मिळण्यासाठी शिफारस करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर तसेच शाळा व्यवस्थापनावर कठोर कारवाई | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | |
| १९८. | श्री. अभिमन्यु पवार,श्री. सुरेश (राजूमामा) भोळे,श्री. राहूल कुल वि. स. स. | " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० महाराष्ट्र राज्यात लागू झाले असणे, सदरील धोरणात शारीरिक शिक्षण शिक्षक (क्रीडा), कार्यानुभव व कला शिक्षकाची नियुक्ती जिल्हा परिषद शाळा मध्ये करण्याच्या स्पष्ट सूचना दिलेल्या असणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि.१५ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार केंद्र शाळांमध्ये शारीरिक शिक्षक, कला शिक्षक व कार्यानुभव शिक्षक यांची उपलब्धता अनिवार्य असल्याचे नमूद असणे, तसेच शासन निर्णय दि.२१ ऑगस्ट, २०२५ नुसार सदरील शिक्षकांच्या नियुक्तीबाबत स्पष्ट आदेश दिले असणे, २५० विद्यार्थीना कला क्रीडा कार्यानुभव विषयाचा प्रत्येकी एक शिक्षक नियुक्ती करण्याचे तरतूद असणे, मागील २० वर्षापासून जि.प., नगरपालिका, महानगरपालिका, शासकीय आश्रमशाळा, समाजकल्याण विभागाच्या शाळा आदी ठिकाणी क्रीडा, कला व कार्यानुभव पदांच्या शिक्षकांची पद भरती झाली नसणे, सदरील पदाची नियुक्ती होत नसल्याने राज्यातील वाडी तांडे व खेडेगावातील विद्यार्थी कला क्रीडा व कार्यानुभव शिक्षणापासून वंचित असणे, त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उल्लंघन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झाले असणे, सदरील कला क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची स्वतंत्र गट/बिंदू करून भरती करणे, शाळा तेथे कला क्रीडा व कार्यानुभव शिक्षक नियुक्ती करणे, पवित्र पोर्टल द्वारे राज्यातील सर्व विभागांच्या शैक्षणिक शाळा मध्ये कला क्रीडा व कार्यानुभाव विषयांच्या शिक्षकांची भरती करून राज्यातील विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकास करण्याची आवश्यता असणे, सदरील प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया " | |
| १९९. | श्री. राजु तोडसाम वि. स. स. | " जिंतूर व सेलू तालुक्यातील ग्रामस्थ क्षेत्रात कंत्राटदार एम.ए. अंभुरे यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांशी संगनमत करून को.प.ब. अंतर्गत मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता केल्याचे निदर्शनास येणे, सन २०१४–१५ मधील अनेक कामे अपूर्ण असताना, त्याच गावांत सन २०१९–२० मध्ये पुन्हा कामे मंजूर करण्यात येणे व तीच कामे संबंधित कंत्राटदारालाच देण्यात येणे, तसेच कार्यारंभ आदेशानंतर अवघ्या ५२ दिवसांत, पावसाळ्यात प्रत्यक्ष काम न करतादेखील कोट्यवधी रुपयांची देयके संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने वितरित करण्यात आलेले असणे, अनेक ठिकाणी प्रत्यक्ष काम झाले नसतानाही गुणवत्ता अहवाल | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सादर करण्यात येणे, परंतु मोजमाप व गोषवारेही संशयास्पद असणे, काही गावांमध्ये कामासाठी जागाच नसताना प्रगती दाखविण्यात आली येणे, यामुळे शासनाचा निधी विनाअर्थ खर्च झाला असून, संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी मोठा प्रमाणावर आर्थिक भ्रष्टाचार केला असणे, यासंदर्भात अनेकदा निवेदने व तक्रार केलेली असणे, परंतु, आजतागायत शासनाद्वारे दखल घेण्यात न येणे, सदर प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई व ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २००. | श्रीमती मंजुळा गावित वि. स. स. | " धुळे जिल्ह्यातील साक्री विधानसभा मतदारसंघात एमआयडीसी निर्मिती करण्यात यावी अशी मागणे गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक, उद्योजक व लोकप्रतिनिधी यांचेकडून होत असणे,साक्री हा भौगोलिक दृष्ट्या विस्तारलेला मोठा तालुका असणे,तसेच तालुक्यात निजामपुर जैताणे, म्हसदी-धमनार, पिंपळनेर, सामोडे, दहिवेल या गावांना प्रमुख बाजारपेठा असणे, साक्री तालुक्यात शिवाजी नगर येथे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित असुन सुझलॉन पवन ऊर्जा प्रकल्प | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देखील निम्या साक्री तालुक्यात पसरलेला असणे, तालुक्यात निम्न तापी प्रकल्प-अक्कलपाडा, लाटीपाडा, बुराई, मालनगाव,जामखेली, काबऱ्याखडक असे मोठे प्रकल्प असुन सर्व प्रकल्पांमध्ये मुबलक पाण्याचा साठा असणे, तसेच शासकिय जमिन मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणे, साक्री येथे नवीन औद्योगिक वसाहत निर्मीतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व मुलभुत सुविधा आणि कुशल-अकुशल कामगार उपलब्ध असणे, शासनाने मजूरांच्या होणाऱ्या स्थलांतराला आळा घाण्यासाठी तसेच स्थानिक भुमिपुत्रांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरीता साक्री विधानसभा क्षेत्रातील साक्री आणि पिंपळनेर येथे नवीन औद्योगिक वसाहत वसाहतीची (एम.आय.डी.सी.) निर्मीती करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून गेल्या दोन वर्षापासून वारंवार शासनाकडे करण्यात येणे, परंतु अद्यापही उक्त प्रकरणी कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी स्थानिक नागरीक, उद्योजग यांच्यात पसरलेला असंतोष, शासनाने पिंपळनेर आणि साक्री येथे नवीन एम.आय.डि सी.ची निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २०१. | श्री. रवी राणा, वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुका हा खारपाण पट्टा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बहुल क्षेत्र असल्याने शेतकऱ्यांना मुख्यतः एकाच पिकावर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात स्थिरता येत नसणे, या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी भातकुली एमआयडीसी क्षेत्रात उद्योगधंदे उभारणे अत्यंत आवश्यक असणे, विशेषतः फूड प्रोसेसिंग उद्योग व इतर लघु-मध्यम उद्योग शेतकरी व स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकणे, या संदर्भात शासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार केला गेला असूनही अद्याप कोणतेही निर्णय किंवा आदेश प्राप्त झालेले नसणे, त्यामुळे या क्षेत्रातील आर्थिक स्थैर्य व रोजगार निर्मितीसाठी तातडीने लघु एमआयडीसीमध्ये मोठे उद्योग सुरू करण्याबाबत शासनाने निर्णायक कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक मंजुरी, पायाभूत सुविधा व सहाय्यक योजना तत्परतेने सुरू करण्याच्या सूचना तातडीने लागू करून स्थानिक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे व तालुक्याच्या आर्थिक विकासाला चालना देणे हे महत्त्वाचे आहे. या संबंधाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २०२. | श्री. राजेंद्र पाटील (यड्रावकर) वि. स. स. | " राज्यात औद्योगिक विकासास गती देण्यासाठी आणि ग्रामीण | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भागातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी नवीन औद्योगिक वसाहती (MIDC) स्थापन करण्यात येत असणे. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून स्थानिक जनतेतून, जनप्रतिनिधींमार्फत तसेच जिल्हा प्रशासनामार्फत शासनाकडे केली जात असूनही या संदर्भातील कारवाईस विलंब होणे, शिरोळ परिसर हा औद्योगिकदृष्ट्या सक्षम, वाहतूकदृष्ट्या अनुकूल व उद्योगांसाठी योग्य पायाभूत सुविधांनी युक्त असूनही MIDC स्थापन करण्यासाठी जागेची निवड, प्राथमिक सर्वेक्षण अथवा प्रस्ताव अहवाल तयार करण्याचे कोणतेही काम न होणे, त्यामुळे स्थानिक युवकांच्या रोजगाराच्या संधी बाधित होणे, या अनुषंगाने शिरोळ तालुक्यात MIDC स्थापन आवश्यकता, याबाबत यावर शासनाने आतापर्यंत केलेली किंवा पुढील काळात करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २०३. | श्री. प्रशांत बंब वि. स. स. | " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सन १९६२ च्या स्थापनेपासून कायदेशीर सल्लागार महाव्यवस्थापक तथा विभाग प्रमुख (विधी व कामकाज) पदाची निर्मिती झालेली | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, सन २०१६ मध्ये अर्हता धारक महिला उमेदवाराची सरळसेवेने निवड केलेली असणे, आठ वर्षांच्या कालावधीत संबंधित महिला अधिकारी यांनी या पदाचे "अधिकार आणि कर्तव्ये" याचा भाग असलेल्या खटल्यांचे व्यवस्थापन करताना शासनासाठी बहुतांश यश मिळवून दिलेले असणे, तथापि संबंधित महिला अधिकारी यांचेविरुद्ध अत्यंत घृणास्पद चारित्र्यहनन, अश्लील लिखाण करून एका व्यक्तीने नावासह दाखल केलेल्या तथ्यहीन तक्रारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रीतसर हाताळण्याऐवजी कोणतीही शहानिशा न करता थेट विभागप्रमुखाचे "अधिकार आणि कर्तव्याचे" शैक्षणिक-तांत्रिकदृष्ट्या अपात्र व विहीत अर्हता नसलेल्या कनिष्ठ व्यवस्थापकांना work distribution करणे, तक्रारदार महिलेची वकीलीची सनद रद्द झालेली असणे, यामुळे संबंधित दिनांक २१/१०/२०२४ ची वर्क डिस्ट्रीब्यूशन ऑर्डर तात्काळ रद्द करुन उक्त महिला अधिकारी यांना त्यांच्या धारण पदानुसार पूर्ववत अधिकाराने काम करु देण्याची आवश्यकता असणे, कामाच्या ठिकाणी महिला अधिकाऱ्यांविरुद्ध अधिकार कक्षेबाहेर जाऊन कट कारस्थानपूर्वक चारित्र्यहनन मोहीम राबविणाऱ्या महाव्यवस्थापक (म.ब.वि) व संबंधितांना | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निलंबनाधीन ठेवून विभागीय चौकशी लावणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २०४. | श्री. सुनिल शेळके वि. स. स. | " ता. मावळ जि. पुणे येथे तळेगाव औद्योगिक क्षेत्रात काही स्थानिक जमिन विक्रेत्यांनी शेतकऱ्यांकडून जमीनी खरेदी करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांना विक्री केलेली असणे. त्यामध्ये मौजे आंबळे हद्दीत गट नं. ३५ व ३८ ते ४९ हे क्षेत्र संगवू हायटेक प्रा. लि PHA इंडिया प्रा.लि., NVH इंडिया ऑटो पार्ट प्रा.लि या कंपन्यांना विक्री केले असून त्याचप्रमाणे मौजे मंगरूळ हद्दीत गट नं. १४७, १४८ व १६५ हे क्षेत्र ह्युंदाई स्टील, कोमोस ऑटोमोटिव्ह इंडिया प्रा.लि, डूवान ऑटोमोटिव्ह सिस्टीम या कंपन्यांना विकले असल्याचे निदर्शनास येणे. सदर स्थानिक जमीन विक्रेते हे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून या कंपन्यांची व पर्यायाने प्रशासनाची फसवणूक करीत असल्याचे गंभीर बाब उघडकीस येणे. सदर कंपन्यांना चुकीच्या पद्धतीने जागेची कागदपत्रे दाखवून त्यांचे झोन बदलले जात असणे. कंपनीचे बांधकाम मंजूर परवानगीपेक्षा जास्तीचे करून मनमानी पद्धतीने बदल करीत असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून प्राप्त होणे. सदर ठिकाणी अनधिकृतपणे विनापरवाना पाण्याचे कनेक्शन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देखील दिले जात असून अशा प्रकरणांमुळे भविष्यात औद्योगिक क्षेत्रावर विपरीत परिणाम होणार असल्याने सदर बाबी नियमित करण्यासाठी स्थानिक जमीन विक्रेत्यांवर अंकुश आणणे अत्यंत आवश्यक असून सदर विषयावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया." | |
| २०५. | श्री. रवी राणा वि. स. स. | " सहकार व पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णय दिनांक १७.०४.२०२५ नुसार मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत भातकुली येथे नवीन बाजार समिती (APMC) स्थापन करण्याबाबत तत्वतः निर्णय घेण्यात आलेला असणे, कृषीप्रधान भातकुली परिसरातील शेतकरी बांधवांना त्यांच्या कृषी उत्पन्नास योग्य बाजारभाव मिळावा, मध्यस्थांची लूट थांबावी तसेच स्थानिक व्यापार व्यवस्थेला गती मिळावी यासाठी या बाजार समितीचे स्थापत्य अत्यंत आवश्यक असणे, तथापि, शासनाच्या तत्वतः निर्णयानंतरही प्रत्यक्ष अंमलबजावणी, प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्धता याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे.यामुळे शेतकरी व व्यापारी वर्गात मोठे असमाधान असणे, APMC स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी, निधी उपलब्धता व जमीन संबंधित प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी शासन निर्णय | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २०६. | श्री. रवी राणा वि. स. स. | " राज्यात व अमरावती जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतीतील उत्पादन घटले असून शेतकऱ्यांना बाजारभावही अत्यल्प मिळत असणे, सोयाबीनला ३०००–४५०० रु., तर कापसाला ६५००–७००० रु. भाव मिळत असल्याने शेतकरी सोयाबीन ७००० रु., कापूस १०००० रु. आणि तुर १०००० रु. प्रती क्विंटल असा योग्य दर मिळावा, अशी मागणी शेतकरी करीत असणे, सोयाबीनचा हमीभाव ५३०० रु. जाहीर असतानाही खरेदी केंद्र सुरू नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून केंद्रे तात्काळ सुरू करणे आवश्यक असणे, कापूस खरेदीत ओलाव्याच्या कारणास्तव ८००० ऐवजी ७६०० रु.दर मिळत असणे तसेच प्रती एकर ७.५ क्विंटलच खरेदी केली जात असून मागील वर्षाप्रमाणे १२ क्विंटल मर्यादा ठेवणे, बी-बियाणे, खत, कीटकनाशके व मजुरीचे दर प्रचंड वाढले असून उत्पन्न त्यानुसार मिळत नसल्याने या दरांमध्ये कपात करणे आवश्यक असणे, जंगली प्राण्यांमुळे पिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याने १००% अनुदानावर तारकुंपण देण्यात येणे गरजेचे असणे, सिंचन असलेल्या शेतकऱ्यांना २४ तास वीज | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मिळावी, जेणेकरून ते सुरक्षितपणे दिवसाच्या वेळेत शेतीचे काम करू शकणे, ट्रॅक्टर-ट्रॉली, अवजारे, स्प्रिंकलर यांसारख्या साधनांवर ५०% अनुदान देण्यात यावे. तसेच ई-पीक पाहणीसाठी ग्रामीण महसूल कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करणे, शेतकऱ्यांच्या स्थिर उत्पन्नासाठी ह्या शेतकऱ्यांच्या मागण्या शासनाने तातडीने मंजूर करण्यासाठी निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| २०७. | श्री. विक्रम पाचपुते,श्री. प्रविण दटके वि. स. स. | " अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगेंदा नगर विधानसभा मतदार संघातील या वर्षीच्या अतिवृष्टी आणि अनियमित पावसामुळे खरीप हंगामातील मका उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील मका आणि सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या आधारभूत किंमतीमध्ये सोयाबीन व मका खरेदी केंद्र सुरू करणे गरजेचे असणे, त्याची खरेदीची कमाल मर्यादा एकरी ३ क्विंटल ऐवजी १० क्विंटल करण्यात यावी, तसेच मका व सोयाबीन थोडे ओलसर असल्यामुळे थोडेशे उशिरा खरेदी केंद्रावर येऊ शकते, यामुळे सोयाबीन व मका खरेदी याची मुदत वाढ मिळावी अशी मागणी होत असणे, मागणीनुसार शासनाने | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व उपाय योजना." | |
| २०८. | श्री. अब्दुल सत्तार वि. स. स. | " शेतकऱ्यांचा कापूस सीसीआयमार्फत खरेदी सुरू करणे, १ हेक्टरला १४ क्विंटल खरेदीची मर्यादा असणे, सिल्लोड-फुलंब्री तालुक्याच्या रुपेश सिंग सेंट्रल इनचार्ज असणे, १ हेक्टरला १४ क्विंटल खरेदीची मर्यादा असताना रुपेश सिंग सेंट्रल इनचार्ज शेतकऱ्याच्या सातबारावर खाडाखोड करून १ हेक्टरचे २ हेक्टर किंवा ४ हेक्टर करून या शेतकऱ्यांच्या नावावर व्यापाराचा कापूस खरेदी करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणे, एका गाठीला ७०० रुपये प्रमाणे लाच घेणे, सिल्लोड सहकारी जिनिंगवर कापूस खरेदी सुरू करणेबाबत मान्यता मिळणे, सिल्लोड जिनिंगने टेंडर सुद्धा भरलेला असणे, परंतु अद्याप पावेतो सिल्लोड जिनिंग सुरू न करणे, खाजगी जिंनिंगला कापूस खरेदी करणे, फुलंब्री तालुक्यातील सीसीआय कापूस खरेदीसाठी राजेंद्र फायबर्स व वरदहस्त जिनिंगला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करणे, ४ महिने सीसीटीव्ही फुटेज ठेवणे अनिवार्य असणे, सिल्लोड जिंनिंगला सीसीआय कापूस खरेदी न केल्यामुळे सिल्लोड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, याकरिता सिल्लोड जिंनीग वर सीसीआय कापूस खरेदी सुरू करणेबाबत व भ्रष्ट सेंट्रल | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इनचार्ज रुपेश सिंग याच्याविरोधात शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २०९. | श्री. नरेंद्र भोंडेकर वि. स. स. | "छत्तीसगडमधून नाकारण्यात आलेल्या कोळशाची माफियांकडून यवतमाळ व चंद्रपूर येथील कोळसा डेपोतून खुलेआम विक्री होत असणे, हा कोळसा मंत्रालयाने प्रदूषणकारक असल्याने नाकारलेला असून कोळशाची विक्री मर्यादित करणे, वणी-चंद्रपूर परिसरातील काही कोळसा व्यापारी नियमांची पायमल्ली करीत हा कोळसा उत्कृष्टमध्ये मिसळून विकत असल्याचे निदर्शनास येणे, या कोळस्याची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाहतूक आणि विक्री करण्यात असून शासनाची करोडो रुपयांची फसवणूक करीत असणे, याकडे प्रदूषण विभागाचे दुर्लक्ष होत असणे, या गंभीर प्रकरणाची प्रदूषण विभाग व पोलीस विभाग यवतमाळ, चंद्रपूर येथे तक्रार होऊन सुद्धा सखोल चौकशी करण्यात येत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चोकशी करून संबधितावर कारवाई होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता |
| २१०. | श्री. सुनिल प्रभू,श्री. चेतन तुपे,श्री. मनोज जामसुतकर,श्री. अमिन पटेल,श्री. विजय | " राज्यात दि.१८.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ या कालावधीत मुंबई शहर उपनगरात हवेची गुणवत्ता प्रचंड प्रमाणात खालावून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | वडेट्टीवार,श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अस्लम शेख,श्रीमती ज्योती गायकवाड,श्री. विश्वजित कदम,श्री. साजिद खान पठाण,श्री. अमित विलासराव देशमुख,श्री. अमित झनक, डॉ. नितिन राऊत,श्री. शिरीषकुमार नाईक, श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. निलेश राणे, श्री. योगेश सागर, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. अजय चौधरी, श्री. मंगेश चव्हाण, श्री. रोहित पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. मिहीर कोटेचा,श्री. दौलत दरोडा,श्री. मोहन मते, वि. स. स. | प्रचंड प्रदुषण निर्माण होणे, केंद्रिय प्रदुषण नियत्रंण मंडळाने शहरातील २४ एक्युआय मॉनिटरींग स्टेशनवर हवेची गुणवत्ता तपासली असता २४ पैकी ९ केंद्रावर -१८७ खराब ते अंत्यत खराब श्रेणीत एक्युआय नोंदविण्यात येणे, सर्वाधिक एक्युआय बीकेसी येथे ३३४ अंकावर पोहोचणे तर कुलाबा-२७४ तर देवनार-२६८, विलेपार्ले-२६४, मालाड-२१४, वांद्रेपूर्व खेरवाडी-२३८ इतक्या प्रमाणात मुंबई शहराचे हवेची गुणवत्ता खालावून प्रदुषणात वाढ होणे, माहे ऑक्टोंबर मध्ये मुंबईतील १९ ठिकाणावरील हवाप्रदुषण मापकावर "पीएम २.५" ची सर्वाधिक नोंद होणे. "पीएम २.५".जाडीचे आणि त्यापेक्षाही सुक्ष्म धुलिकण जास्त धोकादायक मानले जातात. यामुळे मुंबई हे जगातील दुसरे प्रदुषित शहर म्हणून बनणे, मुंबईत बांधकामे, प्रकल्प, वाहतूक कोंडी आदी समस्येमुळे मुंबईची हवा सर्वाधिक प्रदुषित होऊन शहरातील १.५ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| २११. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " गव्हाणपाडा माहुल येथे टाटा पावर कंपनीचा वीज निर्मितीचा प्लांट असून सदर प्लांट कोळशावर चालत असून हजारो | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मेट्रिक टन राख दररोज समुद्राच्या पाण्यात सोडण्यात येत असून सदर राख सोडण्यासाठी केलेल्या रस्त्यातील कांदळवन देखील टाटा पॉवर वीज निर्मिती कंपनीकडून कापण्यात आले असून ही बाब वनविभागाच्या निदर्शनास आले असूनही आजपर्यंत याबाबत वनविभागाने कंपनीवर कारवाई केलेली नसणे, समुद्रात राख सोडत असताना आजूबाजूच्या परिसरातील गव्हाण पाडा आंबा पाडा माहुलगाव वाशी नाका या परिसरातील नागरिकांना अस्थमा व इतर गंभीर स्वरूपाचे श्वसन विकाराचे त्रास होत असून समुद्रात सोडलेल्या राखेमुळे मावळगाव येथील मच्छीमारांच्या मासेमारी व्यवसायावर देखील परिणाम झाला असून त्यांच्यावर देखील उपासमारीची वेळ आली असणे, ही गंभीर बाब असून याबाबत शासनाची करावयाची कारवाई व प्रतिक्रिया" | |
| २१२. | श्री. तुकाराम काते वि. स. स. | " मुंबईत विशेष करून चेंबूर मतदार संघात मोठमोठे बिल्डर रुस्तमजी व इतर बिल्डर मोठ्या प्रमाणात इमारतीच्या बांधकामासाठी खड्डे खोदणे व इमारतीचे बांधकाम सुरू असणे, यामुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषित होत असून चेंबूरमध्ये केमिकल कंपन्यामुळे आधीच हवा प्रदूषित असून त्यात आणखीन भर या इमारत बांधकाम कामामुळे होत असणे, मुंबई | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महापालिकेने इमारत व्यवसायिक बांधकामांना प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असणे, त्याकडे बिल्डर दुर्लक्ष करत असणे, याचे कारण बिल्डरांना अस्वच्छतेबाबत चार्ज मारून कारवाई करणारे एम पश्चिम विभागातील घनकचरा खात्यातील एनडी विभागाचे कर्मचारी महिन्याला बिल्डरांकडून हप्ते घेऊन जात असल्याने बिल्डरांवर वचक न राहिल्याने बिल्डर प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना करीत नसणे, ही अत्यंत गंभीर बाब असून याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | |
| २१३. | श्री. देवराव भोंगळे, वि. स. स. | " राजुरा नगरपरिषदेच्या हद्दीतील या माजी मालगुजारी तलावाच्या सुशोभीकरणाच्या कामासाठी तलाव संवर्धन योजनेअंतर्गत रु. १४.५८ कोटींचा निधी त्वरित मंजूर करून तो तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये समोर येणे, प्रशासकीय स्तरावर निधी मंजुरीच्या प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, या तलावाची अवस्था अत्यंत दयनीय व खराब झाली असून हा तलाव शहरातला मधोमध असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यावरणचा प्रश्न निर्माण होत असणे, सदर प्रस्तावाला तातडीने पर्यावरण व नगर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकास खात्याने मंजुरी देऊन या मालगुजारी तलावाच्या सौंदर्यकरणाला व संवर्धनाला मान्यता द्यावी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ." | |
| २१४. | श्री. राजेंद्र गावित वि. स. स. | " पालघर जिल्ह्यातील तारापुर येथील MIDC औद्योगिक क्षेत्रात सुमारे १३०० कारखाने अस्तित्वात असून शहरातील झपाट्याने होणारे नागरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे पानेरी नदीचे प्रदूषण वाढले असुन घरगुती व औद्योगिक सांडपाणी योग्य प्रक्रिया न करता थेट नदीत सोडल्याने नदी प्रदूषित होणे, काही टँकर चालक व कारखानदारांच्या संगनमतामुळे खाडीतील जलस्त्रोतही अधिक प्रदूषण होणे, अलीकडेच खाडीत केमिकल टाकल्यामुळे हजारो टन मासे मरण पावले, याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई अपयशी ठरणे, या गंभीर परिस्थितीत पालघर शहरासाठी तातडीने सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP- Sewage Treatment Plant) प्रकल्प व MIDC साठी सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP- Common Effluent Treatment Plant) उभारण्याबाबत ठोस उपाययोजना करण्याची तसेच सर्व कारखान्यांवर कठोर कारवाई करुन तारापूर MIDC क्षेत्रातील पानेरी नदी प्रदुषणाचा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २१५. | श्री. विक्रम पाचपुते, श्री. रोहित पाटील, वि. स. स. | " राज्यातील लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रमांमध्ये कृत्रिम फुले, प्लास्टिक फुगे व कमी दर्जाच्या प्लास्टिक खेळण्यांचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला, नैसर्गिक फुलांचा तुटवडा असल्याने या वस्तूंना पर्यायी मागणी असून त्याचा मानव आरोग्य, पर्यावरण, प्राणी-पक्षी आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असणे, रसायनांचे वायू उन्हामुळे बाहेर पडून डोकेदुखी, त्वचाविकार, खाज, लालसरपणा, डोळे जळजळ लहान मुलांमध्ये श्वसनाचे त्रास, प्लास्टिक व रंगातील दीर्घकालीन रसायनांमुळे कर्करोगासारख्या धोक्याची शक्यता संशोधनात अधोरेखित होत आहे, पशुधनावरील धोका गाई, म्हशी व इतर पाळीव प्राण्यांच्या तोंडात कृत्रिम फुले/खेळणी गेल्यास आतड्याचे विकार, पचनसंस्थेचा बंद पडणे, पर्यावरणीय हानी, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढतो, कमी दर्जाच्या किंवा विषारी रसायनयुक्त प्लास्टिक फुले/फुगे/खेळण्यांवर तातडीने बंदी अथवा कठोर नियंत्रण घालणे, पर्यावरण विभागाकडून गुणनियंत्रण तपासणी अनिवार्य करणे, लग्न व कार्यक्रमस्थळी वापरल्या जाणाऱ्या सजावटीच्या वस्तूंसाठी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नॉन-टॉक्सिक प्रमाणपत्र सक्तीचे करणे, तपासणी व अंमलबजावणी, स्थानिक स्वराज्य संस्था यांना बाजारातील अशा वस्तूंची नमूना तपासणी, अनधिकृत उत्पादनांवर दरडोई दंड व जप्ती, याची स्पष्ट कार्यवाही सूचना देणे, जनजागृती व पर्यायी प्रोत्साहन नागरिकांना नैसर्गिक फुले, पुनर्वापरयोग्य सजावट, फॅब्रिक डेकोरेशन यांचा वापर करण्यास प्रोत्साहन, नैसर्गिक फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन, अनुदान व बाजारपेठ उपलब्ध करणे, कार्यक्रमस्थळी व विवाह हॉलमध्ये प्लास्टिक सजावट वापरबंदीचे बोर्ड व दंडात्मक तरतुदी लागू करणे, वैज्ञानिक अहवाल व धोरण, शासनाने करावयाची तात्काळ कार्यवाही व उपाययोजना" | |
| २१६. | श्री. समाधान आवताडे वि. स. स. | " सोलापूर जिल्ह्यात विधिमंडळच्या व्ही.जे.एन.टी. समितीने केलेल्या पाहणीत जिल्ह्यातील तब्बल ९०% आश्रमशाळा कागदोपत्री असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला असणे, या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, भोजन आणि निवास या मूलभूत सुविधाही उपलब्ध नसणे, काही ठिकाणी तर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी देखील बोगस असल्याचे आढळणे, मंगळवेढा- पंढरपूर मतदार संघासह तालुक्यातील आश्रम शाळांमध्ये शासनाचे नियम डावलून प्रचंड | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भ्रष्टाचार सुरू असणे, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेला शासकीय निधी केवळ संस्थाचालक व शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने लाटला जात असणे, संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या मालकीच्या नसलेल्या जागेवर बेकायदेशीर इमारत बांधकाम करणे, ग्रामपंचायतीचे बनावट नमुना ८ तयार करून शासनाकडून लाखो रुपयांचे घरभाडे उकळणे, शाळेत बायोमेट्रिक मशीन जाणीवपूर्वक बंद ठेवून, प्रत्यक्षात विद्यार्थी संख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असूनही बोगस हजेरी लावून अनुदान लाटणे आणि स्थानिक विद्यार्थ्यांना निवासी दाखवून शासनाची फसवणूक करणे, पोषण आहार व साहित्यात भ्रष्टाचार असणे, संस्थेवर प्रशासक नेमून गुन्हे दाखल करण्याबाबत ग्रामस्थांनी वारंवार पुराव्यानिशी तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसणे, या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे व संस्था बरखास्त करून प्रशासक नेमण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २१७. | श्री. रवी राणा,श्री. सुनील राऊत वि. स. स. | " सन १९०१ ते १९४१ या कालावधीतील जनगणनांत जनगणना आयोगाने "कोळी महादेव" या पोटजातीची स्वतंत्र | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोंद न करता केवळ "कोळी" असा सामूहिक उल्लेख केलेला असणे, या ऐतिहासिक प्रशासकीय त्रुटीमुळे आज संबंधित अधिकाऱ्यांकडून "१९५० पूर्वीचे दस्तऐवज सादर करा" अशी अव्यवहार्य अट लावली जात असून, या अनुसूचित जमाती चे समाजातील नागरिकांना अशा नोंदी मिळविणे प्रत्यक्षात अशक्य बनले असणे, परिणामी कोळी महादेव समाजातील लाखो नागरिकांना संविधानाने हमी दिलेल्या हक्काच्या लाभांपासून अन्याय्य वंचित राहावे लागत आहे. या गंभीर प्रश्नावरील तातडीच्या कार्यवाहीसाठी म.कृ.स.चे महासचिव व कोळी महादेव नेते यांनी दिनांक २४/०६/२०२५ रोजी लोकप्रतिनिधींना निवेदन दिले. त्यानुसार महसूल मंत्र्यांनी दिनांक ०७/०८/२०२५ रोजी पत्र क्र. ५७९/२५रोजीचे मुख्यमंत्र्यांकडे पाठविले असणे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०१/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते ११:०० या वेळेत मुख्यमंत्री, मुख्य सचिव व मुख्यमंत्री सचिवालयास मेलद्वारे तातडीची माहिती कळविली. तरीही निर्णय न झाल्यास कोळी महादेव समाज लाखो चे संख्येने दि.१०/१२/२०२५ रोजी विधानभवनावर मोर्चा काढत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने स्पष्ट निर्णय घेऊन जाहीर करण्यात | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २१८. | श्री. रवी राणा वि. स. स. | " "विद्यमान महसूल मंत्री यांनी दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र क्र. ३८१६ द्वारे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे यांच्या आयुक्तांना स्पष्ट निर्देश दिले असून, आदिवासी नेते व म. कृ. स. महासचिव यांनी दिनांक १८/०९/२०२५ रोजी सादर केलेल्या पत्रातील विषयांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित पत्राची प्रत TRTI, पुणे कार्यालयास अधिकृतरीत्या पाठविण्यात आली असून त्याची डिजिटल प्रत TRTI च्या अधिकृत ई-मेलवरही उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.या प्रकरणाची गांभीर्यता लक्षात घेता, शासनाच्या आदिवासी विकास विभाग मंत्रालयाने शासनस्तरावर योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता |
| २१९. | श्री. संजय पुराम,श्री. रामदास मसराम, श्री. भीमराव केराम,डॉ. मिलिंद नरोटे वि. स. स. | " भारतातील १३ राज्यांमध्ये गोंडी भाषा बोलली जात असून मध्य भारतासह ओरीसा, पश्चिम बंगाल, कर्नाटक व महाराष्ट्रात सुद्धा गोंडी भाषा अवगत असणारे व बोलणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, मादाव शंभूशेक यांच्या डमरू | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नादावरून गोंडी धर्मगुरू पहांदी पारी कुपार लिंगोने गोंडी भाषा तयार केली असल्याची आख्यायीका असणे, तेव्हापासून प्राचीन काळात गोंडी भाषा बोलणारे गोंडराजे म्हणून राजे-महाराजे यांचा इतिहास असणे, त्यामुळे गोंडी भाषा लुप्त होऊ नये, यासाठी भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये गोंडी भाषा समाविष्ट करून तीला राज्यभाषेचा दर्जा मिळावा, यासाठी राज्यातील गोंडी भाषीकांची मोठ्या प्रमाणात मागणी असणे, त्यासाठी राज्यशासानाने केंद्र शासनाकडे शिफारस करण्याची विनंती सुद्धा वारंवार करण्यात आली असणे, त्यामुळे राज्य शासनाने गोंडी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे तातडीने शिफारस करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २२०. | श्री. योगेश सागर,श्री. सुधीर मुनगंटीवार<br>वि. स. स. | " नंदुरबार जिल्ह्यात रस्त्यांच्या अभावी दुर्गम भागातील नागरिकांना अनेक समस्यांच्या सामना करावा लागत असणे. धडगाव तालुक्यातील बुन्नीपाडा येथील गर्भवती महिलेला उदय नदीतील पुराच्या पाण्यातून झोळीच्या साहाय्याने वाट काढत सात किलोमीटर पायपीट करत रुग्णालयात नेण्यात आल्याची घटना दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी निदर्शनास आली असणे, जिल्ह्यातील आदिवासी पाड्यात रस्त्यांची अत्यंत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दुरावस्था असणे. खुटवडा - कुडब्यापाडा ते बुन्नीपाडा या गावांना जोडणारा रस्ता नसणे, ४ वर्षांपूर्वी या रस्त्यासाठी मंजुरी मिळून देखील रस्त्याच्या कामाची अद्याप सुरुवात झालेली नसणे, तसेच गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालुक्यातील रस्त्याअभावी चारचाकी वाहन पोहचत नसलेल्या गोटाटोला येथे दिनांक १४ ऑक्टोंबर २०२५ रोजी रूनिता दुम्मा या गर्भवतीला रूग्णालयात पोहचविण्यासाठी खाटेची कावड करावी लागणे, नागरिकांना सार्वजनिक आरोग्याच्या सेवा बांदयापासून चांदयापर्यंत उपलब्ध करून दिल्याबाबत शासनाच्या वेळोवेळी जाहीरातीमधून निदर्शनास येणे, परंतु प्रत्यक्षात गावगाडे आदिवासी राहत असलेल्या दुर्गम भागापर्यंत आरोग्याच्या सेवा उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती वेळोवेळी उघडकीस येणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २२१. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " गोंदिया येथील मे महेंद्र कुमार दीनदयाल अग्रवाल व राहुल राईस मिल नागरा या दोन्ही मिल धारकाला उप प्रादेशिक व्यवस्थापक अहेरी यांनी दिनांक २४/०७/२०२५ रोजी दिलेल्या नोटिसाच्या अनुषंगाने माहिती देणेबाबत पत्र दिलं असणे, सदर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पत्रामध्ये या चार गोष्टींचा उल्लेख करण्यात आला होता त्या अनुषंगाने या दोन्ही राईस मिल धारकांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पर्यंत कोणतीही माहिती सादर केली नसणे, सदर मिल धारकांनी त्यांना दिलेला कालावधीत माहिती न दिल्यामुळे उपप्रादेशिक व्यवस्थापक अहेरी यांनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार या दोन्ही मिल धारकांसोबत संगनमत करून शासनाचे मोठे आर्थिक नुकसान व फसवणूक केली असल्याची बाब समोर येणे,याबाबतीत आदिवासी विकास महामंडळ व जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्याकडे लेखी स्वरूपात दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी या दोन्ही राईस मिल धारक व संबंधित अधिकारी यांनी यांच्यासोबत संगनमत केले त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाच्या गुन्हा दाखल करून कारवाई करणे बाबत निवेदन देण्यात येत नसणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने विभागामार्फत या दोन्ही राईस मिल व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई न होणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २२२. | श्री. आमश्या पाडवी वि. स. स. | " धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागात सन २००४ ते २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सहा हजार कोटी रुपयांचा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गंभीर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप न्यायालयीन नोंदींमधून स्पष्ट झालेला असून, या प्रकरणी न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड चौकशी समितीने तत्कालीन मंत्री तसेच संबंधित अधिकारी यांच्यावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवत फौजदारी कारवाईची स्पष्ट शिफारस केली असताना राज्य शासनाकडून अद्याप ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यामुळे आरोपींना संरक्षण देण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र निर्माण समोर येणे, या गैरव्यवहारासंदर्भात साक्री प्रकल्प कार्यालयासमोर याचिकाकर्ते यांनी सहा दिवस उपोषण करून दोषींवर कारवाई, भ्रष्टाचाराचा निधी व्याजासह वसूल करणे व तत्कालिन संबंधित मंत्र्यांना पदावरून हटविणे यांसह मागण्या केल्या असणे, या प्रकरणी प्रशासनाने लेखी उत्तर दिल्यानंतरच उपोषण मागे घेण्यात आले, याबाबत न्यायालयानेही राज्य सरकारला प्रतिज्ञापत्राद्वारे कारवाईचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिलेले असताना शासन शिफारशीप्रमाणे अंमलबजावणी करण्यात करत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सदरील विषय तात्काळ निकाली काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २२३. | श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. मंगेश चव्हाण, | " राज्य शासन आदिवासी मुलांसाठी आदिवासी विकास | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भास्कर जाधव,श्री. राजु तोडसाम,श्री. मोहन मते,श्री. विलास तरे वि. स. स. | विभागामार्फत अनुदानित व विनाअनुदानित शासकीय आश्रमशाळा चालवित असणे, यामध्ये राज्यभरातील आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थींनी शिक्षण घेत असणे, त्यातील काही विद्यार्थी निवासी असणे, अनेकदा आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या कारणांनी होणाऱ्या मृत्युच्या घटना निदर्शनास येणे, दिनांक ८ ऑक्टोंबर, २०२५ रोजी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील आंबिस्ते खुर्द येथील अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेत मोखाडा तालुक्यातील दोन विद्यार्थी शिक्षण घेत असणे, सदर दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांनी झाडाला लटकून एकत्र गळफास घेतल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, दरम्यान घटनेत एका विद्यार्थ्यांचा मोबाईल हस्तगत करून चौकशीतून निष्पण झालेल्या माहितीच्या आधारे दोषींवर कारवाई होण्याबाबत कुटुंबियांकडून होत असलेली मागणी, तसेच आश्रमशाळेत होणारे मृत्यु टाळण्यासाठी आश्रमशाळांमधील सुरक्षा वाढविणे तसेच मुलांचे योग्य समुपदेशन करण्याबाबत शासनाने यंत्रणा कार्यरत करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२४. | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | " नाशिक येथील आदिवासी विकास उपायुक्त असलेल्या अधिकाऱ्याने ते पूर्वी प्रकल्प अधिकारी पदावर कार्यरत असतांना भ्रष्टाचार केल्याबाबत एफ.आय.आर. दाखल असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करीत २ वेळा नियम डावलून पदोन्नती देण्यात येणे, त्यांच्या विरोधात लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना ई शासनाकडे तक्रारी दाखल केलेल्या असणे, उक्त प्रकरणाची चौकशी आता त्यांच्याकडे जात असणे, सदरहू अधिकारी हे शासकीय सेवेत रुजू होण्यापूर्वी देखीत त्यांच्यावर कळवण पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असणे, असे असताना देखील त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येणे, एकलव्य निवासी शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सहावा व सातवा वेतन आयोग लागू करणे, अयोगातील फरत व प्रोफेशन कालावधीतील फरक मिळणे याबाबत प्रति शिक्षक कर्मचाऱ्यांकडून एक लाख रुपये याप्रामणे रक्कम घेतल्याबाबात सदरहू उपायुक्त व त्यांच्या अधिनस्त कार्यरत सहाय्यक आयुक्त, लिपिक यांच्या विरुध्द लाचलुचपत विभागाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, उक्त प्रकरणी विधानपरिषद सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावारव चर्चा झाली असता | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन मंत्री यांनी दिलेले असणे, परंतु अद्यापही उक्त प्रकरणी कोणतीच चौकशी वा कारवाई न होणे, परिणामी आदिवासी समाजाच्या नागरीकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता." | |
| २२५. | डॉ. मिलिंद नरोटे वि. स. स. | " अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली ही मुख्य समिती कायम ठेवून, ती चंद्रपूर समितीकडे विलीन न करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (गडचिरोली) यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, गडचिरोली जिल्हा यांना दि. २७.९.२०२५ रोजी निवेदनाद्वारे केली असणे, गडचिरोली समिती हि मुख्य समिती असून ती २००७ पासून कार्यरत असल्याने या समितीकडे अनुसूचित जमातीचे लोकसंख्या अधिक आहे व जिल्ह्यातील दुर्गम व नक्षलग्रस्त तसेच वाहतुकीची व दळणवळनाची पुरेसी उपलब्धता नसणे, तसेच समितीच्या कामाकाजाकरिता गडचिरोली येथे अत्याधुनिक कार्यालयाचे बांधकाम अंतिम टप्यात सुरू असून यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झालेला असणे, छत्रपती संभाजीनगर व किनवटकरीता गडचिरोली या दुर्गम नक्षलग्रस्त | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जिल्ह्यातील समितीचे स्थलांतरन न करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही" | |
| २२६. | श्री. हेमंत ओगले वि. स. स. | " राज्यामध्ये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना दिनांक ०९ ऑगस्ट २०१६ वा त्यादरम्यानच्या शासन निर्णयाद्वारे झालेली असणे,शासनाला माहिती तंत्रज्ञान विषयक आवश्यक संयंत्रे, साधनसामुग्री, सेवा पुरवठा करणारी राज्यातील एकमेव यंत्रणा म्हणून या महामंडळास मान्यता देण्यात आलेली असणे,मात्र शासनाचे काही विभाग उक्त महामंडळ ऐवजी खासगी कंपन्यांकडून माहिती तंत्रज्ञान विषयक सेवा घेतात असे माहे ऑक्टोबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आलेले असणे,त्यामुळे उक्त महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश साध्य होताना दिसत नसणे, उक्त महामंडळास शासनाला माहिती तंत्रज्ञान विषयक आवश्यक संयंत्रे, साधनसामुग्री, सेवा पुरवठा करणारी राज्यातील एकमेव यंत्रणा म्हणून मान्यता असूनही त्याची अंमलबजावणी करण्यात शासनाकडून होणारे दुर्लक्ष,याबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता |
| २२७. | श्री. आमश्या पाडवी वि. स. स. | " नंदुरबार व धुळे जिल्ह्यातील नंदुरबार व साक्री | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी केंद्र सरकारची किसान संपदा योजना राबविली जात असताना, या योजनेखाली तत्कालिन आदिवासी विकास मंत्री यांच्या कन्या यांच्या रेवा तापी व्हॅली इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट या कंपनीला तब्बल १० कोटी रुपये अनुदान मंजूर झाल्याची बाब समोर आलेली असून, सदर कंपनीचा प्रकल्प २७ कोटी ६ लाखांचा असून तत्कालिन मंत्री पदावर असताना त्यांनी स्वतःच्या कुटुंबीयांना लाभ मिळवून देण्यात येणे, जिल्ह्यातील वास्तविक शेतकरी, उद्योगप्रवर्तक यांना दुय्यम ठरवून लोकप्रतिनिधींच्या कुटुंबीयांना कोट्यवधींचा लाभ देणे हे शासनाचे दिशाभूल करणारे कार्य असून याबाबत संपूर्ण सखोल चौकशी करून प्रकल्पातील अनियमितता, पात्रता निकषांचे उल्लंघन, राजकीय हस्तक्षेप याबाबत तातडीने तपास करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २२८. | श्री. कैलास घाडगे पाटील वि. स. स. | " खरीप हंगाम २०२० मध्ये धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीच्या ७२ तासाच्या आत पूर्वसूचना देऊ न शकल्याने नुकसानभरपाई पासून वंचित राहिल्याने शेतकरी व शासनाने मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | छत्रपती संभाजीनगर येथे ५१४.१२ कोटी नुकसानभरपाईची याचिका दाखल करणे, कंपनीकडून १५० कोटी जमा करून घेऊन दखल घेणे, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पिक विमा काढलेल्या सर्व व काढणी पश्चात ७२ तासाच्या आत पूर्वसूचना देऊ न शकलेल्या सर्व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे आदेशित करणे, कंपनी निर्णयाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायलयात जाणे, कंपनीकडून २०० कोटी रुपये जमा करून घेऊन दखल घेणे, पात्र शेतकऱ्यांना हेक्टरी १८०००/- रुपयाच्या मर्यादेत नुकसानभरपाई देण्याचे आदेश देऊन कंपनीने जमा केलेले २०० कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांना व्याजासह वर्ग करून १५० कोटी मधील ७५ कोटी वर्ग करावे व उर्वरित ७५ कोटी बाबत अंतिम निर्णय उच्च न्यायालयाने घ्यावा असा निर्णय देणे, या आदेशाप्रमाणे पुन्हा याचिका सुरू करुन उर्वरित ७५ कोटी व्याजासह व राज्य शासनाकडील विमा कंपनीचा प्रलंबित दुसरा हप्ता शेतकऱ्यांना वितरीत करणेबाबत निर्णय देणे, न्यायालयाकडील ७५ कोटी रक्कम व्याजासह जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त होणे, राज्य शासनाकडील विमा कंपनीचा प्रलंबित दुसरा हप्ता १३४ कोटी ११ लक्ष रुपये व्याजासह जिल्हाधिकाऱ्यांना वर्ग करणेबाबत तातडीची | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| २२९. | श्री. अब्दुल सत्तार वि. स. स. | " छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात मोढा शिवारातील गोडाऊनवर कृषी विभागाच्या कारवाईत तब्बल ३ हजार बोगस खतांच्या गोण्या जप्त होणे, शासनाच्या पिशवीत २०० रुपयांचे बनावट खत भरून ते १ हजार रुपये दराने विक्रीस ठेवले असल्याचे उघडकीस येणे, इतक्या मोठ्या स्तरावरील लुटीचा व्यवसाय किती दिवसांपासून चालू होता याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, कारवाईसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना आलेले दबावतंत्राचे फोन, गोडाऊन मालकाचे नाव माहित असूनही फक्त मॅनेजरलाच आरोपी करणे, पंच म्हणून त्या टोळीतील व्यक्तींचाच समावेश करून मोढा गावचे पोलीस पाटील-सरपंच यांना वंचित ठेवणे, रेडच्या व्हिडिओत दिसणाऱ्या व्यक्तीलाच पंच म्हणून दाखवणे, कंपनी डोंगरगाव (गट नं. ७०) येथे नोंदणीकृत असताना मोढा शिवारातील गोदामात माल कसा पोचला, रेड सायंकाळी ५ वाजता होऊनही ८ तास FIR नोंदवण्यात विलंब का केला, कंपनीचे बिलिंग-बँक खाते तपासणी न करणे व इतर भागीदारांवर गुन्हे दाखल न करणे या गंभीर प्रकरणातील संपूर्ण सत्य बाहेर आणून दोषींवर कठोर व तात्काळ कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यवाही व उपाययोजना. आणि शासनाची प्रतिक्रिया" | |
| २३०. | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. अमित विलासराव देशमुख,डॉ. विश्वजित कदम,श्री. संजय मेश्राम,श्री. नानाभाऊ पटोले,डॉ. ज्योती गायकवाड,श्री. अमित झनक,श्री. विकास ठाकरे,श्री. साजिद खान पठाण,श्री. अस्लम शेख,श्री. अनिल मांगुळकर,श्री. हेमंत ओगले,श्री. मनोज जामसुतकर,श्री. योगेश सागर,श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. मंगेश चव्हाण,श्री. मोहन मते,श्री. अबू आझमी वि. स. स. | " राज्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या जात असतांनाही राज्यातील कुपोषणाची समस्या सोडविण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे,महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तीन बालकांध्ये एक बालक कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (आयआयपीए) एका अभ्यास अहवालातून समोर आलेले असल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, जन्मावेळचे कमी वजन, लहान वयात मातृत्व, शिक्षणाचा अभाव, खालावलेले राहणीमान, स्वच्छ पाण्याचा अभाव आणी स्तन्यपानात न केलेल्या मुलांना कुपोषण होण्याची शक्यता दुप्पट असल्याचे आढळून येणे, पोषण निर्देशकांमध्ये जवळपास कोणतीही सुधारणा होत नसल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आलेली असून सदरची बाब चिंताजनक असणे, राज्यातील पाच वर्षांखालील ३५ टक्के मुले वाढ खुंटलेली, ३५ टक्के कमी वजनाची आणी २६ टक्के मुले कुपोषित असणे,याचाच अर्थ राज्यातील प्रत्येक तीन मुलांपैकी एक मूल कुपोषणाला बळी पडले असल्याचा निष्कर्ष जर्नल ऑफ हेल्थ, पॉप्युलेशन अण्ड न्यूट्रीशनमधील | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभ्यासातून समोर आलेले असणे,राज्यातील कुपोषणासंदर्भात सामाजिक संघटना,लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री,मा.महिला व बालविकासमंत्री यांचेकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार तक्रारी करुनही, प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जाणे, परिणामी प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे सदरची समस्या अधीकच चिंताजनक होत चालली असणे, बालकांच्या कुपोषणाची दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेली समस्या महाराष्ट्रासारख्या विकसीत पुरोगामी राज्याला शोभणारी नसणे, सदर गंभीर प्रकरणी त्वरीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २३१. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " नागपूर शहरातील अयोध्या नगर हद्दीतील कुंदनलाल गुप्ता नगर नुरी मज्जितीच्या मागील मोकळ्या मैदानात छापा टाकून दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी गुन्हे शाखेच्या युनिट पाचच्या पथकाने केलेल्या कारवाईत जिल्ह्यात २७ टन पोषण आहार अवैधरीत्या साठवल्याचे निदर्शणास आले असणे. महिला व बालविकास विभागांतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील अंगणवाडी व गर्भवतींना पोषण आहार दिला जात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, यातील तूरडाळ खिचडी प्रिमिक्सचा पिवळ्या रंगाच्या तांदळाने भरलेली पांढरी व इतर प्लास्टिकची एकूण २६९ पोती, त्यातील पिवळा तांदूळ १२० क्विंटल, अंगणवाडी व गर्भवतींचे मल्टिमिक्स सिरिसल्स अँड प्रोटिन प्रिमिक्स असणे, तसेच शून्य ते तीन वर्षे वयोगटातील बालकांना दिली जाणारी खाऊची ८७५ ग्रॅम वजनाची पांढरी व फिक्कट निळ्या रंगाची २१ पाकिटे तसेच शासकीय तांदळाची ज्युटची पोती पोलिसांनी गोदामातून जप्त केली असणे, पोषण आहार देण्यासाठी काही विशिष्ट कंपन्यांना कंत्राट दिले असणे, त्याचा शासनाकडून अधिकृत अध्यादेश काढण्यात आला असणे, या कंपन्यांकडून पाकिटावर कंपनीचे नाव, दिनांक, बॅच नंबर, उत्पादकाचे नाव, कार्यालयाचे नाव व पत्ता, परवाना, आयसीडीएस लोगो, सेल्फलाईफ, वेज ग्रीन लोगो, आहाराचा प्रकार, लाभार्थी प्रकार, मुदतबाह्य दिनांक इत्यादी देण्यात येत असणे, पोलीस कारवाईत सापडलेल्या २७ टनापैकी २१ टन आहाराच्या पाकिटांवर कंपनीचे नाव असणे, या प्रकरणाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २३२. | श्री. आमश्या पाडवी वि. स. स. | " मौजे. रतनबारा (ता.अक्कलकुवा जि. नंदुरबार) येथील श्रीमती. जमुनाबाई प्रताप वसावे ह्या अंगणवाडी सेविका म्हणून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यरत असुन त्यांनी २०१४ साली मोरंबा जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवून विजय मिळविला असणे, परंतु शासन निर्णय ५ ऑगस्ट, २०१० एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत अंगणवाडी सेविका मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सार्वत्रिक निवडणुकीत भाग घेतल्यानंतर नवनिर्वाचित सदस्याचे पद स्वीकारल्यानंतर दोन्ही पदांचे कर्तव्य एकाच वेळी पार पाडता न येणे, तरीही श्रीमती जमुनाबाई प्रताप वसावे जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्याने अंगणवाडी सेविका पदाचा राजीनामा देणे अपेक्षित असणे, परंतु त्यांनी राजीनामा न देता दोन्ही पदाचा लाभ आजपर्यंत घेत असून शासनाची दिशाभूल करत असणे, एकाच वेळी व्यक्ती दोन पदावर काम करणे शक्य नसल्याने सदरील कर्मचारी अंगणवाडी केंद्रात गैरहजर असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत श्रीमती जमुनाताई प्रताप वसावे यांच्याकडून अंगणवाडी सेविका म्हणून सन २०१४ पासून ते आजपर्यंत एकूण १० वर्ष घेतलेला पगार वसूल करून शासनाची दिशाभूल केली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अंगणवाडी सेविका पदावरून कायमस्वरूपी कमी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |

| | | | |
|---|---|---|---|
| २३३. | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | " सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांच्याकडून मनमानी कारभार सुरू असणे, शासन निर्णय व मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या सचिव समितीचे निर्णय परस्पर बदलणे, सारखी संस्थेला २० मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव सचिव समितीने मंजूर केलेला असताना परस्पर टेंडर मध्ये बदल करणे, शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर, २०२२ व ८ नोव्हेंबर, २०२३ चा भंग करण्याबाबत, लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतलेला असताना त्याकडे दुर्लक्ष करून मनमानी कारभार करणे, टेंडर पक्रियेत असणारी अनियमितता तसेच नाशिक जिल्हा न्यायालयासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आलेल्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेला असल्याची तक्रार असणे, नाशिक जिल्ह्यात अनेक सक्षम शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंते कार्यरत असताना सदर प्रकल्पाचा चार्ज नगर जिल्ह्यातीलत राहुरी येथे कार्यरत कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविण्यात येणे, अधिकाऱ्याचे ठेकेदाराशी संगनमत असणे, अनेक नामांकित व दर्जेदार फर्निचर उत्पादक कंपन्या असताना केवळ Godrej, Bacchubhai Chairs, Lunawat, Intro Furniture या मर्यादित चार कंपन्यांनाच टेंडर मध्ये भाग घेण्याचा अधिकार | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देणे,उच्चअधिकार समिती यांच्या मान्यतेने २८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता आदेश आलेले असतांना कामाचे तुकडे करून टेंडर प्रक्रिया करण्यात येणे या सर्व अनिमिततेला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असणारे पाठबळ, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागात वाढत असणारे भ्रष्टाचाराचे व मनमानी कारभाराचे प्रमाण, या गंभीर बाबींकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २३४. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " नागपूर होणाऱ्या हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये रवि भवन परिसरातील मंत्री राज्यमंत्री व इतर शासकीय बंगले तसेच आमदार निवास मधील आमदारांसाठी राहणाऱ्या कक्षासाठी मोठ्या प्रमाणात गडबडी व भ्रष्टाचार सुरू असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये समोर येणे, सदर कामे करत असताना ठेकेदारांनी ३६ ते ५०% कमी दराने निविदा प्रक्रिया घेत असणे, ठेकेदारांनी जी कामे घेतले त्याच्या गुणवत्तेमध्ये निश्चितपणाने खाडाखोड व सुमारे दर्जाचे होत असणे, अधिकारी ने तयार केलेल्या इस्टिमेट च्या बिलो घेतल्याने इस्टिमेट चुकीचे असणे किंवा कामाच्या दर्जा सुमारा असणे, इस्टिमेट बनवणारा अधिकाऱ्यांची चौकशी सुद्धा होणे गरजेचे असणे, बंगल्याच्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कामांची दुरुस्ती स्वरूपाची करणे अपेक्षित असताना ती कामे मूळ स्वरूपात होत असणे, ही बाब अत्यंत गंभीर असणे, गरजेपेक्षा जास्त महागडे वस्तूची खरेदी होत असणे, मानक पेक्षा जास्त फर्निचर व अत्यंत महागडे फर्निचर घेत असणे, फर्निचर साठी MPW मॅन्युअल मध्ये मंत्र्यांसाठी आवश्यक दिलेल्या फर्निचर चे नियमाचे काटेकोर पालन न होणे, वारंवार या सर्व बाबींमध्ये भ्रष्टाचार होत असल्याची बाब समोर येणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात संशयाचे वातावरण निर्माण होणे व हिवाळी अधिवेशनाच्या प्रत्येक खरेदीच्या ऑडिट होणे अत्यंत आवश्यक होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २३५. | श्री. रवी राणा वि. स. स. | " अमरावती शहराच्या मध्यभागी असलेल्या राजकमल चौकातील फुल ब्रिज अनेक महिन्यांपासून शिकस्त असल्याच्या कारणावरून रहदारीसाठी बंद असणे, यामुळे शहरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असणे, रुग्णवाहिकांना व आपत्कालीन वाहनांना प्रवासासाठी अडथळा येत असून, शाळकरी मुलांना सुरक्षितपणे शाळेत पोहोचण्यासाठीही पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असणे, या कारणास्तव नागरिकांचे वेळ व श्रम वाया जात आहेत तसेच | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मनस्ताप वाढला आहे. नागरिकांनी जिल्हा परिषदेस व शासनास संबंधित समस्येबाबत संताप व्यक्त केला आहे आणि पुलाची तातडीने दुरुस्ती करून खुला करण्याची मागणी केली आहे. या गंभीर परिस्थितीचा विचार करून शासनाने तातडीने या पुलाच्या दुरुस्ती व सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत निर्णायक कार्यवाही करणे आवश्यक असणे, पुल पुन्हा सुरळीतपणे चालू झाल्यास शहरातील रहदारी सुरळीत होईल, आपत्कालीन सेवांचा वेग वाढेल आणि नागरिकांचे जीवनमान सुधारेल, त्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | |
| २३६. | श्री. रवी राणा वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील भातकुली हे तालुक्याचे प्रमुख ठिकाण असून, नागरिकांच्या सुलभ प्रशासनासाठी तहसील कार्यालयासह तालुक्यातील सर्व १३ शासकीय कार्यालये एकाच छताखाली कार्यरत असावीत, अशी स्थानिकांची दीर्घकालीन मागणी असणे, या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी भातकुली येथे आवश्यक तेवढी जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली असणे, उपलब्ध झालेल्या जागेवर सर्व शासकीय कार्यालयांची सुसज्ज व आधुनिक इमारत उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून निधी मंजूर करण्याची मागणी केली असणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तथापि, या महत्वाच्या प्रकल्पासाठी शासनस्तरावर अद्याप एकरकमी मोठ्या निधीच्या मंजुरीबाबत कोणताही निश्चित निर्णय घेण्यात आलेला नाही. भातकुली तालुक्यातील प्रशासकीय सेवा अधिक कार्यक्षम, वेगवान आणि सर्वांसाठी उपलब्ध व्हाव्यात यासाठी या इमारतीचे बांधकाम तातडीने होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शासनाने सकारात्मक भूमिका घेत त्वरित निधी मंजूर करून पुढील प्रशासकीय कार्यवाहीबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करायवयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २३७. | श्री. हरिश्चंद्र भोये,श्री. काशिनाथ दाते,श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. रईस शेख,श्री. मोहन मते वि. स. स. | " सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये विविध ठेकेदारांच्या केलेल्या कामांची अनामत रक्कम सिक्युरीटी म्हणुन कामानुसार १ ते ५ टक्क्यांपर्यंत जमा होणे नियमानुसार तीन वर्षा पर्यंत ही रक्कम काढता न येणे, पालघर जिल्ह्यातील जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कामे केली जात असून हि कामे करताना ठेकेदारांकडून बिले देताना अनामत रक्कम स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या जव्हार शाखेत जमा करण्यात येणे, त्या जमा झालेल्या रक्कमेपैकी बांधकाम विभागाच्या एका कर्मचाऱ्याने १११ कोटी ६३ लाखाचा डीडी (डीमांड ड्राफ्ट) काढण्यासाठी चेक व आवश्यक ती कागदपत्रे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बँकेत जमा केल्याचा गंभीर प्रकार समोर येणे, बँकेने पैसे अदा करण्याची प्रक्रीया थांबवून संबंधीत कार्यालयास भेट देऊन खातर जमा केली असता उपस्थित अधिकाऱ्यापैकी कोणीच चेक न दिल्याचे कळणे, अशा प्रकारे अनामत रक्कम काढण्यात झालेल्या प्रयत्नाबाबतची तक्रार पोलिसात दिली असून त्या मार्फत चौकशी सुरू असणे, शासनाच्या निधीचा तसेच ठेकेदारांकडून घेतलेल्या अनामत रक्कमेचा अशा प्रकारे अपहार करण्याच्या प्रयत्नात असलेल्या संबंधीत ठेकेदार व अधिकारी वर्ग व व्यक्ती विरोधात विशेष तपास पथक( SIT ) प्रक्रीये अंतर्गत तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रीया." | |
| २३८. | श्री. विजयबापू शिवतारे वि. स. स. | " पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ नियोजित असणे, सदर विमानतळाच्या भूसंपादनाची प्रक्रीया सुरू असणे, शेतकऱ्यांचा मागील काळात विमानतळाला तीव्र विरोध असणे, शासनाकडून चांगला दर, नोकरी व परतावा यांचा शेतकऱ्यांना प्रस्ताव, परिणामी शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होणे, मोबदल्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर बैठक होणे, जिल्हाधिकारी यांनी अत्यल्प दर दिल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नापसंती दर्शविली जाणे, शेतकऱ्यांना जास्तीत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जास्त दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना परिसरातील व्यवहारांचे पुरावे सादर करणे, त्यानुसार दरात वृद्धी होण्याची आवश्यकता, परतावा जमिनीत वाढ करण्याची शेतकऱ्यांची मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २३९. | श्री. महेंद्र दळवी वि. स. स. | " अलिबाग रोहा कनघर वावे रस्त्याच्या कामाला दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी मान्यता मिळाली असणे, सदर कामासाठी सुमारे १७९ कोटी रुपयाची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, सदर कामाची निविदा मे. जे.आर.ए. अलिबाग रोड प्रोजेक्ट मर्या. कंपनीला देण्यात येणे, सदर ठेकेदाराने उक्त काम विहित वेळेत पूर्ण न करणे, सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरिता १२ महिन्यांच्या कालावधीची मुदतवाढ घेतली असणे, सदर कामाचे आजपर्यंत ११ देयके आदा करण्यात आली असून सुमारे १४५ कोटी रुपये शासनाने ठेकेदारस दिले असणे, परंतु उर्वरित ५५ ते ६० कोटी रक्कम पाहता व प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम पाहता रक्कम तुटपूंजी असणे, जी ११ देयके शासनाने अदा केले आहेत त्या देयकांचा मोजमाप पुस्तिका (M.B) मध्ये कोणत्याही प्रकारची नोंद नसणे, सदर प्रलंबित कामामध्ये मोठ्या प्रमाणात ब्रिजेसची कामे प्रलंबित | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, उक्त एकूण रस्त्यांपैकी ०० ते ५ किलोमिटरचा रस्ता MSRDC कडे वर्ग केला असणे, वरील परिस्थिती पाहता शासनाने ठेकेदारास अदा केलेली रक्कम झालेल्या कामापेक्षा अधिकची असल्याचे निदर्शनास येणे, प्रलंबित रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरिता तसेच चुकीच्या पध्दतीने ठेकेदारस देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २४०. | श्री. गजानन लवटे वि. स. स. | " "अमरावती-बडनेरा रस्त्यावर दि.२९ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास अपघात होऊन २ युवकांचा मृत्यू झाल्याची घटना घडणे, सदर ठिकाणी असलेल्या रपट्याची उंची एक ते दीड फुटापर्यंत असून येथे कुठलाही सावधगिरीचा फलक अथवा झेब्रा कॉसिंग नसल्यामुळे दुचाकी उसळ्याने अपघात झाल्याचे निदर्शनास येणे, शहरातील दत्त मंदिर, कुंभारवाडा बजरंग चौक अंबागेट परिसरातील नागरिकांनी अमरावती-बडनेरा रस्त्यांच्या स्थितीबाबत कार्यकारी अभियंत्याकडे वारंवार तक्रारी केलेल्या असणे, तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सदर अपघात होऊन दोन निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागण्याचा आरोप स्थानिक | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नागरीकांकडून होत असणे, उक्त प्रकरणी चौकशी करुन सार्वजनिक विभागाच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीसाठी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह स्थानिक नागरीकांनी दि.०१ डिसेंबर, २०२५ रोजी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात आंदोलन करण्यात येणे, शासनाने याबाबत तातडीने चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २४१. | श्री. किसन वानखेडे वि. स. स. | " उमरखेड–महागाव मतदार संघातील नागरिकांना गेल्या अनेक महिन्यांपासून रस्ते समस्यांना सामोरे जावे लागत असून संपूर्ण मतदार संघातील प्रमुख व दुय्यम रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय, मागील दोन वर्षे सलग अतिवृष्टी झाल्यामुळे रस्त्यांची चाळणी झाली असून अनेक ठिकाणी रस्त्यांचे डांबर वाहून गेले, खोल खड्ड्यांचे जाळे निर्माण झाले आणि वाहतूक अत्यंत धोकादायक अवस्थेत, या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्यासाठी तत्कालीन आमदार यांच्या विनंती नुसार तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या उपस्थितीत एक विशेष बैठक आयोजित करून महागाव आणि उमरखेड या दोन्ही | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तालुक्यांसाठी स्वतंत्र विशेष पॅकेज देण्याची स्पष्ट सूचना देण्यात येणे मात्र आजपर्यंत त्या निर्णयावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, हे अत्यंत खेदजनक आहे प्रमुख जिल्हामार्ग तसेच अनेक अंतर्गत गावांना जोडणारे संपर्क रस्ते इतर जिल्हा मार्ग ग्रामीण मार्ग आज मोठमोठ्या खड्ड्यांनी भरले आहेत, रस्त्यांचे कडे तुटले आहेत, डांबर पूर्णपणे उखडले असून प्रवाशांचे जीवित धोक्यात येणे, दररोज प्रवास करणारे नागरिक यांच्यावर प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास ओढवला तर अपघातांचे प्रमाणही लक्षणीय रीत्या वाढले, अनेक रस्त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे मंजूर असूनही विभागीय स्तरावर व ठेकेदारांकडून कामांमध्ये अनाकलनीय विलंब, वेळापत्रकांचे उल्लंघन आणि गुणवत्तेबद्दल गंभीर शंका दिसून येणे, या सर्व परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आणि नाराजी पसरणे, या जनजीवनाशी संबंधित अत्यंत गंभीर समस्येवर तातडीने हस्तक्षेपकरून महागाव व उमारखेड तालुक्यांसाठी मागितलेले विशेष पॅकेज त्वरित मंजूर करावे, रस्त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी युद्धपातळीवर सुरू करावी, संबंधित विभागांना वेळबद्ध आणि गुणवत्तापूर्ण कामाचे कठोर निर्देश द्यावेत, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाची भूमिका. " | |
| २४२. | श्री. संदिप क्षीरसागर वि. स. स. | " बीड जिल्हयातील प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ,सार्व.बांधकाम विभाग क्र.२ यांच्याकडून गैरकारभार, मनमानी कारभार, अनियमितता होत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, शिरुर का तालुक्यात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विविध कामे मंजूर होत असतांना बहुतांश कामामध्ये दुबारीकरण करणे, तीच तीच कामे २५१५ अल्पसंख्याक ,समाजकल्याण विभाग, तांडा वस्ती व इतर लेखाशीर्षामध्ये दाखवून अनियमितता करुन केलेला गैरव्यवहार, तालुक्यात सन २०२०-२१ ते ऑक्टोंबर, २०२५ या दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या कामामध्ये मंजूर तथा कार्यारंभ आदेश झालेले असणे, परंतु संबंधित कामे न झाल्यामुळे सातत्याने येत असलेल्या अडचणी, यासंदर्भात लोकप्रतिनिधिनी संबंधित मंत्री महोदयांकडे दिनांक ०८/१०/२०२५ रोजी व त्यापूर्वीही अनेकदा पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणूनही कोणतीच कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू प्रकरणाची शासनाने वर्षनिहाय, स्तरनिहाय, कामनिहाय, लेखा परिक्षणनिहाय सखोल चौकशी करुन दोषी प्रभारी कार्यकारी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, शाखा अभियंता व लेखा विभागातील वरिष्ठ सहायक यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका." | |
| २४३. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " पालघर जिल्हातील जव्हार येथील सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता कार्यालयात सुमारे १११ कोटी रुपयांचा गैरव्यवहार माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, जव्हार हा आदिवासी तालुका असून या क्षेत्रातील कामांच्या प्रक्रियेबाबत जनतेमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होणे, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी हे ठेकेदारांशी संगनमत करून अक्षरशः शासकीय तिजोरी लुटत असणे, जव्हार सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी किमान ४० टक्के कामे न करताच पैस उचलत असून पालघर जिल्हातील जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड व तलासरी या भागातील रस्ते, बंधारे व इमारतीच्या कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचे टेंडर मंजूर होऊनही प्रत्यक्षात दर्जाहीन अपूर्ण कामे, काही ठिकाणी कामे न करताच देयके काढणे, काही कामांमध्ये मुख्य कंत्राटदारामार्फत उप कंत्राटदार नेमून एकाच रस्त्यासाठी दोनदा निधी उचलून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याने याबाबत स्थानिक जनता व पत्रकार यांनी वारंवार तक्रारी व आरोप करुनही ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसणे, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब, जव्हार सार्वनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयातील संबंधित अधिकारी व ठेकेदार यांची चौकशी करून कडक कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २४४. | श्री. करण देवतळे वि. स. स. | " घाटकोपर (पूर्व) मुंबई येथील शासकीय वसाहतीमध्ये एकूण १० इमारती असून त्यातील ७ इमारतीत शासकीय कर्मचारी व त्यांचे परिवार राहत असणे, या इमारतीत असलेल्या लिप्ट तसेच परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने आजमितीस कुठेही CCTV बसविण्यात आलेले नसणे, तसेच सदर ठिकाणी काही नागरिकांकडून गुटखा, तंबाखू सेवन करून लिफ्ट व इमारतीच्या परिसरात थुंकण्याचे प्रकार वाढल्याने त्याठिकाणी दुर्गंधी पसरत असल्याने पुरुष/महिला कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागणे, कर्मचाऱ्यांकडून वारंवार तक्रारी करूनही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्याकडून | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अद्यापी कोणती कारवाई करण्यात येत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजीची व चिडीची भावना निर्माण झालेली असणे, त्याचप्रमाणे सदर इमारती ह्या १४ ते २१ मजल्याचे असून इमारतीच्या पॅसेजमधील खिडक्यांना सा.बां. विभागांसकडून कुठेही सेफ्टी ग्रील बसविण्यात आलेले नसणे, सार्वजनिक बांधकामाच्या अधिकाऱ्यांकडून उक्त प्रकरणी अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आल्याने संबंधितांवर तातडीने कारवाई करणे आवश्यक असणे, त्याठिकाणी इमारतीच्या पॅसेज मध्ये लहान मुले खेळत खिडक्यां जवळ जात असणे, त्याचप्रमाणे रुममधील खिडक्याजवळ जात असल्याने खिडक्यांना सेफ्टी ग्रील नसल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो, त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनात भितीचे वातावरण असणे, याकरिता कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उक्त ठिकाणच्या शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांच्या मागणीचा विचार करून तात्काळ पॅसेजमधील सेफ्टी ग्रील लावण्यासह लिफ्ट/इमारत परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. | |
| २४५. | श्रीमती सुलभा खोडके वि. स. स. | " अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जोडणाऱ्या, बडनेरा-अमरावती रेल्वे मार्गावरील साखळी क्र. ६७१/१४-१५ वरील उड्डाणपुलाचे बांधकाम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने, नागरिकांना गंभीर वाहतूक कोंडीचा व गैरसोयीचा सामना करावा लागत असणे, या प्रकल्पासाठी रुपये १२५.३७ कोटी इतका निधी अपेक्षित असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंबंधीची पुढील कार्यवाही त्वरित करण्याकरिता दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी रेल्वे विभागास कळविलेले असणे, तथापि, कामास गती देण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असून अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने तात्काळ आवश्यक निधी मंजूर करून, संबंधित विभागांना (सार्वजनिक बांधकाम आणि रेल्वे) सदर उड्डाणपुलाचे बांधकाम विहित मुदतीत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका" | |
| २४६. | श्री. मनोज कायंदे वि. स. स. | " बुलढाणा जिल्हा परिषदे अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २६० शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे स्थापित करण्यासाठी अंदाजे तीन कोटी रुपयांची निविदा (ई - निविदा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सूचना क्र ३१/ २०२५ काढण्यात आलेली असणे, एकूण चार निविदा धारकांनी निविदा भरून दिलेल्या असणे, चार पैकी तीन निविदा धारकांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र केल्या असून एका निविदा धारकांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र केलेली असणे, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र तिन्ही निविदा धारकांच्या निविदा महा टेंडर पोर्टल वर तांत्रिक मूल्यमापन ची कागदपत्रे अनलॉक केलेली असणे, भारत सरकारच्या Appendix - १२ नुसार मान्यता प्राप्त प्रयोगशाळाच अशा प्रशिक्षणासाठी वापरल्या जात असणे, शासनाच्या व केंद्रीय सतर्कता आयोगाच्या पारदर्शकता धोरणानुसार निविदा प्रक्रिया पारदर्शक होत नसल्याचे उघडकीस अथवा निदर्शनास येणे, शासनाच्या धोरणानुसार तांत्रिक बोली उघडल्यानंतर संबंधित कागदपत्रे सार्वजनिक दृष्ट्या उपलब्ध असणे ही आवश्यक बाब असणे, Appendix -१२ निविदाधारकाकडे ISO /IEC १७०२५ प्रमाणित किंवा NABL प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदर निविदा प्रक्रियेत गंभीर स्वरूपाच्या अडचणी निर्माण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणे, सदर निविदा प्रक्रिया रद्द करून पारदर्शक निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी संपूर्ण निविदा प्रक्रियेच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तपासणी पद्धतीचा आणि पारदर्शकतेचा सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्याच्या सूचना देऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २४७. | श्री. बबनराव यादव (लोणीकर),श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. नारायण कुचे वि. स. स. | " जालना जिल्हा परिषदेतून विविध विकासकामांसाठी उपलब्ध करण्यात आलेला २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षातील निधी वेळेत खर्च न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर निधी परत गेला असणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागास उपलब्ध असलेल्या निधीपैकी सुमारे ₹ ११ कोटी ३४ लाख रुपये आणि जिल्हा आरोग्य विभागास उपलब्ध असलेल्या निधीपैकी १७ कोटी ७ लक्ष रुपये असा रू २८ कोटी ४१ लाख निधी केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे परत गेला असणे, या संदर्भात संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नसणे, यामुळे जिल्ह्यातील विकास प्रकल्प ठप्प झाली असणे, बांधकाम व आरोग्य विभागाची लोकाभिमुख कामे बंद असणे, सदरील निधी जिल्हा परिषदेला पुन्हा उपलब्ध होणार नसणे, जिल्हा परिषदेवर व स्थानिक विकासकामांवर याचा गंभीर परिणाम होणार असणे, बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा निष्काळजीपणा कारणीभूत असणे, त्यामुळे | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बांधकाम विभागांतर्गत विविध विकास कामे बंद व आरोग्य सुविधा कोलमडली असणे, या प्रकरणामुळे शासन व प्रशासनातील समन्वय नसल्याचे अधोरेखित होत असणे, भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी 'मॉनिटरिंग सिस्टीम' व वेळबद्धता ठरवून दिलेली नसणे, जिल्ह्याच्या झालेल्या या नुकसानीची भरपाई करण्यासाठी संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या संपत्तीवर बोजा टाकून वसुल करण्यात येणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना." | |
| २४८. | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | " मौजे पालखेड तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक येथील गट नंबर ३८७ ब येथे मुस्लिम कब्रस्तानासाठी जागा आरक्षित असताना सदर ठिकाणी बांधकाम न करता गट नंबर ३२६ येथे बांधकाम करणे,याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती दिंडोरी यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत जिल्हा परिषद नाशिक यांना ५/०३/२०२५ रोजी अहवाल देऊन अनियमितता झाल्याचे स्पष्ट केले असतानाही याबाबत कारवाई करण्यात न येणे, याबाबत नव्याने चौकशी जाहीर करून गटविकास अधिकारी पंचायत समिती पेठ यांनी देखील अनियमित्ता झाल्याचे २४.११.२०२५ रोजी मान्य केलेले असणे, उपविभागीय अधिकारी दिंडोरी यांनी ग्राम विकास | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी व गटविकास अधिकारी पंचायत समिती दिंडोरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नाशिक यांनी अपेक्षित कारवाई वेळेत पूर्ण न केल्याबाबत व असमाधान व्यक्त करून सदर अधिकारी कामात टाळाटाळ करत असल्याबाबत अहवाल जिल्हाधिकारी नाशिक यांना सादर करणे, जिल्हा परिषदेचे अधिकारी यांच्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता त्यामुळे गावातील खराब असणारे वातावरण, वेळेत आवश्यक कारवाई न करणारे अधिकाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत शासनाचे होत असणारे गंभीर दुर्लक्ष, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| २४९. | श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | " प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर राज्यपुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यात घरकुल योजना राबविली जात असणे, सदर योजनेच्या अंमलबजावणीत जागा ही बाब अडचणीची ठरत असणे, चिखली मतदारसंघातील जवळपास १००० पात्र लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम केवळ जागा उपलब्ध नसल्याने प्रलंबित असणे, ग्रामीण भागात स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नसणारे काही नागरिक गायरान, वन, गावठाण वा तत्सम शासकीय जागेत अतिक्रमण करून राहत असणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घरकुल योजनेस पात्र असणाऱ्या १ जानेवारी, २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमित करण्याबाबत विविध विभागाचे शासन निर्णय निर्गमित झालेले असणे, मात्र ज्या जागेत अतिक्रमण केलेले आहे तीच जागा नियमानुकुल करून देण्यासाठी अतिक्रमणधारक आग्रही असणे, परंतु उक्त प्रकारे शासकीय जागा नियमानुकुल होत नसल्यामुळे लाभार्थी इतर ठिकाणी पुनर्वसित होण्यास तयार होत नसणे, यामुळे राज्यात लाखो पात्र लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| २५०. | श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. राघवेंद्र पाटील, श्री. रामदास मसराम, श्री. संजय मेश्राम, वि. स. स. | " राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना मागील काही महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागणे, या संगणक परिचालकांचे माहे जुलै २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीतील मानधन अद्याप थकीत असणे, तसेच माहे जून २०२५ नंतरचे मानधनही थकीत असणे,याशिवाय गोंदिया जिल्ह्यासह काही जिल्हा परिषदांनी कोरोना काळातील प्रोत्साहनपर भत्ता देऊन कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविले असताना त्याच धर्तीवर इतर जिल्ह्यांतील संगणक परिचालकांनाही हा लाभ द्यावा अशी मागणी संगणक | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परिचालक संघटनेने करणे, संगणक परिचालकांना ग्रामपंचायत सहायक म्हणून पद निश्चिती करून त्यांना वेतन व ग्रॅच्युइटी देण्यात यावी ही मागणी संघटनेने करणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, संगणक परिचालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| २५१. | श्री. संजय उपाध्याय वि. स. स. | " महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स ही संस्था "The Bharat Scouts and Guides, New Delhi" या राष्ट्रीय संस्थेची राज्य शाखा असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी कार्यरत असणे, ही संस्था १००% शासन अनुदानित असल्याने तिचे सर्व आर्थिक व प्रशासकीय कामकाज शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत चालणे, सन २००५ ते २०१८ दरम्यान निवडणुकीद्वारे कार्यकारिणीत आलेल्या काही खाजगी पदाधिकाऱ्यांच्या कारभारात गंभीर आर्थिक अनियमितता, कर्मचाऱ्यांवरील अन्याय, भ्रष्टाचार व गैरव्यवहाराच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होणे, शासन चौकशीत या तक्रारी सत्य ठरल्याने दि.०९.०८.२०१९ रोजी शासनाने संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करून प्रशासक मंडळ नियुक्त करणे, यानंतर संस्थेचा कारभार शासन नियंत्रणाखाली | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असणे, दि.१५ जुलै २०२५ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येणे, राज्य व जिल्हा संस्थांवर खाजगी व्यक्तींची निवडणुकीद्वारे नियुक्ती करण्यास पूर्णतः प्रतिबंध करणे, शासननिर्णय दि. ०९.०८.२०१९, २७.१२.२०१९, १८.१२.२०२० आणि १२.०८.२०२१ तसेच राष्ट्रीय नियमावलीनुसार शासन नियुक्तीची विद्यमान पद्धत कायम ठेवावी, संस्थेचे अध्यक्ष म्हणून मा.क्रीडा व युवक सेवामंत्री यांची नियुक्ती कायम ठेवावी, मा.मुख्यमंत्री यांनी दि.२७.०६.२०२५ व ११.११.२०२५ रोजी स्पष्ट निर्देश देऊन शासन निर्णय कायम ठेवण्याचा व निवडणुका रद्द करण्याचा आदेश दिला असताना, क्रीडा व युवक सेवा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, उलट काही खाजगी व्यक्तींच्या बैठका लावून व दिशाभूल करणारी माहिती देऊन मा. क्रीडा मंत्री यांना चुकीचे मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर हक्कभंगाची कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २५२. | श्री. सुनिल प्रभू,श्री. चेतन तुपे,श्रीमती सुलभा | " तामिळनाडूतील मे.सेसन फार्मा कंपनीच्या “कोल्ड्रीफ सिरप" | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | खोडके,श्री. अनिल पाटील,अ‍ॅड. पराग अळवणी,श्री. अमित साटम,कॅप्टन आर. सेल्वन,श्री. राजन नाईक,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. संतोष दानवे,श्री. रोहित पाटील,श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | या खोकल्याच्या औषध सेवनाने मध्यप्रदेश,छिंदवाडा येथील १४ तर राज्यस्थान येथील ३ बालकांचा असे एकूण १७ बालकांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी घडणे, सिरफमध्ये डायइथिलीन ग्लायकोल हा विषारी घटक आढळून येणे, सदर प्रकरणी बळींची संख्या सातत्याने वाढणे, दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी नागपूर येथील ३ वर्षीय मुलाचा मृत्यु होणे, विषारी घटक असलेल्या “कोल्ड्रीफ सिरप" च्या एसआरए १३ बॅचचे सिरप न वापरणेबाबत शासनाच्या अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी इशारा देण्यात येणे, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड या पाच जिल्हयात अनेक औषध विक्रेत्यांनी नियमांचे उल्लंघन करुन कफ सिरपची विक्री केल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या सुमारास आढळून येणे, तपास मोहिमेत सुमारे ९८ विक्रेत्यांनी नियमाचे उल्लंघन केल्याने त्यांना अन्न व औषध विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणे, कांदिवली (प.) चारकोप येथील मे. ग्लोबल स्टोर कंपनीने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या सुमारे २ लाख ७७ हजार २२८ कोटी रुपये किमतींची ८ प्रकारची ॲलोपॅथीची औषधे अन्न व औषध विभागाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोजी जप्त करण्यात येणे, परंतु अद्यापही सदरहू कंपनीच्या मालकाविरुध्द कोणतीच कारवाई न करणे, केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिलेल्या रिपोर्टनुसार देशभरातील ११२ औषधांचे नमूने गुणवत्ता चाचणीत अपात्र ठरल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, राज्यातील १३ कोटींच्या पुढे लोकसंख्या असतांना औषधांची गुणवत्ता आणि सुरक्षितता यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी केवळ ४५ निरिक्षकांवर असणे, एकूण २०० मंजूर पदांपैकी १५५ पदे वर्षांनुवर्षे रिक्त असणे, रिक्त पदांसह पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे तपास कामकाजात येत असलेल्या मर्यादा, राज्य शासनाने संभाव्य घटना टाळण्यासाठी राज्यातील सर्व औषध वितरण दुकान मालकांनी “कोल्ड्रीफ सिरप" औषधांचा साठा गोठवून तात्काळ वितरण थांबविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २५३. | श्री. विलास तरे वि. स. स. | " अन्न सुरक्षा व मानके अधिनियम,२००६च्या तरतुदीस अनुसरून अन्न व औषध प्रशासनाने विहित पध्दतीने संपूर्ण राज्यात किंवा एखाद्या क्षेत्रात किंवा एखाद्या भागात गुटखा/तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्री | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यास प्रतिबंध केलेला असणे, तंबाखु हे एक प्रकारचे अन्नच आहे, याबाबत वेळोवेळी मा.न्यायालयांनी अधोरेखित केलेले असून त्यावर वेळोवेळी बंदी घालणे, तंबाखु व सुपारीच्या आकर्षक जडण घडणीमुळे मोठ्या प्रमाणात युवकांची ओढ तंबाखु व सुपारीकडे असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण मुले व्यसनांच्या आहारी जाणे, याचा भावी पिढ्यांच्या जनुकी रचनेवर प्रतिकुल परिणाम होणे, तंबाखु, सुपारी, गुटखा इत्यादीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन अनेक तरुण मुलांना जठर आतडे व श्वसन यासंबंधीचे विविध आजार होत असल्याचे दिसुन येणे, तंबाखु व निकोटीनयुक्त अन्न पदार्थांवर बंदी घालण्याबाबत वेळोवेळी भारत सरकार आरोग्य व कुटूंब कल्याण, मंत्रालयाने सूचना निर्गमीत करणे, महाराष्ट्रात सन २०१२ पासून प्रतिबंधीत अन्न पदार्थांचे उत्पादन, त्याची विक्री व वाहतूक चोरट्या व अवैध पद्धतीने होत असून लहान दुकाने, गोदाम, वितरक, पुरवठादार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते इ.ठिकाणी बाजारात प्रतिबंधित अन्न पदार्थांची किरकोळ विक्री होत असल्याचे महाराष्ट्रात प्रशासनाने व पोलिसांनी केलेल्या कारवाईतून वारंवार आढळुन येणे, राज्यात तंबाखुजन्य, पान मसाला, गुटखा, सुगंधीत सुपारी इ. पदार्थांना प्रतिबंध घालण्यात | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आलेला असतांनाही सर्रास विक्री होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २५४. | श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | " भंडारा जिल्ह्यातील अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत क्रीडांगण विकास योजनेकरिता मंजूर निधीत दुरुपयोग केल्याचे प्रकरण पुढे आले असणे, तत्कालीन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग, भंडारा यांनी कुठल्याही प्रकारे नियमानुसार निविदा प्रक्रिया न करता शासकीय शाळांच्या आणि वस्तीगृहांच्या कार्यासाठी ६५ लाख रुपयांचा निधी वितरित केला, चौकशीत असेही पुढे आले आहे की, यामध्ये कुठल्याही प्रकारे निविदा प्रक्रियेचे पालन न करता किंवा कुठलीही शासकीय कर देयकातून वजा न करता अशोका हायटेक एनर्जी आणि असोसिएट इलेवल बहुउद्देशीय संस्था यांना धनादेशाद्वारे निधीचे वितरण करण्यात आले असणे, तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी समाज कल्याण निरीक्षक यांच्या माध्यमातून निधी वितरणात दबाव टाकला, समाज कल्याण निरीक्षक यांच्या साक्षीप्रमाणे असेही पुढे आले आहे की, निविदा प्रक्रियेची तारीख होण्याअगोदरच या दोन कंपन्यांना बिल देण्यात आलेले असणे, त्याचप्रमाणे यादरम्यान अनेक शासकिय कागदपत्रांमध्ये व जावक क्रमांकामध्येही खोडातोड केल्याचे पुढे आले असणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लक्ष केद्रित करणारी बाब ही की, येथील वार्डन यांच्या अनुपस्थितीमध्ये या फाईलींची हेराफेरी करण्यात आली असणे, शिवाय येथील सीसीटीव्ही फुटेजही डिलीट करण्यात आले असणे, त्याचप्रमाणे या संपूर्ण धांदलीत असेही पुढे आले आहे की, एकच जावक क्रमांक दोन वेगवेगळ्या आदेशांच्या प्रतिंवर वापरण्यात आलेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| २५५. | श्री. शिवाजी पाटील वि. स. स. | " राज्यातील रेशिम शेतकऱ्यांना दर्जेदार रेशिम अंडीपुंज देण्याचे काम बीजकोष निर्मिती केंद्र गडहिंग्लज हे एकमेव केंद्र राज्यात असणे, सदर केंद्राला उत्तम प्रतीचे बीजकोष पुरवठयाचे काम शेतकरी करीत असणे,सदर केंद्रात शासनाच्या दराप्रमाणे माहे जुन, २०२५ पासून आज अखेर बीजकोष विक्री केली असून त्यापोटी रुपये १,२५,००,०००/-इतकी रक्कम अदयाप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, या केंद्रातून राज्यातील इतर शेतकऱ्यांना अंडीपुंज विक्री होत असून त्यापासून दोन कोटीचा महसूल शासना कोषागृहात जमा होत असणे, यापूर्वी शेतकऱ्यांना कोष विक्रीची रक्कम वेळेत मिळत असणे, परंतु आता एकदाही रक्कम मिळालेली नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना रेशिम उदयोगातील विविध अडचणींना सामोरे जावे लागत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून थकीत रक्कम देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका ." | |
| २५६. | श्री. रईस शेख वि. स. स. | " राज्यात १२.७० लाख यंत्रमाग असणे, या यंत्रमाग व्यवसायाने ३० लाख रोजगार पुरवणे, २७ ते २०१ अश्वशक्ती पर्यतच्या यंत्रमागांना प्रति युनिट ७५ पैसे सवलत असणे, राज्यातील यंत्रमाग व्यवसाय आर्थिक संकटात असणे, त्यातच सप्टेंबर, २५ पासून प्रति युनिट ३५ ते ९५ पैशांपर्यत वीज दरवाढ जाहीर करणे, शेतकरी अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात असतांना व सर्वसामान्य जनता महागाईने त्रस्त असतांना सरकारने जनतेला वीज दरवाढीचा झटका देणे, उद्योजकांसह छोटया व्यापाऱ्यांनाही वीजदर वाढीचा दुहेरी बसलेला फटका, अमेरिकेने भारतीय मालावर ५० टक्के कर लादल्यामुळे यंत्रमाग उत्पादनाची निर्यात ठप्प होणे, इतर राज्यांच्या तुलनेत वीजदर उच्चांकी असणे, यंत्रमाग व्यवसायाला सरकारी मदतीचा अभाव असणे, या क्षेत्रात कमी गुंतवणूक असणे, यंत्रमाग व्यवसाय कोंडीत सापडलेला असणे, मा. मुख्यमंत्री महोंदयानी विधानसभेत जनतेचे वीजबिल पुढील पाच वर्षात कमी केले | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जाईल असे आश्वासन देणे, आश्वासनाला बगल देत दिवाळीच्या तोंडावर वीज दरवाढ करणे, या दरवाढीमुळे १०० युनिटपर्यंत वीजवापर करणाऱ्या यंत्रमाग व्यवसाया बरोबरच सर्वसामान्य ग्राहकांना या दरवाढीचा बसलेला फटका, वस्त्रोद्योग विभागाने यंत्रमाग धारकांना वीज सवलतीसाठी नोंदणीची केलेली सक्ती, नोंदणीसाठी संकेत स्थळावरील प्रक्रिया किचकट असणे, ऑनलाईन नोंदणीला होणारा विरोध, नोंदणीस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, यंत्रमाग धारकांना ऑनलाईन नोंदणीची अट रद्द करण्याची आवश्यकता, टोरांटो आणि महावितरण या वीज कंपन्यांकडे यंत्र मागधारकांची मीटर जोडणीचा डेटा असणे, त्या माहितीनुसार १९८३ पासून यंत्रमागांकरिता वीज सवलत चालू असणे, वर्ष २०२३ मध्ये यंत्रमागधारकांच्या समस्यांसंदर्भात नेमलेल्या समितीने वीज सवलतीसाठी नोंदणीची अट रद्द करण्याची शिफारस करणे, मार्च २०२५ मध्ये वीज नियामक आयोगाने वीजरदरामध्ये १२ टक्के कपात सुचवणे, दरकपातीची अंमलबजावणी न करणे, सर्वोच्च न्यायालयात वीज नियामक आयोगाच्या आदेशाला आव्हान देण्याची महावितरणने तयारी करणे, महावीतरणने ४८ हजार कोटीची महसुली तूट दाखवणे, परिणामी ग्राहकांमध्ये | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाप्रती निर्माण झालेली चीड, मा.मुख्यमंत्री यांनी आश्वासनाची पूर्तता न करता उद्योजकांसह सर्वसामान्य जनतेची केलेली फसवणूक, याबाबत शासनाने तातडीने वीज दरवाढीबाबत फेरविचार करावा तसेच यंत्रमाग व्यवसायाला तात्काळ आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २५७. | श्री. रवी राणा वि. स. स. | " प्रादेशिक सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती यांनी दिनांक ०५.०५.२०२५ रोजी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविलेल्या पत्रानुसार बडनेरा विधानसभा मतदारसंघातील अंजनगाव बारी व भातकुली येथे गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता १०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेली शासकीय वसतिगृहे मंजूर करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतु संबंधित प्रस्तावास अद्याप शासनाकडून मंजुरी न मिळाल्याने स्थानिक विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असणे, अनेक विद्यार्थी शिक्षण सोडण्याच्या स्थितीत असून त्यांना सुरक्षित व स्वस्त निवासाची तातडीने आवश्यकता असणे, शासनाने मंजूरी देण्याची आवश्यकता, त्या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रतिक्रिया " | |
| २५८. | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | " बीड जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी वृद्धपकाळ योजना, या तीन योजनेअंतर्गत निराधार, वयोवृद्ध नागरिकांना मानधन दिले जात असणे, परंतु शासनाने थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली लागू केल्याने व सदर प्रणालीत तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सदर मानधन मागील आठ ते नऊ महिन्यापासून रखडले असल्याने वृद्ध, निराधार तहसील कार्यालयाच्या चकरा मारून त्रस्त असून त्यांच्यामधून तीव्र रोष व्यक्त करण्यात येत असणे, सदर तिन्ही योजनेचे लाभार्थी हे वयोवृद्ध, निराधार आहेत सदर योजनेतून मिळणाऱ्या मानधनातून त्यांचा उदरनिर्वाह चालत असणे, मानधन न मिळाल्याने सदर लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या खाण्यापिण्यासह औषधींचा मोठा प्रश्न निर्माण झाला असणे, त्यामुळे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली त्वरित सुरळीत करून वरील योजनेतील लाभार्थ्यांचे प्रलंबित मानधन त्यांना तातडीने अदा करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | कित्ता |
| २५९. | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | " राज्यातील चर्मकार समाजासाठी शासनाने संत रोहिदास | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ स्थापन केले असणे, परंतु महामंडळासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध होत नसून चर्मोद्योग महामंडळासाठी कायमस्वरूपी एम्.डी.ची नेमणूक करण्यात येत नसणे, परदेशी शिक्षणासाठी शैक्षणीक निधी उपलब्ध करून दिला जात नसणे, चर्मोद्योगासाठी समाजबांधवांना आवश्यक असलेले छोटे किंवा मोठ्या रकमेचे कर्ज वेळेत उपलब्ध करून दिले जात नसणे, त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी जो उत्साह किंवा मानसिकता असते ती कालांतराने नष्ट होवून समाज बांधवांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे सदर प्रश्नांची त्वरित सोडवणूक करून महमंडळास आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | |
| **२६०.** | श्री. रवी राणा वि. स. स. | " रमाई आवास योजना ही अमरावती महानगरपालिका क्षेत्रात सामाजिक न्याय विभागामार्फत राबविली जात असून सन २०२४-२५ करिता २००० घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले असणे, दिनांक ०६/०३/२०२५ रोजी सर्व २००० लाभार्थ्यांना मंजुरी प्रदान करण्यात आली असणे, मंजूर उद्दिष्टासाठी रु. ५०.०० कोटी निधी अपेक्षित असताना, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यापैकी केवळ रु. २१.१५ कोटी इतकाच निधी समाजकल्याण विभागाकडून दिनांक ३१/०३/२०२५ रोजी अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झाला असणे, प्राप्त निधीतून पहिला टप्पा म्हणून १८२१ लाभार्थ्यांना रु. २२.९८ कोटी इतका निधी दिनांक २४/०४/२०२५ रोजी RTGS द्वारे वितरित करण्यात आला असणे, योजनेकरिता अद्याप रु. २८.८४ कोटी निधी अपूर्ण असून लाभार्थ्यांनी दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम नियमांनुसार Lintel Level पर्यंत पूर्ण केलेले आहे. पुढील दुसरा व तिसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी मिळावा म्हणून समाजकल्याण विभाग अमरावती व पुणे यांना विविध तारखांना (०८/०५/२०२५, ०३/०६/२०२५, ०३/०७/२०२५, २८/०७/२०२५, ०९/१०/२०२५) प्रपत्रांद्वारे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला असणे, सदर निधी तातडीने प्राप्त होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| **२६१.** | श्री. राजकुमार बडोले वि. स. स. | " राज्यातील अनु.जाती व नवबौध्द समाजाचे ७० टक्के लोक भुमीहीन असुन त्यांची संख्या जवळपास ३० लाख असणे, या भुमीहीन कुटूंबापैकी आतपर्यंत अंदाजे ५००० कुटूंबांना ५००० हेक्टर जमीनीचे वाटप कर्मवीर दादासाहेब गायकवाड | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सबळीकरण योजनेत करणे,उर्वरीत भुमीहीन कुटूंबासाठी विशेष घटक योजनेअंतर्गत कोणताही लाभ न मिळणे, या भुमीहीन कुटूंबातील युवकांना महामंडळामार्फत स्वयंरोजगार न मिळणे व शासनाने कोणत्याही योजना न करणे, राज्यातील १०० अनु.जाती विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना २००९ पासून सुरू होऊन त्यात कोणतीही सुधारणा न होणे, सैनिक शाळेतील अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना २००३ पासून कोणतीही सुधारणा न होता वार्षिक १५००/- प्रतीवर्ष अनुदान मिळणे, राजश्री शाहु महाराज गुणवत्ता पुरस्काराची अंमलबजावणी न होणे व त्यात सुधारणा न होणे, १९७५ मध्ये सुरू झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनु.जाती विद्यार्थ्यांना दरमहा फक्त १०० रुपये विद्यावेतन देण्यात येणे, या सगळ्या योजनांचे पुनर्विलोकन होऊन विद्यावेतन भत्ते यात सुधारणा करणे, सगळे अनु.जाती व नवबौध्द महामंडळांचे कर्ज वाटप ठप्प होणे व फक्त कागदोपत्री तरतूद दाखविली जाणे, आंतरजातीय विवाह योजनेतील जोडप्यांना तीन-तीन वर्षे निधी न मिळणे, त्यासाठी शासनाने प्रोत्साहन न देणे, बेरोजगार युवकांसाठी रोजगार देणे व कर्ज | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देऊन त्यांना स्वावलंबीकरण करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २६२. | श्री. साजिद खान पठाण,श्री. संजय मेश्राम वि. स. स. | " धोबी " समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्यास होत असलेला विलंब," धोबी " जातीचा समोवश अनुसूति जातीच्या यादीत करावा याकरिता शा.निर्णय दिनांक ०५.०९.२००१ अन्वये डॉ.डी.एम भांडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत होणे, समितीने आपला अहवाल दि.५.०३.२००२ रोजी शासनास सादर करणे, तत्का.मा.मंत्री सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षते खाली नेमलेल्या समितीने उक्त अहवालावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा अभिप्राय घेण्याचा घेतलेला निर्णय, सदरहू दोन्ही समितीचे अहवाल कार्यवाहीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणे, जातीय अभ्यासाचा सुधारित प्रस्ताव केंद्र सरकारकडे फेरसादर करण्याबाबत राज्य शासनास कळविण्यात येणे, त्यानुसार दि.२२.१०.२०२१ रोजी केंद्राकडे सुधारित प्रस्तावर सादर करणे, परंतु भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिशनर यांनी दि १७.०६.२०२२ अन्वये समर्थन दिले नसल्याचे भारत सरकारने दि.२९.६.२०२२ रेजी राज्य शासनास कळविणे, त्यानुसार उक्त दोन्ही समित्यानी सादर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेला अहवाल शासनास प्राप्त होणे, कोणत्या जातीचा समावेश करण्यात यावा किंवा वगळण्यात यावा यासंदर्भात अधिकार राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार केंद्र शासनास असल्याने त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता,उक्त समितीचा अहवाल व राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार केंद्र शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करुन " धोबी "जातीचा समोवश अनुसुचित जातीच्या यादीत समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरवा करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| **२६३.** | श्री. विठ्ठल लंघे वि. स. स. | " राज्य व केंद्र शासनाच्या पुरस्कृत वृद्ध, विधवा व निराधार अनुदान योजना कार्यरत असून यापूर्वी लाभार्थ्यांना अनुदान थेट चेकद्वारे दिले जाणे, मात्र नंतर डी.बी.टी. प्रणाली लागू केल्याने बहुतांशी लाभार्थी पोर्टलवर नोंदणीकृत नसल्यामुळे अनुदानापासून वंचित राहणे, यामध्ये विशेषतः वृद्ध आणि अपंग लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रियेसाठी आधारावर ठसे न येणे, आधार अपूर्ण असणे किंवा मोबाईल नंबर लिंक नसणे यासारख्या कारणांमुळे लाभ घेता न येणे, त्यामुळे डिसेंबर, २०२४ पासून अनेक लाभार्थ्यांना अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीसह जीवनमानावर गंभीर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परिणाम होणे, यावर शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने उपाययोजना करून लाभार्थ्यांना तातडीने वृद्ध व अपंग लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| **२६४.** | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस रेल्वे स्थानकात सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सांय. ४.०० वा. अचानक ठिय्या आंदोलन करुन लाखो प्रवाशांना वेठीस धरण्याची घटना घडणे, या आंदोलनानंतर रेल्वे ठप्प असल्याने रुळावरुन चालत जाणाऱ्या २ प्रवाशांना लोकलने धडक दिल्याने मृत्युमुखी पडण्याची घटना घडणे, ठाणे रेल्वे पोलीसांनी मुंब्रा दुर्घटना प्रकरणी अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांना चुकीच्या पध्दतीने दोषी ठरवून आरोपी केल्याच्या निषेधार्थ रेल्वे मजदूर संघाकडून आंदोलन करण्यात येणे, तसेच मोटरमॅन व्यवस्थापकाच्या दालनाबाहेर हे आंदोलन करण्याची परवानगी नसतानाही आंदोलन केल्याची माहिती रेल्वे पोलीसांनी दिलेल्या अहवालाद्वारे निदर्शनास येणे, सदरहू प्रकरणी महाव्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापकांनी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यावा आणि अत्यावश्यक सेवा कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्याची माहिती लोकप्रतिनिधींनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना दिलेल्या पत्राद्वारे मागणी करण्यात येणे, ऐन गर्दीच्या वेळेत आंदोलन केले व त्यानंतर अपघात घडल्यामुळे प्रवासी संघटनेने अनेकवेळा भेटण्याचा प्रयत्न करुनही त्यांनी भेट नाकारणे,दररोजच्या रेल्वेच्या असुविधेमुळे प्रवाशांची झालेली प्रंचड गैरसोय यामुळे जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे वातावरण, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| **२६५.** | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " नागपूर ग्रामीण आरटीओ कार्यालयात लाचखोरी वाढण्याचे समोर आले असून येथे लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने गेल्या ५ महिन्यांत ४ वेळा कारवाई केली असून दि. १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी दोन अधिकाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आली असणे,नागपूर ग्रामीण प्रादेशिक विभागात परिवहन अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विजय चव्हाण यांच्यावर व इतर सहा जणांवर नागपूरातील सिताबर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असणे,असल्यास या प्रकरणी चौकशी करुन दोषापिंतावर कारवाई करण्याची आवश्यकता असतांनाही ती करण्यास | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दिरंगाई होत असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२६६.** | श्री. अमोल खताळ वि. स. स. | " राज्यातील जिल्हा अहिल्यानगर स्थित संगमनेर शहराचा सर्वांगीण विकास, भविष्यातील वाहतूक-सुविधा आणि पुढील पिढ्यांना उद्योग, व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी "नाशिक–पुणे रेल्वेमार्ग संगमनेर शहरातून होण्यासाठी केंद्र तसेच राज्य शासनाकडे होत असलेली मागणी, अलीकडे सदरहू प्रकल्पासंदर्भात GMRT च्या तांत्रिक कारणांचा मुद्दा पुढे आला असला, तरी त्या कारणांचा संगमनेरवर होणारा प्रत्यक्ष परिणाम सरकारला देखील जाणवत असणे, या सगळ्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकार तसेच रेल्वे बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून संपूर्ण प्रक्रिया पुन्हा तपासण्याची आवश्यकता असणे, या प्रकल्पाबाबत सातत्याने पाठपुरावा करणे, केंद्र-राज्य पातळीवरील बैठका घेणे, तांत्रिक तपासण्या, मागण्या, सूचना इत्यादी केंद्र शासनाकडे मांडण्याची गरज असणे, हा प्रकल्प फक्त रेल्वेमार्ग नाही तो संगमनेरच्या भविष्यातील प्रगतीचा महामार्ग असणे, या प्रकरणी राज्य सरकारने पुढाकार घेऊन मंत्री | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पातळीवर केंद्र सरकार तसेच रेल्वे बोर्डाकडे जोमाने पाठपुरावा करण्याची आवश्यकता असणे, परंतु या ज्वलंत प्रश्नाकडे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत सरकार विरोधात पसरलेला असंतोष व तीव्र नाराजीची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| **२६७.** | श्री. विकास ठाकरे वि. स. स. | " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ओलेक्ट्रा ग्रीनटेक आणि ईव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना ५१५० स्टँडर्ड आकाराच्या इलेक्ट्रिक बस खरेदीसाठी आणि त्यानंतर १२ वर्षे संचालन व देखभालीसाठी प्रति किलोमीटर ७८ रुपये दराने एकूण रुपये ७०३७८ कोटींचे काम देण्यात येणे,नागपूर महानगर पालिकेने यासारखा करार प्रति किलोमीटर ६२.९ रुपये दराने दिला असणे, तसेच मुंबई महानगरपालिकेच्या बेस्टनेही यासारखा करार प्रति किलोमीटर ६४ रुपये दराने मंजूर केला असणे, या प्रकारच्या करारांचा सरासरी दर सुमारे प्रति किलोमीटर ६५ रुपये असतानाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने रुपये ७८ दर दिल्याने सुमारे ११,७३० कोटी रुपयांचे नुकसान होणार असल्याने राज्याचे हित लक्षात घेऊन सदर कंपन्यांचा करार रद्द करण्याबाबत करावयाची कार्यवाही व | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याबाबत शासनाचे प्रतिक्रिया" | |
| २६८. | श्रीमती सुलभा गायकवाड वि.स .स . | " कल्याण पूर्वेतील विठठलवाडी आगारात सुरू असलेला गैरकारभार, या आगारातून संपूर्ण् महाराष्ट्भर एस.टी ने नागरीक प्रवास करीत असणे, खेडोपाडयातील नागरीक एस टी प्रवासावर अवलंबून असणे, असे असतांनाही आगारातील बसेस अत्यंत नादुरुस्त कालबाहय झालेल्या असल्याने अनेक ठिकाणी रस्त्यांत बंद पडत असल्याचे समोर येणे, बहुतांश वेळी या आगारातील बसेसचे वेळापत्रक बिघडलेले असणे, त्यामुळे प्रवाशांना तासानतास आगारात गाडीची प्रतिक्षा करावी लागणे , प्रवाशांना नाहक मनस्ताप होणे, प्रवाशांना व कर्मचाऱ्यांना शौचालय, निवारा शेड, आसन व्यवस्था, महिलांसाठी हिरकणी कक्ष, पिण्याचे शुध्द पाणी यासारख्या मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्रीमहोदयांना दि .२५/११/२०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार, पत्राच्या अनुषंगाने अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून कल्याण पूर्वेतील विठठलवाडी आगारासाठी नव्या बसेस उपलब्ध करुन आगाराचा बीओटी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (बांधा-वापरा-हस्तांतरीत करा ) या तत्वावर विकसित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २६९. | श्री. संतोष बांगर वि. स. स. | " राज्यातील अधिस्वीकृती धारक पत्रकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कारार्थी आदि प्राप्त करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना राज्य परिवहन मंडळाच्या एस.टी. बस सेवेत वर्षभर विनामूल्य प्रवास सवलत मिळण्याची तरतूद गृह विभागाच्या दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयात केली असूनही सदर निर्णयामध्ये शिवशाही व शिवनेरी या बस मार्गांचा समावेश नसणे, दि. १० जून, २०२५ रोजी वाय. बी. चव्हाण केंद्र येथे मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते झालेल्या कार्यक्रमात या सवलतीस सहमती दर्शविण्यात आली असणे, उक्त प्रकरणी वारंवार प्रशासनाकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे परिणामी विनामूल्य प्रवास सवलत मिळण्यास अडथळा निर्माण होणे, याबाबत शासनाने तत्काळ सुधारित शासन निर्णय निर्गमित करून पुरस्कारार्थींना शिवशाही व शिवनेरी मार्गावर विनामूल्य प्रवास सवलत देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| २७०. | डॉ. किरण लहामटे वि. स. स. | " पुणे नाशिक हायस्पीड रेल्वेच्या या आधीच्या नियोजित मार्गात बदल करून आता ती शिर्डी मार्गे नेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजणे, निर्णयाविरोधात अकोले व संगमनेर तालुक्यातील जनतेत तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून वर्षानुवर्षी सर्व सामान्य जनता, शेतकरी, उद्योजक, पर्यटक मागणी करीत असलेल्या पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे ही नाशिक सिन्नर अकोले तालुका सरहद्द मार्गे संगमनेर मार्गे जाणे गरजेचे असणे, प्रत्यक्षात सदर रेल्वे मार्ग पुर्ण होण्यासाठी महाराष्ट्र शासन जनभावनांचा आदर करुन तातडीने भुमिका घेऊन केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे तातडीने पाठपुरावा करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाची भुमिका". | कित्ता |
| २७१. | श्री. अभिमन्यु पवार,ॲड. राहूल कुल वि. स. स. | " महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत लातूर जिल्ह्यात सन २०२१ ते सन २०२५ -२६ या आर्थिक वर्षात पंचायत समिती व इतर विभागामार्फत मंजूर असलेली आणि पूर्ण झालेल्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कामाचा अकुशल निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाप्रशासनाने आयुक्त ,मनरेगा नागपूर यांना सादर केला असणे, लातूर जिल्ह्यातील सन २०२१ ते आजतागायत सार्वजनिक स्वरूपांच्या जवळपास रु.१०७७९ लक्ष तर वैयक्तिक | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्वरूपाच्या कामाचा रु. ५९८३ लक्ष रुपये निधीची मागणी शासनाकडे केली असून एकूण रु.१७२६१ लक्ष निधी अद्याप अप्राप्त असणे, गेली दोन तीन वर्षापासून मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांचा निधी मिळाला नसल्याने वैक्तिक लाभार्थी व ग्रामपंचायत यांची सातत्याने मागणी असणे, अकुशल देयके प्रलंबित असल्याने लाभार्थ्यात शासनाच्या विरुद्ध तीव्र संतापाची भावना असणे ,सदरील निधी प्रलंबित असल्याने उर्वरित मंजूर आणि अपूर्ण कामावर परिणाम झाला असणे ,सदरील मनरेगा अंतर्गत सादर मागणीनुसार प्रलंबित अकुशल निधी त्वरित वितरीत करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| **२७२.** | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. अमित विलासराव देशमुख,डॉ. विश्वजित कदम,श्री. संजय मेश्राम,श्री. नानाभाऊ पटोले,डॉ. ज्योती गायकवाड,श्री. अमित झनक,श्री. विकास ठाकरे,श्री. साजिद खान पठाण,श्री. अस्लम शेख,श्री. अनिल मांगुळकर,श्री. मनोज जामसुतकर वि. स. स. | " राज्यात बेभरवशाची शेती आणि त्यातून डोईवर वाढणारे कर्ज या विळख्यातून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढतच असल्याची बाब दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी निदर्शनास येणे, देशातील सरासरी प्रत्येक २ पैकी १ शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत असणे, देशभरात १०७८६ शेतीशी सबंधित आत्महत्या झालेल्या असून यातील ३८.५ टक्के आत्महत्या केलेले शेतकरी हे महाराष्ट्रातील असल्याचे उघडकीस येणे, देशभरातील शेतकऱ्यांवर १२,१९,५१६ कोटींचे कर्ज थकीत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे, यापैकी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर तब्बल ८,३८,२४९ कोटींचे कर्जे थकीत असल्याची चिंताजनक परिस्थीती उघडकीस येणे, सततच्या नापिकीमुळे शेतकरी अडचणींत सापडलेला असतांनाच त्यांच्यावर कर्जाचे प्रमाण वाढत जात असणे, त्याचबरोबर शेतकरी आत्महत्यांचीही संख्या वाढत असल्याचे निदर्शनास येणे, पुरुष शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ९५ टक्के असून महिला शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ५ टक्के असणे, ही भयावह परिस्थीती केंद्र सरकारच्या एनसीआरबी अहवालातून समोर आलेली असणे, वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन शेती मालाला योग्य बाजारभाव मिळण्यासाठी राज्यभरामध्ये शेतकऱ्यांकडून आंदोलने सुरू केलेली असणे, सदर प्रकरणी शेतकरी संघटना, लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी तसेच वारंवार मागणी करणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असून शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होणे,परिणामी राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांचे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रमाण वाढत असणे, सदरची परिस्थीती अधिकच गंभीर व चिंताजनक बनलेली असल्याने यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया" | |
| **२७३.** | श्री. बबनराव यादव (लोणीकर),श्री. नारायण कुचे वि. स. स. | " जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, शासनाने १५ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अनुदान मंजूर केले असणे, सदरील अनुदान खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी बोगस लाभार्थ्यांच्या नावे वळते करण्यात आले असणे, अंबड आणि घनसावंगी तालुक्यांमध्ये २४ कोटी रुपये बोगस लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा झाले असणे, १२,००० बोगस नावाने २४ कोटी रुपये अनुदानाची रक्कम बीड अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यात वळती करण्यात आली असणे, एकाच शेतकऱ्याच्या नावे अनेकदा पैसे जमा करण्यात आले असणे, या घोटाळ्यात तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरण्यात आले असणे, तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी संयुक्त पाहणी न करता बोगस अहवाल सादर केले असणे, अनुदान यादी ची फेर तपासणी करण्यात दोन्ही तहसीलदारांनी हलगर्जीपणा केलेला असणे, एका तलाठी दांपत्याने | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नातेवाइकांची नावे अनुदानाची रक्कम वळती केली असणे, दोन्ही तहसीलदार सदरील अनुदान लाटल्याचे सर्व पुरावे नष्ट करत असणे, दोषी असलेल्या दोन्ही तहसीलदारांना वगळून इतर कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले असणे, अनुदान घोटाळ्याप्रकरणी आयडी आणि पासवर्ड वरून अनुदानाची रक्कम बोगस लाभार्थ्यांच्या खात्यात वळती होण्यास दोन्ही तहसीलदार देखील तेवढेच जबाबदार असणे, दोन्ही तहसीलदारांच्या तात्काळ निलंबनासह दोषी असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेवर बोजा टाकून अपहाराची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना " | |
| **२७४.** | श्री. सत्यजित देशमुख वि. स. स. | " शिराळा व वाळवा तालुक्यात माहे मे ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांना खरीप व रब्बी पिकांची पेरणी करता न आल्याने हजारो शेतकरी दुहेरी संकटात सापडलेले असणे, हजारो एकर जमीन पेरणीविना पडून असणे, सदर ठिकाणी अतोनात शेतीपिकांचे तसेच शेतीचे नुकसान होवूनही शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत न झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले असणे, तदनुषंगाने अनेक शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींनी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांच्याकडे त्वरीत नुकसान भरपाई मिळणेबाबतची मागणी केलेली असणे, नापेर व अतिवृष्टीने शेती पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत आर्थिक मदत मिळणेकामी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, त्यानुषंगाने उक्त गंभीर प्रकरणी चौकशी करुन आपत्कालीन उपाययोजना, बाधित, नापेर क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन त्यांना त्वरीत आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना." | |
| **२७५.** | श्री. काशिनाथ दाते, वि. स. स. | " यावर्षी राज्यात अतिवृष्टी व महापुराने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले असणे, पारनेर विधानसभा मतदारसंघातील पारनेर तहसिल अंतर्गत तालुक्यात एकूण १२ महसूल मंडळे असणे , यापैकी १० महसूल मंडळे अतिवृष्टी निकषात बसून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत आहे. तथापि, पारनेर व कान्हुर पठार महसूल मंडळे तांत्रिक कारणास्तव एका दिवशी ६५ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद नसल्याने निकषात समाविष्ट झालेले नसणे, परंतु तालुक्याचा एकूण सरासरी पर्जन्यमान २१३ टक्क्यांपेक्षा अधिक असून, या दोन्ही मंडळांमध्येही शेतीपिकांचे मोठे नुकसान झालेले असणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महसूल व कृषी विभागाकडून पाहणी व पंचनामे पूर्ण करण्यात आलेले असणे, तसेच जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मा. पालकमंत्री यांच्या शिफारशीने या दोन्ही महसूल मंडळांचा विचार करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असणे, नुकसान भरपाई मिळाली नसल्याने या भागातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, तरी पारनेर व कान्हुर पठार महसुल मंडळातील शेतकऱ्यांना देखील विशेष बाब म्हणून मंजुरी देऊन नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया " | |
| **२७६.** | श्रीमती मंदा म्हात्रे वि. स. स. | " बेलापूर येथील सेक्टर-१५, भूखंड क्र. १११ ए, जेट्टी परिसरात दशक्रिया विधी व धार्मिक विधीसाठी असलेला एकमेव मार्ग प्रशासनाने अन्यायकारी पद्धतीने बंद करून नागरिकांच्या भावनांशी खेळ केला असणे, बेलापूर सेक्टर १५ जेट्टी येथील दशक्रिया व धार्मिक विधींना अडथळा निर्माण करणाऱ्या खाजगी कंपनीच्या निर्णयाविरोधात नवी मुंबई जनतेनी एकमुखी निषेध केला असणे, हिंदू संस्कृतीतील पारंपरिक व श्रद्धास्थानी असलेले विधी अडथळ्यात आणणे ही नागरिकांच्या धार्मिक अधिकारांवर सरळसरळ गदा आणली असणे, त्याच बरोबर बेलापूर ग्रामस्थांच्या वतीने आयोजित | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेल्या बेलापूर गाव सेक्टर – १९/२० येथील राम मंदिर सभा मंडपात बेलापूर गावातील वरिष्ठ नागरिकांसमवेत व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड सागरी मंडळाचे अधिकरी,नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे अधिकारी, स्थानिक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांच्या समवेत बैठक आयोजित केली असणे,दशक्रिया विधी सारख्या पवित्र कार्यावर अडथळे आणणारे अधिकारी हे सर्वसामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असणे, नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावणारे निर्णय रद्द करावेत व बेलापूर येथील सेक्टर-१५, भूखंड क्र. १११ ए, जेट्टी परिसरात दशक्रिया विधी व धार्मिक विधीसाठी असलेला एकमेव मार्ग तात्काळ खुला करण्यासाठी शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२७७.** | श्रीमती सना मलिक वि. स. स. | " मे. योगायतन पोर्ट्स प्रा. लि. कंपनीने आजपर्यंत एकूण किती घन मीटर गाळ काढला आणि तो नेमका कोणत्या ठिकाणी टाकण्याची परवानगी दिली होती? ट्रॉम्बे येथील मच्छीमारी क्षेत्रात सुमारे ७० हजार घन मीटर गाळ टाकल्याची तक्रार खरी आहे काय? असल्यास, CRZ कायद्याचा भंग करणाऱ्या कंपनीवर व या कामात सहभागी असलेल्या महाराष्ट्र मेरी टाइम | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बोर्डाच्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासन कोणती कठोर कारवाई करणार आहे? मच्छिमारांना तातडीने दिलासा देण्यासाठी, सदर अनधिकृत गाळ विहित ठिकाणी उचलून टाकण्यासाठी आणि बाधितांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२७८.** | श्री. राजेंद्र गावित वि. स. स. | " पालघर जिल्ह्यातील सागरी किनारपट्टीवर पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या लहान मच्छीमारांचे जीवनमान समुद्रातील जैवविविधता, मत्स्यसाठ्यांचे पुनर्भरण व शाश्वत मासेमारीवर अवलंबून असताना, केंद्र शासनाने ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी अधिसूचित केलेल्या ईईझेड ( EEZ ) नवीन नियमांमुळे मोठ्या व्यापारी बोटी व भांडवलदारांना खोल समुद्रात मोकळीक देण्यात येत असल्याने लहान मच्छीमारांच्या अस्तित्वावर गंभीर संकट निर्माण झाले असणे, सागरी प्रकल्प, रासायनिक सांडपाणी, किनाऱ्यालगतचे प्रदूषण, व्यापारी जहाजांची वाढलेली रहदारी व तेल-वायू ड्रिलिंगमुळे गोल्डन बेल्ट हा मासेमारी अधिवास नष्ट होत असून, आता पर्ससीन व एलईडीसारख्या विध्वंसक मासेमारीला कायदेशीर मुभा मिळाल्याने समुद्री मत्स्यसाठे पूर्णपणे आटण्याचा धोका निर्माण होणे, नवीन नियमांनुसार २४ मीटरपेक्षा कमी लांबीच्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पारंपरिक बोटींना परवाना बंधनकारक तर मोठ्या यंत्रचलित जहाजांना सूट देणे ही स्पष्ट भेदभावात्मक भूमिका असून पालघर जिल्ह्यातील वसई, डहाणू व तलासरी तालुक्यातील मच्छीमारांचे उपजीविका साधनच धोक्यात आल्याने मच्छीमांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदर नियमांमुळे माशांची संख्या घटण्याचा धोका वाढल्याने राज्य शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घेऊन लहान मच्छीमारांच्या संरक्षणासाठी ठोस धोरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२७९.** | श्रीमती स्नेहा दुबे,श्री. महेश बालदी,श्री. प्रशांत ठाकूर,श्री. समीर कुणावार,श्री. अमित साटम,श्रीमती मनिषा चौधरी,श्री. अस्लम शेख,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अमिन पटेल,डॉ. विश्वजित कदम,श्री. अमित विलासराव देशमुख,श्री. विकास ठाकरे,डॉ. ज्योती गायकवाड,श्री. साजिद खान पठाण,श्री. शिरीषकुमार नाईक,श्री. रामदास मसराम,श्री. संजय मेश्राम,श्री. हेमंत ओगले,श्री. अनिल मांगुळकर, | " कोंकण किनारपटटी मासेमारीसाठी प्रसिध्द. असून सागरी संस्कृती लोकजीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या संपूर्ण किनारपट्टीवरील गावे मासेमारीवर अवलंबून असणे, मागील काही वर्षात Envistart.India यांनी सागरी प्रदुषण अहवालात किनाऱ्यापासून १ कि.मी.पर्यतचे पाणी प्रदुषणामुळे खराब झाल्याचे नमूद असणे, मासेमारी बंदी कालावधी संपल्यानंतर सुरू होणाऱ्या हंगामात अचानक हवामानातील अनियमितता, तापमानवाढ, चक्रीवादळाची संकटे ओढवल्यास मासेमारी न करताच परतावे लागणे, यामध्ये खुप आर्थिक नुकसान होणे, मत्स्य प्रजनन काळात परप्रांतीय यांत्रिक नौका, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भास्कर जाधव, श्री. निलेश राणे, वि. स. स. | ट्रॉलर्स, यांचेव्दारा GPS व् Satelite Fish पॉईंटच्या सहाय्याने एल.ई.डी., पर्ससीन, लाईट फिशिंग, घन आसाच्या डिस्कोडोली, मल्टीडे डोल सारख्या मासेमारी पध्दतीने हव्यासापोटी कमी आसाची जाळी लावून परप्रांतीय यांत्रिक नौका, ट्रॉलर्स, यांचेकडून होणाऱ्या अतिमासेमारीमुळे मासेमारी क्षेत्रच दिवसेंदिवस कमी होणे, समुद्र तळाशी असणाऱ्या बेटसदृष्य भागामध्ये होत असलेल्या मत्स्यबीज उत्पादन क्षेत्रात यांत्रिकी मासेमारी बंद करण्याच्या दृष्टीने हदद निश्चितेचे बंधन, बंदीकाळात नोंदणी नसलेल्या मासेमारी बोटींमुळे स्थानिक मच्छिमारांचे अस्तित्वच धोक्यात येणे, मत्स्य उत्पादनात घट होत असतांना थकीत कर्ज वाढणे, नुकसान भरपाईसाठी वेळोवेळी केलेल्या मागणीवर शासनाने मत्स्य व्यवसायास शेतीचा दर्जा जाहीर करणे, मात्र शेतकऱ्यांप्रमाणे आज ना उद्या कर्जमाफी होईल या आशेवर निराशा पदरी पडणे, यामुळे मच्छिमार बांधवांमध्ये पसरलेली नाराजीची भावना विचारात घेता शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करून विशेष आर्थिक पॅकेज मंजूर करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया." | |
| **२८०** | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | " मुंबईतील गोरेगाव पूर्व दादासाहेब फाळके चित्रनगरीसह | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | राज्यातील चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार/ज्युनिअर कलाकारांवर मालक/निर्माते यांच्याकडून सातत्याने अन्याय होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, या कामगारांना चित्रीकरणासाठी मुंबईसह महाराष्ट्रात विविध ठिकाणी कामासाठी जावे लागत असणे, कामाची ८ ते १२ वेळ निश्चित करणे, निकृष्ट दर्जाचे भोजन न देता सकस आहाराचे भोजन देऊन दुपारी भोजनाची १ वा. वेळ निश्चित करणे, कामाचे वेतन कंत्राटदारा ऐवजी थेट चित्रपट निर्मात्याकडून देण्यात यावे, कामगार चांगले रहावे याकरिता निर्मात्यांनी स्टुडिओ अथवा चित्रिकरणाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्याची सतर्कता घेणे, ज्युनिअर महिला कलाकांराना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र सुविधा करणे, चित्रपट, सिरीअलचे चित्रीकरण रात्री/अपरात्री सुरू असल्याने, घरी जाण्यासाठी गैरसोय होऊ नये यासाठी चित्रिकरणास रात्री १० वा.पर्यंत परवानगी देणे, शासनाच्या १४ फेब्रुवारी, २०२४ च्या कामगारा कलाकारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरिता मानक कार्यप्रणाली (SOP) या शासन निर्णयातील तरतूदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, तसेच दादासाहेब फाळके, चित्रनगरी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांनी, चित्रनगरीतील सर्व निर्मिती संस्थाना कलाकार कामगारांना सुविधा देण्याबाबत दि.१७.०१.२०२५ रोजी लेखी पत्र देऊनही अद्याप, यावर कोणतीच कार्यवाही न होणे, मुंबईसह राज्यातील किमान ५ लाख कामगारांवर झालेला व होत असलेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| २८१. | श्री. रवी राणा वि. स. स. | " "महाराष्ट्रातील सुमारे ४० लाख घरेलू/घरकामगार महिलांचा प्रश्न अत्यंत गांभीर्याचा असून, या कार्यकर्त्या महिलांना अद्यापही मूलभूत कामगार हक्क व सामाजिक सुरक्षा योजनांचा पुरेसा लाभ मिळत नसणे, २००८ मधील घर कामगार कल्याणकारी कायद्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र घर कामगार कल्याण मंडळाचे (MDWWB) कार्य अपुऱ्या नोंदणीदर व निधी अभावी प्रभावीपणे होऊ शकत नसणे, त्यामुळे घर कामगारांच्या जीवनमान उन्नतीसाठी तातडीने पुढील उपाययोजना करणे आवश्यक असणे, घरेलू कामगारांना आरोग्य सुरक्षेची हमी मिळावी यासाठी ESIC आरोग्य विमा योजना तत्काळ लागू करणे, तसेच, घरकामगार कल्याण मंडळाची पुनर्बांधणी करून त्रिपक्षीय रचनेत कार्यरत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करणे गरजेचे असणे, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत कामगारांचा थेट सहभाग सुनिश्चित होणे, सामाजिक सुरक्षा योजनांचा विस्तार करण्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी आणि नोंदणीकृत ६० वर्षांवरील सर्व घर कामगार महिलांना त्वरित पेन्शन लाभ देण्यात यावा, ह्या महत्त्वपूर्ण मागण्यांचा सकारात्मक विचार करून निर्णय घेऊन लाखो घर कामगार महिलांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता, या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| २८२. | श्री. रवी राणा वि. स. स. | " खाजगी कंपनी व विविध आस्थापनांमध्ये ५ ते ७ वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा देणारे सुरक्षा रक्षक अत्यंत कमी वेतनावर दीर्घ तास ड्युटी करत असून त्यांचे वय, कौटुंबिक जबाबदाऱ्या व मर्यादित शारीरिक क्षमतेच्या पार्श्वभूमीवर विद्यमान शासन निर्णयातील पोलीस भरतीसमान कठोर मैदानी चाचणी त्यांच्यासाठी अन्यायकारक ठरत असणे. आस्थापनांकडून त्यांची नोंदणी करण्यासाठी शिफारस असूनही कठीण चाचणी निकषांमुळे मोठ्या संख्येने सुरक्षा रक्षक अपात्र होत आहेत. त्यामुळे त्यांचा रोजगार धोक्यात येत असून अनेक आस्थापना नोंदणी प्रक्रियेतून माघार घेत आहेत, ज्यामुळे शासनाच्या धोरणालाही बाधा पोहोचत आहे. कार्यरत व अनुभवी सुरक्षा | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रक्षकांचा रोजगार टिकून राहावा, त्यांना न्याय मिळावा आणि आस्थापनांना नोंदणी सुलभ व्हावी यासाठी शासन निर्णयातील कठोर मैदानी चाचणी तात्काळ शिथिल करून त्यांच्या सेवाकार्यातील स्वरूप व वयोमान लक्षात घेऊन साधारण व व्यवहार्य चाचणी लागू करणे गरजेचे असणे, वरील निकड तातडी ओळखून शासनाने आवश्यक सुधारणा करण्याची आवश्यकता व करायवयाची कारवाही." | |
| २८३. | श्री. सुनिल प्रभू,श्री. अमोल खताळ वि. स. स. | " मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील गुलमोहर रोड जेव्हीपीडी सीएस क्र.१२७ मधील स्टर्लींग को.ऑप.सोसायटी संबधी प्रकरणात सोसायटी कार्यकारिणी समिती अस्तित्वात नसतांना व गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नियुक्त असतांना तत्कालिन उपनिबंधक, सहकार संस्था विभाग, म्हाडा यांनी परस्पर पदाचा दुरुपयोग करुन हिरेन्द्र गांधी या त्रयस्थ व्यक्तीला उपरोक्त गृहनिर्माण संस्थेचे सदस्यपद बेकायदेशीर रित्या दिल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू गृहनिर्माण संस्थेवर २०२३ या कालावधीत शासनातर्फे प्रशासक नियुक्त करण्यात येणे, हिरेन्द्र गांधी यांनी संस्थेचे सदस्यत्व मिळण्यासाठी प्रशासक यांना दि.१७.०७.२०२३ रोजी दिलेला अर्ज फेटाळण्यात आलेला असतानांही, तत्कालिन | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपनिबंधकांनी हिरेन्द्र गांधी यांना संस्थेचे सदस्यत्व देण्यात येऊन यामध्ये लाखो रुपयाचा केलेला भ्रष्टाचार या संदर्भात अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, मुंबई यांनी दि.०३.०६.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकार आयुक्त यांना लेखी निवेदन देऊनही यावर अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू प्रकरणी शासनाने हिरेन्द्र गांधी यांना संस्थेचे सदस्य पद तत्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२८४.** | श्री. राघवेंद्र पाटील वि. स. स. | "धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघासह राज्यभरातील शेतकरी व लाडक्या बहिणींचे विविध राष्ट्रीयकृत बँकेत खाते असून या खात्यात शासनामार्फत विविध योजनांचे अनुदान DBT मार्फत जमा होणे, त्यात शेतकऱ्यांचे दुष्काळ, आपत्ती, अतिवृष्टी, पीकविमा, पी.एम.सन्मान निधी, नमोकिसान निधी असे व यासारखे अनेक अनुदान जमा होतात. तसेच महिलांचे लाडक्य बहिणीचे हप्ते, वृद्ध पेन्शन योजनेचे हप्ते, संजय गांधी निराधार योजनेचे हप्ते, उज्ज्वला गॅससबसिडीचे पैसे बचत खात्यात जमा होत असणे, शासनाकडून आलले सदर अनुदान बँक, बँकेतील अधिकारी व कर्मचारी हे हेतुपुरस्सर | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शेतकऱ्यांच्या व महिलांच्या बचतखात्यातून त्यांच्या कर्जखात्यात परस्पर वर्ग करत असल्यासमुळे शासकीय अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना व महिलांना मिळत नाही म्हणून ते अनुदानापासून वंचित राहणे, त्याचप्रमाणे तालुक्यात व्यवसाय, उद्योग करू इच्छुक नव उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. त्यासाठी ते शासनाच्या विविध शासकीय योजनेंतर्गत औद्योगिक कर्जांसाठी बँकेत अर्ज करत असतात. परंतु त्यांना देखील कर्ज मिळण्यासाठी बँकेत वारंवार चकरा माराव्या लागतात व शुल्लक कारणाने त्यांची प्रकरणे बँकेकडून रद्द केल्यामुळे बँक प्रशासनाच्या विरोधात नाराजी पसरणे, बँक प्रशासनावर देखील तालुका स्तरावर नियंत्रण ठेवण्यासाठी अशासकीय व्यक्तींची कमिटी गठीत करण्यात यावी. यात अर्थ क्षेत्रातील तज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी व अन्यतज्ञांचा समावेश असावा व नागरिकांना बँक प्रशासनाच्या मनमानी कारभारा विरोधात तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध व्हावी यामुळे बँकेच्या प्रशासकीय कामात सुसूत्रता येऊन नागरिकांच्या समस्या सोडविण्यास मदत होणार असणे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा, महिलांचा, तरुण नव उद्योजकांच्या बँकेतील येणाऱ्या समस्यांच्या निराकरण | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| २८५. | श्री. चंद्रदीप नरके वि. स. स. | " राज्यात चालू वर्षी अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाल्यामुळे या परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी राज्य शासनाने पीक कर्ज पुनर्गठण योजना जाहीर केलेली असणे, त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, राधानगरी, पन्हाळा, शिरोळ, कागल, बंदगड, आजरा, गडहिंग्लज या ९ तालुक्यांत जाहीर झालेली असणे, त्यामध्ये गेल्या वर्षी घेतलेल्या पीक कर्जाचे पाच समान हप्ते करणे, त्यातील पहिला हप्ता आणि व्याज याचवर्षी भरावे लागणे, यंदाच्या वर्षाचे नवीन पीक कर्ज संपूर्णपणे मिळणार असून पुढील वर्षी पुनर्गठण केलेल्या कर्जाची परतफेड ही १२ टक्के व्याजाने करावी लागणार असणे, मात्र सदर योजना अंमलबजावणीत असलेल्या नियम, अटी, स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा मोठ्याप्रमाणातील अभावामुळे जिल्हा बँक आणि राष्ट्रीय बँका यांच्यात गोंधळ निर्माण होणे, त्यामुळे पुनर्गठण केलेल्या कर्जाची परतफेड १२ टक्के व्याजाने करावी लागणार असून या योजनेतील शेतकऱ्यांवर व्याजाचा मोठा भुर्दंड पडणार असल्याने पुनर्गठण केलेल्या कर्जावर व्याज सवलत मिळणार नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडणे, आधीच अतिवृष्टी- | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महापुरात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याऐवजी पुनर्गठण योजनेमुळे शेतकरी व्याजाच्या चक्रव्युहात अडकणे, यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी संकट वाढवणारी ठरणे, अशा परिस्थितीत शासनाने चौकशी पूर्ण करून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन सरसकट कर्जमाफी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया" | |
| २८६. | डॉ. राहूल पाटील वि. स. स. | " राज्यात १६ लाख ८७ हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड करण्यात येणे, त्यानुसार राज्यात किमान ५५५ कापूस खरेदी केंद्राची आवश्यकता असतांना भारतीय कापूस महामंडळाने राज्यात केवळ ८९ केंद्रे सध्या सुरू केलेले असणे, शासनाने शेतकऱ्यांसाठी 'कापूस किसान' ॲप तयार करणे, या ॲपमध्ये नोंदणी प्रक्रिया, ओटीपी इत्यादी क्लिष्ट असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना सदरहू प्रक्रिया कळत नसून या प्रक्रियेवर शेतकऱ्यांना निर्भर राहता येत नसणे, शेतकऱ्यांनी शासनाकडे यासंदर्भात अनेक तक्रारी केलेल्या असणे, तसेच कृषि विभागास गेल्या पाच वर्षापासून विविध योजनांसाठी मंजूर केलेली १२ हजार कोटी रुपयांची थकबाकी अदयापि देण्यात आलेली नसणे, त्यामुळे राज्याचा कृषी विभागच मोठ्या | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आर्थिक संकटात सापडला असणे, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांना विविध योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, शेतकऱ्यांमध्ये शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाची व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | |
| २८७. | श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | " मुंबईतील कांदिवली पश्चिम येथील विशाल सह्याद्री गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्या मनमानी कारभाराबाबत चौकशी करुन विद्यमान समिती बरखास्त करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७७ (अ) नुसार प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक, तसेच संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतची मागणी संस्थेच्या ६५० सभासदांनी दि.३०-९-२५ रोजी शासनाकडे केलेली असणे, सहकार कायदा कलम ७६ (१) (एक) या कलमानुसार संस्थेतील गैरप्रकाराबाबत पत्र देऊन एक महिन्याचा कालावधी उलटून सुध्दा संस्थेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, संस्थेने दि.०४/१०/२०२५ रोजीच्या सूचनेमध्ये पुनर्विकासाच्या अनुषंगाने विकासकाने तयार केलेल्या आराखडयांचे सादरीकरण करणे व विधी सल्लागाराने तयार केलेला विकसन करारनामा सूचना हरकतीसह संस्थेच्या ६५० पेक्षा जास्त | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदस्यांचे मत डावलून संस्थेचे संचालक यांनी ज्या सभासदांना विकसन करारनामा संदर्भात मंजूरीकरिता हात वर करण्याचे आव्हान करुन विकसन करार नाम्यावर मंजूरी घेऊन सहकारी कायद्यांचे उल्लंघन केले, संस्थेने केवळ मर्जीतील व्यक्तींना पुनर्विकास उपसमितीत कोणत्याही सर्वसाधारण सभेचा ठराव नसताना अवैधपणे नियुक्ती केलेली असणे, संस्थेच्या अध्यक्ष, सचिव यांच्या गैरकारभाराबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग यांचेकडे तक्रारी करुनही उपनिबंधक यांनी तक्रारीबाबत कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचे दि.२६-११-२०२५रोजी कारणे देऊन सदर गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रया." | |
| २८८. | श्री. अतुल भातखळकर,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. राजकुमार बडोले,श्री. रोहित पाटील,श्री. दौलत दरोडा,श्रीमती सुलभा खोडके,श्री. चेतन तुपे,श्री. मोहन मते,श्री. विलास तरे वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील आदिवासी भागात माहे जून, २०२५ पासून आजतागायत सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणाला 'भयंकर' असे संबोधले असून, शासनास याबाबत गांभीर्य नसल्याचे ताशेरे ओढले असणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यामध्ये अनेक वर्षांपासून कुपोषण समस्येवर विविध शासकीय योजना राबवण्यात येत असतानाही बालमृत्यू रोखता न येण्याची नेमकी काय कारणे असणे, त्यामुळे मेळघाट व राज्यातील इतर आदिवासी भागांत आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करण्याची गरज असणे, तसेच त्यासाठी विशेष तरतूद म्हणून निधी मंजूर करण्याची गरज असणे, तसेच उच्च न्यायालयाने केलेल्या शिफारसीनुसार आदिवासी भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना अधिकचे प्रोत्साहन भत्ते देण्यासह आदिवासी भागातील कुपोषण रोखण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | |
| **२८९.** | श्री. चेतन तुपे,श्री. शंकर मांडेकर,ॲड. राहूल कुल,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. योगेश सागर,श्री. देवराव भोंगळे,श्री. राजकुमार बडोले,श्री. विकास ठाकरे,श्री. मंगेश चव्हाण वि. स. स. | " राज्यात मे महिन्यापासून अनियमित सुरू झालेला पाऊस, साचलेले पाणी, आणि बदलते हवामान, या कारणांमुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, स्वाईन फ्ल्यू, लेप्टोस्पायरेसीस, कॉलरा, पिवळा ताप, गॅस्ट्रोएन्टरायटिस, टाईफाईड, बर्ल्ड फ्ल्यू इत्यादी रोगांचा वाढलेला प्रादुर्भाव, परिणामी राज्यात ३९ हजार ७१८ रुग्ण साथीच्या आजारांनी त्रस्त असणे तर ३८ रुग्णांचा झालेला मृत्यू माहे, नोव्हेंबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, राज्यात | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मान्सून संपला असला तरी साथीच्या रोगांनी विविध जिल्ह्यात थैमान घातले असून मुंबई, ठाणे, पुणे, गडचिरोली या भागात फार मोठ्या प्रमाणात रुग्णांची संख्या वाढणे, आरोग्य विभागाने साथीच्या आजारावर नियंत्रणासाठी सात सुत्री आराखडा तयार करुन याबाबत जलद सर्वेक्षण, किटक नियंत्रण, फॉगींग, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, या उपाययोजना करुनही साथीच्या आजारामध्ये वाढ होतच राहणे, विशेषतः मुंबईतच मलेरियाचे ८६९७, डेंग्युचे ५२४६, चिकनगुनियाचे ७२६, नाशिकमध्ये डेंग्युचे ५७६, ठाण्यात ४८८, पालघरमध्ये चिकनगुनियाचे ३४३, पुण्यात २३५ रुग्ण नोंदले गेले असून ३८ जणांचा झालेला मृत्यू, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष व भितीचे वातावरण लक्षात घेता या साथीच्या रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | |
| **२९०.** | श्री. चेतन तुपे,श्रीमती सुलभा खोडके,श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर,ॲड. राहूल कुल,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. रोहित पाटील वि. स. स. | " राज्य सरकारने “स्वस्थ नारी सशक्त परिवार" अभियान संपूर्ण राज्यात राबवितांना महिलांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी सर्वत्र शिबिरांचे आयोजन केले असतांना या तपासणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, या अभियानाअंतर्गत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १,५१,१०,००० महिलांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये १७,६१८ महिलांना मुख कर्करोग तर ४५० महिलांना स्तनांचा कर्करोग झाल्याचे निष्पन्न होणे, यामध्ये सर्वाधिक संशयीत रुग्ण नागपूर जिल्ह्यात ३,७४४, बुलढाणा जिल्ह्यात १,२६९ तर अमरावती जिल्ह्यात १,४६० महिला कर्करोगाने ग्रस्त असल्याचे दिसून येणे, तसेच ॲनिमियाग्रस्त असलेल्या महिलांची तपासणी करतांना ५५,८३,००० महिलांची तपासणी केली असता,त्यापैकी ६,७१,२९१ इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांना ॲनिमिया असल्याचे दिसून येणे, यामध्ये चंद्रपूर, पुणे, नागपूर, बुलढाणा, अकोला, नांदेड, परभणी आणि नंदुरबार जिल्ह्यातील परिस्थिती चिंताजनक असणे, तसेच गर्भाशय कर्करोग तपासणीसाठी ५४,४७,००० महिलांची तपासणी केली असता त्यापैकी १०,००० महिला संशयीत रुग्ण आढळून आले असून त्यापैकी १७१० महिलांची बायोप्सी केल्यानंतर २३४ महिलांना गर्भाशय कर्करोग असल्याचे आढळून येणे,संपूर्ण राज्यात याबाबत शिबिरांचे आयोजन करुन तपासणीमध्ये हजारो महिला कर्करोगाने ग्रस्त असल्याचे निदर्शनास आल्यामुळे राज्यातील महिला वर्ग व कुटूंबियांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण लक्षात घेता या रोगावर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नियंत्रण आणण्यासाठी तसेच लोकांना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २९१. | श्री. राजेश वानखडे वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील तिवसा तालुक्यातील नवीन चार आरोग्य उपकेंद्रांच्या इमारती अनुक्रमे बोर्डा, वाठोडा, ममदापूर व भिवापूर शासनाद्वारे उभारण्यात येणे, या उपकेंद्रांमध्ये कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध न होणे, त्याचप्रमाणे तिवसा तालुक्यातील तीन आरोग्य केंद्रांसह उपकेंद्रांमध्ये वैद्यकीय अधीक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक पुरुष, परिचय, सफाई कर्मचारी अशी विविध संवर्गातील एकूण ३१ पदे रिक्त असणे, यात कुऱ्हा, मार्डी, तळेगाव ठाकूर ही आरोग्य केंद्रे तळेगाव ठाकूर विभागातील आठ उपकेंद्रे कुऱ्हा विभागातील सात व मार्डी विभागातील पाच अशी एकूण वीस केंद्रांवर कर्मचाऱ्यांची कमतरता निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांना आरोग्य सेवेकरीता तालुकास्तरावर उपचाराकरिता जाणे क्रमप्राप्त होणे, आरोग्य सेवेतील पदे रिक्त असल्याबाबत सातत्याने वृत्तपत्रांमध्ये वृत्त प्रकाशित होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती रोष निर्माण | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | होणे, परिणामी आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता तीवसा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यातील आरोग्य सेवेतील कर्मचार्यांची पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" | |
| **२९२.** | श्रीमती मंजुळा गावित वि. स. स. | " साक्री (जि.धुळे) विधानसभा मतदार संघ हा अदिवासी मतदार संघ असून भौगोलीक दृष्टया साक्री हा सर्वात मोठा तालुका असणे, वर्षभरात साक्री तालुक्यात ८ ते १० हजार महिलांच्या प्रसुतीचे प्रमाण असणे, अवघड प्रसुतीसाठी महिलांना धुळे, नंदुरबार येथील शासकीय रुग्णालयात पाठवावे लागणे, त्यामुळे त्यांना वेळेवर उपचार होणे शक्य होत नसणे, परिणामी अनेक वेळा नवजात शिशू व मातांचा होत असलेला मृत्यू, त्याचप्रमाणे साक्री तालुक्यात कुपोषित मुलांचे प्रमाण जास्त असून त्यांच्यावर देखील उपचार होणे गरजेचे असणे, तथापि तालुक्यात महिलांसाठी स्वतंत्र असे एकही रुग्णालय नसणे, तालुक्यातील अदिवासी महिलांना व बालकांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी साक्री-पिंपळनेर येथे महिला व बाल रुग्णालय मंजुर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांचेकडे केलेली असणे, तथापि अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, शासनाने याबाबत | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तत्काळ निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २९३. | श्री. रवी राणा वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय तसेच अन्य शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर व नर्स यांच्यावर वाढत असलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तातडीने पुरेशा संख्येने सुरक्षा गार्ड उपलब्ध करून देण्याची मागणी केली असणे, यानुसार शासनाने दि. ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी राज्यातील सर्व रुग्णालयांसाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा गार्ड नेमणुकीस मंजुरी दिली आहे. मात्र मंजुरी असूनही अमरावती जिल्ह्यातील रुग्णालयांना आजपर्यंत सुरक्षा गार्डची सेवा प्रत्यक्षात मिळालेली नसणे, यामुळे संबंधित यंत्रणा अपेक्षित सुरक्षा प्रदान करण्यात असमर्थ असल्याचे पाहावयास मिळत आहे. डॉक्टर, नर्स व आरोग्य कर्मचारी सतत धोक्यात काम करत असून रुग्णालय परिसरात भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्थितीचा तात्काळ सामना करण्यासाठी, कायमस्वरूपी व्यवस्था लागू होईपर्यंत खाजगी यंत्रणेमार्फत तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षा गार्ड नेमण्याचा पर्याय त्वरित राबविणे अत्यावश्यक असणे, यामुळे तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होईल आणि आरोग्य | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा कवच मिळेल. म्हणून आरोग्य विभागाने हस्तक्षेप करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २९४. | श्री. रवी राणा वि. स. स. | "महाराष्ट्रात अमरावती व नाशिक येथे कार्यरत असलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) ही अत्यंत महत्त्वाची आरोग्यसेवा केंद्रे असून येथे बाह्य यंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत गंभीर तक्रारी सातत्याने येत आहेत. अमरावती येथील विभागीय रुग्णालयात सक्षम प्रा. लि. या कंपनीकडे अनेक वर्षांपासून मनुष्यपुरवठा कंत्राट असून त्यांच्याविरोधात मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर दि. २४/०४/२०२५ रोजी मा. आरोग्य मंत्र्यांनी सदर कंत्राट रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तथापि, दिलेल्या आदेशानुसार अद्याप नवीन निविदा प्रक्रिया सुरू न झाल्याने कर्मचारी, रुग्णालय प्रशासन व रुग्णसेवा या सर्वच स्तरांवर अडथळे निर्माण झाले असणे, यावर उपाय म्हणून अमरावती व नाशिक येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयांना स्वतंत्रपणे मनुष्यपुरवठा निविदा प्रक्रिया राबविण्याचा अधिकार देणे अत्यावश्यक आहे. यामुळे सक्षम, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जबाबदार एजन्सींची निवड होऊन सेवा दर्जा सुधारेल आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनातील विलंबाची समस्या दूर होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| २९५. | श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री. धर्मरावबाबा आत्राम,श्री. राजु तोडसाम,श्री. मोहन मते वि. स. स. | " अमरावती जिल्ह्यातील धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात अपुऱ्या सुविधामुळे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी २४ तासामध्ये एका पाठोपाठ तीन बालकांचा तसेच एका गर्भवती मातेचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस येणे, तसेच दिनांक १३ नोव्हेंबरच्या रात्री साद्राबाडी आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या धूळघाट येथील कविता श्रीराम धांडे या महिलेला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करतांना रुग्णवाहिकेतच तिने जुळ्या मुलांना जन्म दिलेल्या मातेसह नवजात मुलींला गावी रवाना करण्यात आलेल्या मुलीचा दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी मृत्यू झाल्याचा संतापजनक प्रकार निदर्शनास आला असणे, धारणी उपजिल्हा रुग्णालयाला २० वर्षे पूर्ण झाली असतांना कुपोषणासारखा बट्टा लागलेल्या मेळघाटात सर्व सुविधां पुरविण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असून त्यासाठी कोट्यावधी रूपयांचा निधी खर्च करण्यात आला असतानाही रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर, कर्मचारी परिचारिका अशा जवळपास ४० जागा रिक्त असणे, तसेच रुग्णालयात औषध | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुरवठा करण्यास योग्य निधी मिळत नसल्याने आदिवासी बालकांचा विविध कारणांनी होत असलेले बाल मृत्यू, माता मृत्यूचे प्रमाण वाढत असणे, मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी आजही आदिवासी भागात मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असणे, याबाबत शासनाने रूग्णालयात आवश्यक त्या सुविधासह, औषध साठ्यासह, अनेक रिक्त असलेल्या जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२९६.** | श्री. आनंद तिडके वि. स. स. | " नांदेड जिल्ह्यातील नांदेड तालुका, हदगाव, माहूर, लोहा व किनवट तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये मागील काही महिन्यांपासून आरोग्य सुविधा पूर्णपणे ढासळून कार्यक्षमतेचा पूर्ण ऱ्हास झाल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले असणे, बरडशेवाळा आरोग्य केंद्रात औषधांचा तीव्र तुटवडा निर्माण होऊन रुग्णांना सोशल मिडिया ग्रुप व स्थानिक स्वयंसेवकांकडून औषधांचा पुरवठा घ्यावा लागणे, माहूर तालुक्यात पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे व २७ उपकेंद्रांमध्ये निम्म्याहून अधिक पदे रिक्त असून गंभीर रुग्णांवर उपचार करणे अशक्य झाले असणे, लोहा तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी मुक्कामी राहत नसल्याने | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आरोग्य सेवा मिळत नसणे, तर किनवट तालुक्यातील खंबाळा उपकेंद्र अनेक महिन्यांपासून कुलूपबंद असून नागरिकांना शेजारील गावात उपचारासाठी जावे लागणे, चिंचोर्डी आरोग्य केंद्रात औषध तुटवडा, बायोमेट्रिक गैरव्यवहार, वीज-पाणी पुरवठा खंडित होणे यामुळे रुग्णांची प्रचंड गैरसोय होणे, या सर्व परिस्थितीमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील गर्भवती महिला, नवजात शिशू, वृद्ध, कुपोषित व संसर्गजन्य आजारांनी ग्रस्त रुग्णांचे प्राण धोक्यात येणे, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील विस्कळीत झालेली आरोग्य व्यवस्था तात्काळ सुधारून रिक्त पदे भरणे, औषध पुरवठा नियमित करणे, उपकेंद्रे सुरू करणे व या परिस्थितीस जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **२९७.** | श्री. शिवाजी पाटील वि. स. स. | " चंदगड (जि.कोल्हापूर ) येथील रुग्णालयात सोयी-सुविधांच्या अभाव,चंदगड तालुका हा सीमावर्ती भागास लागून असून डोंगराळ व दुर्गम भाग असल्याने येथे आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात असणे,रुग्णालयाच्या अपुऱ्या आरोग्याच्या सेवेमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांना प्राण गमवावे लागत असणे,चंदगड तालुक्याला लागून सीमावर्ती भागात सोयी | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | –सुविधांनी सुसज्ज असे आयुष हॉस्पीटल झाल्यास चंदगड, गडहिंग्लज, आजरा व इतर आसपासच्या तालुक्यांबरोबर सीमावर्ती भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकेल, यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदंयाकडे दिनांक ११/११/२०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार,सदर पत्राच्या अनुषंगाने अदयाप कार्यवाही न होणे, , याकरिता शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष घालून चंदगड ( जि.कोल्हापूर ) येथे सोयी –सुविधांनी सुसज्ज असे आयुष हॉस्पीटल उभारण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका." | |
| २९८. | श्री. मंगेश चव्हाण, श्री. योगेश सागर, देवराव भोंगळे, वि. स. स. | " राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, रक्ताचा तुटवडा होऊ नये यासाठी पाच महिन्यांपूर्वी एकाच वेळी चाळीस पेक्षा अधिक रक्तपेढ्यांना मान्यता देण्यात आली असणे, परंतु रक्तपेढ्या वाढल्या तरी रक्ताचा तुटवडा संपुष्टात येत नसल्याने राज्य शासनाने राज्यात रक्त धोरण राबविण्यात येईल असे घोषित केले असणे, मात्र अद्यापही घोषणेची अंमलबजावणी झालेली नसणे, या धोरणाचा मसुदा तीन ते चार वेळा तयार होऊनही त्याला धोरणाचे स्वरूप प्राप्त झाले नसणे, राज्यात प्रत्येक महिन्यात रक्ताची उपलब्धता समान नसणे, | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संकलन, साठवणुकीच्या पद्धतीमध्ये भेद असणे, शहरी आणि ग्रामीण भागातील रक्तसंकलन आणि वापराच्या पातळीवरील आव्हाने वेगवेगळ्या स्वरूपाची असणे, त्यामुळे रक्त संकलनाच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता रहावी, राज्यातील रक्ताची इतर ठिकाणी नियमबाह्य विक्री होऊ नये, यासाठी राज्य रक्त धोरण अत्यंत गरजेचे असणे, त्याचे महत्व लक्षात घेऊन या धोरणाची अंमबजावणी तातडीने करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया" | |
| **२९९.** | श्रीमती सना मलिक वि. स. स. | " राम मंदिर रेल्वे स्थानकावर नुकतीच एका गर्भवती महिलेची प्लॅटफॉर्मवर प्रसूती झाल्याची गंभीर घटना घडणे, त्या ठिकाणी तत्काळ वैद्यकीय मदत किंवा रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण होणे, या घटनेमुळे मुंबईतील उपनगरी रेल्वे स्थानकांवरील आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद प्रणालीची कमतरता ठळकपणे समोर येणे, मुंबई महानगर प्रदेशातील बहुसंख्य स्थानकांवर Emergency Medical Room (EMR), प्रशिक्षित पॅरामेडिक्स किंवा स्थायी रुग्णवाहिका व्यवस्था उपलब्ध नसणे, तसेच BMC–रेल्वे–सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आणि आपत्कालीन परिस्थितीत मानक प्रतिसाद वेळेचे पालन न होता होणारा विलंब, प्रवाशांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करीत असणे, सर्व स्थानकांवरील आपत्कालीन सुविधांचा तातडीने आढावा घेणे आवश्यक असणे, प्रमुख स्थानकांवर स्थायी वैद्यकीय किओस्क व रुग्णवाहिका तैनात करणे आणि रुग्णवाहिका-रेल्वे नियंत्रण कक्ष जवळील रुग्णालय यांच्यात संयुक्त नियंत्रण प्रणाली प्रस्थापित करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

## विवरण क्रमांक - ३६

## लक्षवेधी सूचनेवर अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

## (म.वि.स. नियम १०५ अन्वये )

**निरंक**

***

# लक्षवेधी सूचनेवरील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवणे

## (म.वि.स. नियम १०५ अन्वये)

| अ.क्र. (१) | विषय (२) | उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. | "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." | श्री. दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्याबाबत. | दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. |

***

# विवरण क्रमांक - ३७

शासकीय ठराव

(म.वि.स. नियम ११० अन्वये).

काही नाही

***

# विवरण क्रमांक - ३८

## अशासकीय ठराव

( म.वि.स. नियम १०६ अन्वये)

(१) एकूण आलेले ठराव - २२०
(२) अमान्य झालेले ठराव - ०५८
(३) मान्य झालेले ठराव - १६२

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नाव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १. | "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गांवर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | | | |
| २. | "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावीत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |
| ३. | "दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |
| ५. | "राज्यातील प्रमुख शहरातून मोठ्या प्रमाणात वाढत असलेली अनधिकृत बांधकामे, त्याला आळा घालण्यास स्थानिक संस्थांचे तसेच शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती व समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | ॲड पराग अळवणी, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |
| ६. | "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधांच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधाअभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किंमती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | “राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास  ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे” | श्री. चेतन तुपे, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |
| ८. | “राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवर अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासास होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी तसेच कायद्यामध्ये कडक तरतूदी करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.” | श्री. रोहित पवार, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | “यवतमाळ जिल्ह्यातील झरी, मारेगाव हे आदिवासीबहुल तालुके असून या तालुक्यातील एमआयडीसीमध्ये नवे उद्योग यावेत व त्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावेत यादृष्टीने सदर एमआयडीसीमध्ये आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.” | श्री. संजय देरकर, वि.स.स. | १२ डिसेंबर, २०२५ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही. |

***

# विवरण क्रमांक - ३९

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

(म.वि.स. नियम १९४ अन्वये).

**काही नाही.**

***

# विवरण क्रमांक –४०

## गठित करण्यात आलेली समिती

(म.वि.स. नियम १६३ अन्वये).

| समितीचे नाव | समिती गठीत करण्यात आल्याचा दिनांक |
|---|---|
| विधानमंडळ समित्यांच्या दौऱ्यादरम्यान विधानमंडळ सदस्यांचे आचरण कसे असावे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती गठीत करण्यात आली. | दिनांक १४ डिसेंबर, २०२५ |

*****

# विवरण क्रमांक –४१

## विशेषाधिकारभंग सूचनांसंबधी माहिती

## विधानसभेच्या सन २०२५ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २९ | २९ | श्री. अबू आझमी, वि.स.स. दि. ०४ डिसेंबर, २०२५ | **श्री. अनमोल सागर, आयुक्त, भिवंडी महानगरपालिका, भिवंडी यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "भिवंडी येथे राहणारे नागरिक रियाज आझमी यांच्या जागेवर करण्यात आलेली कारवाई व शदाब उस्मानी आणि स्थानिक नागरिकांनी दिलेल्या विकास आराखडयामधील दिलेल्या समस्यायासंदर्भात महिती घेण्यासाठी तसेच आयुक्त, भिंवडी निजामपूर महानगरपालिका यांची भेट घेण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी दिनांक १४ व २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी श्री. अनमोल सागर, आयुक्त, भिंवडी निजामपूर महानगरपालिका यांना भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता आयुक्तांनी सन्माननीय सदस्यांचा फोन उचलला नाही व "नंतर संपर्क करेल" असा संदेश (एस.एम.एस.) सन्माननीय सदस्यांना पाठवीला परंतु त्यांनतर आयुक्तांनी सन्माननीय सदस्यांसोबत कोणताही संपर्क केला नाही. तसेच | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सन्माननीय सदस्य हे दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी आयुक्तांना भेटण्यसाठी गेले असता आयुक्तांनी लोकप्रतिनिधींशी भेटताना शासन परिपत्रकानुसार पाळावयाच्या राजशिष्टाचाराचे उल्लंघन केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय". | |
| ३० | ३० | श्री. सुरेश धस, वि.स.स. दि. ०९ डिसेंबर, २०२५ | **डॉ. मंगेश गोंदवले, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडे २००८-२०२४ या कालावधीतील १) महामंडळात नोंदणीकृत ११ कंपन्यांची तपशीलवार माहिती २) त्यांच्या कार्यातील अनियमितता व आर्थिक व्यवहारांची नोंद ३) "तुर-सोयाबीन व तेलबिया पिकांची उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकास विशेष कृती योजना" अंतर्गत करण्यात आलेला संपूर्ण खर्च ४) नॅनो युरिया, नॅनो DAP मेटाल्डिहाईड व स्प्रे पंप यांच्या खरेदी प्रक्रियेची नोंदी ५)खरेदीसंबंधी Tenders, Scrutiny Reports, Comparative Statements ६)फाईल नोटिंग्स (File Notings) ७) तत्कालीन कृषी मंत्री मा.धनंजय मुंडे साहेब यांचे टिप्पण्या ८) कृषी सचिवांचे आदेश ९) या संदर्भातील सर्व नस्ती (Files), मंजूर प्रस्ताव, विचारपत्रे यांची माहिती मागीतली असता डॉ. मंगेश गोंदवले, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांनी सन्माननीय सदस्यांना फक्त टेंडर कुणाला दिले यांची प्राथमिक व अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | ३१ | श्री. सुरेश धस, वि.स.स. दि. ०९ डिसेंबर, २०२५ | **अपर मुख्य सचिव, (कृषि), महसुल व कृषि विभाग यांचेविरूध्द.....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, “सन्माननीय सदस्यांनी १) दिनांक २६/०१/२०२५ एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ मूल्य साखळी विकास कार्यक्रम सन २०२४-२५ या योजने विषयी सविस्तर महिति मिळणे बाबत. २) दिनांक १५/०२/२०२५ रोजी सन२०२३-२०२४ व २०२४-२०२५ मध्ये कापूस सोयाबिन व इतर तेलबिया पिकांची उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकाससाठी विशेष कृती योजनेमधील कापूस साठणूक बँक खरेदी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती बाबत. ३) दिनांक १५/०४/२०२५ तत्कालीन कृषि मंत्री श्री. धनंजय मुंडे व यंत्रमाग महामंडळातील अधिकाऱ्यांनी संगनमताने निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप / रिंग करून एकाच घरातील आपसातील नातेवाईकांच्या कंपन्यांना निविदा मुंजूर करून सर्वच निविदा धारकांना पुरवठा आदेश देऊन कापूस साठवणूक बॅग खरेदी ४९.४४ रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबात. ४) दिनांक २६/०५/२०२५ श्री. धनंजय मुंडे तत्कालीन कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी पदाचा गैरवापर करून कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ मूल्य साखळी विकास योजने मध्ये अधिकाऱ्यांच्या संगनमताने नॅनो युरीया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईट किटकनाशक, बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप, कापुस साठवणूक बॅग खरेदीमध्ये केलेल्या कोटयावधी रकमेच्या भ्रष्टाचाराची चौकशी स्वतंत्र SIT नेमून संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत. ५) दिनांक ०१/०७/२०२५ रोजी श्री. विनय आवटे, संचालक कृषी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच तत्कालीन मंत्री यांनी पंतप्रधान पिक विमा योजनेमध्ये केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची, गैरकारभाराची चौकशी ED व CBI मार्फत | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करून दोषीवर फौजदारी करावाई करणे बाबात. ६) दिनांक २८/०७/२०२५ पिक विमा योजने बाबात माहिती मिळण्यबात उपरोक्त पत्रान्वये १) अपर मुख्य सचिव (कृषी), महसूल व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व २) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र शासन, पुणे यांना वारवार अधिकृत माहिती देण्याबाबत विनंती करून सुध्दा सन्माननीय सदस्यांना सदरहू माहिती जाणिवपूर्वक दिली नसल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | |
| ३२ | ३२ | श्री. नारायण पाटील, वि.स.स. दि. ०९ डिसेंबर, २०२५ | **सौ. शिल्पा ठोकडे, तहसिलदार, करमाळा यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाकरीता नागपूर येथे उपस्थित असताना सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करीत असलेल्या करमाळा तालुक्यातील तातडीच्या प्रशासकीय कामानिमित्त दिनांक ०९/१२/२०२५ रोजी सौ. शिल्पा ठोकडे, तहसीलदार, करमाळा यांना सन्मानीय सदस्यांनी वारंवार फोन केला असता त्यांनी त्यांचा फोन उचलला नाही तसेच त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |
| ३३ | ३३ | डॉ. नितीन राऊत, वि.स.स. दि. १२ डिसेंबर, २०२५ | **आयुक्त व प्रशासक, नागपूर महानगरपालिका यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे,"सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करीत असलेल्या मतदारसंघातील माजी नगरसेवक व माजी स्थायी समिती अध्यक्ष यांच्याकडे कोणतेही वैधानिक पद किंवा अधिकार नसताना नागपूर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन / प्रारंभ माजी नगरसेवक व माजी स्थायी समिती अध्यक्ष यांच्याकडून करण्यात आल्यामुळे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी सन्माननीय सदस्यांचा केलेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | ३४ | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. दि. १४ डिसेंबर, २०२५ | **मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "विधानसभेच्या प्रत्येक अधिवेशनात स्विकृत लक्षवेधी सूचना चर्चेसाठी न आल्यास त्या लक्षवेधी सूचनाचे उत्तरे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवण्यात येतात परंतु मार्च २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील १२९ लक्षवेधी सूचना व २०२५ च्या पावसाळी अधिवेशनातील २९२ लक्षवेधी सुचनांची उत्तरे अप्राप्त असल्यामुळे मा. सचिव-२, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदरहू लक्षवेधी सूचनाचे उत्तरे पाठविण्याबाबत सूचित केले होते. ही बाब सन्माननीय सदस्यांनी दिनांक १३/१२/२०२५ रोजी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदर्शनास आणली असता मा. अध्यक्ष यांनी अधिवेशन संपण्यापूर्वी प्रलंबित लक्षवेधी सुचनांची उत्तरे पटलावर ठेवली नाहीत तर मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याविरुध्द हक्कभंग आणण्यात येईल असे निदेश देऊन सुद्धा मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी प्रलंबित सूचनाचे उत्तरे पटलावर ठेवलीनसल्यामुळे सन्माननीय सदस्य व सभागृहाचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |
| ३५ | ३५ | श्रीमती ज्योती गायकवाड, वि.स.स. दि. १४ डिसेंबर, २०२५ | **श्री. विसपुते, सहाय्यक आयुक्त, जी नॉर्थ, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेविरूध्द....**<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या जेंडर बजेट अंतर्गत महिला व बाल कल्याण योजनेतून आर्थिकदृष्टया दुर्बल कुटूंबातील महिलांना शिलाई मशिन, घरघंटी व मसाला कांडप यंत्राचे वितरण करण्यात येते सन्माननीय सदस्या प्रतिनिधित्व करत असलेल्या मतदासंघातील गरीब होतकरु | खुलासा मागविण्याबाबत प्रस्तावित. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | महिलाच्या स्वयंरोजगारासाठी जास्तीत जास्त महिलांचे अर्ज सन्माननीय सदस्यांच्या कार्यालयातून भरुन देण्यात आले आहेत. परंतु श्री. विसपुते, सहायक आयुक्त, जी नॉर्थ, बृहन्मंबई महानगरपालीका, मुंबई यांनी सन्माननीय सदस्या ह्या स्थानिक लोकप्रतिनिधी असून सुध्दा त्यांना विश्वासात न घेता अनेक ठिकाणी महिलांना शिलाई मशिन, घरघंटी व मसाला कांडप यंत्राचे वितरण केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | |

# महाराष्ट्र विधानसभा

## विधानसभेच्या सन २०२५ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या प्रकरणांचे विवरणपत्र.

| अ.क्र.<br>(१) | प्रकरण क्रमांक<br>(२) | प्रकरणाचा विषय<br>(३) | अहवालातील शिफारशी<br>(४) |
|---|---|---|---|
| १. | १ | दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू असताना श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स. यांचे अभ्यागत श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात केलेल्या धक्काबुक्कीमुळे सभागृहाचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण<br>(१) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी चौकशी व अहवाल सादर करण्याकरीता विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केले.<br>(२) दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी विधानसभा सभागृहात अहवाल सादर केला.<br>(३) मा.संसदीय कार्य मंत्र्यांनी मांडलेल्या मा.मुख्य-मंत्र्यांच्या प्रस्तावानुसार सदरहू अहवाल सभागृहाने दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी एकमताने स्विकारला. | दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात धक्काबुक्की करीत अत्यंत आक्षेपार्ह कृत्य करून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा व प्रतिमा मलीन केल्याने उद्भवलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणासंबंधातील विधानसभा विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदरहू अहवालातील समितीच्या अभिप्राय व शिफारशींशी सहमत असून असा ठराव करीत आहे की,<br>१) संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेप्रमाणेच महाराष्ट्र विधानमंडळाची सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २) विधान भवनात येणाऱ्या सर्वच अभ्यागतांसाठी सुरक्षा तज्ञ व सल्लागारांच्या अभिप्रायांनुसार एक स्वतंत्र नियमावली तयार करण्यात यावी व अशा नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.<br>३) अशा प्रसंगाना रोखण्यासाठी किंबहुना अशी घटना घडूच नये म्हणून सुरक्षा तज्ञ व सल्लागार तसेच पोलीस विभागाशी समन्वय ठेऊन प्रभावी अशी सुरक्षा व्यवस्था विधान भवनात निर्माण करण्यात यावी.<br>४) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेशिका वितरण प्रणाली ही महाराष्ट्र पोलीस डेटाबेस बरोबर संलग्न करून त्याद्वारे अभ्यागतांची स्वयंचलित रिअल टाईम पार्श्वभूमी तपासणी प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी. ज्यामध्ये अभ्यागतांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे प्रणालीला दिसून आल्यास त्या अभ्यागताची प्रवेशिका विनंती तात्काळ नाकारली जाईल. याप्रमाणे डिजिटल प्रवेशिका वितरण प्रणाली विधान भवनात या विषयातील तज्ञांच्या सल्ल्यानुसार स्थापित करण्यात यावी.<br>५) विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी विधानमंडळाच्या प्रसिमेत अभ्यागतांना घेऊन येताना दक्षता घ्याव्यात व सर्व सन्माननीय सदस्यांनी अभ्यागतांच्या सुरक्षा तपासणीमध्ये विधानमंडळाच्या सुरक्षा अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य करून एक आदर्श निर्माण करावा तसेच सन्माननीय सदस्यांच्या भेटीला येणाऱ्या अभ्यागतांची सुरक्षा तपासणी व सुरक्षा सूचनांचे सौजन्याने आणि शीघ्रतेने पालन करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६) सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांचे अभ्यागत श्री.सर्जेराव बबन टकले या अभ्यागतांनी प्रवेश नियमांचे उल्लंघन करीत विधान भवनाच्या मुख्य पोर्च येथे विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना केलेल्या धक्काबुक्कीमुळे विधानसभेच्या कामकाजामध्ये प्रत्यक्षपणे व्यत्यय निर्माण झाला. त्यांनी धक्काबुक्कीचे अतिशय आक्षेपार्ह, निंदनीय व गुन्हेगारी स्वरुपाचे गंभीर दुष्कृत्य केले. त्यामुळे विधानसभा सभागृह व विधानसभेचे सन्माननीय सदस्य यांचेबाबत जनमानसात संभ्रम व गैरसमज निर्माण झाला, माध्यमांद्वारे विधानमंडळाबाबत अत्यंत प्रतिकूल वृत्तांकन केले गेले. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य यांच्या प्रतिमेला व प्रतिष्ठेला तडा गेला म्हणून समिती श्री.नितीन हिंदुराव देशमुख व श्री.सर्जेराव बबन टकले यांच्या गंभीर कृत्यांसाठी त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही म्हणून श्री.नितीन हिंदुराव देशमुख त्याचप्रमाणे श्री.सर्जेराव बबन टकले यांना दोन दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी. तसेच त्यांना विधान भवनाच्या मुंबई व नागपूर येथील प्रसिमेत येण्यास या विधानसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत म्हणजेच सन २०२९ पर्यंत बंदी घालण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कारावासात पाठविलेल्या व्यक्तीस विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर मुक्त केले जाते ही वस्तुस्थिती विचारात घेता विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वी संबंधित अवमानकर्ते यांची लगेच मुक्तता होऊन आवश्यक तेवढा त्यांच्या शिक्षेचा कालावधी पूर्ण न झाल्यास विधानसभेच्या एका किंवा अधिक अधिवेशनात त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेचा एकूण कालावधी पूर्ण करण्यासाठी पुढील अधिवेशनात त्यांना पुन्हा कारागृहात पाठविण्यात यावे. |



****

# विवरण क्रमांक - ४२

## सांविधिक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९० अन्वये)

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - ४३

## अंतिम आठवडा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

| अ.क्र.<br>(१) | सदस्यांचे नाव<br>(२) | विषय<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| १. | सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पाटील, अमीन पटेल, अजय चौधरी, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, नारायण पाटील, विकास ठाकरे, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजु खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत | राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती महिला व बालके सुद्धा राज्यात सुरक्षित नसणे, राज्याच्या उपराजधानी असलेल्या नागपूरसह विदर्भात कायदा व सुव्यवस्थेची बिघडलेली परिस्थिती, ता. साक्री (जि. धुळे) येथे यात्रेत गेलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची करण्यात आलेली हत्या, उल्हासनगर येथील एका अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्या आरोपी सोबत असणाऱ्या गावगुंडांनी पीडितेच्या घरासमोरून काढलेली मिरवणूक, मुंबई शहरात गेल्या ६ महिन्यात ४९४ महिलांवर बलात्कार झाल्याच्या घटना घडणे, त्यामुळे मुंबई शहर सुद्धा आता महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नसणे, राज्यात भ्रष्टाचारात | १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा होऊन दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी उत्तर देण्यात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मंगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. | मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, राज्यात घडत असलेला शेकडो कोटी रुपयांचा धान घोटाळा, भ्रष्टाचाराच्या बाबतीत राज्य आघाडीवर असणे, रोजगार हमी योजनेत सर्वाधिक भ्रष्टाचार होत असल्याची बाब उघडकीस येणे, भ्रष्टाचाराच्या व लाचखोरीच्या घटनांमध्ये न्यायाधीशांसह गेल्या १० महिन्यात ६१ वर्ग १ चे अधिकारी अडकले असून याला आळा घालण्याची नितांत आवश्यकता, संतोष देशमुख मृत्यू प्रकरणी अद्यापही आरोपींना अटक झालेली नसणे, कृष्णा आंधळे अद्यापही फरार असणे, मुख्य आरोपीला जामिन मिळण्याची जनमानसांत होत असलेली चर्चा, नांदेड मधील सक्षम ताटे या युवकाची जातीय वादातून झालेली हत्या, अमली पदार्थांच्या तस्करीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून एमडी (मॅफेड्रॉन) या अमली पदार्थाचे उत्पादन आता राज्यातच होत असून यावर नियंत्रण आणण्याची नितांत आवश्यकता, राज्य शासनाच्या महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाप्रमाणे ७३० दिवस बालसंगोपन रजा अनुज्ञेय करण्याची होत असलेली मागणी, सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून सर्वाधिक गुन्हे मुंबईत होत असणे, या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने उपाय करण्याची आवश्यकता, राज्यातील ज्येष्ठ नागरिक असुरक्षित असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ब्युरोच्या अहवालातून स्पष्ट होणे, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना विशेष संरक्षण देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात आलेले अपयश, राज्याची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, राज्यातील वैशिष्टयपूर्ण उत्पादनांना भौगोलिक मानांकन /पेटंट/ट्रेडमार्क देण्याची आवश्यकता, राजकीय विरोधकांवर सूडभावनेने दाखल होत असलेले गुन्हे, पोलिस यंत्रणेचा गैरवापर, सामाजिक राजकीय कार्यकर्त्यांवर होत असलेले हल्ले व ते रोखण्यास पोलिस यंत्रणेला आलेले अपयश, ग्रामीण भागात टोळक्यांची दहशत, अवैध दारूभट्ट्या, वाळू माफिया, गुटखा माफिया सक्रिय होणे, बेरोजगारीमुळे राज्यातील तरुणांमध्ये व महाविद्यालयीन विदयार्थ्यांमध्ये ड्रग्सचे वाढते प्रमाण, मुंबई, पुणे, नागपूर येथे मोठया प्रमाणावर एमडी व अन्य् ड्रग्सचे उत्पादन व साठा होत असणे, राज्यात सर्रासपणे होणाऱ्या अमली पदार्थांच्या विक्रीस आळा घालण्यास शासनाला येत असलेले अपयश, POCSO अंतर्गत गुन्हे ३० ते ३५% ने वाढले असणे, महिला सुरक्षेसाठी पोलिसांची अपुरी यंत्रणा, बीट-मार्शल पेट्रोलिंग कमी असणे, पीडितांना न्याय मिळण्यास प्रचंड विलंब होत असणे, FIR नोंदणीस नकार, तक्रारी दाबण्याचे प्रकार, मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, बंजाराधनगर, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आदिवासी प्रश्न यासंदर्भात राजकीय पातळीवर द्वेषपूर्ण वक्तव्ये व जाणूनबुजून तयार केलेला तणाव, काही पोलीस ठाण्यात तक्रारदारांना वेळेवर FIR न देण्याचे वाढलेले प्रकार, मोक्याच्या ठिकाणी वाढलेले जमीननमाफिया, त्यामध्ये बिल्डररपोलिस व राजकीय हस्तक्षेप होत असणे, नगरविकास विभागाच्या दिनांक १ जानेवारी, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार जे झोपडीधारक पुनर्वसनासाठी पात्र ठरत असतील त्यांच्याकडून शुल्क आकारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने त्वरित धोरण ठरऊन स्वतंत्र कक्ष सुरु करण्याची आवश्यकता, गिरणी कामगारांच्या रखडलेल्या घरांच्या मागण्यांबाबत मा. उप मुख्यमंत्री, नगरविकास यांनी दिनांक १०/०७/२०२५ रोजी कामगार नेते व संबंधित अधिकारी यांची घेतलेली बैठक, बैठकीतील आश्वासनांची अंमलबजावणी न होणे, गिरणी कामगारांचे अनेक वारसदार हक्काच्या घराकरीता अर्ज करण्याचे बाकी असणे, आतापर्यंत २२८६ हून अधिक अर्जांची झालेली नोंद, त्यांना हक्काचे घर मिळण्याबाबत असलेली अपेक्षा, त्यांना तात्काळ अर्ज उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही, वरळी मुंबई येथील हर्मीस हाऊस पुनर्विकास प्रकल्पात (जी/दक्षिण प्रभाग) झालेल्या डीसीपीआर २०३४ नियमन ३३(१२)(A) आणि (B) चा गैरव्यवहार | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झाल्याने दिलेली NOC तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, विदर्भाचा अद्यापही विविध क्षेत्रात अनुशेष असून विदर्भात पाटबंधारे, जलसंपदा प्रकल्प निधी अभावी अर्धवट अवस्थेत असणे, विदर्भ-मराठवाडयातील ग्रामीण रस्त्यांची दुरावस्था असून निधी अभावी अनेक ग्रामीण रस्ते प्रलंबित असणे, परिणामी विदर्भात नविन मोठे उद्योग उभारण्यास येणा-या अडचणी, त्यामुळे बेरोजगारीचे वाढते प्रमाण, अवकाळी पाऊस व दुष्काळ यामुळे शेतीचे अतोनात नुकसान होऊन शेतीसाठी पुरक बाबी निर्माण करण्यात राज्य शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पिकाला हमीभाव मिळत नसल्याने व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात होत असलेल्या आत्महत्या, राज्यात महागाईने सर्व सामान्य जनतेचा गळा आवळल्याने शासना विरोधात नाराजी पसरली असून महागाई कमी करण्यास शासनाला आलेले अपयश,परिणामी विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्यात सर्वसामान्यांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिकमध्ये होत असलेले जमीनी बळकावण्याचे प्रकार, टायटल फसवणूक, बनावट ७/१२ नोंदी भूखंड घोटाळा, मुंढवा, पुणे येथील महार वतनाची जमीन क्षुल्लक किंमतीत देण्याचा प्रकार उघडकीस येणे, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुणे येथील पिंपरी औद्योगिक क्षेत्रात महिला उद्योजकांना सामुहिक गटासाठी  भूखंड क्र. बीजीपी-१०७ शैक्षणिक संस्थेस वाटप  करण्यासाठी राबविलेली निवीदा प्रक्रीया रद्द करून नियमबाह्य राबविण्याचे निदर्शनास येणे, नगरपरिषदेत वैशिष्ट्यपूर्ण कामांमध्ये भ्रष्टाचार, निधी नसताना कामाला मान्यता देण्यात येणे, पाणीपुरवठा स्वच्छता निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार, HAM निविदा सूचनेमध्ये भ्रष्टाचार व mobilasation चार्जच्या नावाखाली वसुली होत असणे, नांदेड महानगरपालिकेत अमृत जल व मलनिःसारण योजनेत भ्रष्ट आणि दर्जाहीन काम झालेले असणे, सदरील कामासाठी शहरातील संपूर्ण नवीन रस्ते खोदकाम करून शहर अस्ताव्यस्त केले गेलेले असणे, सदरील कामामुळे पावसाचे पाणी तुंबून पूर परिस्थिती उद्‌भवणे, पुणे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील गाव मौजे मोशी, तालुका हवेली येथील गट क्रमांक ४५२/१/१ येथील अंदाजे ३२ जमिनींची चतुःसीमा वेगळी दाखऊन संबंधित विकासकाने मोठा भूखंड गिळंकृत करणे, अनेक नगर परिषदेत ओबीसी आरक्षण घोटाळा झाला असून  आधी २७ टक्के आरक्षण दिले असे सांगण्यात येऊन आता मात्र ओबीसी आरक्षण अडचणीत आलेले असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये मान्यतेपेक्षा जास्त कि.मी. रस्त्याला | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मान्यता देण्यात येणे, JJM/MJP केंद्र व राज्यात योजना ठरलेली असताना CMGSY/PMJSY मध्ये कारवाई न होणे, पैसे उपलब्ध नसताना सुप्रमा देणे, निविदेत अनियमितता, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ संबंधित गंभीर गैरव्यवहार, बोगस अपंग प्रमाणपत्र घेऊन नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, राज्यातील उद्योगांमधील गुंतवणुकीची आकडेवारी आणि प्रत्यक्ष गुंतवणूक यातील मोठी तफावत, राज्यातील ढासळलेली आरोग्य व्यवस्था, काटोल, जिल्हा नागपूर येथील संत्रा प्रक्रिया प्रकल्प पुनर्जीवित करण्याची आवश्यकता, चिखली, जिल्हा बुलढाणा येथील ऐतिहासिक विश्रामगृह पडल्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व त्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची होत असलेली मागणी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणातील औषध खरेदी प्रक्रिया सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली असणे,छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने थेट प्राधिकरणाला पत्र लिहून त्यांच्या कार्यालयाला पाठवलेल्या अतिरिक्त औषध पुरवठ्यावर जोरदार आक्षेप घेतला असणे, नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून आरोग्य विभागाची प्रतिमा मलिन केलेली असणे, त्यांच्या कार्यकाळात अनेक गंभीर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्रारी प्राप्त होणे, जालना एमआयडीसी फेज-३, प्लॉट क्र. P-2 मधील सम्यक स्पेसेस क्लस्टरच्या भ्रष्ट संचालक मंडळावर गुन्हे दाखल करून क्लस्टर शासनाने तात्काळ लिलाव करण्याची आवश्यकता, पालघर जिल्हयातील मनोर ग्रामीण रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या प्रिती जाधव या महिलेचा उपचाराअभावी झालेला मृत्यू, कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी जबाबदारी झटकत बाहेरच्या हॉस्पीटलमध्ये जाण्याचा दिलेला सल्ला, राज्यात शिवभोजन योजनेअंतर्गत २२५८ केंद्रे मंजूर करण्यात येणे, त्यापैकी १९७५ केंद्रे सध्या सुरु असणे, एप्रिल, २०२५ पासून शिवभोजन केंद्रांना अनुदान देण्यात न येणे, शिवभोजन केंद्र चालविण्यासाठी व खर्च भागविण्यासाठी केंद्र चालकांना अडचणी येत असणे, गेल्या ८ महिन्यांपासून थकीत असलेले अनुदान केंद्रांना त्वरित देण्याची कारवाई करण्याची आवश्यकता, नागपूर येथील मिहान प्रकल्पात मोठे उद्योग न येणे, रोजगारही न वाढणे, प्रकल्पाबाधित गावातील नागरिकांचे अद्यापही पुनर्वसन पूर्ण न होणे, सन २००० पूर्वीच्या झोपडयांना संरक्षण देऊन झोपडीवासियांचे पुनर्वसन करण्याचा शासनाने निर्णय घेणे, सदर निर्णय केंद्र शासनाच्या रेल्वेच्या जागेवरील झोपडयासंदर्भात लागू नसणे, त्या ठिकाणी हजारो झोपडया असल्यामुळे ह्या झोपडपट्टीवासियां- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चेही पुनर्वसन करण्याची आवश्यकता, विदर्भातील सोयाबीन, धान, कापूस उत्पादक अत्यंत अडचणीत असून अद्यापही शासनाकडून योग्य मदत न मिळणे, पिकाला हमी भाव मिळत नसणे, सरसकट कर्जमाफी करण्याची घोषणा करुनही अद्यापही सरसकट कर्जमाफी न करण्यात येणे, त्यामुळे राज्यातील नागरिकांमध्ये व शेतकरी वर्गात पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही. | |

# विवरण क्रमांक - ४४

## अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसंबंधातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

**निरंक**

***

# विवरण क्रमांक ४५

## सार्वजनिक हितसंबंधातील इतर बाबतीतील प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(१) प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या - ०२

(२) मान्य सूचनांची संख्या - ०२

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - ०२

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, शेखर निकम, प्रशांत बंब, दिपक केसरकर, संजय बनसोडे, संभाजी निलंगेकर-पाटील, तानाजी सावंत, अनिल पाटील, सुभाष देशमुख, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, सुरेश धस, राजेंद्र | "राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वंकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्विकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहिर करून शेतकऱ्यांना तात्कालीक दिलासा देण्यात येणे, जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, बुजलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई | ९ व ११ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा होऊन दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी उत्तर देण्यात आले |

| | | | |
|---|---|---|---|
| | गावित, दौलत दरोडा, तानाजी मुटकुळे, विजय शिवतारे, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बबनराव लोणीकर, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. प्रवीण दटके, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, विजय देशमुख, विलास तरे, काशिनाथ दाते, सुरेश भोळे, चंद्रदिप नरके, सचिन पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, रमेश कराड, मंगेश कुडाळकर, मंगेश चव्हाण, किशोर पाटील, समाधान आवताडे, शांताराम मोरे, | देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणाऱ्या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसूली थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेले निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करून मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे, शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृध्द झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांना तातडीने मदत देण्याची यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा हिंस्त्र व वन्य प्राण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतकऱ्यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपण घालण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करून राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रामीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाडयासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करून बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. संजय कुटे, सर्वश्री प्रकाश सुर्वे, मोहन मते, निलेश राणे, हरिष पिंपळे, तुकाराम काते, समीर कुणावार, अशोक पाटील, श्रीमती अनुराधा चव्हाण, श्री. चंद्रकांत सोनवणे, श्रीमती मोनिका राजळे, श्री. बालाजी कल्याणकर, श्रीमती सीमाताई हिरे, श्री. सुहास कांदे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री संजय गायकवाड, संतोष दानवे, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री चैनसुख संचेती, महेंद्र थोरवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री महेंद्र दळवी, नारायण कुचे, चंद्रकांत पाटील, किर्तीकुमार भांगडीया, संतोष बांगर, किशोर जोरगेवार, | दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्हयात उभारण्यात येत असलेले उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीड" हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतकऱ्यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रति कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना विम्याद्वारे प्रति हेक्टर रुपये १७ हजार मदत देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येणे इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वंकष मदत देऊन शेतकऱ्यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशारीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाड्यासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत सभागृहात विचार-विनिमय करून राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |

| | | | |
|---|---|---|---|
| | विश्वनाथ भोईर, गोपिचंद पडळकर, दिलीप लांडे, राजेश पवार, महेश शिंदे, राणाजगजितसिंह पाटील, आमश्या पाडवी, हिकमत उढाण, सुरेश खाडे, बाबुराव कदम-कोहळीकर, विक्रम पाचपुते, अमोल खताळ, सत्यजित देशमुख, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री मनोज घोरपडे, आनंद तिडके, डॉ. विजयकुमार गावित, सर्वश्री मुरजी पटेल, राजेश पाडवी, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, देवराव भोंगळे, सुहास बाबर, करण देवतळे, विलास भुमरे, तुषार राठोड, राजेश मोरे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | विठ्ठल लंघे, सुमित वानखेडे, किरण सांमत, डॉ. आशिष देशमुख, ॲड. राहुल कुल, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री महेश लांडगे, शिवाजी पाटील, सिध्दार्थ शिरोळे, शंकर जगताप, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री देवेंद्र कोठे, अमल महाडिक, सुधीर गाडगीळ, राघवेंद्र पाटील, प्रविण तायडे, राजेश बकाने, अमोल जावळे, प्रकाश भारसाकळे, समीर मेघे, उमेश यावलकर, प्रताप अडसड, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, काशिराम पावरा, अनुपभैय्या अग्रवाल, किसन वानखेडे, चरणसिंग ठाकूर, राजेश वानखडे, | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, संजय पुराम, राजू तोडसाम, भीमराव केराम, दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री भिमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, रविशेठ पाटील, राहुल आवाडे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, वि.स.स. | | |
| २. | सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, | जून ते सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी-ओला दुष्काळ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल होणे, शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी न होणे, बहुतेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तुटपुंजी मदत मिळणे, शेतीचे पंचनामे करण्यास प्रशासनाकडून विलंब होत असल्याने निधी वितरणात गोंधळ उडालेला असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्यांचा धोका वाढणे, मुंबई-नागपूर-चंद्रपूर, पुणे-ठाणे इत्यादी शहरांमध्ये हवेचे गंभीर प्रदूषण वाढले असल्याने हवेची गुणवत्ता धोक्याच्या पातळीवर गेल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणे, प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची कार्यवाही अपुरी असणे, बेरोजगारीमुळे तरुणाईमध्ये ड्रग्सचे वाढते प्रमाण, मुंबई-पुणे-नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर एम.डी. (मेथ) व अन्य ड्रग्सचे उत्पादन, वाहतूक व साठा आढळणे, महाविद्यालयीन तरुणाईला ड्रग्सचा विळखा पडला असून सर्रासपणे होणाऱ्या अंमली पदार्थांच्या विक्रीस आळा बसविण्याबाबत | ११, १२ व १३ डिसेंबर, २०२५ रोजी चर्चा होऊन दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी उत्तर देण्यात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संदिप क्षिरसागर, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, अभिजीत पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनिल मांगुळकर, नारायण पाटील, राजु खरे, वि.स.स. | शासनाला येत असलेले अपयश, सन २०२६ मधील नाशिक येथील कुंभमेळयाची तयारी सुरु असून यासाठी पुरातन वारसा असलेल्या तपोवन परिसरातील हजारो झाडांची कत्तल करून पर्यावरणीय संतुलन बिघडून हरितपट्टा नष्ट होण्याचा धोका निर्माण होणे, तपोवन परिसरातील वृक्षतोडीला समाजातील विविध माध्यमातून विरोध दर्शविला असणे, मातृभाषा-आधारित शिक्षण पद्धतीच्या विरोधात निर्णय घेऊन इयत्ता १ ते ३ पर्यंत “तिसरी भाषा” अनिवार्य हिंदी भाषा थोपवली जात असणे, मुंबईतील महानगरपालिकेच्या मराठी शाळा बंद पडत असणे, मुंबईतील शासकीय स्थळांचे खाजगीकरण होत असणे, राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटची अंमलबजावणी करतांना मराठा विरुध्द इतर मागासवर्ग, धनगर व बंजारा विरुध्द आदिवासी असा वाद निर्माण करून सहिष्णुता संपुष्टात आणणे, राज्यातील विविध प्रशासकिय विभागांमध्ये सध्या गंभीर अनियमितता, धोरणात्मक त्रुटी, भ्रष्टाचार, निधी अभाव आणि अंमलबजावणीतील शिथिलता दिसून येणे, याचा थेट परिणाम राज्याच्या विकासकामांवर, शेतकरी वर्गावर, महिला-बालकांच्या आरोग्यावर, शहर व ग्रामीण विकासावर, पर्यावरणावर तसेच कायदा-सुव्यवस्थेवर होत असणे, मागील काही महिन्यांपासून अनेक समाजोपयोगी योजना बंद करण्यात येणे, त्यात आनंदाचा शिधा, एक रुपयात पीकविमा, स्वच्छता मॉनिटर, एक राज्य एक गणवेश, लाडक्या भावाला अपरेंटीसशिप, योजनादूत योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना इत्यादी महत्वाच्या योजना बंद करण्यात येऊन त्यांचा निधी इतरत्र वळविणे, सामाजिक न्याय, आदिवासी, महिला व बालविकास, ग्रामविकास आदी विभागांच्या अनेक योजना बंद किंवा ठप्प झालेल्या असणे, महिला व बालविकास विभागातील आदर्श अंगणवाडी “स्मार्ट किट” खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अनियमित खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असणे, किटचे निकृष्ट दर्जाचे साहित्य असल्याने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा न | |

